


# माणसं : भेटलेली न भेटलेली



राजू परूळेकर

प्रकाशिका
सौ.सुप्रिया शरद मराठे
नवचैतन्य प्रकाशन
न्यू गजांत को.ऑप.हौ.सो.लि.
ब्लॉक नं.सी/११, तळमजला,
कोसांगोनगर, फलाय ओव्हरखाली,
एस.व्ही.रोड, ए
बोरिवली (प.), मुंबई - ४०० ०९२
दूरध्वनी : २८६४५२१२

*

सुप्रिया राजू परुळेकर
बी १००३, विनी टॉवर, इन्फन्ट जीझस शाळेसमोर,
ऑफ लिंक रोड, ऑफ चिंचोली बंदर रोड,
मालाड (प.), मुंबई - ४०० ०६४
भ्रमणध्वनी : ९८२०१२४४१९
web : www.rajuparulekar.us
email : raju.parulekar@gmail.com
rajuparulekar@rajuparulekar.com

*

प्रथमवृत्ती : ऑक्टोंबर २००६
सुधारित द्वितीयवृत्ती : ४ जुलै २०१०

*

मुखपृष्ठ/रेखाटने : मनोज आचार्य
दूरध्वनी : २५०९०१७

*

मूल्य : ३०० रुपये

ग्रंथबांधणी :
साईकृपा बुक बाईडिंग
लक्ष्मी अपार्टमेंन्ट
३४४, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

*

अक्षरजुळणी :
सौ.चेतन विकास बडके
शब्दमाधुरी, पुणे
भ्रमणध्वनी : ९८९०९८४९२७

*

मुद्रक :
शामला अनंत चिंचणीकर
माधुरी मुद्रण
४५१/१/२, बहिरट-पाटील सदन,
गणपती चौक, शिवाजीनगर
गावठाण,
शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

# अनुक्रम

## नांदी

❖ श्रीगणेश ........ ११

## आठवणीतले काही

❖ विजय तेंडुलकर ........ १७
❖ प्रिया आणि राजू ........ ३०
❖ राज आणि फोटोबायोग्रफी ........ ४६

## सर्वसत्ताधीश

❖ हिटलर ........ ५५
❖ बेनिटो मुसोलिनी ........ ५९
❖ डेंग झिआओ पेंग ........ ६३
❖ महाराजा ........ ६७
❖ वेलुपिल्लई प्रभाकरन ........ ७१

## नेते जनतेचे

❖ लोकमान्य टिळक ........ ७९
❖ गांधीजी ........ ८३
❖ नेताजी सुभाषचंद्र बोस ........ ८७
❖ सावरकर ........ ९१
❖ जयप्रकाश नारायण ........ ९५
❖ राम मनोहर लोहिया ........ ९९

❖ महात्मा जोतिराव फुले ........................................ १०३
❖ बाळासाहेब देवरस ........................................ १०७
❖ गोळवलकर गुरुजी ........................................ १११

## राजकीय नेते

❖ अटलबिहारी वाजपेयी ........................................ ११७
❖ परवेझ मुशर्रफ ........................................ १२०
❖ जॉर्ज बुश (ज्युनिअर) ........................................ १२४
❖ लालकृष्ण आडवाणी ........................................ १२८
❖ प्रमोद महाजन ........................................ १३२
❖ लालूप्रसाद यादव ........................................ १३६
❖ डॉ.मनमोहन सिंग ........................................ १३९
❖ नरसिंह राव ........................................ १४३
❖ जॉर्ज ........................................ १४७
❖ सोरेन गुरुजी ........................................ १५०
❖ सुशीलकुमार शिंदे ........................................ १५३
❖ नरेंद्र मोदी ........................................ १५७
❖ रामविलास पासवान ........................................ १६२
❖ विलासराव देशमुख ........................................ १६६
❖ जे.जयललिता ........................................ १७०
❖ मायावती ........................................ १७४
❖ आर.आर.पाटील (आबा) ........................................ १७८

## फॅमिली

❖ सर इंदिरा ........................................ १८५

❖ सोनिया फॅक्टर ........................................................ १८८
❖ राहुल गांधी ........................................................ १९२

## संत

❖ आदिशंकराचार्य ........................................................ १९९
❖ समर्थ कवी रामदास ........................................................ २०३
❖ विनोबा भावे ........................................................ २०९
❖ रजनीश ओशो ........................................................ २११

## वाचलेले कुणी

❖ नरहर अंबादास कुरुंदकर ........................................................ २१७
❖ भालचंद्र नेमाडे ........................................................ २२१
❖ कवी नारायण सुर्वे ........................................................ २२५
❖ श्रीपु ........................................................ २२८
❖ जीए ........................................................ २३२
❖ अरुण साधू ........................................................ २३६
❖ बाबासाहेब पुरंदरे ........................................................ २४०
❖ पीटर ड्रकर ........................................................ २४४

## मैत्र

❖ कुमार केतकर ........................................................ २५१

❖ बंग ........................................ २५६
❖ अनंत सामंत ........................................ २५९
❖ सुनील कर्णिक ........................................ २६३
❖ विनय सहस्त्रबुध्दे ........................................ २६७
❖ डॉ.प्रकाश आमटे ........................................ २७१
❖ अविनाश धर्माधिकारी ........................................ २७५
❖ साळगावकर ........................................ २७९
❖ डॉ.प्रवीण म्हात्रे ........................................ २८३
❖ अच्यूत गोडबोले ........................................ २८७
❖ सुरेश खोपडे ........................................ २९०
❖ दत्ता इस्वलकर ........................................ २९४
❖ संजय मेमाणे ........................................ २९८
❖ डॉ.राजीव कर्णिक ........................................ ३०२

## अखंड धडपड

❖ माधव गडकरी ........................................ ३०९
❖ मेधा पाटकर ........................................ ३१३
❖ अण्णा हजारे ........................................ ३१६

## तारे

❖ लता मंगेशकर ........................................ ३२३
❖ अमिताभ ........................................ ३२७
❖ सचिन तेंडुलकर ........................................ ३३०
❖ शाहरुख खान ........................................ ३३४

## भैरवी

❖ नदिरा ........................................................... ३४१
❖ परवीन बाबी ........................................................ ३४५

# नांदी

## श्रीगणेश

**श्री**गणेशाच्या आगमनाबरोबर महाराष्ट्रात सणांच्या उत्साहाला सुरुवात होते. गणपती येणार म्हटल्यावर मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात व्यक्ती आणि समाजपुरुष ताजा आणि टवटवीत होतो. गणेश ही आदरणीय पाहुणा असलेली व्यक्ती होऊन जाते. माझ्या लहानपणी गणपतीसाठी आम्ही कोकणात जात असू. गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी संध्याकाळी आमच्या प्रचंड मोठया वाडयातल्या एका आतल्या खोलीत श्रीगणेशाची मूर्ती आणून ठेवली जात असे. बहुतेक वेळा हे काम माझे मूर्ती पाहून मन भरुन येत असे.

आजोबा करत असत. मग मला नेऊन त्या खोलीतल्या आदरणीय पाहुण्याचे दर्शन घडवत. त्या वयातही ती श्रीगणेशाची प्रसन्न

मग दुसऱ्या दिवसापासून चतुर्थीची धमाल सुरु होत असे. श्रीगणेश चतुर्थीला फटाके, मोदक, फराळ सारी साग्रसंगीत तयार असे म्हणजे आता आपण दिवाळीत जी धमाल मुंबईत बघतो तीच धमाल कोकणातल्या गणपतीची असते. मला तर आत्ता लिहिताना धूप, चंदन, अगरबत्तीचा वास ताजा होऊन त्याची जाणीव नाकाला होते आहे. त्या वासशी श्रीगणेशाचा दाट संबंध आहे अशी माझी धारणाच होऊन गेलीय. आजही तो वास मला कुठेही आला तरी मला गणेशोत्सव सुरु झाला आहे असे वाटते. पुढे जेव्हा श्रीगणेशाच्या विसर्जनाची वेळ जवळ येत असे तसा मी हमसाहमसी रडत असे. आजी मग समजूत घालत असे.- ‘ पुढच्या वर्षी बाप्पा परत येणाराय. रडायचं नाही.’ मग मुष्किलीने मी रडे आवरत असे.

आज मी त्या गणेशोत्सवाचा विचार करतो तेंव्हा माझ्या लक्षात दोन गोष्टी येतात. श्रीगणेशविसर्जन हे प्रतिकात्मक आहे. गोष्ट कितीही प्रिय असली तरी भौतिक जगात तिचा वियोज हा अटळ आहे. मग ती व्यक्ती असो, वस्तू असो वा पद, याची शिकवण श्रीगणेशविसर्जनाचा क्षण करुन देतो. दुसरं म्हणजे, परत पुढच्या वर्षी श्रीगणेश येणारच आहेत, म्हणजे दुःख आणि आनंदाचं हे चक्र अव्याहतपणे चालूच राहणार आहे. वियोग आणि मीलन हा या चक्राचाच भाग आहे. त्यामुळे कुठच्याही गोष्टींच्या प्राप्तीने हर्ष होणं आणि कुठच्याही गोष्टीच्या वियोगाने शोक करणं हे अज्ञानीपणाचं आहे, असा संदेश श्रीगणेश आपल्याला देतो. दृष्टी ‘ सम ’ करण्याचा हा श्रीगणेशाचा संदेश फार थोडयांच्या पचनी पडतो; परंतु ज्यांच्या पचनी पडतो तो पडतो ते खऱ्या अर्थाने गाणपत्य बनतात. इथे ‘ गाणपत्य ’ चा रुढ अर्थ मी गृहीत धरत नाही. श्रीगणेशाबाबत एक गोष्ट फार बोलकी आहे. पुरणातल्या सर्व देव-देवतांचा कुठे ना कुठे, कधी ना कधी पराभव झालेला आहे; परंतु श्रीगणेश हा कायम अजिंक्य, अपराजेय राहिलेला आहे. ज्ञात-अज्ञात सर्व युध्दांत श्रीगणेशाचा विजयच झालेला आहे. अर्थात ‘ गाणपत्य ’ असणाऱ्या प्रत्येकाचा असाच विजय अपेक्षित आहे; पण खरा ‘ गाणपत्य ’ तो असतो ज्याची आयुष्याचीप्रती दृष्टी ‘ सम ’ झालेली असते. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक त्या अर्थाने खरे ‘ गाणपत्य ’

होते. मुलगा गेल्यावर जो माणूस, ‘ गावाची होळी पेटली तर आपल्या घरच्या चार गोवऱ्या जाणारच, ’ असं म्हणतो, तो खरा माणूस प्राप्ती आणि वियोगाकडे किती ‘सम ’

दृष्टीने पाहतो हेच दिसून येते. त्यामुळे श्रीगणेशाने सार्वजनिक गणेशोत्सवाचं जनकत्व लोकमान्य टिळकांकडे सोपवलं त्यात नवल ते काय ?

श्रीगणेशावर अनेक माणसांनी अनेक पुस्तकं लिहिलेली आहेत. एलिस गेटी या परकीय माणसाने Ganesha नावाचं एक अप्रतिम पुस्तक लिहिलेलं आहे. त्यात त्यांनी ‘ विप्राणां दैवतं शंभू शुद्राणां गणनायकः’ हा श्लोक दाखवून वेदांमध्ये श्रीगणेशाचा उल्लेख नाही, हे सप्रमाण सिध्द केलेलं आहे. मी स्वतः याच्याशी सहमत आहे. गेटींच्या मते, श्रीगणेश हे आर्यांचं दैवत नसून अनार्यांचं दैवत आहे. यातला मजेदार असा गमतीशीर योगायोग असा की, पुढे १८९३ पासून कसब्याच्या गणपतीपासून सुरुवात करुन टिळकांनी पुण्यात सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. ज्या उत्सवासंबंधी दर वर्षी लिहिताना ‘ केसरी’ मध्ये लोकमान्य टिळक, हा गणेशोत्सव साळी, माळी, सुतार, रंगारी, ब्राम्हण, व्यापारी, मारवाडी, चांभार, कुंभार, सोनार, वाणी वगैरे सर्वांनी एकोप्याने साजरा केला, हे आग्रहाने प्रतिपादन करतात. अजून एक गंमत म्हणजे खुद्द टिळकांनासुध्दा तेला-तांबोळयांचे पुढारी म्हणूनच ओळखले जाते. ब्राम्हणांचे नाही ! श्रीगणेश हासुध्दा त्या अर्थाने सर्व जाती-जमातींचा नायक आहे. श्रीगणेश हा धर्मातीत आहे. त्याची अनुभूती ही अस्तित्वाशीच निगडित आहे. ख्रिश्चन, मुसलमान, पारशी, जैन, हिंदू कुणीही असो, श्रीगणेशाच्या अनुभूतीपलीकडे किंवा अलिकडे काहीच नाही. उगाच नाही श्रीगणेशाला ब्रम्हांडनायक म्हणत !

‘ सर्व जगदिदं त्वत् तो जायते सर्व जगदिदं त्वत्तस्तिष्ठति । सर्व जगदिदं त्वयि लयमेष्यति’ असं अथर्वशीर्षांमध्ये गणेशस्वरुपाचं वर्णन केलेलं आहे. श्रीगणेश हा ओंकार स्वरुप असल्याने या विश्वाच्या आदि, मध्य आणि अत या तिन्ही अनुभूतींच्या पलीकडे तोच तो भरुन राहिलेला आहे, असे योगशास्त्र मानते.

महाकवी ज्ञानेश्वरांनी श्रीगणेशाचे वर्णन फार उत्कटतेने केलेले आहे :

*अकार चरणयुगल ।*
*उकार उदर विशाल ।*
*मकार महामंडल मस्तकाकारें ॥ ९ ॥*
*हे तिन्ही एकवटले ।*
*तेथ शब्दब्रम्ह कवळले ।*

*ते मियां श्रीगुरुकृपा नमिले ।*
*आदिबीज ॥ १० ॥*

# आठवणीतले काही

# विजय तेंडुलकर

**मा**झ्यासारखाच कुणाचाही जन्म पंचवीस-सव्वीस वर्षांपूर्वी झालेला असेल. मी मराठी भाषक असेन, मी लिहीत असने. माझं मराठी भाषेवर खास प्रेम नसेल. मला मराठी भाषेचा अभिमान तर अजिबात नसेल. कारण भाषा हे माध्यम आहे, ते वापरणाऱ्याच्या कुशलतेवर अवलंबून आहे, याची मला जाणीव असेल. मराठी भाषा, ज्ञानेश्वरांसारखे मोजके अपवाद वगळले तर बटबटीत उपदेश व ढोबळ पत्रकी जाहिरातींचा इतिहास असलेली भाषा, त्यामुळे ह्या भाषेत जन्म घेतलेल्या माणसाला प्रतिभा म्हणजे जाहिरात व

लेखन म्हणजे संदेश वा उपदेश वाटणं हे माझ्या भाषेचं व भाषकांचं प्राक्तन मला ठाऊक असले. तरीही मी लिहू इच्छित असने, तर मला किंवा माझ्यासारख्याच कुणालाही विजय तेंडुलकर अटळ आहेत.

लहानपणापासून मराठी भाषा शिकताना आणि मराठी ' साहित्य ' वाचताना, जगात साहित्य म्हणजे विरंगुळयाबरोबर येणारा उपदेश असा समज पक्का होत गेला. ज्या दोन-तीन लेखकांनी हा समज पुसून टाकला, त्यात तेंडुलकर बिनीचे होते. तेंडुलकरांचे लेखन समजायची संवेदना लाभलेला प्रत्येक मराठी माणूस तेंडुलकरांचा ऋणी आहे.

लेखक विजय तेंडुलकरांवर लिहिताना कुणालाही दोन गोष्टी कराव्याच लागतील. पहिलं म्हणजे, मराठी समाजाचा इतिहास वरवर का होईना पडताळून पाहावा लागेल. दुसरं म्हणजे, त्या इतिहासाबाबत पुरोगामी-प्रतिगामी असे भ्रम डोक्यात निर्माण झालेले असतील तर ते काढून टाकावे लागतील. हया समाजाच्या राजकीय व सामाजिक इतिहासात व जीवनपध्दतीत ज्या काही घडामोडी घडल्या त्यातून कला व साहित्याबाबतची काही ठोस सूत्रं निर्माण झाली. ती सूत्रंच कलेची व साहित्याची मानकं व मापदंड ठरु लागली. ' माणूस हा स्खलनशील प्राणी नसून तो एक पूर्ण दैवगुणसंपन्न सजीव आहे' हे असंच एक ' सगुण' सूत्र. हे सूत्र अनुस्यूत मानून जी वा जे प्रसवली वा प्रसवले जाते ती कला वा ते साहित्य. अशा कलेला व साहित्याला संस्कृतिपूर्णपणेचा व शुचितेचाही वरदहस्त असतोच. त्यामुळे त्या सूत्राच्या बळावरच मराठीतला साहित्यव्यापार व कलाव्यापार डोलत असतो, हा पक्का समज.

मग खूप वर्षांपूर्वी तेंडुलकर लिहू लागले. त्यांनी प्रतिभेच्या बळावर ही सगुण सूत्रं उलटीपालटी करुन टाकली. हया सूत्रांचा उलटेपणा तेंडुलकरांचं श्रेष्ठ लेखकपण सिध्द करतोच; पण हया सगुण सूत्रातल्या अतिमानवीपणाला मानवी पातळीला आणून ठेवण्याचं काम करणाऱ्या प्रतिभेच्या मागे असलेल्य तेंडुलकर नावाच्या माणसालाबद्दल कुतूहज वाढत जातं.

तेंडुलकरांनी नेमकं वेगळं काय केलं ? हया प्रश्नाचं उत्तर इतिहासाच्या संदर्भाशिवाय देणं अशक्य आहे. तेंडुलकरांनी जो प्रवाह निर्माण केला त्याचे ते स्वतःच जनक होते. ऐकणाऱ्यावर चकित करुन, छाप टाकण्याचा प्रयत्न म्हणून स्वतःच्या वेगळेपणाच्या शोधात गेली कित्येक वर्ष असणारे महेश

एलकुंचवारांसारखे एक्झिबिशनिस्ट, मामा वरेरकरांना तेंडुलकरांचे पूर्वसुरी घोषित करतात व मोठाच शोध लावल्याचा आविर्भाव आणतात. खरं तर वरेरकर

पूर्वसुरीच असतील तर ते एलकुंचलवारांचे; कारण एलकुंचवारांच्या वर उल्लेखिलेल्या विधानांप्रमाणेच नाटके लिहिण्याचे धाडस त्यांच्याकडे होते ! वस्तुनिष्ठपणे विचार केल्यास साहित्यप्रवाह व लेखनशैली यांचा अभ्यास करणाऱ्या कुणाही संवेदनाशील माणसाला तेंडुलकरांच्या प्रवाहाचे ते स्वतःच मूळ पुरुष होते, हे लक्षात येईल. हे सारे मी माझ्या पध्दतीनं पाहतोय.

मी ज्या घरात जन्माला आलो ते घर मराठीतल्या ग्रामीण व शहरी संदवेदनांच्या मध्यावर येणारं होतं असं म्हणता येऊ शकेल. सुशिक्षितता तीन-चार पदव्यांनी मढलेली असली तरी कोणत्याही आधुनिक सांस्कृतिक संकल्पनांचा वारा आमच्या घराला लागेला नव्हता. मुलाचा ‘ सर्वांगीण विकास’ वगैरे संकल्पना माझ्या आईबापांना कधी शिवल्याही नाहीत; आजही शिवत नसाव्यात. तांत्रिकदृष्टया आम्ही उच्चभ्रू असूनही मुलाला रग्गड खायला घालून तीन ऋतूंबरहुकूम कपडे दिले की, मुलं एके दिवशी कमावती होतात, हाच त्यांचा विकास होय, हया संस्कृतीच्या कल्पना आमच्या घरात मौजुद होत्या, आजही आहेत. तेंव्हा ग्लुकोज बिस्किटे ही आधुनिकता होती. आज मायक्रोसॉफट कॉम्प्युटर ही आधुनिकता आहे आमच्या घरात. माझे घर हे एक प्रगतिनिधिक घर होते.

त्या वेळी आणि आजही महाराष्ट्रातली हजारभरं घरं वगळता महाराष्ट्रातल्या सुशिक्षित पिढया अशाच वाढल्या. अपवाद फक्त सुशिक्षिततेबरोबर ब्राम्हण व सांस्कृतिक संचिताला आकार देण्याची काळजी असलेल्या हया हजार घरांचा होता. ती हजार घरं कुवतीनुसार महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताला आकार देत होती. तबला शिकत होती, हार्मोनियमचे क्लास करता करता जर्मनही शिकत होती. बॅडमिंटनच्या कोचिंग व पोहण्याच्या क्लासेसबरोबर कलावाद की जीवनवाद हयाच्यावर चिंता करत होती. आजही मानसिक विकासासाठी डॉ.आनंद नाडकर्णीच्या भाषणांपासून ते अण्णा वैद्यांच्या क्रिकेट कोचिंग क्लासमध्ये तीच हजार घरे दाटताना दिसतील.

हया घरांत सर्व जातिधर्माची घरे होती. त्यांचे ब्राम्हण हे विशिष्ट व्याख्येनं निर्धारीत झालेले होते. हया घरांमध्ये आजोबांनी नातवाला दाखवायची नाटकं होती. वडलांनी मुलांना द्यावयाची पुस्तकं होती. आईनं मुलीबरोबर पाहायचे सिनेमे होते.

तेंडुलकरांबद्‌दल वाचून (त्यांच्यासंबंधी त्यांनी व इतरांनी) एवढं कळते की, त्यांचा जन्म हया हजार घरांतलं एक म्हणावं अशा घरात झाला. त्यांच्या घरात

कला, नाटकं वगैरे गोष्टींबाबत जाण होती. ती मुलांमध्ये उतरावी यासाठी थोडेफार प्रयत्न केले जात असावेत.

पण तेंडुलकर नंतरच्या आयुष्यात स्वतः घडत गेले, स्वतःला घडवत गेले; जे कृष्णमूर्तीप्रमाणे; हया घरांनी ठरवलेली मानकं, मापदंड त्यांच्या सांस्कृतिक शुचिता विसर्जित करत गेले. विसर्जित करत गेले म्हणण्यापेक्षा तेंडुलकरांनी हे सारं मुळातून उखडून भिरकावून दिलं, असं म्हणणं अधिक योग्य. तेंडुलकर एका प्रवाहाचे मूळ उत्तरोत्तर घडत गेले. 'गृहस्थ' पासून 'सफर' पर्यंतचा नुसता नाटकांचा प्रवाससुध्दा तेंडुलकरांच्या मूळ पुरुषपणाची साक्ष ठरतो. या प्रवासात त्यांनी एकांकिका लिहिल्या, ललितलेखन केलं, कथा लिहिल्या. हे सारं वेगवेगळं केलं, दृक्-श्राव्य खेळ केले, सिनेमांच्या पटकथा लिहिल्या. हे सारं वेगवेगळं किंवा एकत्र घेतलं तरी तेंडुलकरांचं मूळ पुरुषपण किती सौष्ठवपूर्ण, अनेकपदरी व मूलभूत आहे ते लक्षात येतं. तेंडुलकरांच्या प्रत्येक कृतीनं, लेखनानं ती हजार मूल्यमापक घरं घाबरली, सैरावैरा झाली, कोंडलेल्या मांजरीप्रमाणे हिंस्त्र झाली. तेंडुलकरांना ओरबाडून परपीडनाचा आनंद घेती झाली. अगदी हजारभर घरं हेही खरं नव्हे.

त्या हजारभर घरांत अर्धा टक्का अपवादात्मक घरं होतीही. ती वैश्विकतेचा अर्थ उमगून होती. त्यामुळे इथल्या जीवनपध्दतीतला आणि इथल्या सगुण सूत्रातला ढोंगी नपुंसकपणा त्यांनी जाणला होता. अशा पार्श्वभूमीवर तेंडुलकरांचं श्रेष्ठतव ती घरं जाणून होती; पण अशा अपवादात्मक अर्धा टक्का घरांवर सिनिसिझमचा जबरदस्त पगडा होता.

याउलट त्या हजार घरात पाच-दहा टक्के घरं अशी होती, ज्यांनी तेंडुलकरी आक्रमणाच्या दिंडया पताका वाहिल्या आणि हया आक्रमणाला आपल्या छान घरटयाच्या चौकटीत, पाट-चौरंग देऊन, रांगोळी काढून समाविष्ट करण्याचा त्थ्यांचा प्रयत्न होता ! स्वतःला पुरोगामी ठरवण्याच्या त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांचा तो एक भाग होता. लेखक तेंडुलकर त्या घरांच्याही कवेत कधी आले नाहीत. माणूस तेंडुलकर मात्र बऱ्याचदा त्यांच्या पाटाचा सस्मित स्वीकार करीत राहिले. ते अटळच होतं. कारण जगताना आजुबाजूला, त्यातल्या त्यात जवळच्या माणसांची निवड, असलेल्या माणसांमधूनच करायची होती. तिथे योग्यतेचा प्रश्न नव्हता. ठरवूनही कोस्लर व बोव्हा प्राप्त नव्हते. तेंव्हा पुरोगाती असल्यास, दामले व दातार स्वीकारणं भाग होतं !

प्रश्न हा होता की, तेंडुलकरांचं लेखन म्हणून आक्रमण कशावर होतं ?

मुळात तेंडुलकरांनी माणूस म्हणून किंवा लेखक म्हणून अभिनिवेश आणल्याचं मला तरी (माहीत असलेल्यामधून) स्मरत नाही. त्यांच्या लेखनाला ‘ आक्रमक ’ हे विशेषण त्या अर्थानं लागत नाही. तेंडुलकरांनी मराठी साहित्यात एक आरसा आणला. त्यांच्या सुरुवातीच्या लेखनातही ते तो वाचकांसमोर ठेवत होते. त्या आरशाची उपद्रवक्षमता सुरुवातीला सूक्ष्म होती. तेंडुलकरांमधला लेखक जसजसा प्रसरण पावत गेला, तसतसा हा आरसा त्यात पाहणाऱ्या माणसाचं ‘ पाहाल ते रुप’ पाहण्याचा आनंद हिरावून घेत गेला. स्वतःतली स्थलकालसापेक्ष भीतीदायक सत्यं तुम्हाला ठोक उत्तर न देता प्रश्नोपनिषदात गुंतवत नेतात. हे एका वाक्यात लिहिणं जेवढं सोपं, तेवढं साहित्यात उभं करणं कठीण. तेंडुलकरांनी ते केलं. तसं करुन तेंडुलकरांनी इथली एक पळवाट नष्ट करुन टाकली. वर्षापासून ही पळवाट इथल्या हजार घरांनी मळलेली होती व त्या वाटेकडे उरलेली लाखो घरं कलेचा हेतू म्हणून पाहात होती.

इथल्या समाजमनाला लेखनातून, कलेतून विरेचन शोधण्याचं एवढं व्यसन होतं की, लेखन वा इतर कला हा इथे उपाय मानला जात असे. नव्हे, जणू काही तोच त्याचा एकमात्र हेतू असावा. मूळ समस्यांवरची एक पळवाट होती. तिच्यातून निर्माण होणारी सांस्कृतिक मैथुनाचा कृतक आनंद, अर्धा टक्का वगळता, हजार घरं उपभोगत होती. तेंडुलकरांनी तो आनंद त्यांच्याकडून कायमाचा हिरावून घेतला. त्याहीपेक्षा महत्वाचं म्हणजे त्या आनंदाला मिळणाऱ्या प्रतिष्ठेची त्यांनी लाज वाटायला लावली. हया एका कर्तृत्वामुळेसुध्दा मराठी साहित्य तेंडुलकरपूर्व व तेंडुलकरोत्तर असं विभागलं जाऊ शकतं.

थोडयाफार फरकानं माणसांची दुःखं सारखीच असतात. ती तशी असली तरी ती सोपी नसतात. जगणं हे सुख-दुःख, स्वकीय-परकीय, सज्जन-दुर्जन अशा ढोबळ उपदेशात्मक भेदांनी भरलेलं नसून जगण्यातले अंतर्विरोध सूक्ष्म आहेत. ते माणसांच्या प्रबळ वासनांवर उभे आहेत. माणसं एकंदरीतच दुर्बळ असली तरी त्याच्या वासना प्रबळ विखारी असू शकतात व त्याच अखेर इतिहासाला आकार देतात. त्यात पुन्हा योग्य-अयोग्य यांची निवड करण्याचं गुरुपद कुणालाच नसतं. हा, अशा प्रकारचा आध्यात्मिक प्रेषितवाद प्रथम माणसाला आणि नंतर साहित्याला पोकळ, कुचकामी, ढोंगी बनवतो. हया नवीन सूत्रांची झगझगीत जाणीव तेंडुलकरांनी स्वतःच्या प्रतिभेच्या बळावर करुन दिली.

हया सूत्रांच्या धाग्यांभोवती तेंडुलकरांनी जी पात्रं उभी केली ती अज्ञात नियतीनं बांधलेली होती (तेंडुलकर कादाचित हे मान्य करणार नाहीत.), क्वचित त्या पात्रांनी स्वतःची वेगळी अशी मूलभूत भूमिका घेतलीच तर बाहय दबावापुढे, क्वचितप्रसंगी अज्ञात नियतीपुढे ती भूमिका टिकत नाही. मग असहय तडफड व शेवटी बऱ्याचदा हार अटळ असते. जगताना भूमिका घेऊन त्यासाठी लढणं आणि त्याच वेळी ती भूमिका जगणं या दोन वेगळया व एकाच वेळी निभावण्यासाठी असत्यंत कठीण गोष्टी आहेत, हे तेंडुलकर खूप सूक्ष्मपणे सूचित करत राहतात. जगण्यातल्या हया द्वंद्वांचं चित्रण जेव्हा त्यांच्या नाटकांतून पुढयात येतं, तेव्हा ते अंगार येणारं अत्यंत हिंस्त्र वाटतं. माणसांच्या वासनांमध्येच दडलेली त्यांची हार लेखक तेंडुलकरांनी समर्थपणे मांडलेली आहे. म्हणून अर्थातच तेंडुलकरांनी वासना कुठेही अस्पर्श्य मानलेली नाही. दडलेल्या पराभवासकट वासना स्पर्शातच आनंददायी असावी इतक्या उत्कटपणे लेखक तेंडुलकर तिला स्पर्श करतात.

माणसाला त्याच्या तर्कासकट पराभव अटळच आहे. त्या पराभवातही जे काही माणूस जिवंत सोडेल ते वासनेचंच असेल असं तेंडुलकरांना सुचवायचं असतं की काय असं मला वाटतं. अशी भूमिका अत्यंत सहजतेनं घेणाऱ्या माणूस तेंडुलकरांबद्दल मला कुतूहल वाटतं. आश्चर्य नाही. मोर्चे, निदर्शने, सभा, संमेलनांमध्ये पुरोगामी घरांच्या जवळ जाणारी स्वतःची भूमिका मांडायला तेंडुलकर कधीच मागे सरकले नाहीत. या संदर्भात, खासगीत व जाहीरपणे तेंडुलकरांवर केला जाणारा एक आरोप मला आठवतो. ज्याचा विचार केल्याशिवाय तेंडुलकर माणून म्हणून आणि लेखक म्हणूनही आकल होणं अपूर्ण राहील. तेंडुलकरांनी स्वतःच्या भूमिका (विशेषतः स्वतःच्या लेखनासंदर्भात) संदिग्ध ठेवून एक प्रकारचा संधिसाधू पलायनवाद जोपासला. असा जाहीर आरोप त्यांच्या विरोधकांकडून केला जातोच. त्याच वेळी त्याच्या चाहत्यांच्या व समर्थकांच्या गोटातही ही कुलबूज ऐकू येतच नाही असं नाही. हया आरोपाच्या पुष्टयर्थ जी अनेक उदाहरणं पुढे केली जातात, त्यात सर्वात मोठं उदाहरण म्हणून, 'घाशीराम कोतवाल' च्या वेळेला 'प्रस्तुत नाटकातील पात्रे व घटना ऐतिहासिक नसून त्यातून बोध घ्यायचाच असेल तर तो वेगळा आहे' अशी जी भूमिका घेतली ती त्यांच्या वतीनं लढणाऱ्यांची पंचाईत करणारी होती; त्या घटनेचा दाखला देण्यांत येतो.

तेंडुलकर अशा प्रकारच्या आरोपांबाबत बहुधा मौन पाळतात. खासगीत शांतपणे तुमच्या एकेका शंकेचं निराकरण करणारे तेच का हे तेंडुलकर ? असं वाटावं अशी त्यांची मुग्धता असते. तेंडुलकर माणूस म्हणून अनेक तऱ्हांनी

तुम्हाला प्रवृत्त करतात ते इथेच. त्यांच्याबाबतीत जाणून घ्यायला तुमची आकलनशक्ती हीच मर्यादा असते. मूळ आरोपाच्या मुद्दयाचा विचार करताना मला तेंडुलकर लेखक म्हणून घडत गेले ती प्रतिक्रिया खूप महत्वाची वाटते. त्या आरोपाला स्वतंत्रपणे महत्व द्यावं असं त्यात काही नाही; पण हया प्रक्रियेच्या संदर्भातच त्याचा विचार व्हायला हवा. उमेदीच्या आणि उभारीच्या वर्षात कमालीची हार्डशिप करणाऱ्या संवेदनशील माणसाची अवस्था कमालीची असुरक्षित असते. तेंडुलकर हे लेखक म्हणून सुरुवातीच्या वर्षात हया समाजात उपरे होते. युरोपिअन देशातले ज्यू किंवा स्पेन-तुर्कस्थानातून अमेरीकेत आलेले महान प्रज्ञावंत, प्रतिभावंत ज्या तऱ्हेनं घडत गेले. इथे तेंडुलकरांचं घडणं एका तऱ्हेनं तसं होतं. लेखनामुळे निर्माण होणारी वादळं झेलत असताना, स्थितप्रज्ञता वाटावी असं मौन बाळगण्याची माणसाला सवय होऊ शकते. हयाचा अर्थ माणूस हया साऱ्याची त्रयस्थ दृष्टीनं गंमत बघत असतो, असं नव्हे. अशा वेळी प्रसंगातून मध्यममार्ग काढण्याचीही निकड भासू शकते. त्या क्षणीच्या दबावांवर, संवेदनांवर आणि जबाबदाऱ्यांवर ते अवलंबून असतं. हया गोष्टींचा, तेंडुलकरांवर आरोप करताना इथल्या बाबू लढवय्यांनी विचार केलेला दिसत नाही.

दुसऱ्यासाठी लढणं हे नेहमीच सोपं असतं. कारण त्यात एक पळवाट कायम शिल्लक असते, ती म्हणजे आपण नसण्याची; पण आपल्या कृतीचा परिणाम म्हणून तातडीनं लढणं महत्वाचं की कृती टिकणं महत्वाचं, हयाचा विचार तो म्हणजे आपणच असलेल्याला नेहमीच करावा लागतो व त्यात दोन शक्यतांतली कोणतीही धरली तरी तो संधिसाधू पलायदानवाद निश्चितच होत नाही. इलिया कझान या अमेरिकन रंगभूमी व चित्रपटातील महान व्यक्तीचं आत्मचरित्र वाचताना अगदी वेगळया कारणासाठी तेंडुलकर आठवले. इलिया कझानचे वडील तुर्कस्थानातून स्थलांतरीत होऊन अमेरिकेत आले. कझानच्या वडिलांनी अमेरिकेत व्यापार सुरु केला. कझाननं वडिलांकडून एक गुण आत्मसात केला, तो परिस्थितीनेच त्यांना शिकवला होता. आपल्यापेक्षा अत्यंत विपरीत समाजात समोरचा प्रत्येक बरावाईट प्रसंग प्रतिक्रिया देत न बसता, प्रसंगी दुर्लक्ष करुन आपली ' कृती ' अधिकाधिक परिपुर्ण करणं. इलिया कझाननं पुढे लिहिलेलं आहे, ' हा गुण मी वडिलांकडून उचलल्यावर माझा स्वभाव दोन वेगळी माणसं वाटावी असा घडत गेला. एका माझ्या आला मी आणि स्वतःला जो म्हणून प्रक्षेपित करतो तो मी.' सुरुवातीच्या काळातला सततचा अस्वीकार

संवेदनशील माणसाला आत हळवा व बाहय प्रक्षेपणासाठी बधिर व मूक बनवतो.

तेंडूलकांवरचे सुरुवातीलचे प्रहार हे इथल्या ब्राम्हण्याची तार्किक चैन होती. इथल्या ब्राम्हण्याला त्यांच्या (खरं तर कूणाच्याच) लोकेत्तर प्रतिभेविषयी काही देणंघेणं नव्हतं तेंडूलकर जो प्रयोग करत होता तो माणसांच्या जाणिवांशी देणंघेणं ठेवून होता. त्या अर्थानं तो वैश्विक होता (बाहेरच्या विश्वान तशी नोंदही नंतर घेतली) इथलं ब्राम्हण आपली समीकरणे जपण्यात मग्न होतं. आजही तसंच आहे. किंबहुना अधिक पतितावस्थेत (म्हणुन जास्त अहंकारात) आहे. बुध्दिमत्ता = (हजार घरांची ) ब्राम्हण संकल्पना हे समीकरण टिकविण्याकरता तेंडूलकरांचा उपयोग तर दिसेचना, उलट उपद्रवच होऊ लागल्यावर अहंकारानं, व्यवहारानं (जातीचा अपवाद न करता) अतिशय अल्पसंख्यांना समावून घेणारी पर तत्व म्हणून दश्लनात अतिशय पायघोळ अशी अदृष्य संकल्पना होती, आहे. दश्लनी पाहता बाळ ठाकरे व त्यांचे सैनिक - ज्यांना नाटक- नाटयप्रवाह हयांच्याशी काहीच देणंघेणं नव्हतं, किंबहुना, लिहिण्यानं समाजात एकंदरीतच काही बदल घडतो, यावर विश्वास नसलेल्यांनी तेंडूलकरांवर हल्ला चढवला. तेच जनसंघाच्या सामान्य कार्यकर्त्यांबाबत म्हणता येईल. तेंडूलकरांवर ज्यांनी हल्ला चढवला ती फक्त शस्त्रं होती शस्त्रं चालवणारी हजार ‘ सुसंस्कृत ’ घरातली पंच्च्याण्णव टक्के घरं होती. तेंडूलकरांनी हया शस्त्रं चालवणाऱ्या पंच्च्याण्णव टक्के घरांच्या नपुसकत्वाला उघडं पाडून त्यांच्यावर मर्मघातक प्रहार केला होता. एका ऐतिहासिक ( पण विकृत) मनोव्यापाराचा प्रवास शोधायला तेंडूलकर निघाले होते. तेंडूलकरांची ही साहित्ययात्रा नेपोलियनच्या एल्बा ते पॅरिस यात्रेपेक्षा किंचितही कमी रोमांचक नव्हती. त्यात पराभव तर होताच, विजयाच्या कमानीही होत्या, दमवून टाकणारी युद्धं होती, नव्यानं जमवाजमव होती, पराकोटीची असुरक्षितता होती. एक अर्थपुर्ण जुगार होता तो. तेंडुलकर पुढे पुढे लिहिणार हया कल्पनेनंच पंच्याण्णव टक्के गढया बिथरल्या. तेंडुलकरांच्या सुरुवातीच्या काळातल्या ‘ श्रीमंत ’ हया नाटकावर, ते आधारित नाटक असल्याच बतावणी करणारा लेख माधव मनोहरांनी लिहिला. असं चुरचुरीत लिहुन तार्किक चैन भागवण्याची प्रदिर्घ परंपरा माधव मनोहरांना लाभलेली होती. शिवाय त्यात जमल्यास असे लिहिणाऱ्याला सुरुवातीलाच खुडून टाकण्याचा बेत होताच. नंतर माधव मनोहरांनी तेंडुलकरांच समर्थन केलं. त्याचीही सुसंगतता स्पष्ट कराता येईल; पण तो वेगळा विषय आहे.

बाळ ठाकरेंनी हया समाजातल्या नपुंसक बाबू, संस्कृतीच्या संस्कृतीच्या मानसिक गरजा व चोचले पुरवले नाहीत, तर ते एक क्षणही त्यांच्या स्थानावर (!) राहू शकणार नाहीत. बाळ ठाकरे हे कायमच त्या वर्गाच्या हातातले महत्वाचे शस्त्र ठरत आलेले आहे. इथल्या बाबू ब्राम्हण्याने ते शस्त्र तेंडुलकरांवर फेकले. हयात प्रतिगामी-पुरोगामी, काहीही नव्हते, हे नीट लक्षात घेतले पाहजे. शिवसेना व जनसंघ प्रतिगामी होता म्हणून त्यांनी तेंडुलकरांना विरोध केला व समाजवादी व कम्युनिस्ट पुरोगामी होते म्हणून तेंडुलकरांना पाठिंबा दिला असं मानणं ही घोर फसवणूक होय. मुळातून ते तेंडुलकरी विश्लेषणाच्या विरोधीही जाईल. असं मानून समाजाचं विश्लेषण करण्याची आपण चुकीची व गुन्हे पाठीशी घालणारी पध्दत रुढ करुन. शिवाय, त्यातून तेंडुलकरांचं नीटसं आकलन होणार नाही. तेंडुलकरांवर हल्ला करणारे पु.भा.भावे, ग.वा.बेहरे, बाळ ठाकरेच होते, असे नव्हे तर नाना गोरे व भाई डांगेसुध्दा होते ! वेगवेगळया फॉर्म्समधून तेंडुलकरारंनी, मानसिक व सामाजिक पातळीवर हया बाबू समाजाची नपुंसकत्वातून निर्माण झालेली अहंकारी झब्बूशाही व तिच्या विकृत वासनामयी पतनाचं थरथरनारं चित्रण केलेलं होतं. वर ज्या व्यक्तींची नावं लिहिलेली आहेत त्या व्यक्ती प्रतिनिधिक होत्या. पाठराखण करणारी लाखो साक्षर-निरक्षर घरं त्यांनी ‘ घडवण्यासाठी ’ आपआपणास वाटून घेतलेली होती. हया समाजात पुरोगाती-प्रतिगामी असे वर्ग निर्माण झालेच नाहीत. जो काही झगडा होता तो ब्राम्हण वाटून घेण्याच्या प्रयत्नातला वतनी झगडा होता. हुषार बाबूंनी स्वतःच्या ब्राम्हण्यांच्या तत्वांना अधिक पायघोळ बनवून त्याला पुरोगातीत्व म्हणायला सुरुवात केली. मुळात व्यवहारात व अहंकारात तेवढयाच अल्पांना मुभा असणार होती. तेंडुलकरांनी सर्वांना एकदम एका पातळीवर आणून झाडा सुरु केल्यानं तात्पुरते वतनी झगडे थांबवून सारे ब्राम्हणवादी तत्काळ एकमत झाले. कॉ.डांगेची कीर्तनस्वरुप भाषणं ऐकून त्यांना पाठिंबा देणारा लाखोंचा जनसमुदाय त्यांच्यानंतर वारसदार म्हणून बाळ ठाकऱ्यांच्याच मागून गेला. समाजाच्या मनाची ही अचूक संगती नाही का ? इथल्या महान कम्युनिस्ट डांग्यांचं कौतुक ते लेनिनच्या समाधीपाशी जाऊन रडले व संप चालवण्यापेक्षा मागे घेण्याचं अचूक ज्ञान त्यांच्यापाशी आहे, यासाठीच करावं अशी परिस्थिती; किंवा नाना गोऱ्यांचं गुळगुळीत ललित ‘ सांस्कृतिक ’ लिखाण; ते त्यांच्याविषयी काय सांगतं? तेंडुलकरांनी केलेल्या लिखाणाला येणाऱ्या प्रतिक्रियांतून प्रतिगामी-पुरोगातीच्या संकल्पना हया समाजाच्या संदर्भात संपूर्णपणे खोटया असल्याचं जवळजवळ सिध्द

झालं आहे. अप्रत्यक्षपणे तेंडुलकरांनी समाज मानसशास्त्राला केलेली ही मदतच होय.

ज्या हजारभर घरांना व त्यांच्यामागून येणाऱ्या लाखो घरांना तेंडुलकरांनी बिथरवले होते, त्यातल्याच पाच घरांनी तेंडुलकरांना पाठिंबा दिला. इतक्या वर्षांनी जाणवतंय ते हे की, त्यांचे अत्यंत अपवादात्मक समर्थक सोडले तर हया समाजाच्या संदर्भात तेंडुलकरांचं समग्र आकलन त्यांच्या समर्थकांनाही त्यांच्या विरोधकांएवढंच झालेलं होतं. माणूस म्हणून तेंडुलकर ज्या पाच टक्क्यांच्या जवळ होते, त्या पाच टक्क्यांच्या ब्राम्हण्यांच्या पायघोळ संकल्पनांत अकारण व संदर्भरहित दलितस्तुती वा दलितांसाठी वेगळया सौंदर्यशास्त्राच्या मागणीला फार प्रतिष्ठा होती. हया कल्पना मुळातच पूजनीय असल्याची एक बतावणी होत होती. लेखक तेंडुलकर ' कन्यादान ' नाटक लिहून पाच टक्क्यांचाही रोष घेते झाले. हे नाटल लिहून त्यांनी पुरोगामी ब्राम्हणांची सोय बंद केली. त्या नाटकाचा हा एकच पैलू नव्हे, पण हा एक महत्वाचा पैलू आहे. सुरुवातीला काळाएवढा तेंडुलकरांना त्रास झाला नाही. वतनी दुहीमुळे पंच्याण्णव टक्के तटस्थ होते. पाच टक्केच अस्वस्थ. शिवाय, तेंडुलकर या नावाभोवती हिंदी चित्रपटांचे पटकथाकार म्हणून प्रतिष्ठेचं वलय होतंच. मराठीबाहेर मोठा वर्ग त्यांचा समर्थक बनलेला होता.

तरीही हजारातल्या हया पाच टक्के घरांत तेंडुलकर मनापासून रमले. त्यांच्या चळवळी, मोहिमेला तेंडुलकर स्वतः सहभागी झाले. तेंडुलकरांनी आपलं नावही त्यांना वापरायला दिलं. एस.के.लिमयेंच्या स्टडी सर्कलपासून मानवेंद्रनाथ रॉयच्या भाषणापर्यंत साऱ्या वैचारिक घुसळणीत तरुणपणी मनापासून सहभागी होणारा तेंडुलकर नावाचा प्रतिभावंत रमला. तेंडुलकर मार्क्सवादी नसावेत; पण त्यातून पलीकडे पुढे काय ? त्याचं कुतूहल त्यांना अनावर असावं. त्यासाठी ते मार्क्सवादापासून गांधीपर्यंत सर्वत्र मनस्वीपणे फिरत राहिले. तेंडुलकरांमधला मानवतावादी खूप प्रबळ आहे. त्या मानवतावाद्यामुळेच तेंडुलकर माणून म्हणून हजारातल्या पाच टक्के घरांशी जवळीक करु शकले. अन्यथा ते एक बेट होऊन गेले असते. तेंडुलकरांची माणसं पाहण्याची-ऐकण्याची क्षमता अपार आहे. ती क्षमता त्यानं मानवतावादीपणाबरोबर माणसाबद्दलच्या असलेल्या जिज्ञासेनं दिलेली आहे. हयाचा एक उगम तेंडुलकरांच्या इथल्या संस्कृतीत खोलवर गेलेल्या मुळांमध्ये होतो.

त्यांचे दुष्परिणामही दिसतातच. मेधा पाटकरबाबत बोलताना तेंडुलकर चर्चगेटच्या पाटकर हॉलमध्ये मेधा ही ' आजच्या युगातली गांधी आहे ' असं

म्हटल्याचं मी ऐकलेलं आहे, तेव्हा मला धक्काच बसला; पण त्याची नंतर सवयही झाली. नरेंद्र जाधवांच्या ' आमचा बाप आन् आम्ही' च्या वेळी, शरद भुताडियांच्या ' किंग लिअर' च्या वेळी, सुमती लांडेच्या ' कमळाकाचा ' च्या वेळी, डॉ.अरुण गद्रेच्या समग्र लिखाणाबाबत तेंडुलकर सुपरलेटीव्हज् वापरताना दिसतात. तेंव्हा फक्त जाणवतं की, तेंडुलकरी प्रतिभेच्या शाखा पार अंतराळापर्यंत गेल्य तरी मुळे इथल्या मातीत आतडयांतून गुंतून आहेत. मग तिथे सुपरलेव्हीज् वापरताना पी.एल्. कोणते नि तेंडुलकर कोणते, हयाचा फरक करता येत नाही. तेंडुलकरांच्या उभारीचा काळ मार्क्सवादाच्या बहारीचा काळ होता. विश्वसाहित्यातील अनेक प्रतिभावंतांचा-प्रज्ञावंतांचा जुन्या जगाशी संबंधच उखडला गेला. तेंडुलकरांबाबत असं म्हणता येणार नाही. लेखक म्हणून तेंडूलकर मूळ पुरुष असले तरी माणून म्हणून जुन्या जगात त्यांचे पूर्वसुरी सापडतात, हाच त्याचा अर्थ आहे. हे सुसंगत वाटणारं नसलं तरी ते तसं आहे. तेंडुलकर एकदा बोलताना मला म्हणाले, ' मानवाच्या आयुष्यात Logic चा जेवढा पराभव झालाय तेवढा क्वचित कशाचा झाला असेल.' मानवीपणा हा Illogical आहे तेंडुलकरांच्या बाबती तो एक अर्थ आहे.

तेंडुलकर ज्या समाजात जन्माला आहे, त्या समाजानं त्यांची नाटकं जाळली. त्यांच्या कुटूंबीयांना अपरिमित त्रास दिला. मानवाच्या मूलभूत जाणिवांवर आणि विकृत वासनांवर झगझगीत प्रकाश टाकला, म्हणून तेंडुलकरांनाच विकृत ठरवून त्यांची अवहेलना केली व तसं करण्यामध्ये स्वतःचा बौध्दिक अहंकार मिरवला. वर तेंडुलकर लढवय्ये नव्हते, ते स्वार्थासाठी तडजोडी करतात, असेही आरोप केले. युरोपियन समाजाची इथे आठवण येते. तेंडुलकरांवरच्या तडजोडवादाच्या आरोपत तथ्य नव्हतं. पण ते तसं आहे असं मानलं तरी गॅलिलिओनं एकदा पृथ्वी-सूर्याच्या नात्याविषयी सांगून झाल्यवर, मग अपार हालांना कंटाळून स्वतःच्या शोधाचं जनकत्व त्या संदर्भात नाकारल्यावर आज युरोप गॅलिलिओला एक तडजोडवादी मानव म्हणून ओळखत नाही, तर उलट त्यानं संशोधक म्हणून लावलेला शोध त्याच्या माणूंस म्हणूनच्या स्खलनशीलतेपेक्षा अधिक महत्व देण्याचा आहे. विश्व अधिक समृध्द करणारा आहे, हे मान्य करुन बोलले जाते ते त्याच्या संशोधकपणावर. त्यानं दबावाखाली दिलेल्या कन्फेशनवर नाही.

तेंडुलकरांचा जन्म हयाउलटचा जीवनविचार असणाऱ्या समाजात झालेला होता. हया सर्वात करुण म्हणजे नुकतेच तेंडुलकरांना मनोहर जोशींच्या हस्ते

पारितोषिक घ्यायला लागणं. ज्या समाजात मनोहर जोशी मुख्यमंत्री होतात, त्याच समाजाच कित्येक वर्षांपूर्वी तेंडुलकरांच्या प्रतिभेला थोपविण्याचा प्रयत्न करणारे बाळ ठाकरे असतात व त्यांच्याच आदेशाने प्रमोद नवलकरांबरोबरीने त्याच मनोर जोशींनी तेंडुलकरांची नाटकं बंद पाडलेली असतात. तेंडुलकरांनी ' घाशीराम कोतवाल ' हे नाटक लिहिलं. ते नाटकही मनोहर जोशींनी बंद पाडण्याचा प्रयत्न केला. गेली तीनशे वर्ष हया पतित समाजाच्या गुलामीच्या नवीन आविष्काराच्या वेळी व्यवस्थेत ' घाशीराम कोतवाल ' चा प्रयोग रंगतोच. त्या अर्थानं तो प्रयोग व त्यातली पात्र ऐतिहासिक होऊच शकत नाहीत...

मनोहर जोशींनी तेंडुलकरांना परितोषिक देणं हे साक्षात् दुर्योधनानं व्यासांना सन्मानित करण्यासारखेच. हयात दुर्योधन हे खलपात्र आहे म्हणून नव्हे, तर ते व्यासांनीच रंगवलेले पात्र आहे. तेच व्यासाचा सन्मान करते हे चित्र व्यासाला काही कमीपणा आणत नाही. कारण व्यास स्वतःच्या इच्छेनं महाभारतात अवतरु शकतो. संपूर्ण समाजासाठी मात्र हे चित्र करुण आहे.

आज तेंडुलकरांना मराठी समाजानं स्वीकारल्याचं चित्र दिसतं. त्यांना जेरबंद करा. त्यांचा पुरता बंदोबस्त करा म्हणणारे त्यांना बक्षिसं जाहीर करतात. जाहीर समारंभात त्यांच्या पाया पडतात. तेंडुलकरांनी हे जे चित्र मांडलं, त्या समाजाच्या जीवनविचाराची उत्क्रांती तिथपर्यंत पोहोचली असं वाटायला लावणारं फसवं चित्र आहे. वास्तविक महाराष्ट्राबाहेरच्या भारतात किंबहूना भारताबाहेरच्या युरोपात लेखक तेंडुलकरांचं जे स्वागत झालं, त्याच्यासमोर नमतं घेणाऱ्या लाचारीचं हे चित्र आहे. समाजमन अजूनही तुळशी वृंदावन, ताई-भाऊ, घोडयावरुन येणारा प्रेषित तलवारी-भाले यापलीकडे गेलेलं नाही. राजकीय-सामालिक विचारांपासून ते रोज नवनवीन येणाऱ्या वृत्तपत्रांमधल्या भाषेपर्यंत हया समाजाचा जीवनविचार दिसतो. तो अजून डबक्यातच आहे. आता तर त्यावर मल्टिनॅशनल सुखाचा ओशट तवंग आलेला आहे. आपण थ्त्या समाजाचे भाग आहोत ही जाणीव मन खिन्न करते. लिहिण्याची इच्छा मारते.

मला माझ्या आजोबांनी कधी नाटक दाखवलं नाही, वडलांनी कधी पुस्तक भेट दिलं नाही. माझ्या आईनं माझ्यासाठी कधी कविता म्हटल्याचं स्मरत नाही. माझी वाढ-विकास काय तो अगदीच बेशिस्तपणे झाला. माझ्या हया बेशिस्त प्रवासात मला तेंडुलकर लेखक म्हणून भेटले. माझ्या भाषेबद्दलचा माझा न्यूनगंड कमी झाला. प्रवास सुसहय झाला. अन्यथा दहावीत बोर्डात येऊन दर वर्षी, आवडते नेते - बाळासाहेब ठाकरे, आवडते लेखक - पु. ल. देशपांडे, यश

मिळाले ते टिळक, सहस्त्रबुध्दे वा गोडबोले गुरुजींमुळे, असं बजावणाऱ्या हया रतिबी समाजात माझ्यासारख्या नवशिक्षितांचा काय पाड लागणार होता महाराष्ट्र अन् भारताबाहेरच्या ज्या विस्तीर्ण जगाकडे मी बेशिस्तपणे खेचलो गेलो, तिथे माझ्या भाषेच्या व संस्कृतीच्या उत्क्रांतीच्या गप्पा मी तेंडुलकरांमुळे मारु शकलो. माझी भाषा व माझी संस्कृती हे आदरानं म्हणू शकलो;ऋण विजय तेंडुलकर नावाच्या एकमेव लेखकाचं आहे.

मी तेंडुलकरांचा कायमचा ऋणी आहे. हया एकमेव ऋणाची आयुष्यात मला लाज वाटणार नाही.

# प्रिया आणि राजू

**सा**धारणपणे जानेवारी दोन हजार दोनच्या शेवटच्या आठवडयात मी आपणहून प्रियाशी बोलणं बंद केलं. त्यानंतर तिनेही त्याचा काहीतरी अर्थ लावून माझ्याशी बोलणं बंद केलं. फेब्रुवारी ते सप्टेंबर या कालावधीत आम्ही एकमेकांशी फक्त दोनदाच बोललो. एकदा एप्रिलमध्ये जिला सु. ल. गद्रे पुरस्कार मिळाला तेव्हा तिची जाहीर मुलाखत मी घेतली. तेव्हा मी मुलाखत मी घ्यावी असं तिनेच अगोदर संयोजकांना सुचवलं होतं. त्या पुरस्कार वितरण समारंभात आमची भेट झाली, तेव्हाचं बोलणं हे माझं आणि प्रियामधलं

नेहमीच बोलण नव्हतं. सगळ औपचारिक होतं; परंतु तिला पाहताना तिच्या तब्बेतीत चार महिन्यांत पडलेला प्रचंड फरक मनात चिंता निर्माण करणारा होता. दुसऱ्यांदा तिचं आणि माझं बोलणं साधारण जूनच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवडयात अगदी आकस्मितपणे झालं. तेंडूलकारांचा मला फोन आला अन् ते म्हणाले, ‘प्रियाला काहीतरी कारणासाठी विश्वास पाटलांचा फोन हवाय. तो तुझ्याकडे असेल असं तिचं म्हणणं आहे; पण तिच्या म्हणण्याप्रमाणे तुला तिच्याशी बोलायचं नाहीय.’ मी म्हटलं, ‘असं नाहीय, तिला हवं असेल तर तिला मी आत्ता फोन करतो.’

मी तिला फोन केला. आम्ही अर्धा तास बोललो. प्रिया भरभरुन बोलली पण फक्त त्या गरजू मुलाविषयी, ज्याच्या ॲडमिशनच्या कामाविषयी तिला पाटलांशी बोलायचं होतं. तेच माझं आणि प्रियाचं शेवटचं बोलणं. त्यानंतर न राहवून मी जुलैमध्ये एकदा प्रियाला फोन केला होता. तेव्हा तो तिनं घेतला नाही. असं माझी आणि प्रियाची ओळख झाल्यानंतर तिचा अकाली अंत होईपर्यंतच्या काळात एकदाही झालं नव्हतं.

प्रियाची आणि माझी ओळख ‘ग्रंथाली’ च्या डिसेंबर पंचवीसच्या कार्यक्रमात ती आणि तेंडूलकरांनी करुन दिली. ९७-९८ साल असावं. त्या काळात तेंडूलकरांकडे जायचं म्हणजे माझ्या मनाला फार भीड पडत असे. मी नेहमीच त्यंना अतर्क्य कारणं सांगून जाणं टाळत असे तेंडूलकर माझ्या या त्यांच्याकडे न जाण्याची खास त्यांच्या पद्धतीने थट्टा करत असत. त्या दिवशीही तेंडुलकरांनी माझी थट्टा सुरु केली. ते म्हणाले ‘उद्या जर तू फोन करुन सांगितलंस कि, मी येणार होतो पण इथे युद्ध सुरु झालय, तरीही मी त्यावर मी विश्वास ठेवेन.’ त्यावर प्रिया खळखहूप हसली होती. तिच्या नेहमीच्या पद्धतीने. त्या दिवशी तिने पांढरा ड्रेस घातला होता. केस मोकळे सोडलेले होते. ती खूपच सुंदर दिसत होती. तिच्या हसण्याने म्हणा किंवा नंतर स्र्टेजवर तिच्या आक्रमक अभिनिवेशाने म्हणा, आपण तिच्या कक्षात कधीही येता कामा नये, शक्यतोवर तिच्यापासून चार हात दूरच राहिलं पाहिजे, अशी माझ्यामनाने नोंद घेतली. पुढे आमच्या आख्ख्या मैत्रीच्या काळात मला जेव्हा जेव्हा माझ्या त्या सुरुवातीच्या निश्चयाची आठवण होत असे, तेव्हा फार आश्चर्य वाटत असे. म्हणजे तो निश्चय मी कसा मोडला याचं.

पुढे ही पहिली ओळख विखन गेली. नंतर मी मात्र तेंडूलकरांकडे भीड चेपून जाऊ-येऊ लागलो. एवढंच नव्हे तर कित्येकदा त्यांच्या नाटकांवर माझी मतं

व्यक्त करण्याइतपत मी धीट झालो. याच काळात एकदा मी तेंडुलकरांकडून वाचायला काहीतरी नेलं होतं. ते मी वेळेत परत देऊ शकलो नाही. तेंडुलकरांनी मला ते प्रियाचं असल्याचं सांगितलं. मला फारच अपराधीपणाचं वाटलं. मी ते तातडीने प्रियाला परत करण्याची तयारी दाखवली. त्या दिवशी संध्याकाळी मी ते कागद घेऊन प्रियाच्या पवईच्या घरी गेलो. प्रिया पवईला ‘ जलवायू विहार ’ मध्ये राहत असे. ती आणि तिची बहीण तनुला तेव्हा तिथे होत्या. प्रियाने काहीतरी पदार्थ बनवला होता. तो खाणार का ? विचारलं. मी ‘ नको ’ म्हटलं. तिने पुन्हा आग्रह केला. ती तो पदार्थ चवीने खाल्ला. आता तो पदार्थ आठवत नाही ; पण त्या वेळेस मला प्रियाच्या सुगरण असण्याची ओळख झाली. अन् प्रियाला मी काहीही खाण्याअगोदर एकदा ‘ नाही ’ ‘ नको ’ म्हणतो त्याची. ही आमची एकमेकांबद्दलची ओळख शेवटपर्यंत टिकली. प्रिया नेहमी म्हणत असे, ‘ परुळे ’ आता पहिल्यांदा नको म्हणेल. म्हणून त्याला दोनदा विचारायला लागेल. मी मला‘ राजू ’ पेक्षा ‘ परुळे ’ या नावाने हाक मारत असे. तिच्या ‘ नॉकिया’ च्या फोनबुकमध्ये माझं पूर्ण नाव मावत नसे. त्यामुळे जेवढं नाव मावत असे तेवढंच ती घेत असे.

त्या माझ्या प्रियाच्या घरी जाण्यानंतरही प्रियाबद्दलचा माझ्या मनातला संकोच, अढी दूर झाली असं नव्हे. तिच्याही दृष्टीने मी तिच्या बाबांनी मित्र मानलेला अजून एक माणूस असं समीकरणं होतं. हे खूप नंतर तिनेच सांगितलं म्हणून मला कळलं. नंतर मी आणि प्रिया कधीकधी तेंडुलकरांच्या पार्ल्याच्या घरी भेटत अस; पण आमच्यात अहो-जाहो पलीकडे फार संभाषण झालं नाही. त्या काळात प्रिाया बाबांवर एक फिल्म बनवू इच्छित होती. फार पूर्वीपासून म्हणजे तेंडुलकरांवर मी एक लेख लिहिला होता तेंव्हापासून माझ्या मनातही हेच होतं. तेंडुलकर त्या साऱ्यापासून अगदी अलिप्त होते. त्यांच्यासमोर हा विषय काढला तरी ते एक नाही दोन नाही - फक्त ‘ हं ’ एवढंच म्हणत असत. मग नकळत एका प्रक्रियेत मी, तनुजा (तेंडुलकरांची धाकटी मुलगी) आणि प्रिया हे एक ब्रॅकेट बनत गेलं. माझ्यात आणि प्रियात जेव्हा वाद होत तेव्हा तनुजा तडजोड करायला पुढे येत असे. तनुजात आणि माझ्यात वाद होत तेव्हा प्रियामधे पडत असे. त्याची खरी सुरुवात प्रियाने ‘आप की अदालत ’ हा कार्यक्रम सुरु केल्यावर झाली.

‘ आप की अदालत ’ हा झी टीव्हीवरचा कार्यक्रम प्रियाने निर्माण आणि सादर करायचं ठरल्यावर जी मीटिंग तेंडुलकरांच्या पार्ल्याच्या घरी झाली, त्या वेळी योगायोगानेच मी तिथे हजर होतो. मीटिंगमध्ये एक प्रश्न चर्चेत आला होता

की, या कार्यक्रमाचं ‘ रिसर्च ’ कुणी करायचं ? सामाजिक आणि राजकीय विश्लेषक असणारी कुणीतरी व्यक्ती हवी होती. अचानक प्रियाने मला विचारलं, ‘ अहो, परुळे, तुम्ही का नाही करत रिसर्च माझ्या कार्यक्रमासाठी ? ’ मग बाबांकडे वळून, “ बाबा ? ”

तेंडुलकर म्हणाले, “ त्याने जर रिसर्च केलं तर मला आनंदच आहे.”

मी लगेच काही उत्तर देऊ शकलो नाही ; पण मी प्रियाच्या कॅम्पमध्ये दाखल झालो. तेव्हा ठाण्याला राहत असे. पवई ठाण्यापासून फार दूर नाही. हळूहळू प्रियाच्या घरी, जिथे तिचं ऑफिसही होतं, तिथे जाणं माझ्या अंगवळणी पडलं. प्रियाच्या घरी कित्येकदा काम करत मी एकटाच बसलेला असे. कित्येकदा मी आणि तनुजा. प्रिया दुपारनंतर यायची. कित्येकदा संध्याकाळी मग आम्ही चर्चा करत बसायचो. तासन्तास अनेक मुद्दयांवर उत्तररात्रीपर्यंत अक्षरश; काथ्याकुट करायचो आम्ही. प्रिया प्रत्येक मुद्दा धसाला लावायची. तिचं समाधान होईपर्यंत त्याचा कंगोरा तपासून पाहायची. तिची आकलनशक्तीही थक्क करुन टाकणारी होती.

‘ आप की अदालत ’ सुरु होण्याअगोदर एकदा मी प्रियाकडे गेलो होतो. तेव्हा प्रियाचा टी.व्ही. काहीतरी कारणाने बंद पडला होता. प्रियाने मला वाटतं जाण्याअगोदरही दोन-तीन वेळेला सर्व्हिस सेंटरला पुन्हा फोन लावला होता. मी मिच्याकडे पोचलो तेव्हा ती प्रचंड डिस्टर्ब झालेली होती. तिने त्याच सर्व्हिस सेंटरला फोन लावला अन् त्याच्या पंजाबी मालकाला अशा आडव्या हातानी घेतला की मी तिचा अवतार बघून स्तंभित झालो. अक्षरशः पाचव्या मिनिटला सर्व्हिस सेंटरमधून माणूस हजर. त्यानंतर दीडव्या मिनिटाला प्रियाचा टीव्ही सुरु. त्या सगळया प्रकारात मी प्रचंड अस्वस्थ झालो होतो. प्रियाच्या आकलनशक्ती एवढीच तिची नजर अतिशय तीक्ष्ण होती. तिच्या नजरेतून काही म्हणता काहीही सुटत नसे. पुढेही हा अनुभव मला सातत्याने आला. त्या वेळी पटकन प्रियाचा मूड बदलला. तिने माझ्याशी अत्यंत खेडकर गप्पा सुरु केल्या. बोलता-बोलता चटकन् सांगून टाकलं, “कधीकधी अशी चिडण्याची ॲक्टिंग करावी लागते. ”

पण ती ॲक्टींग नव्हती. प्रिया अचानक कित्येकदा काही कारण नसतानाही पराकोटीची चिडत असते. ती एकदा चिडली की काय बोलेल याचा नेम नसे. तिच्याकडून कारण नसताना आपला अपमान होऊ नये यासाठी मी पराकोटीचा सावध असायचो. मला वाटतं, तिला याची कल्पना असावी. तिने माझ्या या सावध पवित्र्याला व्यवस्थित अर्थ लावला. अन् त्याची टिंगल सुरु केली. सुरुवातीला तिच्या टिंगलीचा माझ्यावर परिणाम व्हायचा नाही, पण नंतर तिच्या

## तिच्या लेखनातील करुणेची रेषा

प्रियाला मृत्यूच्या कल्पनेबद्दल कुतूहल होतं. तिच्या लिहिण्यातही त्याचं प्रतिबिंब उमटलेलं आहे. ‘ जन्मलेल्या प्रत्येकाला ’ या तिच्या कथासंग्रहातल्या ‘ जाणे ’ आणि ‘ काळ ’ या कथा त्याची साक्ष आहेत. मृत्यूचा सर्वांगाने वेध घेण्याचा प्रयत्न तिने आपल्या या कथांत केलेला आहे. मृत्यूनंतर आपला आत्मा सारं काही पाहू शकतो, समजू शकतो, उलट अधिकच सामर्थ्यशाली झालेला असतो, अशी तिची ठाम समजून होती. यावही तिने माझ्याशी अनेकदा वाद घातलेले आहेत. मी म्हणायचो,

“ माणूस गेला की संपलं. त्याचं काय होतं याचा विचार, चर्चा करुच नये. त्याला अंतच नाहीय. कारण तो सगळा कल्पनेचाच खेळ आहे. ”

पण प्रियाला हे जाम पटायचं नाही. ती म्हणायची, “ माणसं गेल्यावरही आपल्यामध्येच असतात.”

मी अगदीच ऐकेना झाल्यवरती स्वतःला अगदी जवळच्यांचे माहीत असलेले अनुभव सांगायची. मी तिच्याशी हा वाद घालणं राहूच्या मृत्यूनंतर बंद केलं. कारण तिला तिच्या या कल्पनेचाच खूप आधार वाटत होता; पण एकदा तिने मला एक अशी गोष्ट सांगितली, की मी घटनेची खरी खोली समजून न घेण्याएवढा हादरलो. प्रिया म्हणाली,

“ राजू असण्याच्या कल्पनेचा पगडा माझ्यावर एवढा प्रचंड आहे की काल मध्यरात्री मला ते सारं असहय झालं. मग मी उठून बसले आणि स्वतःलाच बराच वेळ सांगत असले की, युअर ब्रदर इज डेड. राजू तेंडुलकर इज डेड.”

प्रियाला सु.ल.गद्रे पुरस्कार मिळाला (एप्रिल २००२). त्या समारंभात श्री.पु. भागवत बोलताना प्रियाच्या लेखनाबद्दल, “ करुणेचा स्पर्श आता तिच्या पुढच्या लेखनाला होवो.” अशासारखं काहीतरी म्हणाले, तेंव्हा मला वर लिहिलेली घटना आणि तिने त्याही अगोदर लिहिलेल्या ‘ जाणे ’ आणि ‘ काळ ’ या कथा आठवल्या.

‘ जाणे ’ या तिच्या कथेत, अपघातात वारलेल्या विशीतल्या मुलाचा बाप पहाटेपासून ते सकाळपर्यंतची म्हणजे कॉरोनर कोर्टातून

*पोस्ट मार्टेम झालेल्य मुलाची बॉडी हस्तगत करतो, तोपर्यंतची गोष्ट आहे. प्रियाने ही कथा त्या बापाच्या मानसिक आंदोलनांना हळूवारपणे पकडून लिहिलेली आहे. ज्या माणासाचा मुलगा गेलेला आहे त्याच्या आत जे चाललेलं आहे, बाहेरच्या जगाचा त्याच्याशी काहीही संबंध नाहीय. अजाणतेपणाने बाहेरचं जग, मुलगा गेलेल्या माणसाच्या भावनांबाबत कोरडं-तटस्थ आहे. प्रियाने या कथेत त्या मृत मुलाच्या बापाच्या मनात चाललेली वाक्यं लिहिलीत..., " मेला आहे म्हणजे नक्की काय झालं, ते मला तरी कुठे कळतयं ? मेला आहे म्हणजे तो संपला आहे. त्याचं शरीर संपलं आहे. तो आता असणार नाही. दिसणार नाही. घरात नाक्यावर कुठेच नाही. त्याचा आवाज आता ऐकू येणार नाही. त्याचं दाणदाण चालणं, धाडकन दरवाजा आपटणं, मोठयांना रेडिओ लावणं, ओला टॉवेल गादीवर फेकणं, पैशासाठी पाठी लागणं, काही काहीच आता असणार नाही..."*

*' काळ ' कथेत प्रियाने ' प्रश्न फक्त माहीत असण्याचा किंवा नसण्याचा असतो बहुधा. तेवढाच फरक असतो का जीवन आणि मृत्यूत ? ' असं विचारलंय. तिच्या मृत्यूनंतर तिचं अंत्यदर्शन घेताना मला सतत वाटंत होतं, फक्त एकदा प्रियाशी बोलता यावं. अन् त्या दिवशी सु.ल.गद्रे पुरस्काराच्या वेळी तिला मनापासून सांगावीशी वाटली होती ती गोष्ट सांगावी. जी गोष्ट माझ्याकडून ऐकायला तिला आवडली असती. " प्रिया, तुझं लेखन आणि तुझं आयुष्य यात अगदी पुसट होत गेलेली रेषा होती. कित्येकदा त अदृश्यही होत असेल, दिसेनाशी होत असेल. इतकी तुझ्या आयुष्याची आणि कल्पनांची सरमिसळ झालेली होती; पण ती रेषा तिथे निश्चित होती. अनू मी खात्रीने सांगतो, ती रेषा करुणेची होती...."*

त्या टिंगलीचा माझ्यावर व्हायचा तो परिणाम होऊन माझा तटस्थ बाणा आपसूकच विरुन गेला.

प्रिया सुगरण होती हे मत मला तिच्याकडे जायला लागल्यावर अधिक पक्क करावं लागलं. हे मी प्रियाला नेहमीच म्हणत असे. माझ्या आजीनंतर इतके चवीचे पदार्थ मी प्रियाच्याच हातचे खाल्लेत. माझी आजी नेहमी म्हणते, 'चव

हातात असते.' प्रियाच्या हाताला चव होती. दुपारच्या वेळेला मी तिच्याकडे जायचो. अक्षरशः काही मिनिटात ती अद्‌भूत पदार्थ बनवत असे. म्हणजे सुकं चिकन आणि ज्वारीची भाकरी हे पदार्थ इतर डाळ, भात वगैरेसह प्रिया अक्षरशः अर्ध्या तासात बनवत असे. हे पदार्थ इतके चवदार असत की, कित्येकदा घरुन जवून मी तिच्याकडे गेल्यावर पोट तुडुंब भरलेलं असलं तरीही चवीसाठी खाल्लेत.

'आप की अदालत' कार्यक्रम झाल्यानंतर आमच्या त्रिकुटाला (म्हणजे मी, प्रिया आणि तनुजा) अजून दोन महत्वाचे कोन प्राप्त झाले. राजू तेंडूलकर आणि दोन खुद्द विजय तेंडूलकर. राजू तेंडूलकर एकदोनदा अपवाद सोडला तर मला पवईला कधीच भेटला नाही. राजूला तेंडूलकर 'राजा' म्हणत. तो खरोखरच राजा होता. त्याच्याबरोबर तेंडूलकरांच्या पार्ल्याच्या घराच्या गच्चीवर मी तासन्‌तास गप्पा मारत उभा राहयचो. 'आप की अदालत' च्या दिल्लीतल्या शुटींगच्या वेळेला त्याच्या रुम मध्ये आम्ही 'पार्टी' करायचो. त्याची मानवी संबंधातल्या हळूवारपणाबद्‌दल समज कमालीची प्रगल्भ होती. ती समज ॲकॅडमिक नव्हती. याऊलट प्रियाची ॲकॅडमिक समज जिनियसच्या तोडीची होती; पण तिचं तिच्या व्यवहारात दहा टक्के सुद्‌धा रुपांतर होत नसे.

प्रियाचा राजू तेंडूलकरवर कमालीचा जीव होता. राजू अकाली जाण्यानंतर एक वर्ष दोन महिण्यांतच प्रिया गेली, हा मला योगायोग वाटत नाही. प्रिया अनेकदा तिच्या लहानपणीची गोष्ट सांगताना राजूबद्‌दल सांगायची की, राजू लहानपणी चांगलाच बाळसेदार होता. अन्‌ प्रिया खूप अशकत अन्‌ मागेमागे पडणारी. ती त्याला खेळताना उचलून घ्यायला जाऊन पाडायची. मग राजू तिची तक्रार आईकडे करायचा. प्रियाला लहनपणी एकंदरीतच इतर भावंडांच्या मानाने आपली बाजू मांडता यायची नाही.

लहानपणीच्या अजून एका आठवणीने प्रियाच्या मनात घर केलेलं होतं.

लहानपणीपासून तिच्या बाबांचा फार लळा. त्यामूळे बाबा कुठे जायला लागले की आपले दोन्ही हात पसरुन ती बाबांना अडवायची. बाबा तिचे हात बाजूला करुन निघून जायचे. हा प्रसंग प्रियाने इतक्यांदा इतक्या गंभीरपणे सांगितला होता की, ती गेली हे कळल्यावरच्या सैरभैर अवस्थेत अनेकदा मला तो आठवला.

प्रिया स्वतःला बाबांनी चमची म्हणायची; पण वस्तूतः तसं नव्हतं. बऱ्याच जणांचा असा समज आहे की, प्रिया म्हणजे तिचे बाबा अन्‌ बाबा म्हणजे प्रिया; परंतु प्रियाची प्रतिभा सोडली तर तेंडूलकर आणि प्रियात मला तरी कसलंही साम्य आढळलं नाही. तेंडूलकरांचा संयम, माणासांना सांभाळून घेण्याची वृत्ती, शिस्त,

तीव्र क्षोभ मनात दाबून धरण्याची हिंमत यातलं काहीही प्रियात नव्हतं. ती एखाद्या बाणासारखी स्वतःला आणि समोरच्याला रक्तबंबाळ करत सुटायची. परिणामांची अजिबाद पर्वा करायची नाही. दिसेल त्यावर घडक मारायची.

खरं तर तेंडूलकरांचे अजून दोन गूण प्रियात होते. किंबहुना, तेडूलकारांच्या सर्वच मुलांत म्हणजे सुषमा, तनुजा, राजू आणि प्रियातही हे गुण होते. वक्तशीरपणा आणि कामावर प्रेम करण्याची वृत्ती, आमची मीटिंग ठरली, की जिथे असतील तिथून प्रिया, तनुजा आणि बाबा ठरलेल्या वेळेवर मीटिंगच्या ठिकाणी पोहोचतात, असा माझा अनुभव होता. माझ्याकडे स्वतःचं वाहन नसल्यामुळे मीटिंगची जागा माझ्या सोयीची ठरवली जायची; पण नेहमीच आणि खात्रीने मला उशीर व्हायचा. मग बाबा आणि प्रिया आता मी कोणती सबब सांगतो अशा अर्थाने माझ्याकडे बघायचे.

माझ्यात आणि प्रियात एकमेकांविषयी समज आणि विश्वास वाढला. तेव्हा प्रियाने आपल्या पध्दतीप्रमाणे माझ्या दुर्गणांना सुधारण्याची सूत्रं आपल्या हातात घेतली. आमच्या कार्यक्रमामध्ये येणारे पाहुणे, त्यांच्या राजकीय-सामाजिक भूमिकांचं विश्लेषण, त्यांना विचारता येऊ शकणारे प्रश्न, त्यावरचा तिचा ‘ अभ्यास ’ संपेस्तोवर संध्याकाळ व्हायची. ‘ अभ्यास ’ हा तिचाच शब्द. या आमच्या चर्चेत सीमाचा (राजूची बायको) फोन आला तर मी सांगे, ‘ मी परुळेबरोबर अभ्यास करत्ये.’ तिचा अभ्यास संपला की ती माझी शाळा घ्यायची. विषय असायचा. ‘ एकंदरीत आयुष्य आणि माझी बेपर्वा वृत्ती.’ कित्येकदा चर्चा, वाद संपेस्तोवर रात्रीचे दोन-तीन वाजलेले असायचे. माझी शाळा घेताना प्रिया जे बोललेली आहे, ते आज ती नसताना जणू काही माझ्या मानगुटीवरच बसलेलं आहे. ती होती तोवर मी ते मनाच्या खोल कोपऱ्यात दडवून ठेवायचो; पण आता ते संगळं जागं झाल्याचं जाणवतं. कित्येकदा प्रिया माझी शाळा घेताना मी तिची बाजू तिच्यावरच उलटवायचो. मग मीच तिची शाळा घ्यायला लागायचो. माझा मुद्दा असायचा, एकंदरीत आयुष्यात माझा बेपर्वा वृत्तीपेक्षा तिच्या माणसांवर एकदम चाल करुन जाण्याचे माणसांना दुखवण्याचे जास्त नुकसान होते. प्रियाची मानवी भावनांबाबत, संबंधांबाबत एकंदरीतच ॲकॅडमिक समज जिनिअसची असल्याने ती त्याचं स्पष्टीकरण द्यायची.

‘ हे बघ परुळे, माणूस जसा असतो त्यावर त्याचा इलाज नसतो.’

“ मग हे मला पण लागू होत नाही काय ? ” हे विचारल्यावर तिचं उत्तर तयास असायचं. ती म्हणायची,

" तुला, कमीतकमी शिस्त अन् वक्तशीरपणा अंगात आणलाच पाहिजे. नाहीतर तुझे सगळे गुण फुकट जातील."

तिने मग आमच्या मैत्रीचा हवाला देऊन माझ्याकडून वक्तशीरपणाचं चक्क प्रॉमिस घेतलं. एकदा नव्हे, अनेकदा. आज मागे वळून बघताना जाणवतं की, प्रियाने माझ्यात हा आमूलाग्र बदल घडवून आणला.

सर्वसाधारणपणे आज मी कुणालाही विचार करु वेळ देतो. अन् वेळ दिली की, त्याअगोदर पाच मिनिटं तिथे पोहोचतो. हे प्रियाच्या ' शाळे ' शिवाय झालं नसतं.

माझ्या बाजूने जे काही मी तिच्याशी बोलत असे त्याचा तिच्यावरही परिणाम होत असे. आमच्या मैत्रीच्या काळात असं क्वचितच घडलं की, प्रिया तिच्या पध्दतीने कुणावर माझ्यासमोर चाल करुन गेलीय. माझ्यासमोर तरी ती ते कटाक्षाने टाळत असे. फक्त दोन असे प्रसंग घडलेत; पण त्या दोन प्रसंगामुळेच मी असं म्हणेन की, प्रियासुध्दा तिच्या बाजूने मैत्रीच्या कराराचं जिवाच्या आकांताने पालन करण्याची कसोशी करत होती.

**_'आपण ज्यात खूप आहोत, त्यात आपण नसतोच.'_**

*अभिनेत्री म्हणून मला स्वतःला प्रिया कधीही सर्वकालिक असाधारण वाटली नाही; पण याला अपवाद आहे. काही अभिनेते / अभिनेत्री असे असतात की, त्यांच्या टाईपच्या भूमिका लिहाव्या लागतात. तसं झालं तर ती भूमिका ते असाधारण कौशल्याने पार पाडतात. प्रिया अभिनेत्री म्हणून अशातली होती. तिच्या मनाला तिच्या भूमिकेतलं काहीतरी ' क्लिक ' व्हावं लागे. ते न झाल्यास ती भूमिका काही फार वेगळी होत नसे. मी स्वतः लिहिलेल्या ' आरंभ ' मालिकेत तिने घटोस्फोटित; पण मनाने पतीच्या घरापासून वेगळी होऊ न शकलेल्या ' स्त्री 'ची भूमिका केली होती. ते पात्र तिने असाधारण उंचीला नेऊन पोहोचवलं. राजू गेला त्या अगोदर तासभर आम्ही (प्रिया आणि मी) दुसऱ्या दिवशीच्या शेडयुलबाबत काय निर्णय घ्यावा, याची चर्चा करत होतो. प्रियाला राजूचं भवितव्य माहीत होतं आणि त्या क्षणी तरी तिने ते ठामपणे स्वीकारलेलं होतं. आम्ही बोलत असताना एक वृध्द बाई तिथे आली अन् तिने प्रियाला 'तुम्ही*

*आरंभ मधल्या ना ?' असं विचारलं. त्याही परिस्थितीत प्रियाने माझ्याकडे बघून म्हटलं, " तू ' रजनी ' पुरलीस ? "*

*त्या मालिकेत काम करताना तिने माझ्याकडून प्रॉमिस घेतलं होतं. मी ज्या कथेचे डायलॉग लिहीन अशा कथेत तिच्यायोग्य भुतिका असेल तरी मी तिला पहिल्यांदा विचारायचं. दुर्दैवानं हे सारं पुन्हा जुळून आलं नाही.*

*एकदा ' आरंभ ' च्या शूटिंगनंतर तिने मला फोन केला. मी सहसा शुटिंगला जात नसे. दुसऱ्या दिवशी तिने शूटिंगला बोलावलं. मी नकार दिला; पण संध्याकाळी तिला घरी जाऊन भेटायचं मान्य केलं. संध्याकाळी प्रियाने मला आख्खी. ' शॅंपेन ' ची बाटली भेट दिली. एका डायलॉगप्रित्यर्थ. तो डायलॉग खरं तर प्रियाच्या तोंडी नव्हता. सतीश पुळेकर प्रियाच्या पहिल्या नवऱ्याची भूमिका करायचे. त्यांच्या तोंडी प्रियाला उद्देशून डायलॉग होता. " ज्याची बायको काहीही कारण न देता त्याला सोडून जाते, त्याचा हात रात्री बिछान्यात सरावाने बायको झोपल्यच्या जागी जातो, तेव्हा ती जागा रिकामी नसतेच. बायकोने जाताना न दिलेलं कारण तिथे झोपलेलं असतं. हात पडल्यवर ते जागं होतं अन् मग आख्खी रात्र डोळयासमोर पसरते."  मला प्रियाने त्याच डायलॉगसाठी शॅंपेन दिली.*

*पुढेही हिंदीत प्रियाने मी लिहिलेल्या मालिकांत काम केलं, पण डायलॉग माझे नव्हते. अन् असं काहीच जुळलं नाही. ' आरंभ ' च्या अखेरीचं दृश्य मी प्रियावर लिहिलेलं होतं. मालिकेतील तिच्या दोन मुली अन् पहिल्य नवऱ्याने लग्न केलेली त्याची नवी पत्नी यांना देश सोडून जायच्या अगोदर प्रिया स्वतःच्या घरी बोलावते अन् सगळयांना फोटोसाठी उभं करते. मुली तिलाही आग्रह करतात तर ती नकार देते. अन् म्हणते, " आपल्याला वाटतं की, आपण ज्यात खूश आहोत, खरं तर आपण त्यात नसतो. . "  कॅमेरा क्लिक होतो. प्रियाविना तिच्या कुटुंबाचा फोटो निघतो. इथे मी मालिका संपवली होती. दिग्दर्शकांनी हे दृश्य शूट केलं नाही. अगोदरच्या कुठल्या तरी दृश्यावर मालिका संपली. लिहीत असताना प्रिया हे दृश्य कसं करेल याची कल्पना मी केली होती. ती तशीच राहिली. व्हर्जिन कल्पना.*

एकदा प्रिया आणि मी तिच्या गाडीने अंधेरीकडे कुठेतरीच चाललो होतो. प्रियाचा नवा ड्रायव्हर गाडी चालवत होता. तिला कोणताच ड्रायव्हर पटायचा नाही. प्रियाच्या गाडीत प्रिया बसली न् पुढे ड्रायव्हर असला की, ड्रायव्हरची कंबख्तीच भरायची. असे अनेक ड्रायव्हर तिने काढून टाकले. त्या दिवशी मी आणि ती गूढविद्येवर काहीतरी बोलत होतो. तेवढयात रस्त्यावरच्या खड्डयात गाडीने धक्का खाल्ला. झालं, प्रियाचं डोकं गेलं. तिने ड्रायव्हरला हिंदीत (तो हिंदी भाषिक होता) उभा-आडवा सोलायला सुरुवात केली. काही मिनिटांत तिला जाणीव झाली की, मी प्रचंड अस्वस्थ झालोय. तिने मला समजवायला सुरुवात केली. ती म्हणाली,

“ हे बघ, मला उत्तम ड्रायव्हिंग येतं (हे अगदी खरं होतं.). आपण तिळतीळ तुटून पैसे कमावतो. त्यातले पैसे आपण त्या ड्रायव्हरना देतो. आणि हे मात्र बेदरकारपणे गाडी चालवतात. समजतात काय हे ? ” बअसं बोलून तिने पुन्हा ड्रायव्हरलासोलायला सुरुवात केली. संपूर्ण प्रवासभर ती न राहवून ड्रायव्हरवर चाल करुन जात होती. त्याच वेळी मला ‘ समजेल ’ असं त्या कृतीचं विश्लेषण करुन मला समजावत होती.

दुसरा प्रसंग ऑगस्ट २००१ मधला आहे. आमचं ‘ जिम्मेदार कौन ’ चं शेडयूल होतं. शूटिंग नानावटी स्टुडिओत चालू होतं. शूटिंगच्या वेळेला बहुतेक वेळ मी प्रियाच्या मेकअपरुममध्ये असे. आम्ही दिवसाला साधारणपणे चार एपिसोलड्स शूट करीत असू. एपिसोडच्या अगोदर एपिसोडची उजळणी चालत असे. विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची आम्ही चर्चा करत असू. शेवटच्या चौथ्या एपिसोडला प्रिया सेटवर जाण्याअगोदर काहीतरी कारणाने प्रियाला कुणाची तरी चीड आली. तनुजा तिथेच होती. प्रिया चिडून काहीतरी बोलू लागली. तनुजाने तिला गप्प करण्यासाठी ‘ शू SS ’ असं केलं. त्याने प्रिया अधिकच चिडली. ‘ शू SS कुणाला करता तुम्ही ?’ असं विचारुन तिने भांडणात तनुजाला आणि मलाही ओढलं. माझी कुणालाच पर्वा नाही, या अर्थाचं बरंच बोलून ती शूटिंगला आत गेली.

सर्वसाधारणपणे माझं काम संपल्यावरही मी अखेरचा एपिसोड शूट होईस्तोवर थांबत असे. त्या दिवशी तसं न करता मी निघून गेलो. त्या दिवशीच रात्री बारा वाजता मी गाढ झोपेत असताना माझा मोबाईल वाजला. मोबाईलवर प्रियाचा ‘ आय ॲम एक्स्ट्रीमली सॉरी, प्लीज डोन्ट माइंड ’ असा मेसेज होता. मी तिला ‘ आय डिडन्ट माइंड. प्लीज फर्गेट इट ’ असा मेसेज पाठवला. तर तिचा, ‘ आय डोण्ट फर्गेट, बट यू प्लीज फर्गीव ॲण्ड फर्गेट ’ असा मेसेज होता. हे

प्रेमाचं मेसेज-युध्द मग रात्री दोनपर्यंत चालू राहीलं.

प्रियात आणि माझ्यात घनिष्ट मैत्री होण्याला कारणीभूत काही दुवे होते. त्यातला महत्वाचा म्हणजे, या जगात आपल्या छोटयाही चुकीला क्षमा होणार नाही. आपल्याला जगण्याकरता फारसे फेवरेबल पर्याय नाहीयेत याची जाणीव. गूढविद्या आणि ज्योतिषाचा नाद, हा आमच्यातला अजून एक दूवा. आम्ही एकमेकांच्या ओळखीच्या अनेक गूढवादी अन् ज्योतिषांना जाऊन भेटी दिल्यात. माझ्यापेक्षा प्रियाला अशा गूढवाद्यांचा शोध लवकर लागायचा. मग ती फोन करायची. त्या गूढवाद्याच्या सिस्टीमची माहिती द्यायची. मग मी प्रियाच्या मागे लागायचो. फिल्मवाल्यांची लाडकी ज्योतिषी सुनीता मेननची भेट प्रियामुळे अशीच अचानक झाली.

एक सकाळी प्रियाचा मला फोन आला. तिने आग्रह करुन दुपारी मला पार्ल्याला बाबांकडे बोलावलं. मी गेलो. ती म्हणाली,

“ आज एक सरप्राइज आहे; पण संध्याकाळपर्यत वाट पाहा. ”

संध्याकाळी पाच वाजेस्तोवर मी तेंडुलकरांशी बोलत बसलो. पाच वाजेस्तोवर प्रिया घरांमध्ये आई, सीमा, बंटीशी बोलत बसली. तिच्या जबाबदाऱ्यांसंबंधीही काहीतरी कामं होतीच. पाच वाजता ती म्हणाली, ‘ चल. ’

आम्ही गाडीत असल्यावर म्हणाली, “ मी मुला सुनीता मेननकडे नेतेय. ” तोपर्यंत प्रियानेही सुनीता मेननची भेट घेतेलेली नव्हती. प्रियाला मी विचारलं, “ तू अपॉईंटमेंट घेतलीयस का ? ”

प्रियाने अपॉईंटमेंट घेतलेली नव्हती. तिने फक्त पत्ता शोधून काढला होता.

सुनीता मेननकडे प्रियाने आपला नेहमीचा चार्म वापरुन आत जाण्याची संधी मिळवली, आत जाऊन तिला सांगितले,

“ तू मला जो अर्धा तास देणार आहेस; तो दोन भागात वाट. माझा अर्धा वेळ माझा मित्र माझ्यासोबत आलेला आहे त्याला दे. असं तू करणार नासशील तर मग मलाही माझं भविष्य जाणून घेण्यात रस नाही. ”

त्या दिवशी सुनीता मेननने मला वाटतं, पहिल्यांदाच पंधरा-पंधरा मिनिटात दोन माणसांचं भविष्य पाहिलं.

एकदा प्रियाने मला मनगटात घालायला भगण्या मण्यांची एक माळ दिली होती. त्यामुळे मी खूप सुखी होईन असा तिचा दावा होता. गळयात घालायला फेंगशुईचा एक खडाही तिने मला दिला होता. तिची इच्छा झाली की मी तिने दिलेल्या गोष्टी घालतोय हे तिला दाखवावं लागे. नाहीतरी तिच्या त्या करण्याला

माझ्यालेखी काही किंमत नाही हे ती मनाने घेईल अशी भीती सतत माझ्याकडे असे. २००१ च्या डिसेंबरात मी एकदा लिहीत बसलेलो असताना माझ्या मनगटातली प्रियाने दिलेली प्लॅस्टीकच्या दोऱ्यात ओवलेली माळ कचकन तुटली. तिचे मणी इतके इतस्ततः विखुरले की शोधूनही ते सर्व सापडले नाहीत. तिचा फेंगशुईचा खडा कुठेतरी घरातच आहे. गेला महिनाभर मी शोधतो आहे.

तिने राजूला वाचवण्यासाठी या सर्व विद्यांचाही सहारा घेतला होता. सर्व ज्योतिषी, डॉक्टर्स, पुजारी सर्व काही तिन केलं. तिच्याहून कुणीही बहीण मला नाही वाटत आपल्या भावासाठी काही करु शकली असती; पण राहूवरच्या तिच्या आत्यंतिक प्रेमातच मला वाटतं की, एका शोकांतिकेने जन्म घेतला. किंबहुना, प्रिया नेहमी म्हणत असे, 'मी कोणालाही पकडून ठेवू इच्छित नाही. कारण मी कशासाठीही आटापिटा केला की ते माझ्या हातातून जातं.' प्रिया ज्यांच्यावर प्रेम करत असे त्यांच्या आयुष्याचा ती कब्जाच घ्यायची. राजूच्या बाबतीत तिने नकळत असं केलं असं आता मागे वळून पाहताना वाटतं. तिला जे माणसांना पकडून ठेवताना आपण त्यांच्या आयुष्यातली 'स्पेस' नाहीशी करतो याचं ज्ञान होतं, त्याचा वापर तिने राजूच्या बाबतीत केला नाही. प्रेमामध्ये ती सगळी निर्णयप्रक्रिया स्वतःच्या अखत्यारीत आणत असे. राजूच्या स्वभावाची घडण प्रियापेक्षा एकदम भिन्न होती. राजू आणि प्रियाच्या आयुष्यात वेगवेगळया वेळी वेगवेगळया गोष्टी चुकत गेल्या. म्हणजे त्या नियतीच्या इच्छेनेच चुकल्या असं म्हणणं अधिक योग्य होईल. बाहेर बऱ्याच जणांचे राजू तेंडुलकरांबद्दल वेगवेगळे समज होते; पण मी त्याला अगदी जवळून पाहिलेलं आहे. राजू अतिवंसेदनशील होता; पण त्याला स्वतःच्या जबाबदारीची जाणीव नव्हती असं अजिबात नव्हे. किंबहुना, त्याला स्वतःच्या जबाबदारीचा अवास्तव ताण होता. आपल्यावर मुलगा म्हणून काही जबाबदाऱ्या अन् अपेक्षा आहेत, हे त्याच्या मनाने अगदी तरुणपणी घेतलं. त्यात तो काही व्यापार करुन कर्तृत्व दाखवायला गेला. त्या व्यापारात त्याचा जो भागीदार होता तो चक्क एक बदमाश इसम होता. त्याने राजूला भलत्याच कायदेशीर कटकटीत गुंतवलं. राजू 'मायनर' होता. त्यामुळे त्या खटल्यात तेंडुलकरांचं नाव वडील म्हणून गोवलं गेलं. या घटनेने राजूच्या आयुष्यालाच न बुजणारे तडे गेले. आपण कुटुंबाची जबाबदारी घेण्याऐवजी उलट आपल्या कर्तृत्वान वडिलांना आणि कुटुंबाला त्रासच देतोय, हे त्याच्या मनाने घेतलं. अन् त्याने आपला मार्ग निवडला. तो मार्ग प्रचंड आत्मपीडनाचा होता. त्या सगळया घटनांचा प्रियाने वेगळा अर्थ लावला. तिचा

भाऊ हा जगात संघर्ष करुन विजयी होण्याची शक्यता तिला कमी वाटू लागली. उलट, पुन्हा पुन्हा राजू जगाकडून फसवला, नाडला जाऊन रक्तबंबाळ होण्याची शक्यता अधिक होती. त्यामुळे आपल्या सामर्थ्याच्या अन् शहाणपणाच्या बळावर ती राजूची संरक्षक ढाल बनली. ही गोष्ट वरवर साधी दिसली तरी राजूसारख्या सरळ, उमद्या आणि संवेदनशील माणसाचं पौरुष दुखावणारी होती. राजू माझा कित्येक बाबतीत प्रियापेक्षाही जवळचा मित्र होता. मुख्य म्हणजे तो प्रियासारखा गुंतागुंतीचा नव्हता. त्याला समजणं सोपं होतं. मी पाहिलेल्या उत्तम कॅमेरामन्सपैकी तो एक होता. त्याचं लायटिंग आजही आठवतं...

प्रियाच्या त्या कब्जा घेण्यामुळे तो आतून कळवळत असे. प्रियाचीही एक बाजू होती. राजूचीही एक बाजू होती. मला स्वतःला राजूची बाजू बरोबर वाटायची; पण हे निःसंदिग्धपणे मी प्रियाला कधीच सांगू शकलो नाही. याउलट, आयुष्य जगातले अपमान, अप्रतिष्ठा अन् समस्या झेलल्याशिवाय जगावं असं वाटत असे. कारण हे सर्व झेलण्याकरीता ती होतीच. शिवाय तिच्या दृष्टीने, हे सर्व झेलायला राजू जाता अन् अगोदरच्या अनुभवाप्रमाणे रक्तबंबाळ होऊन येता, तर ते तिला अन् बाबांनाच निस्तरावं लागलं असतं. त्यापेक्षा त्याने संरक्षित आयुष्य जगावं, हे तिला उत्तम वाटायचं.

मी आडून आडून प्रियाला राजूची बाजू सांगायचो. त्याचीही स्वतःची आयडेण्टिटी साकार व्हायला हवी असेल तर त्याच्या आयुष्याची निर्णयप्रक्रिया तिला कितीही त्रासदायक वाटली तरीही तिने राजूवरच सोपवायला हवी. ते स्वतः राजूला आणि मुख्य म्हणजे तेंडुलकरांनाही आवडलं असतं; पण प्रियाच्या संपूर्ण संरक्षित प्रेमाच्या कल्पनेपुढे बाकी कुणाचं काहीही चालू शकलं नाही. अगदी बाबांचंसुध्दा.

राजू गेला तेव्हा प्रियाने जे पहिलं वाक्य उच्चारलं ते तिच्या मनात जी घालमेल अन् खळबळ चाललेली होती त्याचंच साक्षी होतं. प्रिया म्हणाली,

“मला सोडून गेलास ना, तुला जिथे सुख मिळेल तिथे जा, तिथे सुखी राहा. तिथे तुला तुझ्या मनासारखी चांगली बहीण मिळो, जे तुझ्या मनात येईल ते ती करेल. माझ्यासारखी प्रेमाची जबरदस्ती करणार नाही...”

ऐकणाऱ्याच्या हृदयाला चरे पाडणारा तो प्रसंग होता. राजूचं प्रियावर आणि प्रियाचं राजूवर आत्यंतिक प्रेम होतं; पण दुर्दैवाने शेवटी हा हताश ताण निर्माण झाला.

राजू गेला तेव्हा प्रियाला कॅन्सर झालेला होता. कॅन्सरच्या पहिल्या झेपूतून प्रिया अंगभूत जिद्दीने आणि औषधोपचाराने नुकतीच बाहेर येत होती. ‘ जिम्मेदार कौन ’ कार्यक्रमाचं दुसऱ्याच दिवशी शेडयुल होतं. राजू संध्याकाळी गेला. तरीही प्रचंड वेदना, दुःख दाबून तेंउुलकर स्वतः, प्रिया, तनुला दुसऱ्या दिवशी सकाळी साडेआठला सेटवर हजर होते. सेटवर कधीही नव्हे एवढं उदास वातावरण होतं. तसं वरवर कुणीच दाखवत नव्हतं. तरीही सर्वांना ते जाणवत होतं. मेकअपरुममध्ये जास्त वेळ मी, प्रिया अन् तनुजा असत असू, कधी मी आणि प्रिया, कधी मी आणि तनुजा. प्रिया सतत म्हणत होती की, उगाच मला रडवण्याऱ्यांना मला भेटू देऊ नकोस.

त्या दिवशी आम्ही चार एपिसोड्स शूट केले. मानसिक आणि शारिरिक थकव्याने प्रिया प्रचंड दबून गेली असणार; पण तिने तसं अजिबात दाखवलं नाही. त्या दिवशी माझी इच्छा असूनही मी प्रियाशी फार बोलू शकलो नाही; पण माझं तिच्यासोबत असणं तिला आश्वासक वाटतयं त्याचं मला फार बरं वाटलं.

राजूला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलं तेव्हा मी एकदाही हॉस्पिटलमध्ये गेलो नव्हतो. कारण राजू फार चिडचिडा झालेला होता. अन् मला अशा वेळी आपण नेमकं काय बोलावं ते कळत नसे. सुरुवातीला राजूची तब्येत काही फार बिघडलेली नव्हती. राजूला हॉस्पिटलमध्ये दुसऱ्यांदा ॲडमिट केल्यावरही तो सुधारत होता; पण मग अचानक त्याची तब्येत जास्त बिघडली अन् त्याच्या शरीरातून रक्तस्त्राव होऊ लागला. शरीरात असलेली शरीरातून बाहेर वाहणारं रक्त स्वाभाविकपणे गोठण्याची प्रक्रिया बंद झाली, तेव्हा प्रियाचा मला फोन आला. मी म्हणाली,

“ बाबांकडे जा, त्यांची काळजी घे, राजू आता वाचेल असं वाटत नाही. ”

नंतर प्रियाने दोनदा फोन करुन मी बाबांकडे पोहोचलोय याची खात्री करुन घेतली. मी बाबांकडे पोचलो तेव्हा बाबांकडे स.ह.देशपांडे बसलेले होते. तितक्यात प्रियाचा मी पोहोचलोय याची खात्री करुन घेणारा फोन आला. स.ह. देशपांडेंना तेंडुलकर; राजू गेलाच आहे असं धरुन काहीतरी बोलले. त्यावर तेंडुलकरांना स.ह., ‘ जोपर्यंत खरोखरच संपत नाही तोपर्यंत सारं काही संपलं म्हणून नये,’ अशासारखं काहीतरी म्हणाले. माझ्याच्याने तेंडुलकरांच्या समोर बसून भावना आवरणं आता खूप कठीण होत होतं. त्या वेळेला मला माझ्यात

आणि प्रियात मृत्यूसंबंधी झालेला एक करार आठवत होता. प्रियाच्या काही ठाम समजुती होत्या. त्यातली एक म्हणजे, आपल्या अगदी जवळची - प्रेमातली व्यक्ती मृत्यु पावली तर ती व्यक्ती वर जाऊन खाली असलेल्या आपल्या जवळच्या व्यक्तीच्या नशिबाच्या बिघडलेल्या सर्व तारा व्यवस्थित करते अन् मग जवळच्या जिवंत व्यक्तीचं फार भलं होतं. प्रियात आणि माझ्यात मृत्यूसंबंधी जेव्हा जेव्हा बोलणं होई तेव्हा तेव्हा प्रियाने एक करार केला होता. जर मी अगोदर गेलो तर मी तिच्या नशिबाच्या तारा नीट करणार होतो.... राजू अत्यवस्थ असताना तेंडुलकरांच्या समोर बसून मृत्यूसंबंधी सगळया गोष्टी डोक्यात भिरभिरत होत्या, तेव्हा ही एक गोष्ट त्यात होती.

प्रिया गेली तेव्हा मला वर्तमानपत्रातून फोन यायला लागले. मी दादरमध्येच होतो. मला सुरुवातीला विश्वासच वाटेना. मन भ्रमित झालं. त्या भ्रमित अवस्थेत मला पुन्हा पुन्हा वाटत होतं की, प्रिया फोन करुन “ बाबांकडे जा, त्यांची काळजी घे.” असं सांगेल. फक्त एक वर्ष दोन महिन्यांपूर्वीच तिने असंच केलं होतं. राजू अचानक गेला. त्याला प्रियाने तिच्या नशिबाच्या तारा नीट करायचा अवधीही दिला नाही. आता हे लिहितानासुध्दा सारखा मनाचा एक कोपरा हे गृहीत धरुन लिहितोय, की प्रिया ते वाचणार आहे. मग मध्येच मन भानावर येतं.....

# राज आणि फोटोबायोग्रफी

**बा**ळासाहेबांच्या फोटोबायोग्रफीचं (ग्र. 'ग्रा ' नव्हे) काम खूप काळ सुरु होतं. मी राजकडून त्याबद्दल ऐकतही होतो. श्वेता परुळेकर, विनायक नायक ही मंडळी मधूनमधून त्या भल्यामोठया पुस्तकाचं वजन पेलत राजच्या घरी येऊन जातानाही मी एकदोनदा पाहिलं होतं, पण तोपर्यंत पुस्ताकाशी माझा थेट संबंध नव्हता. जवळच्या मित्राच्या घरी मिठाई बनवत असताना आपलं तिथं जाणं व्हावं आणि थोडसं वासावरुन, काही आपल्या मित्राच्याच सांगण्यावरुन आपल्याला

कळावं तसा काहीसा तो मामला होता.

त्यानंतर असाच एका दुपारी राजकडे गप्पा मारत असलेलो असताना पुन्हा एकदा श्वेता परुळेकर पुरस्ताकचं बाड सांभाळत आल्या. त्या दिवशी बॉम्बे आर्ट सोसायटीचं चित्रांचं प्रदर्शन होतं. राज त्या प्रदर्शनाला जाणार होता. जाण्याअगोदर तो मुख्य विषयाकडे वळला. मला तो म्हणला, " ही बाळासाहेबांची फोटोबायोग्रफी. ती नीट वाचून-पाहून मला तुझं खरंखुर मत हवंय. जमल्यास आजच मी निघतोय, पण तुला श्वेता पुस्तकाबद्‌दल सगळं समजावतील " नंतर मी श्वेता परुळेकरांबरोबर ते भलंमोठं पुस्तक पहायला बसलो. विवेक परुळेकर पहाटेच्या फलाईटने आलेला होता. (*तो पायलट आहे.*) त्यामुळे तो पेंगुळलेला होता. त्याला आतमध्ये झोपवून राज प्रदर्शनाला गेला.

" बाळ केशव ठाकरे - अ फोटोबायोग्रफी " या पुस्तकाच्या घडयात माझा प्रवेश हा असा झाला. त्या दिवशी तिथेच, राजच्या घराच्या दिवणखान्यात शिसपेन्सिल घेऊन मी श्वेता परुळेकरांसोबत ती फोटोबायोग्रफी पाहायला बसलो. प्रत्येक पानाबाबत माझं मत होतं. पुस्तकाची कॉपी हा तर माझाच विषय. त्याबद्‌दल तर विशेष मत होतं. ते मी त्या पानावर नोंदवत गेलो. संपूर्ण पुस्तक पाहून झाल्यावर पुस्तकाच्या मागच्या पनावर मी रजा एक चिठ्ठी लिहिली. जी पुस्ताकचं विश्लेषण करणारी होती. जवळजवळ एकशे सत्तावीस ठिकाणी कॉपी लिहिण्याची गरज होती. काही ठिकाणी कॉपी नव्याने लिहिण्याची गरज वाटत होती. काही ठिकाणी कॉपी कमी करण्याची गरज वाटत होती. हे सगळं मी राजला स्पष्टपणे लिहून ठेवलं आणि त्या दिवशी त्याच्याकडून निघालो. तेव्हा विवेक परुळेकर अजून जागा झाला नव्हता. त्यानंतर मध्ये एक दिवस गेला. तिसऱ्या दिवशी आम्ही सगळे पुन्हा भेटलो. तेंव्हा राज म्हणाला, " ते जे तू लिहून ठेवलंयस ते तुलाच करायचंय."

त्यानंतर जवळजवळ रोजच आम्ही सर्वजण श्वेता परुळेकरांच्या स्टुडिओत दिवसभर जमू लागलो. त्या 'आम्ही' मध्ये खुद्‌द राज, श्वेता आणि विवेक परुळेकर, विनायक नायक, विलास साळुंखे, मी आणि इतर अनेक कलाकार तंत्रज्ञ असत. एखाद्या कलाकृतीची निर्मिती करताना जे आदर्श वातावरण निर्माण व्हावे लागले ते करण्यासाठी राज कसोशीने प्रयत्नशील असायचा. सकाळपासूनच पुस्तकातल्या प्रत्येक फोटोबाबत आणि प्रत्येक मजुकराबाबत प्रचंड ब्रेनस्टॉर्मिंग व्हायचं. राजची चर्चा वादळी करण्याची एक खास स्टाईल आहे. तो एक मुद्‌दा सर्वांसमोर टाकायचा. मग चर्चा होऊ द्यायचा. चर्चा होऊ द्यायचा. चर्चा तापायला लागली की त्याला आमच्यापैकी कुणाचं मत मान्य आहे आणि ते का मान्य आहे हे सांगायचा. मग चर्चेच्या भोवऱ्यात तो सुद्‌धा ओढला जायचा. आमच्यापैकी ज्यांना राजचं

मत मान्य नसायचं ते ‘ साक्षात राज ठाकरे ’ यांच्या विरोधात मत न नोंदवता आपलं मत कडेकडेनं व्यक्त करायचे. स्वतः राजने मात्र या सर्व प्रक्रियेत ‘ मी हे म्हणतोय म्हणून बरोबरच आहे हे तुम्ही मान्य करा. ’ अशी भूमिका कधीच घेतली नाही. आपलं मत मांडण्याची एक पद्धत मग आम्ही तिथे रुढ केली. त्या पद्धतीनुसार ज्याला पुस्तकाबद्दल जे काही मत मांडायचंय ते त्याने/ तिने त्याच्या शास्त्रीय तर्कासहच मांडायचं असा आम्ही नियमच केला. याबाबतीत मी जरा पुढाकार घेतला. ही पद्धत रुढ झाल्यावर चर्चा अतिशय सघन व्हायला लागल्या. अगदी गोळीबंद. हे सारं होऊ शकलं कारण राजने पुस्तकाच्या परिपुर्णतेचा अक्षरशः ध्यास घेतला होता. सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत तो पुस्तकनिर्मितीच्या प्रक्रियेतल्या प्रत्येक बाबींवर थकून जाईस्तोवर काम करीत असायचा. बाळसाहेबांच्या आयुष्यातले अनेक प्रसंग असे होते की त्याचे फोटो मिळायच नाहीत. कॉम्प्युटरसमोर बसून थकलेल्या डोळयांनी रात्ररात्र अक्षरशः हजारो फोटो डोळयांसमोर घेऊन बसलेला राज मला अजून आठवतोय.

या पुस्तकात बाळासाहेबांच अख्खं आयुष्य अलवारपणे उलगडत जातं. एक व्यंगचित्रकार म्हणून कलावंतांच आयुष्य जगणारे बाळासाहेब, त्याही अगोदर प्रबोधनकारांसोबत उभे असलेले किशोरवयीन बाळासाहेब, मीनाताईसोबत लग्न झालं तेव्हाचे बाळासाहेब आणि स्वप्नाळू डोळयांच्या मीनाताई. त्या वेळच्या मीनाताईंच्या डोळयांत उद्याची स्वप्नं बघणारी भंवुकता दिसते. शिवसेनेच्या स्थापनेअगोदरचा बाळासाहेब आणि श्रीकांतजींच्या आयुष्यातला निवांतपणा, नंतरचा शिवसेनेचा झंझावात, प्रचंड संघर्ष, बाळासाहेबांची अटक, मुंबई बंद च पर्व. बाळासाहेबांच्या पोषाखात होत गेलेला असंख्य उतार-चढाव हे आणि असं या अगोदर कुणीही कधीही न पाहिलेलं बरचं काही या पुस्तकात आहे. बाळासाहेबांबरोबर त्यांच्याबरोबरचे अनेकजण आणि त्यांची आयुष्यंही कशी बदलत गेली हे पुस्तक पाहताना आपोआप उलगडत जातं. मनोहर जोशींसारख्या शिवसेना नेत्याच्या डोक्यावर किती दाट केस होते ते कळतं ! खुद्द राज किती बारीक होता ते कळतं ! उद्धव पूर्वी जाड होता आणि आता बारीक झालाय हेही लक्षात येतं ! बाळासाहेबांच्या अंगावर शाल नेमक्या कोणत्या कालखंडात आली

हे सुद्धा कळतं. हे तर केवळ बाहय बदल. शिवसेनेच्या पूर्वीच्या पत्रकार परिषदांना पत्रकारांपेक्षाा शिवसेना नेतेच संख्येन किती जास्त असत हे सुद्धा पुस्तक पाहताना लक्षात येतं. साधं बाळासाहेबांच निवडणुकीतील मतदान किती प्रकारे बदलत गेलं हाही या पुस्तकाचा एक विषय आहे. एकेकाळी मतदान करताना बाळासाहेब एकटे असत आणि आज हे पुस्तक अनेक करोटयांवर उभं - आडवं पुनःपुन्हा तपासून पाहतांना राजने असंख्य माणसांची भेट घेतली. बाळासाहेबांची कौटुंबिक, व्यक्तिगत, राजकीय पातळीवर जी उत्क्रांती होत गेली ती अचूक, कलात्मक कसोटीवर आणि कोणतीही शास्त्रीय चूक न करताना एका पुस्तकात पकडणं ही प्रचंड दमछाक करणारी गोष्ट होती. कारण बाळेसाहेबांच्या आयुष्याशी महाराष्ट्राच्या इतिहासाचे असंख्य संदर्भ गुंतलेलं आहेत. जॉर्ज फर्नांडिस, शरद पवारांसारख्या समकालीन प्रवाभी नेत्यांची आयुष्यंही या गुंत्यात येतात. हे सार प्रवाहीपणे लोकांसमोर आणणरी फोटोबायोग्रफि बनवण हे किती अवघड आहे हे प्रत्यक्ष त्या कामाच्या प्रक्रियेतून गेल्याशिवाय कळूच शकत नाही.

माझा थेट संबंध पुस्तकाच्या काही कॉपी लिहिण्याच्या एका भागाशी होता. त्या व्यतिरिक्त लेआऊट, डिझाईन, रंगसंगती, फोटोंचा क्रम, त्यांचे संपुर्ण पुस्तक म्हणून दिसण - असे असंख्य विभाग त्यात येत होते. त्याबद्दल आगाऊपणाने आम्ही मते नोंदवत असे हे खरं, पण त्या प्रक्रियेचा सर्व भार राजने पेलला होता.

या पुस्तकाच्या कामाच्या काळात श्वेता परुळकरांचा स्टुडिओ हा आमचा अड्डाच झालेला होता. रात्री निघताना पुस्तकाच्या कामाचे जे संदर्भ सुटलेले असत त्यांचे धागे पकडून सकाळी परत एकदा ज्ञानयज्ञ सुरु हाई. लिहिलेला मजकूर मी मोठयाने वाचून दाखवत असते. त्यावर राज, श्वेता, विवेक, विनायक सर्वजण मत व्यक्त करीता असत. सुदैवाने बहूधा मतं अनुकुल असतं. राज जर माझ्या मजकुरातून कुठला तरी अज्ञात संदर्भ सुटलेला असेल तर तो संदर्भ सांगत असे. मग सुधारित मजकूर तयार होई सातत्याने दिवसांमागून दिवस हे काम अशा पद्धतीने चाललेलं होतं की परिपूर्णतेच्या ध्यासापलीकडे एक दिवस हे पुस्तक पुर्णत्वाला पोहोचून हे कामही संपेल ही भावनाच आम्ही सगळेजण विसरलो होतो. या साऱ्या काळात कष्टाने आमची वजनं कमी झाली असतील असं वाचकांना वाटलं तर ते साफ चुकतील. या साऱ्या काळात राजने दुनियाभरातून नानाविध प्रकारची जेवणं आणि खादयपदार्थ मागावून आम्हाला वाढवली. श्वेता आणि विवेकने राजचंच अनुकरण करीत राजच्या नजरेतून सुटलेले खादयपदार्थ आणि स्वादिष्ट जेवण खिलवून त्यांनी वनज घटण्याचे उरलेले सर्व मार्ग बंद केले !

याचा अर्थ या पुस्तकाच्या प्रक्रियेत तीव्र मतभेद झालेच नाहीत असं नाही. पुस्तकाच्या बाबतीत सुरुवातीला एका मुद्दयावरुन दोन मतप्रवाह होते. पुस्तकात बाळासाहेबांच्या आयुष्यातले विरंगुळयाचे काही क्षण टिपणारे फोटोज ' मूडस् ' नावाच्या स्वतंत्र कप्प्यात टाकण्यांत आलेले होते. माझं मत त्याविरुध्द होतं. अजित भुरेंचा (*आणि इतर काहींचा*) मूडस्च्या या वेगळया कप्प्याला पाठिंबा होता. माझ्या मताला श्वेताचा पाठिंबा होता. राजने आपलं मत कुणाच्याच पारडयात टाकलेलं नव्हतं. आमच्याच झालेल्या नव्या नियमाप्रमाणे त्याने माझ्या मतामागचा माझा तर्क विचारला. मी म्हटलं, " माणूस आयुष्य जगताना विरंगुळयाचे क्षण वेगळे काढून जगत नाही. संघर्षाचे आणि विरंगुळयाचे क्षण हातात हात घालून येतात जसे आयुष्यात ते येतात तसेच ते पुस्तकातही आले पाहिजेत. " राजने माझ्या मताला शंभर टक्के पाठिंबा दिला. अथोत् जेव्हा जेव्हा कुणीही राजकडे योग्य तर्कासह युक्तीवाद केला, तेव्हा तेव्हा राजने तो युक्तिवाद तत्काळ स्वीकारला. " बोलायला सर्वांना परवानगी आहे. ठरवेन मात्र मीच !" असं राज अनेकदा म्हणायला. ते तो खरंही करायचा, पण बोलणाऱ्या प्रत्येकाच्या मताचं पुरं मूल्यमापन करुनच. तरीही राजने माझ्या दोन सूचना मान्य केल्या नाहीत. त्यातली एक होती ती पुस्तकाच्या बुकमार्कसंबंधी. बुकमार्क हा पुस्तकातला मधला खुणेचा धागा असतो. तो बुकमार्क म्हणून राजने बाळासाहेबांची काढलेली व्यंगचित्रं (*पाठोपाठ*) असावी असा माझा आग्रह होता. कारण वास्तविक आयुष्यात व्यंगचित्रं हा राजला बाळासाहेबांशी जोडणारा एक धागा आहे. त्याचं ते कलात्मक (*आणि सूक्ष्म*) प्रकटीकरण तरलपणे पुस्तकात झालं असतं, पण " पुस्तकात मी दिसता कामा नये, " या राजच्या (*अजब*) आग्रहापायी ही सूचना त्याने मान्य केली नाही. याची सल मला कायम राहिली. माझी दुसरी सूचना (*खरंतर विनंती*) अशी होती की, अशा प्रकारच्या कॉपी रायटरचं (म्हणजे माझं) नाव देऊ नये. कॉपी रायटर हा अज्ञात रहावा किंवा त्याच्या स्टाईलमुळे तो ओळखला जावा, असं माझं म्हणणं होतं; परंतु राजने ' विशेष सहाय्य ' म्हणून का होईना माझा उल्लेख पुस्तकात केलाच आणि माझं ऐकलं नाही. मी राजला केलेली ही विनंती अंबरीश मिश्र यांनी मात्र इंग्रजी आवृत्तीत स्वतःचा व्हेटो वापरुन मान्य केली (*त्यासाठी त्यांचा मी ऋणी आहे.*)

मराठी पुस्तकाचं काम संपल्यावर माझी मराठीतली कॉपी मी इंग्रजीत रुपांतरित केली आणि ती अंबरीश मिश्र यांच्याकडे नेऊन दिली आणि त्याच दिवशी मी बाहेरगावी निघालो. विमानात डोळे मिटून बसलो असताना " बाळ

केशव ठाकरे - अ फोटोआयोग्रफी " या पुस्तकाचा इतके दिवस राजसोबत केलेला प्रवास माझ्या डोळयांसमोर उभा राहिला. पुस्तकाचं काम अखेरच्या टप्प्यात आलं असताना एकदा बाळासाहेबांचा अलीकडचा (*दाढी असलेला आणि हृदयावर हात ठेवलेला*) एक फोटो राजने पुस्तकात समाविष्ट केला. त्या वेळी तो फोटो न्याहाळत राज काही मिनिटं बसलेला होता. तेव्हाचे त्याच्या नजरेतले भाव वाचता येण्याजोगे होते. जणू नजरेने त्या फोटोवरुन हात फिरवीत तो म्हणत होता - माझे प्रिय बाळासाहेब... ते दृश्य माझ्या स्मरणातून कधीच जाणार नाही. आपला प्रिय नेता आणि आपला प्रिय काका किती असाधारण आणि वर्णनविलिक्षण आयुष्य जगेला आहे हे जगाला दाखवण्यासाठी जी कलाकृती बनविण्याचा ध्यास माझ्या या मित्राने घेतला त्यात माझाही छोटासा वाटा होता याचं मला तेव्हा समाधान वाटलं. पुस्तक जेव्हा लोकांसमोर येईल तेव्हा माणंस थक्क होतील याची मला खात्री आहे. बाळासाहेबांचं आयुष्य जेवढं वर्णनविलक्षण आहे तेवढंच ते मांडण्यांत राजने दाखवलेलं कौशल्यही वर्णनविलक्षण आहे. याविषयी कुणाचंच दुमत होणार नाही.

ज्या माणसाच्या हातात हे पुस्तक पडेल त्या माणसाला आपण बाळासाहेबांच्याच आयुष्याचा भाग आहोत असं वाटेल... आणि येणारा बराच काळ तसं वाटत राहील !

# सर्वसत्ताधीश

# हिटलर

**हिं**दुस्थानी समाजात हिटलरबद्‌दल हल्ली खूप जिज्ञासा आणि कुतूहल दिसून येतंय. ज्यांना लिहितावाचता येत अशा सर्वांना हिटलर काय होता आणि त्याने काय केलं याविषयी बऱ्यापैकी माहिती असते. पुस्ताकांच्या दुकानात हल्ली हिटलरवर रोज नवीन पुस्तकं येत असतात. मृत्यूनंतर साठ वर्षांनी एखाद्या व्यक्तीबद्‌दल एवढी उत्सुकता आणि एवढं कुतूहल क्वचितच दिसून येतं. वास्तविक दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात ॲडॉल्फ हिटलर हा व्हिलन मानला गेलेला आहे. त्याचा नॅशनल सोशॅजिस्ट पक्ष हा मानवताविरोधी कृत्यांसाठी प्रसिध्द

आहे. तरीही हिटलरविषयीचे हे कुतूहल कशासाठी ?

हिटलरने स्वतःच्या आयुष्यात शून्यातून संघटना उभी केली. ती उभी करताना त्याने माणसांच्या मानसशास्त्राचा सखोल अभ्यास केला. तो इतका सखोल होता की, संध्याकाळच्या वेळेला सभा घ्याव्यात. सकाळच्या वेळेला घेऊ नयेत असं तो (*हिटलर*) म्हणतो; कारण संध्याकाळच्या वेळेला माणसं मनाने थकलेली असतात. कुठच्याही राजकीय कल्पनांशी लढण्याची त्यांची ताकद कमी झालेली असते. नेमक्या अशाच वेळी नवीन राजकीय कल्पना लोकांवर लादता येतात, असा दावा हिटलरने केलेला आहे. जो दावा प्रात्याक्षिकांसहित त्याने यशस्वी करुन दाखवला. आजही कुणाला हिटलरच्या संध्याकाळच्या सभा किती यशस्वी होतं हे पाहायचं असेल तर त्याने लेनी रॅफेनस्थल नावाच्या दिग्दर्शिकेने त्या काळात नऊ कॅमेरे लावून शूट केलेली ' ट्रायम्फ ऑफ विल ' नावाची फिल्म बघावी.

हजारो लोकांचे मशाल मोर्चे, लक्षावधी लोकांच्या सभा आणि एकामागे होणारी नाझी नेत्यांची भाषणं यांनी त्या काळातलं जर्मन जनमानस ढवळून काढलं. या साऱ्या भाषणांचा कळस हिटलरच्या भाषणाने होत असे. पुढे पुढे नाझी पक्षाच्या या सभांमुळे आख्ख्या युरापेला धडकी भरु लागली. ॲडॉल्फ हिटलर आणि त्याच्या पक्षाचं सामर्थ्य जो जो जो वाढत गेलं तो तो लक्षात हे येत गेलं की, हे सामर्थ्य मानवी जीवनाच्या आणि मानवी रचनेच्या हिताचं नव्हतं. विध्वंस हेच हिटरलचं खरं सामर्थ्य होतं. त्याचं जे म्हणून काही तत्वज्ञान होतं त्यात कोणत्याही रचनेच्या विध्वंसापासनू ते विध्वंसापर्यंतच विचार त्यने केल्याचं दिसून येतं.

बऱ्याच जणांना असं भाबडेपणानं वाटलं की, हिटलरने जर्तनीचे अनेक आर्थिक प्रश्न सत्तेवर आल्या आल्या सोडवले. ही त्याच्या रचनात्मक कर्तृत्वाची पावतीच मानली पाहिजे. वास्तविक हिटलर जर्मनीत सत्तेवर आल्या आल्या जर्मनीतले बेरोजगारी आश्चर्यकारण रीतीने कमी व्हायला लागली. याचं मुख्स कारण म्हणजे पुढच्या विध्वंसाच्या तयारीसाठी आख्ख्यी तरुण पिढी त्याने गुंतवली. युध्दाच्या तयारीसाठी जे उपक्रम आणि शस्त्रास्त्र कारखाने त्याने सुरु केले त्यात सर्व देश कामाला लागला. म्हणजे ही विध्वंसाच्या आधाराने उभी असलेली रोजगार हमी योजनाच ! प्रश्न असा पडतो की हिटलरने असा हा विध्वंस का केला ज्या विध्वंसाचा पायाच मुळात अशास्त्रीय होता. आर्य आणि अनार्य अशा दोन वंशांत या जगाची विभागणी झालेली असून आर्य हे उत्क्रांतीच्या

पुढच्या टप्प्यावर असून अनार्याची योजना मानवी उत्क्रांतीत आर्यांचे गुलाम म्हणूनच झालेली आहे. अशा स्वनिर्मित खुळचट तत्वज्ञानासाठी हिटलरने आपलं आख्खं विध्वंसाचं यंत्र राबवलं. हिटलरचा सुरुवातीचा विध्वंस हा अनुयायी मिळवण्याकरता होता. त्याच्या मते, जनता ही बाईसारखी असते. *(यातही त्याचा स्त्रीविरोधी अहंमन्य दृष्टिकोन दिसतो)* ती विध्वंस करु शकणाऱ्या सामर्थ्यशाली पुरुषाला वश होते. हिटलरच्या आर्यअनार्य कल्पनेने हिंदुस्थानातल्या ब्राम्हणवाद्यांच्या छात्या फुलून येतात. शिवाय स्वस्तिक वगैरे चिन्हं पाहून असं त्यांना वाटतं; परंतु  हिटलर भारतीयांना अनार्य (*आणि म्हणूनच गुलाम*) वंश मानत असे. सर्वच काळे आणि तपकिरी त्याच्या दृष्टीने अनार्य आणि गुलामच होते. गोऱ्यांमध्येही त्याने आर्य-अनार्यचे बरेच भेद केलेले आहेत. मुख्य म्हणजे त्याची गोऱ्यांची संकल्पना ही इथल्या गोऱ्यांच्या संकल्पनेवर आधारीत नसून ती स्वतंत्र आहे. हिटलरच्या मनात भारतीयांबद्दल असलेली वंशक्षुद्रतेची भावना काढण्याचा प्रयत्न सुभाषचंद्र बोसांनी केला होता. त्यानुसार हिटलरने स्वतःच्या पुस्तकात भारतीयांबद्दलचे गैरउद्गार काढून टाकण्याचा शब्दही त्यांना दिला होता.

आख्ख्या आधुनिक जगात आता हिटलर आणि त्याच्या नाझी पक्षाला नाझी टोळी म्हणूनच संबोधतात. दुसऱ्या महायुध्दानंतर हिटलरच्या बहुतेक सर्व प्रमुख अनुयायांना पकडून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. ‘ न्यूरेंबर्ग ’ चा खटला म्हणून तो प्रसिध्द आहे. त्या खटल्यात जसजशी उलटतपासणी होत गेली, तसतशी हिटलरच्या तत्वज्ञानाची भयानकता जगासमोर येत गेली. साठ लाखांहून अधिक ज्यूंची हत्या ही आता सर्व जगाला माहीत असलेली बाब आहे; परंतु याहूनही अधिक महत्वाचं म्हणजे नाझींनी हिटलरच्या तत्वज्ञानासाठी जिंकलेल्या सर्व प्रदेशांमध्ये जी छळयंत्र उभी केली त्याच्या पध्दती बघून मन हैराण होतं. मनुष्यजातीत जन्माला आलेला प्राणी इतका क्रूर, पाशवी आणि अधःपतित होऊ शकतो, यावर जगाच्या कुठच्याही कोपऱ्यात असलेल्या सुसंस्कृत माणसाचा विश्वास बसत नाही.

हिटलरमध्ये नेतृत्वक्षमता आणि नेतृत्वगुण असूनही आधुनिक जगात आणि आधुनिक समाजात हिटलरच्या नावाला नैतिक प्रतिष्ठा उरलेली नाही, याचं कारण हेच आहे. मानवी जीवनाचं किंवा मानवी संस्कृतीचं काहीतरी भव्य, उदात्त, मंगल करण्याच्या प्रेरणेने त्याने हिंसा केलेली नसून स्वतःच्या अत्यंत

अशासकीय आणि नृशस मतांसाठी त्याने कोटयावधींचे बळी घेतले, हे न्यूरेंबर्गच्या खटल्यत सप्रमाण सिध्द झालं.

हिटलर असा कशामुळे घडला, असा प्रश्न नेहमीच विचारला जातो. त्याचं एकाकी बालपण, त्या वेळच्या उद्‌ध्वस्त युरोपियन समाज आणि वडिलांकडून त्याचं झालेलं दमन ही कारणं हिटलरच्या अशा विचित्रपणासाठी दिली जातात; परंतु याच कारणातून मानवजातीचं कल्याण करणारी अनेक माणसं घडलेली आहेत. हिटलरच्या बाबतीत एक सार्वत महत्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या बुटाला पाय घालून तुम्ही पाहयलं की तो तुम्हाला एखाद्या वेळेस ग्रेट वाटू शकतो; पण जर का तुम्ही त्याचे बळी ठरलेल्यांच्या बुटात पाय घालून पाहिलंत तर तो साक्षात नरराक्षस वाटतो. हिटलर एखादास असतो तो अपघाताने घडतो. त्यचे बळी कोटयावधी असतात. त्यामुळे बुटात पाय घालताना तार्किक आणि शास्त्रीय पध्दतीने पाय घालायचा ठरवल्यास तो त्या कोटयावधी बळींच्याच पायत घालावा लागेल, हे फार थोडया माणसांच्या लक्षात येतं. हिटलर हयात असताना आणि त्याच्या मृत्यूनंतर साठ वर्षांनीही.

तरीही हिटलरने मानवी इतिहासात काही तत्वं आपल्याला शिकवलीच. त्यातली दोन तत्वं मला विशेषत्वाने आवडतात. पहिलं म्हणजे जनसमुदायाला रचना करण्यापेक्षा विध्वंस करावयला आवडतो. दुसरं म्हणजे ज्या वाक्यांना टाळया पडतात ती वाक्यं ऐतिहासिकदृष्टया सत्य असतातच असं नाही.

*(टीप : हिटलरची उंची पाच फूट नऊ इंच होती. तो चांगला उंच होता.)*

# बेनिटो मुसोलिनी

**अ**ापण हिंदुस्थानात बहुतेक वेळा ' फॅसिस्ट 'हा शब्द अगदी सहजपणे वापरतो आणि बऱ्याच जणांचा असा समज असतो की, फॅसिझम हा काहीतरी हिटलरशी निगडित आहे. वास्तविक ' फॅसिझम ' हा हिटलरचा जर्मनीत उदय होण्याअगोदर किमान दशकभर इटलीत सत्ताधीश झाला होता. त्याचा प्रणेता होता बेनिटो मुसोलिनी. मुसोलिनीबद्‌दल आपल्याकडे जी माहिती येते किंवा जी माहिती प्रसृत केली जाते ती सर्व दुसऱ्या महायुध्दाशी संबंधित असते. खरं तर फॅसिझमचा उदय आणि त्याची भरभराट ही

ि

हिटलरपूर्व काळातली आहे. हिटलरसोबत फॅसिझम आणि बेनिटो मुसोलिनीचा ऱ्हास सुरु झाला.

बेनिटो मुसोलिनीचा जन्म रविवारचा. २९ जुलै १८८३ ला इटलीमध्ये प्रिडेपिओ नावाच्या गावातला. मुसोलिनी वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत बोलू शकला नाही. लहानपणी त्याच्या बाबतीत जवळच्या माणसांबाबत लक्षात राहण्याजोगी गोष्ट म्हणजे त्याचे अपवादात्मक काळे डोळे, ज्या डोळयांमध्ये बांधून ठेवणारी हिप्नॉटिक अशी शक्ती होती. मुसोलिनी हा लहाणपणापासूनच अत्यंत बंड होता. त्याला व्यवस्था आहे तशी स्विकारायला प्रचंड अडचण होत असे. तारुण्यात माणूस जे जे अपराध करु शकतो ते सारे मुसोलिनीने त्याच्या तारुण्यात केले. पुढे तो इटलीचा सर्वसत्ताधीश झाल्यावर त्याच्या ज्ञात असलेल्य १६९ प्रेयसी होत्या. स्त्रियांबद्दलची त्याची मजं फार विचित्र होती; जशी राजकारण आणि जनतेबाबत. मार्क्सवादाचा तेव्हा युरोपभर जोर वाढत होता. मार्क्सवादी आणि लोकशाही यांच्यातून तिसरा मार्ग काढण्याच्या नादातून फॅसिझमचा जन्त झाला; पण या फॅसिझममागे मूळ विचार काय होता हे जाणण्याकरिता १९३२ साली (*हिटलर सत्तेवर येण्याअगोदर वर्षभर आणि मुसोलिनी सत्तेवर आल्यावर जवळजवळ दहा वर्षांनी*) एमिल लुड्विग या प्रसिध्द पत्रकाराला मुसोलिनीने एक मुखाखत दिलेली आहे. त्यात त्याने आपण व्हिएन्नाचा मानसशास्त्रज्ञ ‘ओटो विनेन्गर’शी सहमत असल्याचं म्हटलेलं आहे. त्या विनेन्गार मते ‘बायका या फक्त आज्ञापालनाच्या लायकीच्या असतात. त्यांना गुमाल करु नये पण त्यांना मतदानाचा अधिकार दिल्यास त्या फक्त हसतील. त्यामुळे त्यांना जमेस धरु नये.’ मुसोलिनीने याच विनेन्गरची जनतेबाबतची सिध्दता तशीच्या तशी उचलली होती. त्यात थोडा बदल करुन मुसोलिनीने आपला जगप्रसिध्द आणि पुढे हिटलरने आदर्शवत मानलेला सिध्दांत मांडला. तो म्हणजे ‘जनता हुकूमशहावर प्रेम करते. जर ती त्या हुकूमशहाला घाबरत असेल तर जनतेला पोलादी पुरुष आवडतो. ती एखाद्या स्त्रीसारखीच असते.’ मुसोलिनीच्या मत ‘स्त्रीला आणि जनतेला जबरदस्तीने हिसकावून (स्वतःला) जिंकलेले आवडते.’ हे वाचायलासुध्दा आज भयंकर वाटत असले तरी त्या काळात युरोपमध्ये हा विचार प्रबळ ठरुन त्याचा विजयही झालेला दिसतो.

हा विचार किती यशस्वी ठरला होता याचे पुरावे दाखवायचे झाले तर विन्स्टन चर्चिल आणि पोप पायस अकरावा यांची विधानं द्यावी लागतील. विन्स्टन चर्चिल यांनी मुसोलिनीचं वर्णन त्या काळात ‘रोमन जिनिअस’ असं

केलं होतं आणि पोप पायस अकरावाला तर तो देवदूत वाटला होता पण सत्तेवर येण्याअगोदर मुसोलिनी शिक्षक, पत्रकार ते बेकार भटक्यापर्यंत साऱ्या प्रकारचं आयुष्य जगला होता. रक्ताचा एक थेंबही सांडता इटलीच्या संसदेवर मुसोलिनी आणि त्याच्या फॅसिस्ट सहकाऱ्यांनी कब्जा केला.

तत्वज्ञान आणि वास्तविकता यात नेहमीच अंतर असतं. गंमत म्हणजे रशियन राज्यक्रांतीमुळे रशियात लेनिनच्या नेतृत्वाखाली बोल्शेविक (कम्युनिस्ट) सत्तेवर आलेले होते. त्या कम्युनिस्ट सत्तेला मान्यता देण्याची जगातल्या कुठल्याच देशाची तयारी नव्हती. जानेवारी १९२४ ला मुसोलिनीने सोविएत रशियातल्या नव्या सोविएत सरकारला प्रथम मान्यता दिली. एवढंच नव्हे तर रशियासोबत व्यापारी करारही केले. पुढे मुसोलिनीला अत्यंत असंस्कृत आणि बीभत्सपणे ठार मारणाऱ्या कम्युनिस्टांनी या गोष्टीचा पुढे त्यांचा इतिहासात उच्चार करण पध्दतशीरपणे टाळलं. हेसुद्धा त्यांच्या खास पद्धतीप्रमाणेच झालं. सत्तेवरची सुरुवातीची दहा वर्षे मुसोलिनीचा सुवर्णकाळ होता. ब्रिटनपासून हिटलरपर्यंत तो नवा रोमन सम्राट वाटत होता. इटलीत त्याची लोकप्रियता ही वादातीत होतीच पण त्याच्या एवढी अफाट लोकप्रियता त्याअगोदर युरोपात फार थोडया जणांना मिळाली असेल. हिटलर मुसोलिनीसमोर बुजलेलाच असे परंतु हिटलरने दुसऱ्या महायुद्धाचे फासे टाकले आणि मुसोलिनीने आपले फासे हिटलरच्या पदरात टाकले. तिथून मुसोलिनीचा ऱ्हास आणि नाश सुरु झाला. तरीही मुसोलिनीने केलेल्या काही बाबींची इतिहासात ठळकपणे नोंद झालेली नाही. हिटलरच्या ज्यू नरमेधाच्या कार्यक्रमामध्ये मुसोलिनी सर्व सत्ता स्वतःच्या हाती असेस्तोवर सामील झाला नाही. नंतर तो स्वतःच नाझींचा हातातले बाहुले बनला तेव्हाची गोष्ट वेगळी पण त्या अगोदर त्याने हजारो ज्यूंच आयुष्य नाझींच्या तावडीतुन सोडवलं होतं. त्या वाचलेल्या ज्यूंची संख्या ही शिंडलर्स लिस्ट पेक्षा कित्येक पटीने जास्त होती. परंतु या कार्यासाठी त्याला कुणीही स्मरणात ठेवलं नाही. याउलट महायुद्धाच्या अखेरच्या काळात एकदा अटकेतून ओटो स्कोर्झोनी. या नाझीने सोडवून आणल्यावर इटलीवर नाझींचा पक्का फास आवळला गेला. या गुन्हयासाठी त्याला आणि त्याच्या प्रेयसीला (*क्लारा पॅटसी*) पकडून मारण्यात आलं आणि त्याच्या प्रेताची अत्यंत बीभत्स विटंबना करण्यात आली. वीस वर्षाहून अधिक रोमन सम्राटांहून दिमाखदार राज्य करणाऱ्या माणसाला इतिहासाने अत्यंत क्रुर अशी शिक्षा दिली होती. त्याच्या हिटलर आणि नाझी पक्षाबरोबर जाण्याची. त्यांच्या मृत्युनंतर साठ वर्षांनी जाणवतं ते हेच की, तो खूप चांगला राज्यकर्ता पुरुष होता असं नव्हे पण तो वाईट होता असं

असेल तर अनेक कम्युनिस्ट हुकूमशहांहून कांकणभर कमीच वाईट होता असं म्हणता येईल. फक्त त्याच्या मृत्युपेक्षाही त्याला सर्वात मोठी शिक्षा कोणती असेल तर इतिहासातील त्याचे स्थान जे काय असेल याचा आयुष्यभर त्याने विचार केला. ते स्थान त्याला कायमचेच नाकारण्यात आले. याला म्हणतात नियती.

# डेंग झिआओ पेंग

**मां**जर जोपर्यंत उंदीर पडकते आहे तोपर्यंत ती काळी आहे का पांढरी आहे याची चिंता करु नये, असे कठोर व्यवहारवादी उद्‌गार कम्युनिस्ट जगाला परिचित करुन देणारे डेंग झिआओ पेंग (याचे वेगवेगळे उच्चार होतात) हे राजकीय इतिहासातलं वर्णनविलक्षण व्यक्तिमत्व. आज चीन जो काही दिसतो आहे त्याचे खरेखुरे शिल्पकार डेंग झिआओ पेंग हेच आहेत.

डेंग यांची उंची पाच फूटांहून थोडी कमी. जन्म २४ ऑगस्ट १०९४ चा. श्रीमंत घरातला. तरीही १९२० साली वयाच्या

सोळाव्या वर्षी डेंग स्वतः कष्ट करीत फ्रान्सला शिक्षणासाठी गेले. चीनमध्ये ते परतले ते कम्युनिस्ट होऊन, 'माओ म्हणजे चीन आणि चीन म्हणजे माओ ' असे जे समीकरण पुढे निर्माण झालं, त्या माओ युगाची निर्मिती करण्यात डेंग यांचा मोठा वाटा होता. भयानक म्हणजे ज्या युगाची निर्मिती करण्याकरिता डेंग यांनी अपरिमित कष्ट केले त्या माओ युगात त्यांना दोनदा भयानक छळ, विजनवास, अरिमित कष्ट आणि पराकोटीच्या अपमानांना तोंड द्यावे लागले. त्यांचा मुलगा कायमचा अपंग झाला. लुळयापांगळया झालेल्या मुलाची सेवा करीत साध्या कामगाराची नोकरी करीत विजनवास सहन करणारे डेंग पुढे या साऱ्यावर मात करुन चीनचे सर्वसत्ताधीश होतील आणि चीनचं भवितव्य बदलून टाकतील, हे केवळ आश्चर्यकारक भविष्य तेव्हा कुणालाच वर्तविता आले नाही.

कम्युनिस्टांचा भांडवलशाहीला असलेला विरोध हा मानवी प्रेरणेच्याच विरोधातला आहे आणि संपत्तीचा संचय करणे ही मूलभूत मानवी प्रेरणा आहे, हे डेंग यांनी बरोबर ओळखलं. याचं कारण त्यांनी आयुष्यात माओंच्या प्रेरणेने निर्माण झालेली आणि फसलेली महाआंदोलनं पाहिलेली होती. ज्या आंदोलनात कोटयावधी लोकांचा त्याग होता; पण मूलभूत मानवी प्रेरणांच्या विरोधात ती आंदोलनं होती. चीनने त्याची खूप मोठी किंमत मोजली. डेंग हे कठोर व्यवहारवादी होती. त्यांनी राजकीय विजनवासाच्या काळातही स्पष्टकतेपणा, सत्य आणि व्यवहारवाद या मूल्यांची कास कधीच सोडली नाही. त्यांना आयुष्यात स्पष्टवक्तेपणापायी अनेकदा त्याची जबर किंमत मोजावी लागली. सांस्कृतिक क्रांतीच्या काळात तर त्यांचा छळ सुरु झाला, तेव्हा (*ज्याला त्यांचे सुरुवातीला लिहिलेले उद्‌गार जबाबदार होते*) त्यांच्या एकुलत्या एका मुलाला (*घराच्या झडतीच्या वेळी)* रेड गार्डस्‌नी वरच्या मजल्यावरुन खाली ढकलून दिले. तो कमरेखाली कायमचा लुळा झाला (*पुढे डेंग आयुष्यभर स्वतः त्याला मालिश करीत असत.*) पण म्हणून डेंगनी कम्युनिस्ट पक्षाचा त्याग केला असंही झालं नाही. हेही आश्चर्यच. आज आपल्याकडे सर्वच पक्षांत इकडून तिकडे जाणारे जथ्थे पाहिले की ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. केवळ तिकडे एकच पक्ष आहे म्हणून या प्रश्नाचं उत्तर देणं हे काही खरं नव्हे. चिनी माणसाच्या मानसिकतेचाही त्याच्याशी थेट संबंध आहे. १ ऑक्टोंबर १९४९ ला जेव्हा चीनमध्ये क्रांती झाली तेव्हा माओ चीन राष्ट्रनायक बनले होते; डेंग झिआओ पेंग हे माओंचे उजवे हात. क्रांतीनंतर लगेच माओना शांघायच्या (*तेच ते शांघाय*) प्रमुखपदी डेंग

यांची नियुक्ती करायची होती; पण डेंग स्वतःच आघाडीवर लढण्याकरिता निघून गेले. गंमत म्हणजे कोणत्याही प्रकारचे लष्करी पद किंवा लष्करी शिक्षण नसताना डेंग यांनी अनेक लढाया जिंकलेल्या होत्या.

आधुनिक चीनचा हा निर्माता १ ऑक्टोंबर १९४९ रोजी जेव्हा चीन पाच हजार वर्षांच्या राजेशाहीमधून बाहेर आला तेव्हा वयाने पन्नास वर्षांचा होता. म्हणजे दहा वर्षात रिटायरमेंटचं वय ! पण पुढे कर्तृत्व गाजविण्याचा काळ डेंग यांच्या आयुष्यात आला तो १९७६ नंतर. म्हणजे वयाच्या ७२ वर्षानंतर. आश्चर्य म्हणजे तेव्हा डेंगनी चीनमध्ये असे काही कर्तृत्व गाजवले की, त्याचमुळे आजचा चकचकीत चीन उभा राहिला. खुद्द मिखाईल गोर्बाचेव्ह जिथे फसले आणि अमेरिकेने जिथे आश्चर्याने तोंडात बोटे घातली, तो कम्युनिस्ट शासनपध्दतींतर्गत भांडवलशाहीचा प्रयोग डेंगनीच यशस्वी करुन दाखविला.

माओ आणि डेंग ही व्यक्तिमत्वं परस्परविरोधी होती. माओचं त्यांच्या आयुष्यात दैवतीकरण झालं. जे जगलेही एखाद्या चिनी सम्राटाप्रमाणे. त्यांच्या आयुष्यात अनेक स्त्रिया आल्या. बेधडकपणे जनतेवर कोणताही भीषण प्रयोग करायला ते करचले नाहीत. त्यांच्या आयुष्यात चीन नष्ट होतो की काय असे वाटायला लावणारे प्रयोग त्यांनी जनतेवर केले. त्यांची होर्डिंग्ज, कटआऊटस्, रेडबुक या साऱ्याला त्यांच्या हयातीतच धार्मिक श्रध्देइतकं महत्व आलं.

परंतु असं असलं तरी चीनचं खऱ्या अर्थाने भलं केलं, चीनमध्ये समृध्दी, सुबत्ता आणली आणि बळ आतेतलं ते डेंग झिआओ पेंग यांनीच. माओनंतर ते चीनचे सर्वेसर्वा झाले (*तो इतिहासही खूप रंजक आणि समज वाढविणारा आहे.*) माओंनीच त्यांना आयुष्यात दोनदा सरकारातल्या आणि पक्षातल्या सर्व पदांवरुन काढून टाकून कारखान्यात साधे कामगार म्हणून राजकीय विजनवासात पाठवलं. माओ गेले तेव्हा डेंग विजनवासातच दिवस कंठत होते. ‘डेंग’ नी आपले दैवतीकरण होऊ दिलं नाही. चीनमध्ये ‘डेंग’ यांची कटआऊटस्, होर्डिंग्ज वा पुतळे त्यामुळेच उभे राहिले नाहीत. त्यांना त्यांची प्रसिध्दी झालेली आवडत नसे. वैयक्तिक आयुष्यात ते आदर्श पती आणि आदर्श पिता होते. आपली पत्नी झुवो लिन हिच्याशी ते आयुष्यभर एकनिष्ठ राहिले; परंतु संपूर्ण चीनला त्यांनी कम्युनिस्टांच्या काल्पनिक आणि ढोंगी नैतिक शुचितेच्या गर्तेतून बाहेर आणले. मार्गारेट थॅचर आणि ब्रिटीश मुत्सद्यांनाही ते पुरुन उरले. हॉगकॉग चीनमध्ये विलीन करण्याच्या भूमिकेत त्यांचा विजय झाला. त्याही वेळी ‘एक देश, दोन व्यवस्था’ अशी घोषणा देऊन डेंग यांनी कर्मठ परंपरावाद्यांना धक्का

दिला.

चीन माओंच्या काळातही दु:ख, अश्रू आणि गरिबीच्या गर्तेत खोल खोल जात होता. १९७८ ते १९९५ ही डेंग यांची सत्तेची वर्षे. (*१९९७ साली वयाच्या ९३ व्या वर्षी डेंग मरण पावले; पण त्याआधी दोन वर्षे त्यांनी आपले राजकीय वारस जियांग झेमिन यांना निवडले व १९९५ पासून सक्रिय राजकारणातून निवृत्ती पत्करली.*) सत्तेच्या काळात डेंग यांनी चीन आमूलाग्र बदलला. ' टू बी रीच इज ग्लोरिअस ' (*श्रीमंत होणे हे दैदीप्यमान आहे*) किंवा ' आधी थोडे श्रीमंत होतील, मग सारे ' अशासारख्या घोषणा कम्युनिस्ट देशात ' डेंग ' च आणू जाणे. सतरा वर्षांच्या कारकीर्दीत डेंग यांनी चीन अमेरिकेशी श्रीमंतीत आणि व्यापारात स्पर्धा करणारा देश बनवून सोडला. हा एक चमत्कार आहे. डेंग बाजूच्या देशातच जन्माला आले होते; पण आपल्या देशात त्यांच्याविषयी खूप कमी माहिती आहे.

मुख्य म्हणजे डेंग असो वा शांघाय, आपल्या बाजूच्या देशातच असणार आहेत. आपण फक्त अभ्यासदौऱ्याच्या निमित्ताने त्यांचा आढावा घ्यायचा जर ठरवले तर कोणताही गाजावाजा न करता देश आमूलाग्र बदलला जाऊ शकतो, हेच ' डेंग 'यांच्या चरित्राचे सार आहे. आपण मात्र त्यातून कृपया काही शिकायचे नाही !

# महाराजा

**स**ध्या संपूर्ण पंजाब शीख इतिहासाची चारशे वर्षे साजरी करतो आहे. गुरु ग्रंथसाहिबा या ग्रंथाला चारशे वर्षे पूर्ण झाल्याचा सोहळा तुफान उत्साहात पंजाबात सुरु आहे. आश्चर्यकारक योगायोग म्हणजे देशाचा पंतप्रधानही एक शीख आहे. शीख राज्यकर्ता असण्याची आणि गुरु ग्रंथसाहिबा या ग्रंथाने आपले अजून एक शतक पूर्ण करण्याची इतिहासातील ही दुसरी वेळ आहे. दोनशे वर्षापूर्वी म्हणजे १८०४ साली शिखांचा एक सार्वभौम राजा राज्य करीत होता. ‘ महाराज ’ या नावाने तो प्रसिध्द होता. ज्या राजामुळेच खरं तर शीख

समाज आज जगभर सन्मानाने उभा राहू शकला.

म्हाराजा रणजितसिंह हे त्या राजाचे नाव. महाराजा रणजितसिंह हे १७८० साली जन्मले आणि १८३९ साली मृत्यु पावले; पण या कालावधीत त्यांनी हिदुस्थानच्या इतिहासात प्रचंड उलथापालथी घडवून आणल्या. मुख्य म्हणजे शिखांना त्यांनी कायमचा आत्मसन्मान मिळवून दिला. नेतेपदाचे गुण शीख समाजाच्या अंगात कायमचे मुरवले. त्यामुळेच आज शीख समाजाचा सुवर्ण मंदिरातला उत्सव जगभर दखलपात्र मानला जातो. नेतृत्वगुणांच्या अभावामुळे नेमकं काय होतं ते मराठी समाज अचूक अनुभवतोय ! अशा वेळी महाराजा रणजितसिंहांचं स्मरणही महत्वाचंच.

म्हाराजा रणजिंतसिंहांच्या वडिलांचं नाव महानसिंह. त्यांचे पूर्वज गुराखी होते. कुटूंब शेतकरी होते. त्यांच्या पूर्वजाने सुकेरचक या गावी किल्ला बांधला होता. त्या सुकेरचक गावाच्या नावावरुन ज्या संघटनेचं महानसिंग नेतृत्व करीत, त्याला सुकेरचकीआ असं नाव होतं. महानसिंहांनी जम्मूमध्ये डोग्रा नेत्यांचा पराभव केला आणि ते परतत होते तेव्हा त्यांना मुलाच्या जन्माची बातमी समजली. तेव्हा सुरुवातीला त्यांनी त्याचे नाव ' बुधसिंह ' ठेवलेलं; पण मग रणात मिळालेला विजय हा प्रमाण मानून त्यांनी ते नाव ' रणजितसिंह ' ठेवले.

महाराजा रणजिसिंहांनी शिखांच्या खऱ्याखुऱ्या राजकीय इतिहासाचा डौल उभा केला. लाहोर आणि पेशावरवर अफगाणांचा पराभव करुन हिंमतीने राज्य करणारा एकमेव हिंदुस्थानी, असे महाराजांचे वर्णन करावे लागेल. महाराज रणजितसिंह हे पूर्णपणे अशिक्षित होते. बालपणी त्यांना देवी आल्या होत्या. त्यात त्यांचा एाक डोळा कायमचा निकामी झाला होता. दोनश वर्षांपूर्वी (*अचूक बोलायचं तर १८०५ मध्ये*) महाराजांनी अमृतसर भांगी संघटनेकडून काबीज केलं.

महाराज रणजितसिंहांना ' महाराज ' हा किताब सर्व सरदार मंडळींनी मिळून दिला होता तो १८०१ मध्ये; पण त्यांना ' सरकार 'याच संबोधनाने संबोधले जात असे. महाराज रणजितसिंहांनी जी नाणी पाडली ती त्यांच्या स्वतःच्या नावाची नव्हती. ती गुरु नानक आणि गुरु गोविंदसिंग यांच्या नावाची होती. आजही ती ' नानकशाही ' म्हणून ओळखली जातात.

१७५७ मध्ये इंग्रजांनी हिंदुस्थानात पाय पक्के रोवले होते. प्लासीची लढाई होऊन गेली होती. अशा परिस्थितीत हिंदुस्थानात मराठयांव्यतिरिक्त फक्त रणजितसिंह हेच काय ते आशा बनून राहिले होते. उत्तरेत यशवंतराव होळकर

आणि इंग्रज या दोघांशीही तह केले आणि मुत्सद्दीपणाने स्वतःचं राज्य एका विशाल साम्राज्यात बदलवत नेले.

महाराजा रणजितसिंहांनी राज्य धार्मिक तत्वांवर कधीच चालवलं नाही. एका शीख सरदाराने एका मुस्लिम माणसाच्या अंगावर डुकराचे कातडे फकले, तेव्हा महाराजांनी त्या शिखाला कठोर शिक्षा केली आणि त्यवर प्रतिक्रिया व्यक्त केली की, हे मी न केल्यास शीख मुसलमानांस जिणू मुष्कील करुन सोडतील.

महाराज रणजितसिंहांनी लाहोर शहर जेव्हा जिंकले तेव्हा तेथील, सुनहरी मशीद त्यांनी मुसलमानांना परत केली; पण त्याचबरोबर महाराज रणजितसिंहांनी जेव्हा अफगाणिस्तान जिंकले (*अफगाणिस्तान जिंकणारे ते एकमेव परकीय व्यक्ती होत.*) तेव्हा तिथे शहा सुझाला स्थानापन्न करताना १०२४ मध्ये गझनीच्या महंमदने लुटून नेलेले हिंदूंच्या सोमनाथ मंदिराचे दरवाजे परत केले पाहिजेत, ही अट त्यांनी घातली होती !

महाराज रणजितसिंहांचे सर्वात महत्वाचे वैशिष्टय म्हणजे त्यांच्या हातात अमर्याद अशी सत्ता असूनही त्यांनी ती अतिशय विवेकाने चालवली. महाराज रणजितसिंहांचं एक फर्मान असं होतं :

'महाराज रणजितसिंह निक्षून असा हुकूम देत आहेत की लाहोर शहरात जनतेशी कोणीही जुलमाने किंवा दादागिरीने वागता कामा नये. स्वतः महाराजांनी स्वतःच एखाद्या नागरिकाविरुध्द चुकीचा हुकूम काढल्यास तो त्यांच्या नजरेस त्वरित आणावा, म्हणजे त्याची दुरुस्ती केली जाऊ शकेल. कोणीही व्यक्ती अथवा अधिकारी तुमच्या सल्ल्याविरुध्द अथवा सूचनेविरुध्द वागू लागल्यास तुम्ही त्याला एक औपचारिक पत्र पाठवावे. म्हणजे ते पत्र हे पुरावा समजून त्याच्या आधारे महाराज त्या व्यक्तीला त्याच्या आज्ञाभंगाबद्दल शिक्षा करतील.'

याहून विवेकी राज्यकर्ता असू शकेल काय ? हल्ली जिल्हा पातळीवरचे नेतेही ग्रामसिंह बनून लोकशाही असूनही ज्या हिंसक अविवेकाने जनतेच्या माना झुंडशाहीच्या जोरावर मुरगाळतात, त्या पार्श्वभूमीवर महाराज रणजितसिंह देवच म्हणावे लागतील !

एवढया विवेकाने उभारलेली राजसत्ता रुजली नसती तरच नवल ! पण इतिहासाच्या पटलावर, महाराज रणजितसिंहांनी सिंधू नदीच्या पार जे साम्राज्य उभे केले होते, ते त्यांच्या मृत्यूनंतर अवघ्या दशकातच कोसळले. ब्रिटीशांनी महाराजांचे मोठेपण ओळखले होते. त्यांनी त्यांचीच धोरणे चालू ठेवली; पण

पंजाब पूर्णपणे ब्रिटीशांच्या घशात गेला. आज त्यानंतर दोनशे वर्षांनी एक शीख पंतप्रधान सुवर्ण मंदिरात भाषण करताना दिसला आणि यशस्वी समाज म्हणून उभा राहिलेला जगभरचा शीख समुदाय तिथे गोळा झाला. स्वाभाविकच महाराज रणजितसिंहांचे स्मरण झाले. महाराष्ट्राच्या नशिबी हे भाग्य नाही, हा विषादही वाटला !

# वेलुपिल्लई प्रभाकरन

**ज**गातला सर्वात धोकादायक आणि सर्वात शक्तिशाली अतिरेकी कोण, असा प्रश्न विचारला गेला तर बरेचजण ओसामा बिन लादेन असं उत्तर देतील; पण उत्तर सपशेल चुकीचं ठरेल. कारण आज जगातल्या सर्वच अतिरेक्यांमध्ये वेलुपिल्लई प्रभाकरन हाच सर्वांत धोकादायक आणि सर्वांत शक्तिशाली आहे. अर्थात लिबरेशन टायगर्स ऑफ तामीळ इलमचा हा अत्यंत शक्तिशाली नेता त्याच्या संघटनेमध्ये (लिट्टे हा शॉर्टफॉर्म) ‘ प्रेसिडेंट ॲण्ड प्राइम मिनिस्टर ऑफ तामीळ इलम ’ या

पदानेच ओळखला जाता ! लिट्टे ही संघटना अतिरेकी आहे हेच मुळात त्यांना मान्य नाही. ' लिट्टे ' च्या जगभर पसरलेल्या प्रचारयंत्रणेनुसार ' लिट्टे ' ही स्वातंत्र्ययुध्द लढणारी संघटना आहे; पण केवळ ' लिट्टे ' च्या प्रचार यंत्रणांच्या आधारे जगभर अतिरेकी ठरवली गेलेली संघटना आणि तिचा नेता वेलुपिल्लई प्रभाकरन याच्याबद्दल आण मत ठरवू शकत नाही.

वेलुपिल्लई प्रभाकरन याच्या नेतृत्वाखाली साधारणतः तीन दशकांपूर्वी उभी राहिलेली ' लिट्टे ' ही संघटना फक्त तीन-चारजण आणि जुनं रिव्हॉल्व्हर यांच्यासहित सुरु झालेली होती; पण वेलुपिल्लई प्रभाकरन यांचे हौसले बुलंद होते. त्याचे हीरो दोन होते. भगतसिंग आणि सुभाषचंद्र बोस. गेल्या तीस वर्षात लिट्टे ही जगातली सर्वात अभेद्य अशी गनिमी सेना झालेली आहे. स्वतंत्र तामीळ राष्ट्राच्या मागणीसाठी लिट्टेने केलेल्या हिंसेत साठ हजारांवर माणसांचा बळी गेलेला आहे. त्यात श्रीलंकेचे अध्यक्ष प्रेमदास आणि हिंदुस्थानचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा समावेश आहे. या साऱ्या लढाऊ यंत्रणेचा एकमेव शिल्पकार आहे तो वेलुपिल्लई प्रभाकरन.

प्रभाकरन हा श्रीलंकेत आणि जगभरच्या तामिळांमध्ये कमालीचा करिश्मॅटिक नेता मानला जातो. त्याच्या एका शब्दासाठी जीव देणारे तरुण-तरुणी अक्षरशः जगभर पसरलेले आहेत आणि हा करिष्मा त्याने बिन लादेनसारखा कोणत्याही धर्माचा वापर करुन निर्माण केलेला नाही की ना कोणत्याही तत्वज्ञानाची त्याने कास पकडली. त्याचा पण आहे तो श्रीलंकेतून तामिळांचं स्वतंत्र राष्ट्र फोडून काढण्याचा. तामीळ इलम ! फक्त या त्याचा आवाहनावर त्याने त्याची मोहिनी निर्माण केली. त्याने ठरवलं तर तो काहीही करु शकतो. अक्षरशः काहीही. अशीच त्याची सार्थ प्रतिमा आहे. कोलंबोतल्या विमानतळावर हल्ला करुन श्रीलंकेच्या संपूर्ण हवाई दलाची कित्येक विमाने निकामी करण्याची हिंमत नाही तर कोण करील ? ते त्याने केलेले आहे. ' लिट्टे ' या त्याच्या संघटनेनं एकतृतीयांश श्रीलंकेवर आपली प्रभुसत्ता स्थापन केलेली आहे. या संपूर्ण भूभागाचा प्रभाकरन हा अनभिषिक्त सम्राट आहे. जाफना ही त्याची राजधानी आहे. १९९५ सालच्या अवघ्या पन्नास दिवसांत जाफनाचा ताबा ' लिट्टे ' कडून काढून घेण्याची श्रीलंकन लष्कराची कामगिरी वगळता ' लिट्टे ' ने कायमच या भूभागावर (*आणि जगभर*) धडकी भरवणारी अशी अजिंक्य लढत दिलेली आहे. अगदी हिंदुस्थानी शांती

सेनेलासुध्दा !

प्रभाकरनचा जन्म मध्यमवर्गीय कुटुंबातला. २६ नोव्हेंबर १९५४ हा त्याचा जन्मदिवस. वालीपुरम पार्वती हे त्याचा आईचे नाव. तिरुवेंकटम वेलुपिल्लई हे वडिलांचं. वेलवीट्टीतुराई हे त्यांचे गाव. प्रभारकन हा त्याचा आईवडिलांचं चौथं आणि सर्वात धाकटं अपत्य. धाकटं असल्याने लाडका. तरुण होईस्तोवर प्रभाकरनची सर्व गावात अतिशय नम्र आणि अगत्यशील अशी किर्ती होती. हाफ चड्डी आणि हाफ शर्ट घालून लोकांना मदत करावयला धावणारा प्रभाकरन आजही तिथे अनेकांना आठवतो. प्रभाकरनचे वडील जमीन अधिकारी होते. त्यांचं कुटुंब दोनशे वर्षांपूर्वी तामीळनाडूतून श्रीलंकेत सलिांतरीत झालं. प्रभाकरनचे वृध्द आईवडील आजही तामीळनाडूतल्या त्रिची या गावी राहतात.

सुरुवातीला जेव्हा प्रभाकरनने ‘ लिट्टे ’ची सिापना केली तेव्हा त्याचे ‘ लिट्टे ’ ची घटना बनवली. ज्याला आज ‘ लिट्टे ’ चे कोड ऑफ कण्डक्ट मानलं जाते. त्या घटनेनुसार संघटनेच्या कोणत्याही सभासदाला अनैतिक शरिरसंबंध ठेवणं किंवा संघटना सोडल्यावर दुसरी संघटना स्थापन करणंकिंवा ‘ लिट्टे ’ च्या कार्यपद्धतीविषयक काही बाहेर बोलणं या साऱ्याला सक्त मनाई आहे आणि घअनेतील ही कलमं तोडून काही करु पाहणाऱ्याला एकच शिक्षा आहे : मृत्यु. प्रभाकरनने अनेकांना ही शिक्षा फर्मावलेली आहे. त्याचेच एक स्त्री अंगरक्षक आणि एक पुरुष अंगरक्षक यांनी अनैतिक शरीरसंबंध ठेवलेला होता म्हणून त्यांना प्रभाकरनने गोळया घालून ठार करायला लावले. महात्ताया हा प्रभाकरनचा अत्यंत विश्वासू आणि जवळचा साथीदार होता. ‘ लिट्टे ’ मध्ये तो नंबर दोन मानला जायचा. त्याने प्रभाकरनला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. तोही एका छोटयाशा मुदयावरुन. त्याला १९९४ साली ‘ लिट्टे ’ च्या तुरुंगात हाल हाल करुन मारण्यात आले.

‘ लिट्टे ’ चे थेट सैन्यसदस्य साधारणतः दहा ते बारा हजार आहेत, ज्यांच्या निष्ठा आणि कडवेपणा पूर्णतः प्रभाकरनला वाहिलेल्या असतात. ते सर्वजण प्रभाकरनशी निष्ठेची शपथ घेऊन सायनाइडची कॅप्सूल गळयात बांधतात. स्वतः प्रभाकरनही सायनाइडची कॅप्सूल गळयात बांधतो. ती तोंडात नीट जाते आहे ना हे पुनःपुन्हा तपासून पाहून. लिट्टे त्यांचं वर्चस्व

असलेल्या भागात ट्रफिक पोलीस, स्थानिक व्यवस्थापन, रस्तेबांधणी, दळणवळण, अन्ननिर्मिती, त्यांच वाटप, ग्रामविकास, रोजगार सगळं सगळं स्वतःच्या हातात होते. सैन्यसदयांव्यतिरिक्त लाखो सहानूभूतीदार सदस्य ' लिट्टे ' च्या या सगळया व्यवहारात सामील असतात. ' लिट्टे ' स्वतःचे मुद्रांक, स्टॅम्पसुद्धा छापते. याव्यतिरिक्त स्वतःचे चॅनल्स, अनेक मासिकं, पाक्षिकं, वृत्तपत्रं, शिपिंग कंपन्या, विमानदल, जगभराची ऑफिसेस असा आश्चर्यकारक पसारा प्रभाकरनने वाढविलेला आहे.

तरी पण प्रभाकरनचं सर्वात घातक हत्यार आहे ते त्याचे ब्लॅक टायगर्स. आत्मघातकी पथक. स्वतंत्र तामीळ राज्याच्या कल्पनेने भंरावलेले प्रभाकरनचे एकनिष्ठ तरुण-तरुणी मृत्युच्या वाटेवर जेव्हा निघतात, तेव्हा स्वतः प्रभाकरन त्यांच्यासोबत जेवण घेता. त्यांना त्यांच्या ' एकतर्फी ' प्रवासासाठी स्वतः एका टपपर्यत येऊन शुभेच्छा देतो. या प्रसंगांचं व्हिडीओ चित्रण केलं जातं. आत्मघातासाठी निवडलेला किंवा निवडलेली ब्लॅक टायगर्सची कार्यपद्धतीच गुप्त ठेवली जाते. कुणी बाहेर फोडल्यास मृत्यु. कित्येक वर्ष ' लिट्टे ' महिन्याला किमान एक असा आत्मघाती हल्ला करीत असे. ब्लॅक टायगर्समध्ये आत्मघातासाठी पुढे येण्यासाठी अहमहमिका असते. ब्लॅक टायगर्समध्ये आत्मघातासाठी पुढे येण्यासाठी अहमहमिका असते. राजीव गांधीचा बळी अशाच ब्लॅक टायगर्सने ' धानू' ने घेतला होता हे आपल्याला ठाऊक आहेच.

ही एवढी थरारक संघटना बांधणारा प्रभाकरन कुणालाही मित्र मानत नाही. इंदिरा गांधीनी त्याला सुरुवातीच्या काळात बळ दिलं म्हणून राजीव गांधीना मारताना त्याने मागेपुढे पाहिलं नाही. एकेकाळी त्याला राजकीयदृष्टया घडवणाऱ्या अमृतलिंगम या नेत्यालाही गोळी घालताना ' लिट्टे ' ने ' तामीळ इलम' साठीची त्याची उपयुक्तता संपली, एवढाच विचार केला. एवढं सारं करुनही ' तामीळ इलम' हे स्वतंत्र असं जगाने मान्य केलेलं राष्ट्र अजूनही दृष्टीपथात नाहीए. प्रभाकरन अजूनही ' रॉबिनहूड ' प्रमाणेच आहे, राष्ट्रप्रमुख नव्हे. ११ सप्टेंबरच्या अमेरिकेवरच्या हल्ल्यानंतर अमेरिकेने ' लिट्टे ' ला अतिरेकी संघटना घोषित केल्यावर तर परिस्थिती अजूनच बिकट झालीय. अशा वेळी या न संपणाऱ्या गुहेतला हा वाघ वेलुपिल्लई प्रभाकरन मध्यमस्थीसाठी येणाऱ्या नॉर्वेजियन पथकाशी काय

बोलत असेल ? हिंदुस्थान सरकारला तो अजूनही ‘ वॉण्टेड ’ च आहे. श्रीलंकेत त्या तुरुंगात तर तो कधीच गेलेला नाही. एवढा इतिहास निर्माण करणारा (*बरा वा वाईट)* प्रभाकरन हा फक्त पन्नास वर्षाचा आहे !

# नेते जनतेचे

# लोकमान्य टिळक

**ल**हानपणी वक्तृत्वस्पर्धांत लोकमान्य टिळक हा अत्यंत फेवरीट विषय असायचा. ‘ माझ्या बंधूनो आणि भगिनींनो, ’ पासून सुरु करुन ‘ लोकमान्य टिळकांवर जे दोन शब्द बोलणार आहे ते शांतचित्ताने आपण ऐकून घ्यावे, ’ असा घोषा लावण्यात मोठी धन्यता होती. टिळकांचा ‘ चिखली ’ गावचा जन्म, त्यांचे ‘ संत ’ हा शब्द तीन प्रकारे लिहिणे, शिवाय त्यांचे न खाल्लेल्या शेंगांची टरफले न उचलणे वगैरे... पण टिळकांचे वेगळेपण हे त्यांच्या या कथांमध्ये नाही हे कळायला पुढे बरीच वर्षे जावी लागली.

'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे,' हे वाक्य आज अजरामर झालेले आहे. या निर्भयपणासाठी आज आपण टिळकांना ओळखतो. ब्रिटीश साम्राज्य त्याच्या उत्तम काळात असताना त्याला आव्हान देण्याचे सामर्थ्य टिळकांत होते, पण माझ्या दृष्टीने टिळकांचे महाराष्ट्र समाजावर जे ॠण आहे ते वेगळेच आहे. जे मराठी नेते तत्व म्हणून देशभर पसरले आणि देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहचले असे तीनच नेते आहेत. पहिले छत्रपती शिवाजी महाराज, दुसरे लोकमान्य टिळक आणि तिसरे बाबासाहेब आंबेडकर.

लोकमान्य टिळकांची वृत्ती राजकारणी माणसाची नव्हती. त्यांचा पिंड होता तो गणिततज्ञ आणि समाजसुधारकाचा; परंतु वृत्तीतल्या तटस्थतेमुळे आणि स्थितप्रज्ञतेमुळे ते राजकारण कुशलतेने करु शकले. आज लो.टिळकांची आठवण होण्याचं कारण म्हणजे हल्ली बऱ्याचदा मराठी माणूस अभावानेच दिसतो. खरं तर 'दिल्लीत झेंडा रोवणं' हे वाक्य प्रतीकात्मक आहे. दिल्लीत झेंडा रोवणं याचा खरा अर्थ आपलं व्यक्तिमत्व, कार्य आणि विचार (*असला तर !*) देशभर पोहोचवण्याचं सामर्थ्य असणं हाच आहे. लोकमान्य टिळकांमध्ये ते सामर्थ्य निःसंशयपण होतं आणि त्यांच्यानंतर हे सामर्थ्य फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखलं. अर्थात, टिळकांच्या राजकारणाचा सारा दृष्टिकोन हा वेगवान समाजसुधारणा विरोधीच होता. आज कधीकधी लोकमान्य टिळकांचं लेखन वाचताना हा प्रज्ञावान माणूस जाती व्यवस्था आणि स्त्रियांबाबतीत आपल्या काळाच्यापुढे जाऊ शकला नाही याचं आश्चर्य वाटतं. कारण पारतंत्र्याची सुरुवात ही शाळांपासून होते यांचे अचूक भान टिळकांना होतं. राजकीय कार्याची सुरुवात शाळा काढून करावी हा शहाणपणा तेव्हा आश्चर्यकारक आणि नवीन होता. महाराष्ट्रात आजही बरेच महाभाग राजकारण करण्यासाठी शाळा-कॉलेजस काढतात, पण त्याचं कारण कोटयावधी रुपये देणारं चराऊ कुरण निर्माण करण्याचा असतो. त्याहीपेक्षा गमतीची गोष्ट म्हणजे आज इंग्रजी शाळांचे पेव फुटलेले आहे आणि मराठी शाळा धडाधड बंद पडत चाललेल्या आहेत. टिळकांनी त्या काळात स्वतःच्या एका व्याख्यानात इंग्रजीबद्दल मत व्यक्त केलेले होते. ते वाचल्यावर लोकमान्य टिळक काय प्रकारचे माणून होते हे लक्षात येतं. टिळकांनी म्हटलंय, '*इंग्रजी भाषा फार द्वाड आहे, ती लवकर येत नाही. ती सोपी नाही. केवळ राज्यकर्त्यांची म्हणून आम्हांस ती शिकावी लागते. आमच्यावर ते निव्वळ ओझे आहे. आजचे शिक्षण मराठीत मिळत नसल्यामुळे फार नुकसान*

*आहे. आपणास इंग्रजीत दोन-दोन तास बोलण्याची काय म्हणून जरुर वाटावी ? आम्ही इंग्रजी भाषेचे ज्ञान शिकविण्यात फुकट वर्षे घालविली. मला मिळालेले ज्ञान मराठी भाषेत मिळाले असते तर, हे सर्व ५२ वर्षांचे ज्ञान पंचविसाव्या अगर तिसाव्या वर्षीच मला मिळाले असते. या इंग्रजी भाषेमुळे वर्षे फुकट जातात. राष्ट्रास परकी भाषेत शिक्षण देणे म्हणजे त्याची खच्ची करण्यासारखे आहे.'* हे टिळकांचे विचार १९०८ सालातले आहेत. म्हणजे टिळक काळाच्या पुढे होते की मागे होते असा प्रश्न आज पडतो ना ?

आज संपूर्ण महाराष्ट्र लोकमान्य टिळकांना विसरुन गेलेला आहे. त्यांच्या बाबतीत सध्याच्या राजकर्त्यांच्या लक्षात राहिलेली एकमेव गोष्ट म्हणजे ते ब्राम्हण होते ही होय, टिळकांची सामाजिक सुधारणांच्या बाबतीतली मते ही बुरसटलेली होती. (*त्याचा उल्लेख म.फुल्यांवरच्या लेखात या पुस्तकात इतरत्र केलेला आहेच.*) महात्मा फुलेंनी सामाजिक बाबींमध्ये जी दिशा महाराष्ट्राला दिली नेमकी तीच दिशा राजकीय बाबींमध्ये लोकमान्य टिळकांनी देशाला दिली. महात्मा फुल्यांच्या कार्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कळस चढवला. टिळकांचं राजकीय कार्य महाराष्ट्रातून कुणीही पुढे नेलं नाही. टिळकांनंतर देशाचं नेतृत्व म.गांधीनी पुढे नेलं. बरेचसे टिळकांचे अनुयायी म. गांधीच्या मागून गेले. जे राहिले ते गांधीजींचा द्वेष करत कुढत राहिले. त्यांनी राष्ट्रीय राजकारणात टिळक मताची मोठी रेषा आखली असं झालं नाही.

देशात टिळक हे टिळक महाराज म्हणून ओळखले जात. त्यांना तेल्यातांबोळयांचे पुढारी म्हटलं जाई. कुठल्याही नेत्यांच्या अटकेनंतर 'मुंबई बंद ' होण्याची प्रथा लोकमान्य टिळकांपासून सुरु झाली. लोकमान्य टिळकांना पकडलं आणि मुंबईतल्या गिरणी कामगारांपासून संपूर्ण कष्टकरी वर्गाने उत्स्फूर्त हरताळ पाळला. लोकमान्य टिळक हे एका वेगळया अर्थानेद सुभाषचंद्र बोसांचे पूर्वसूरी होते. कॉंग्रेसमधल्या मवाळांविरुध्द लोकमान्यांनी बराच काळ एकहाती लढत दिली. आश्चर्य म्हणजे एकाहून एक मुत्सद्दी असलेल्या अनेक दृढाचार्य कॉंग्रेस नेत्यांना त्यांनी नामोहरण आणि पराभूत केले होते. आज महाराष्ट्रामधून कॉंग्रेसचे जे नेते निर्माण होतात ते पाहिल्यावर आणि त्यांचे दिल्लीतले वर्तन पाहिल्यावर लोकमान्य टिळक किती थोर पुरुष आणि किती थोर महाराष्ट्रीयन होते हे लगेचच लक्षात येतं.

त्या काळात 'केसरी ' वाचणं ही एक फॅशन होती. 'केसरी ' विकत घेणं हेसुध्दा प्रतिष्ठेचं मानलं जात असे. आज फॅशनवरच छापून पेपर काढण्याची फॅशन

असण्याच्या युगात टिळकांच्या ‘ केसरी ’ चं मोठेपण अधिकच जाणवेल. साध्या मराठी भाषेत असलेल्या ‘ केसरी ’ नावाच्या वृत्तपत्राने त्यांनी सारा देश पेटवला.

इच्छा आणि हेतू शुध्द असला की कुशाग्र बुध्दीचा प्रामाणिक माणूस काय करु शकतो त्याचं टिळक हे प्रतीक होते. लोकमान्य टिळकांनंतर राष्ट्रीय राजकारणात (*आणि कॉंग्रेसी राजकारणातही*) कोणताही मराठी माणूस इतक्या स्वयंसिध्द तेजाने तळपला नाही. म्हणून त्यांचं हे स्मरण, प्रेरक पण तेवढंच वेदनादायीही !

# गांधीजी

**वा**चलेल्या अनेक पुस्तकांतून माझं अत्यंत आवडीचं पुस्तक निवडायचं जर मी ठरवले तर गांधीजींचं ‘ सत्याचे प्रयोग ’ या पुस्तकाचीच मी निवड करीन. इतकं थेट लिहिलेलं आत्मचरित्र जगात दुसरं नसेल. तशी तुलनाच करायची झाली तर ‘ रुसो ’ चं ‘ कन्फेशन ’ तितकंच थेट लिहिलेलं आत्मचरित्र आहे; परंतु ‘ सत्याचे प्रयोग ’ मध्ये जे आत्मिक सामर्थ्य आहे ते ‘ कन्फेशन ’ मध्ये नाही. गांधीजींचं संपूर्ण आयुष्य हे घडवलेलं आयुष्य आहे. एका सामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या माणसाने स्वतःच्या प्रयत्नाने घडवलेली

पोलादी इच्छाशक्ती आणि त्या इच्छाशक्तीच्या जोरावर बदलेलेली सभोवतालची परिस्थिती याचं गांधीजी हे उदाहरण आहे; पण अशी उदाहरणेही इतिहासात हजारो सापडतील. मग प्रश्न असा पडतो की, गांधीजींचं वेगळेपण काय ?

मला स्वतःला गांधीजींच्या आयुष्याचं अनावर आकर्षण आहे. त्यामुळेच वर लिहिलेला प्रश्न मलाही अनेकदा पडलेला आहे. किरो नावाचा एक अतिप्रसिध्द हस्तसामुद्रिक होऊन गेला. त्याने हात पाहून भविष्य सांगण्याच्या कलेचं पुनरुज्जीवन केलं. महापुरुषांच्या हातावरुन चिन्हे, उंचवटे वगैरे पाहून त्यांचे आयुष्य इतकं वेगळं आणि प्रसिध्द का, त्यांना जननेतृत्व का मिळालं वगैरे अनेक प्रश्नांचा बराच ऊहापोह त्याने आपल्या पुस्तकातून केलेला आहे. त्याच्या पुस्तकात त्याने असंख्य मोठया माणसांच्या हाताचे ठसे त्याच्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ दिलेले आहेत. या साऱ्यामध्ये अतीव आश्चर्याची गोष्ट म्हणजे गांधीजींच्या हाताचा ठसाही त्याच्या पुस्तकात आहे. त्या हातावर एकही मोठया माणसाची खूण नाही. प्रसिध्द, जननेता किंवा मान्यता मिळवणारा, तत्वचिंतक वगैरे कोणत्याच प्रकारच्या माणसांना घडवणारी कोणतीच रेषा गांधीजींच्या हातावर नाही. किंबहूना गांधीजींच्या हातावर तीन मुख्य रेषा (*अंतःकरण, मस्तक आणि आयुष्यरेषा*) वगळता इतर तथाकथित प्रसिध्दर रेषाच नाहीत. त्यांच्या हाताचे उंचवटेही सपाट असल्याचं स्पष्ट दिसतं. आता हस्तसामुद्रिक या कलेचे महत्व मानायचे की नाही हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे; पण या गंमतीशीर वस्तुस्थितीत एक सत्य लपलेले आहे असं मला वाटतं, जे सत्य गांधीजींचं वेगळेपण विशद करतं. एका अतिसामान्य माणसाला आपलं आयुष्य उन्नत करण्याकरिता काय करता येऊ शकतं, हे गांधीजींच्या काळापर्यंत (*अर्वाचीन काळात*) अज्ञात होतं. गांधीजींनी ते शोधून काढलं आणि गांधीजींनी ते शोधून काढलं ते स्वतःच्याच आयुष्यावर प्रयोग करुन. गांधीजींचे नंतरच्या आयुष्यातले मोठमोठे प्रयोग आपण सोडून देऊ. साधं इंग्रजी सुधारण्याकरिता लॅटिन आणि इंग्रजीवर त्यांनी केलेले प्रयोग लक्षात घेतले तरी पुरेसे आहे. आजही कोटयावधी हिंदुस्थानींची छाती इंग्रजीच्या भयाने दडपलेली असते. आपल्याला कधी इंग्रजी बोलता-लिहिता येणार नाही असं वाटून कोटयावधी जण/जणी न्यूनगंडाने आयुष्य जगत असतात. त्यांनासुध्दा गांधीजींनी मार्ग सांगितलेला आहे. स्वतः गांधीजींनी इंग्रजांच्या अगाध अज्ञानापासून ते ब्रिटीशांना आदर्शवत् वाटेल अशा

इंग्रजीपर्यंत प्रवास कसा केला ते अतिशय प्रेरणादायक आहे. अगदी आजही गांधीजींचं हे अतिशय सोपं, सुबक आणि अचूक शब्दयोजना वापरलेल्या स्वरुपात आपल्या समोर येतं, त्यांच्या इतर आयुष्याप्रमाणेच.

बऱ्याचजणांना गांधीजी आवडतात ते त्यांच्या ' पॉवर ' मुळे. त्यांना एवढी सत्ता मिळाली, एवढया मोठया संख्येने माणसं त्यांचं ऐकत असत, जागतिक दर्जाचे जननेतेपद त्यांना लाभलं किंवा ते असधारण इतिहासपुरुष होते, ही गोष्ट असंख्यांना गांधीजींकडे आकर्षित करते; पण ही दिशाभूल आहे. गांधीजींच्या आयुष्यातून घ्यायचा जो बोध आहे तो हा नाहीच. हेच गुण हवे असतील तर हिटलरही आहेच. गांधीजी कशाला हवेत ? गांधीजींचं वैशिष्टय हे त्यांच्या सत्तेत नाही. सत्ता ही बाब त्यांच्या आयुष्यात आनुषंगिक होती. त्यांच्या आयुष्याचा जो मूळ बोध आहे तो अगदी वेगळा आहे. साधी, छोटी आणि अतिसामान्य गोष्ट, व्यक्ती आणि आयुष्य ही इतिहासात ब्रम्हांडाएवढीच मोठी, महान आणि महत्वाची असतात, हे गांधीजींनी मानवी इतिहासात प्रयोगाने पहिल्यांदाच सिध्द केलं. प्रत्येक सामान्य व्यक्तीला आपण तर अतिसामान्य आहोत, आपलं कोण ऐकणार किंवा आपलं काय महत्व असं वाटत आलेलं असतं. अशा माणसांचा समूह बनवून त्याचा राजकीय इंधनासाठी वापर करण्याची पध्दत जगभर रुढ होती. मग ती फॅसिझममध्ये असो की कम्युनिझममध्ये असो.

गांधीजींनी आपलं सामान्यपण हे चिल्लर नसून त्यामध्येच खरी विश्व समजून घेण्याची शक्ती आहे, हे जगासमोर आणलं. गांधीजींच्या अहिंसेचा विचार हाही त्याच संदर्भात करायला हवा. दुसऱ्यांची ताकद खच्ची करण्याचे दोन मार्ग असतात. एक त्याच्यावर हल्ला करण्याचा, दोन स्वतःची ताकद अमर्याद वाढवण्याचा आणि इथे स्वतःची ताकद अमर्याद वाढवण्याचा अर्थ स्वतःची आत्मिक ताकद वाढवण्याशी आहे. कारण शेवटी कोणतेही युध्द हे खरे तर आत्मिक असते. मग आत्मिक ताकद असली की साधे मीठ उचलूनही व्हाईसरॉयला बुचकळयात टाकता येते. गांधीजींचा जो प्रयोग होता त्याचं मूळ अतिसामान्य माणसाला संपूर्ण आणि सिध्द करण्याशी आहे. एक सामान्य माणूस संपूर्ण स्वयंपूर्ण आणि सिध्द झाला की वेगळी काही जादू करावीच लागत नाही. त्यानंतर जे जे होतं ती जादूच असते. भव्यदिव्य करण्याचा आटापिटा नेहमीच इतिहास पुरुषांना कफल्लक आणि अतिरेकी बनवून सोडतो. तिथे हा शेवटी काय करायचं हे स्पष्ट नसलेला प्रयोग अतिसामान्य माणसाला अचानक

भव्यदिव्यांचा स्पर्श करुन सोडतो.

परंतु या साऱ्याचा अर्थ गांधीवाद नावाचं काही तत्वज्ञान आहे आणि ते ऊरी धरुन जगलं पाहिजे असं अजिबातच नाही. उपनिषदात एक छान रुपक आहे. अग्नी गवताला जाळतं आणि नंतर अग्नीही शिल्लक राहत नाही अन् गवतही. गांधीजींच्या प्रयोगाचं तसंच आहे. गांधीजींना देवत्व मिळालं तर तो प्रयोग अयशस्वी झाला असं समजावं. जे जे अतिसामान्य आहे ते संपूर्ण सबल आणि सिध्द झालं की त्यात गांधीही उरत नाहीत. किंबहूना उरता कामा नयेत. Small is beautiful असं जे जगभर म्हटलं जातं ते वेगळया अर्थाने माणसांबाबतही सत्य आहे हे गांधीजींनी दाखवलं.

या सत्याचा शेवटचा खरा संदेश असेलच तर हाच आहे की, ‘गांधीवादापासून सावधान.’ आज पाचशेच्या नोटांवर गांधीजीचा फोटो छापून आपण हा संदेश अधिकच नागडं सत्य बनवलंय.

# नेताजी सुभाषचंद्र बोस

**हिं**दुस्थानी पुराणात जे सात चिरंजीव मानले जातात त्यात विसाव्या शतकात आठव्या चिरंजीवाची भर पडली. नेताही सुभाषचंद्र बोस हे त्या चिरंजीवाचे नाव. नेताजी सुभाषचंद्र बोस हे सर्वार्थाने चिरंजी ठरले. ते मृत्यु पावलेलेच नाहीत, तर वेळ आणि संधी पाहून ते परत येणार आहेत, असे मानणाऱ्यांची संख्या आजही देशात कमी नाही. खरे तर मानवी आयुष्याच्या कार्यक्षम वयाची मर्यादा आज नेताजींनी ओलांडली असेल. तरी ते अजूनही जिवंत आहेत असे

मानून त्यांचा शोध घेतला जातो. अलिकडेच मी पुण्यात कॅम्प भागात 'नेताजी लवकरच देशाचे तारणहर्ते म्हणून परत येणार आहेत ' अशा रंगविलेल्या घोषणा वाचल्या. हे चिरंजीव असल्याचं नव्हे तर अन्य कशाचं लक्षण आहे ?

यापलिकडे दुसऱ्या अर्थाने नेताजी सुभाषचंद्र बोस हे चिरंजीव आहेत. फाळणी, स्वातंत्र्य आणि त्यानंतरची देशातली प्रत्येक घटना लोकांनी 'नेताजी आज इथे असते तर असे वागले असते, अमका निर्णय त्यांनी घेता असता, ' वगैरे विचार करतच पाहिली. आपल्यात नसलेली व्यक्ती आपल्या आयुष्यातल्या प्रत्येक प्रसंगात कशी वागली असती असा विचार आपण करतो तेव्हा ती व्यक्ती आपल्यासाठी चिरंजीव असते. नेताजी वर उल्लेखिलेल्या दोन्हीही अर्थाने चिरंजीव ठरलेत.

म.गांधी यांचं सुभाषबाबूंवर खूप प्रेम होतं; परंतु स्वतःचे उमेदवार म्हणून पट्टाभि सीतारामय्या यांना गांधीजींनी कॉंग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उभं केले आणि त्यांना पाडून नेताजी निवडून आले. या घटनेने गांधीजींचा ' अहं ' दुखावला गेला. गांधीजींनी ' पट्टाभि ' चा पराभव हा स्वतःचा पराभव मानला. नेताजी सुभाषचंद्र बोसांची कॉंग्रेसबाहेर वाढ व्हायला मात्र हा गांधीजींचा पराभव उपकारकच ठरला. स्वातंत्र्य मिळविण्याचे इतर मार्ग नेताजी सुभाषचंद्रांनी नंतर शोधले त्यामागे नेमकी हीच पार्श्वभूमी होती.

एकदा नेताजींना कॉंग्रेसच्या कार्यकारिणीत स्थान नसल्याचं पाहून खुद्द जवाहरलाल नेहरुंनी गांधीजींना जाब विचारला होता. त्यावर गांधीजींनी आपल्या चिरपरिचित शैलीत जवाहरलाल यांना उत्तर दिलं होतं, ' सुभाषसाठी सारा देश मोकळा आहे.' पुढे सुभाषचंद्रांनी स्वतःसाठी सारे जग मोकळं असल्याचे सव्तःच्या उदाहरणाने सिध्द केले. कर्तृत्ववान माणसे पक्षाच्या कार्यकारिणीत स्थान मिळाले नाही म्हणून कुढत असत नाहीत की पक्षनेतृत्वाला दोषही देत नाहीत. ते स्वतःचा नवीन मार्ग स्वतः खोदून काढतात. नेताजींचे उदाहरण हेच दाखवते.

एक नेताजी सुभाषचंद्रांचं हिदुस्थानी समाजाला पराकोटीचे आकर्षण वाटते. त्याचे कारण गांधीवादामधील अनैसर्गिकता आहे. महत्मा गांधी हे एक असाधारण पुरुष होते. त्यांच्या मार्गावरुन आपण चालावे असे प्रत्येक हिंदुस्थानीला आयुष्याच्या कोणत्या ना कोणत्य टप्प्यावर वाटते; परंतु गांधीजींचा मार्ग हा पूर्णपणे अशक्य आहे. चार पावले चालल्यावर हे कळते. त्या मार्गावरुन फक्त गांधीजीच चालू शकतात. इतर गांधीवाद्यांच्या पदरात

दांभिक आणि ढोंगी जगणे येते. कारण ब्रम्हचर्यापासून ते दारु, सिगारेटपर्यंतचे गांधीजींचे विचार हे अनैसर्गिक होते. खुद्द जवाहरलालही त्या मार्गावरुन कधीच चालले नाहीत. अहिंसेचा जो गांधीविचार आहे तो गांधीमार्गाचा परिपाक आहे. त्याविरुध्द शब्दसुध्दा न बोलता सुभाषचंद्रांनी यशस्वी बंड केले. इतर कुणालाच ते जमले नाही. सावरकरांनासुध्दा. कारण सावरकरानी गांधीजींच्या मार्गाची शाब्दिक टवाळी फार केली. ती फक्त गांधीद्वेष भावनेची जन्मदात्री ठरली. यशस्वी बंडाची निर्मिती त्यातून कधीच झाली नाही. याउलट सुभाषबाबूंनी म.गांधींना राष्ट्रपिताच मानले. स्वतःला त्यांच्या नेतृत्वाखाली लढणारा सैनिकच मानले; परंतु अत्यंत नम्रपणे स्वतःला अतिरेकी अहिंसेच्या हिंसेपासून अलग केले. हिंदुस्थानी माणसाला एक वेगळाच मानसिक पर्याय उपलब्ध करुन दिला. सशस्त्र लढयाच्या मार्गाची गांधीजींनी नैतिक प्रतिष्ठाच नष्ट करुन टाकली होती. गांधीयुगाच्या सुवर्णकाळात सुभाषबाबूंनी ती नैतिक प्रतिष्ठा सशस्त्र लढयाला परत बहाल केली. आश्चर्याची बाब म्हणजे या महासंग्रामात सुभाषबाबूंना कोणीही गुरु नव्हता. पुन्हा इथे एक बाब नीट लक्षात घेतली पाहिजे की, महाराष्ट्रात काहीजण असे मानतात की, सावरकरांनी त्यांना सशस्त्र लढयाचा कानमंत्र दिला होता. स्वातंत्रवीर सावरकर आणि नेताजी सुभाषचंद्र बोस या दोघांचेही आयुष्य नीट पाहिले असता यात काहीही तथ्य दिसत नाही. एकतर सर्व जागतिक प्रवाहांची सर्वार्थाने नीट कल्पना असणाऱ्या सुभाषबाबूंना शब्दात ‘ रणावीण स्वातंत्र्य कुणा मिळाले ? ’ असे कोणी सांगून त्यांना ‘ ज्ञान ’ देण्याची काहीच गरज नव्हती. असे म्हणणे म्हणजे सुभाषबाबूंचा कमीपणा करणे आहे. दुसरे म्हणजे सावरकरांचा अंदमाननंतरचा सगळा ‘ सशस्त्र ’ विचार हा अहिंसेविषयीच्या द्वेषाने भारलेला आणि अतिअहंकारी होता. त्याची मजलही ब्रिटीश फौजेत तरुणांनी दाखल व्हावे इतपतची होती. याउलट सुभाषबाबूंनी पुढे जाऊन रासबिहारी बोसांकडून ‘ आझाद हिंद फौजे ’ ची सूत्रे घेतली आणि त्याची पुढखी मार्गक्रमणा केली ती अत्यंत नम्र सर्वधर्मसमभावाच्या तत्वावर. त्यात सावरकरांच्या हिंदू विचारांचा किंवा अहंकारी आक्रमकतेचा मागमूसही नव्हता. उलट स्त्रियांना बरोबरीने स्थान देण्याची सृजनशील समताही सुभाषबाबूंनी प्रस्थापित केली. ती तर तेव्हाच्या कोणत्याही हिंदुस्थानी नेत्याच्या कल्पनेच्या पलीकडचीच गोष्ट होती. स्वा.सारकरांचे मोठेपण त्यांच्या जागी आहे; पण म्हणून त्यांना सुभाषबाबूंचे गुरुपद देणे योग्य नव्हे. तो वावदूकपणा आहे.

नेताजी सुभाषचंद्र बोसांच्या आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या जोरावर उभ्या राहिलेल्य ' आझाद हिंद फौजेने ' संपूर्ण भारतवर्षाला आपल्या पुरुषार्थाची जाणीव करुन दिली. ही पुरुषार्थाची जाणीव एका बंगाली संन्याशानेच एकदा सुभाषबाबूंच्या अगोदर करुन दिली होती. स्वामी विवेकानंद जेव्हा शिकागोतल्या धर्मपरिषदेत बोलले होते. तेव्हा हिंदुस्थानी समाजात निर्माण झालेली पुरुषार्थाची जाणीव सुभाषचंद्र बोस या दुसऱ्या बंगाल्याने पूर्णत्वाला नेली. आश्चर्य म्हणजे पूर्वायुष्यात सुभाषचंद्र बोस यांच्यावर रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांचा खोल प्रभाव होता.

२३ जानेवारी हा सुभाषचंद्रांचा जन्मदिवस. त्या अर्थाने ते आज १०८ वर्षांचे असतील. स्वतंत्र हिंदुस्थानविषयी नेताजींनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पाहिलेली अनेक स्वप्ने कधीच प्रत्यक्षात आली नाहीत. त्यातलं एक स्वप्न तर हृदयद्रावकरीतीने खंडित झालेले आहे. नेताजी म्हणाले होते, 'दिल्लीस जाती हजार रस्ते, एक रस्ता स्वातंत्र्याचा.' आज आपण दिल्लीला जाणारा रस्ता स्वातंत्र्याचा आहे असे म्हणून शकतो का ?

# सावरकर

सावरकरांचा खरा पराभव करणं त्यांच्या शत्रुंना कधीच शक्य झालं नव्हतं. ती कसर त्यांचे अनुयायी म्हणवणाऱ्यांनी भरुन काढली. आज उत्तर प्रदेशात विश्व हिंदू परिषदेच्या मांडवाखाली ते साधू-संत जमून जी कर्मकांड, याग-यज्ञ करतात ती सावरकरांनी पाहिली असती तर त्यांनी विश्व हिंदू परिषदेविरुध्द उघड उघड मोहीमच उघडली असती.

सावकरांनी त्यांच्या आयुष्याच्या दुसऱ्या टप्प्यात (*इंग्रज सरकारच्या प्रदीर्घ कैदेत जाऊन आल्यावर*) जे बंड पुकारलं ते बुध्दीच्या आणि विज्ञानाच्या विरोधात

जाऊन आचरटपणाचे चाळे करणाऱ्यांविरोधात. गांधीवादाला त्यांचा अनेक कारणांनी विरोध होता. त्यातलं सर्वांत महत्वाचं कारण होतं ते म्हणजे गांधीवाद्यांची बुध्दीविरोधी प्रवृत्ती आणि त्या प्रवृत्तीतून निघालेली फॅडं.

'एखादा देशभक्त आजारी पडली की आपण सार्वजनिक प्रार्थनासभेकडे धाव घेतो. ज्या वेळी या गोष्टीची कारणमीमांसा ठाऊन नव्हती त्या वेळी हे ठी होतं पण या आपत्तीची कारणमीमांसा विज्ञानाने उलगडून दाखवल्यावरही त्याच जुन्या भ्रमांना कवटाळून बसणं हे शुध्द वेडगळपणाचं आहे,' हे सावरकरांचं वाक्य आज तरी किती जणांना पटेल ?

सावरकरांबाबत आजही प्रचंड गैरसमज आहेत. सावरकरांनी ' हिंदुत्व ' हा हिंदुत्वाबाबत नेमकी भूमिका विशद करणारा ग्रंथ तुरुंगात असताना लिहिला होता; पण सावरकर खऱ्या अर्थाने हिंदू परंपरेतले होते आणि नव्हतेही. म्हणजे हिंदूंची जी बंडखोरीची परंपरा आहे ज्यात चार्वाक, बुध्द किंवा महावीर या चक्रधरांना आपण पाहतो, त्याच वेळेला मच्छिंद्रनाथ, गहिनीनाथांचा नाथ संप्रदाय आणि त्यातलेच नंतर निवृत्तीनाथ नि पुढे संतपरंपरेचे आद्य ज्ञानेश्वर येतात. हे हिंदूंच्या त्या त्या वेळच्या परंपरेविरुध्द बंड करुन उभे करणाऱ्यातले सावरकर अर्वाचीन हिंदू पुरुष होते; पण हिंदूंच्या चालत आलेल्या परंपरेत लीन होऊन त्यासमोर शरणागततेचे स्तोत्र म्हणणाऱ्या हिंदू समुदायाच्या अर्थाने ते कधीच हिंदू नव्हते.

आपली जात समोर दिसली की आपसुकच मऊशार होण्याची जी हिंदूंची आत्मघातक कृती आहे, त्याचे विनाशकारी परिणाम आपण पाहतोच आहोत. सावरकर हयात असताना रत्नागिरीच्या चित्पावन ब्राम्हण विद्यार्थी सहाय्यक संघाने आपल्या वार्षिक संमेलन सभेत अध्यक्ष म्हणून भाषण करण्याची विनंती सावरकरांना केली. तेव्हा सावरकर म्हणाले, ' विशिष्ट ज्ञातीसाठीच असलेल्या संस्थांत मी भाग घेऊ शकत नाही. इतर कोणत्याही ज्ञातीच्या हिंदू विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती देण्यात येईल एवढा बदल तुम्ही तुमच्या घटनेत करीत असाल तर मी तुमचे निमंत्रण स्वीकारेन.'

सावरकर युसूफ मेहरअलींना मंदिरात अगदी आतपर्यंत घेऊन गेले, तेव्हा युसूफ मेहरअलींनाही त्याचे आश्चर्य वाटले होते; पण सावरकर परंपरावादी हिंदूंच्या चौकटीत कधीच बसले नाहीत. राष्ट्रीय स्वयंसेवक

संघाला सावकरांविषयी सुरुवातीला आत्मीयता असली तरी सावरकरांचे हिंदुत्व त्यांनी कधीही पचले नाही. आत्मसात करण्याची गोष्टच दूर राहो. ‘ गाय ही आपली माता नव्हे. गाय ही माता असेलच तर ती बैलांची होय. ’ असे ठामपणे सांगणाऱ्या सावरकरांचा गोहत्याबंदीची मागणी आणि आणि अंमलबजावणी हा सरकारी कार्यक्रम बनवणाऱ्यांशी सुतराम संबंध नाही. जनसंघ आणि भाजपचे हे गोहत्याबंदीचे सूर थेट सावरकरांच्या हिंदुत्वाचा अपमान करणारेच आहेत.

सावरकरांनी मार्सेलिसला समुद्रात उडी मारली किंवा अंदमानमध्ये भीषण अशी जन्मठेपेची शिक्षा भोगली म्हणून ते जितके क्रांतिकारक ठरतात, त्यापेक्षा कित्येकपट अधिक क्रांतिकारक ते ऐनभरात असलेल्या अहिंसावादाला विरोध करताना, रामाचं मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करताना हिंदू धर्मातल्या लोकमान्य कर्मकांडांना विरोध करताना होतात. कारण रुढीवादी आणि गतानुगतिक अशा समाजात संपूर्ण समाजाच्याच मान्यतांना आव्हान देणं, हे अधिक क्रांतिकारकपणाचं होतं आणि आहे.

लोकांना काय आवडतं ते बोलून त्यांचं नेतृत्व मिळवण्यापेक्षा त्यांच्या हिताचं जे आहे ते त्यांना सांगून त्यांच प्रसंगी रोष पत्करणाऱ्यांच्या कुळातले सावरकर हे नेते होते.

‘ लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या ’ असं सांगणाऱ्या सावरकरांनी लेखणीही तेवढयाच अद्वितीयपणे चालवली. आज आपण ‘ मेयर ’ ला ‘ महापौर ’ आणि ‘ बजेट ’ ला ‘ अर्थसंकल्प ’ असे शब्द वापरतो अगदी सहजपणे. हे आणि असे अनेक शब्द सावरकरांनी निर्माण केलेले आहेत.

श्राजकीय उलथापालथी, सामाजिक क्रांती, भाषाशास्त्र, वाङ्मय, साहित्य यांवर इतकी ठाम मतं असूनही सावरकर अंततः एक अपयशी राजकीय नेते मानले जातील आणि त्याचं कारण त्यांनी मुस्लिम व ख्रिश्चनांसंबंधी जे इशारे दिले किंवा ज्या कृतीची मागणी केली त्याची अंमलबजावणी झाली नाही हे नाही तर बहुसंख्य हिंदू समाजात त्यांना अपेक्षित असलेले क्रांतिकारक बदल अजिबातच झाले नाहीत. आज उलट हा समाज नवनवीन बुवा, बाबांच्या संगतीने उलटया दिशेने मार्गक्रमण करु लागलाय हे आहे.

कुमारीलभट्ट, रामदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, चैतन्य यांच्याप्रमाणे सावरकरांनी स्वतः होऊन देहत्याग केला. २६ फेब्रुवारी रोजी सावकरांनी

प्राणत्याग केला. त्यांनी मृत्यूपत्रात स्वतःच्या बंडखोरीची प्रचीती दिली होती. ज्यात त्यांनी 'माझे प्रेत विद्युत चितेवर जाळण्यांत यावे. जुन्या पध्दतीप्रमाणे खांद्यावरुन नेऊ नये. ते यांत्रिक शववाहिकेतून विद्युत स्मशानात न्यावे...' वगैरे म्हटले होते. या बंडखोराच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून २२ फेब्रुवारी रोजी ब्राम्हणांनी महामृत्युंजय यज्ञ घातला होता !

असे अनुयायी मिळाल्यावर लोकोत्तर पुरुषाचे जे होते तेच सावरकरांचे झाले !

# जयप्रकाश नारायण

**बि**हारमध्ये सध्या चालू असलेल्या निवडणुकांमधले हीरो आहेत ते लालूप्रसाद यादव, नितीशकूमार, रामविलास पासवान. सर्वजण कधीकाळी जयप्रकाश नारायण यांचे शिष्योत्तम होते. हिंदुस्थानी इतिहासातल्या कुठल्याही नेत्याचे मोठेपण अथवा छोटेपण जाणण्याची एक छोटीशी कसोटी आहे. ती म्हणजे त्याने कोणते अनुयायी स्वतःच्या मागे सोडले आहेत ही,

स्वतः जयप्रकाश नारायण हे ज्यांचे शिष्य होते, त्या गांधीजींबाबत ही कसोटी लावली असता गांधीजी हे एक थोर नेते होते, हे तात्काळ लक्षात येते; परंतु

जयप्रकाशांबाबत ही कसोटी लावली तर जयप्रकाश त्या कसोटीत उतरत नाहीत. खरे तर जयप्रकाश नारायण हे जेवढे गांधीवादी नव्हते तेवढे त्यांच्या पत्नी प्रभावतीदेवी गांधीवादी होत्या. जयप्रकाश जेव्हा अमेरिकेला निघून गेले तेव्हा लग्नानंतर प्रभावतीदेवी गांधीजींसोबत राहिल्या होत्या.

जयप्रकाश नारायण जेव्हा अमेरिकेत गेले तेव्हा त्यांच्यावर मार्क्सवादाचा खोल प्रभाव पडला होता. नंतर हिंदुस्थानात परत आल्यावर कालांतराने ते पुन्हा गांधीवादाकडे वळले. स्वातंत्र्य आंदोलनात गांधीजींची आणि अहिंसेची अपरिहार्यता त्यांना पटली. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांना जवाहरलाल नेहरुंनी मंत्रिमंडळात येण्याचा आग्रह केला, तेव्हा त्यांनी आपला चौदा कलमी कार्यक्रम त्यांना दिला. अर्थात् तो कार्यक्रम आणि जयप्रकाशांचे मंत्रिमंडळात येणे सारेच फिस्कटले. नंतर जयप्रकाश सक्रिय राजकारण टाळून भूदान आंदोलन आणि सर्वोदयामध्ये ओढले गेले ते थेट ‘ नवनिर्माण आंदोलन ’ आणि ‘ संपूर्ण क्रांती ’ चा आणीबाणी कालखंड येईस्तोवर.

जयप्रकाश नारायण यांचा हा संपूर्ण आयुष्यपट पाहिल्यावर जाणवतं की, ते फार भावुक होते. राजकारणातली तटस्थता त्यांच्यापाशी नव्हती. त्याही पलीकडे जाऊन परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या शक्यता-शक्यतांचा अचूक अंदाज घेण्याचं सामर्थ्यच त्यांच्यापाशी नव्हतं. होती ती फक्त सद्‌भावना. वास्तविक व्यक्तिगत गुणांचं मूल्यमापन करायचं झालं तर जयप्रकाश नारायण तत्वज्ञानाच्या कोणत्याही वाटेने गेले असते, तरीही ते शेवटी त्याच निष्कर्षावर पोचले असते. कारण त्यांच्याच एक भीषण द्विधा होती. तिचा ते कधीच मुकाबला करु शकले नाहीत.

११ ऑक्टोंबर १९०२ या दिवशी सीताबडीयारा या उत्तर प्रदेश, बिहारच्या सीमेवर असणाऱ्या गावात जन्माला आलेल्या या नेत्याने महात्मा गांधींनंतरचा महत्वाचा हिंदुस्थानी नेता असा जो लौकिक इतिहास लिहिताना जयप्रकाश नारायण यांना टिकवता आला नाही. याचं कारण द्विधा मनःस्थितीतून येणारी जयप्रकाश नारायण यांची होणारी चलबिचल होती.

आणीबाणीच्या कालखंडात जयप्रकाश नारायण यांच्यासंबंधी ‘ अंधेरे मे एक प्रकाश – जयप्रकाश, जयप्रकाश ! ’ अशी घोषणा देण्यांत येत असे. त्यासोबतच ‘ अंधेरे में एक

चिन्गारी – अटलबिहारी, अटलबिहारी ! ' अशीही एक घोषणा देण्यांत येत असे. संपूर्ण आणीबाणीच्या कालखंडात आणि

त्याअगोदरही जयप्रकाश नारायण यांनी स्वप्नमय क्रांतीसाठी पुढे येण्यासाठी आवाहन केले. जुनेच सामजवादी पक्ष, रा.स्व.संघ, जनसंघ यांना एकत्र कडबोळे बनवून जनता पक्षाची स्थापना केली. वास्तविक जयप्रकाश नारायण हे आधुनिक हिंदुस्थानातले एकमेव असे नेते होते की, ज्यांना संपूर्णपणे नवीन आणि कोरी पाटी असणारे नेतृत्व उभे करता आले असते; परंतु जयप्रकाश नारायणांनी पूर्वीचेच संधीसाधू, गणंग स्वतःभोवती गोळा केले. तरुण राहिले बाजूलाच आणि दुढाचार्यांची वेगळीच सत्तास्पर्धा सुरु झाली. या सर्वांवर कडी झाली ती जगजीवनराम यांच्यासारख्या मागासवर्गीय लोकप्रिय नेत्याला पंतप्रधानपद नाकारुन मोरारजी देसाईंना ते पद देताना ! उपयुक्ततावाद आणि संधीसाधूपणा हा नग्नपणे समोर आणणारी नीती नाकारण्याची हिंमत जयप्रकाश नारायणांना दाखवता आली नाही.

जयप्रकाश नारायणांच्या या द्विधेचा वेगळाच परिणाम हिंदुस्थानी इतिहासावर झाला. १९७७ साली हिंदुस्थानी जनतेने अखेरचा राजकीय उत्साह दाखवला. जनता पक्षाचे खरे विदारक स्वरुप समोर येताच हिंदुस्थानी जनतेचा राजकारणातल्या शुचितेवरचा विश्वास कायमचाच उडाला. राजकीय ऊर्जा निर्माण करण्याची आणि रस्त्यांवर ती विधायक रीतीने वापरण्याची जनतेची इच्छाच त्यानंतर मेली. आज ज्या राजकीय उदासीनतेचे वेगवेगळे अवतार आपण पाहतो, त्याची मुळं जयप्रकाश नारायण यांच्या त्या ऐतिहासिक क्षणीच्या कचखाऊ आणि द्विधा मनःस्थितीत आहे.

परवा नितीशकुमारांची मुलाखत पाहताना त्यांच्यामागे जयप्रकाश नारायणांचा फोटो पाहिला. लालूप्रसादर यादव हे तर जयप्रकाश नारायणांच्या तरुण कमांडरांमधलेच. या साऱ्यांची प्रतिभा विध्वंसक आणि भ्रष्ट मार्गाने का गेली, असा विचार आपण आज क्षणभरही करत नाही; पण या साऱ्यांनी त्या ऐतिहासिक क्षणी जयप्रकाशांच्या नेतृत्वाखाली हे पाहिलंय की शेवटी विजय लाठीचा आणि उपयुक्ततेचा होतो, आदर्श बाजूला पडतात. तुम्ही कुठच्या कुठे फेकले जाता.

गांधीजींच्या शिष्यांत असं नव्हतं. विपरीत परिस्थितीत गांधीजी मोठे होत जाताना त्यांनी पाहिलं होतं. वल्लभभाई, सुभाषचंद्र, राजेंद्रप्रसाद, नेहरु, खुद्द जयप्रकाश, विनोबा भावे असे भारी अनुयायी गांधीजींनी म्हणूनच मागे ठेवले. जयप्रकाशजींच्या अनुयायांकडे

बघताना देशाची चिंता वाटते. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाबद्दल स्वाभाविक शंका उत्पन्न होते. त्या शंकेची फोड ही अशी आहे.

जयप्रकाश नारायण यांच्या फोटोकडे बघताना आज वाटतं ते एवढंच की, माणूस फक्त सद्वर्तनी, सद्भावनेने भारलेला असून चालत नाही. राजकारणात जगताना एकाच अंधाऱ्या गुहेत शिरण्याची हिंमत लागते. तिथे कच खाऊन चालत नाही. गुहेच्या पलीकडे प्रकाश आहे वा नाही हा विचार इतिहासात होतो. जयप्रकाशांनी प्रकाशाच्या शोधात जाताना देशालाच अंधाऱ्या गुहेत सोडले ते त्यांच्या द्विधा मानसिकतेमुळे !

# राम मनोहर लोहिया

**आ**धुनिक हिंदुस्थानात आणि त्यातही स्वातंत्र्योत्तर हिंदुस्थानच्या इतिहासात राम मनोहर लोहियांएवढी बंडखोर आणि विद्रोही विचाराची माणसं फारच थोडी होऊन गेलेली आहेत. सध्या संसदेत वेगवेगळया पक्षांचे खासदार ‘ स्टिंग ऑपरेशन ’ मध्ये कैद होताना दिसताहेत. अशा वेळी राम मनोहर लोहियांच्या विचारवंत म्हणून केलेल्या लेखनाची वारंवार आठवण होते. राम मनोरह लोहिया हे त्या विचारवंतांपैकी एक होते, ज्यांनी संसदेच्या सभागृहांना केवळ सत्ताप्राप्तीचे साधन कधीच मानले नाही. त्यांच्या मते निवडणूक

हे सत्ताप्राप्तीचे साधन नसून जनतेच्या सार्वभौम इच्छाशक्तीचे ते मौल्यवान साधन आहे. आज हा विचार जनता आणि राजकीय नेतृत्व पूर्णपणे विसरलेले आहेत. राम मनोहर लोहियांचे आर्थिक विचार हे मतभेदाचे कारण होऊ शकते; परंतु सत्ता आणि शासनसंस्था याबाबतचे त्यांचे विचार (*विशेषतः हिंदुस्थानसंदर्भात* ) चिरंतन मूल्याचा दर्जा असलेले होते.

राम मनोहर लोहिया हे पक्के लोकशाहीवादी होते. ते (*त्या काळच्या*) सोव्हिएत रशिया, पूर्व जर्मनीसहित अमेरिकेत गेलेले होते. पूर्व जर्मनीत तर त्यांनी शिक्षणच घेतलेले होते. अमेरिका आणि कम्युनिस्ट देश यांच्यातला जो फरक होता त्याबाबत लोहियांची एक मार्मिक टिपणी आहे. ते म्हणतात, “प्रेसिडेन्ट जॉन्सन खड्डयात गेले तरी हरकत नाही, असे मी अमेरिकेत म्हणू शकतो. त्या स्वातंत्र्यात एक विलक्षण आनंद आहे. पूर्व जर्मनीत आणि रशियात तो आनंद नाही.”

राम मनोहर लोहियांनी शासन संस्थेवर बोलताना एकदा म्हटले होते ते उद्‌गार आज सर्व शहाणी पुनःपुन्हा मनात घोळवतील तरच त्यांना संसदेचे काही प्रतिष्ठित सदस्य जे काही वर्तन करत आहेत त्यातून अंशतः मानसिक मुक्ती मिळू शकेल. लोहिया म्हणतात, ‘केंद्रित सत्ता आणि नोकरशाही याऐवजी गाव, जिल्हा प्रांत या एककांवर सत्तेचे विकेंद्रीकरण व्हायला पाहिजे.’ अकर्मण्य, अवडंबर, निवडणूकबाजी, गटबाजी, सत्तेसाठी बिनकष्टाचा मार्ग शोधण्याची प्रवृत्ती हे लोहियांनी संसदीय पक्षपध्दतीत (*हिंदुस्थानात*) शिरलेले प्रमुख दोष आहेत असं आग्रही प्रतिपादन त्यांच्या आयुष्यात केलं; परंतु त्यांच्या या प्रतिपादनाकडे खुद्द त्यांच्या समाजवादी पक्षानेच दुर्लक्ष केलं, तर मग इतर पक्षांची गोष्टच वेगळी. मात्र राम मनोहजर लोहियांनी त्यांच्या मृत्यूअगोदर असं म्हटलं होतं की, ‘लोग मेरी बात सुनेंगे, शायद मेरे मरने के बाद, लेकिन किसी दिन सुनेंगे जरुर.’

राम मनोहर लाहिंयाचा जन्म १० मार्च १९१० सालचा. अकबरपूर, जिल्हा फैजाबाद, राज्य उत्तर प्रदेश. त्यांचया घरचा लोखंडाचा व्यवसाय होता. वडिलांचं नाव हिरालाल. आईचं नाव चंद्री. राम मनोहर लोहियांनी पीएच.डी.केली ती जर्मनीत.

१९३३ मध्ये ते परत हिंदुस्थानात आले. ते समाजवादी विचारांचे असूनही त्यांनी इतर समाजवाद्यांप्रमाणे पठडीबध्दता कधी दाखविली नाही. वास्तविक लोहियांना मार्क्सवाद आणि गांधीवाद या दोन्हीही विचारांविषयी ममत्व होतं; परंतु या दोन्ही विचारांची आंधळी कास त्यांनी

कधीच धरली नाही. या दोन्हीही विचारसरणीच्या पतनाची आणि त्यात निर्माण होणाऱ्या भ्रष्टतेची त्यांना पूर्ण जाणीव होती. ते मार्क्सला ऋषी मानत आणि गांधीजींना संत मानत. त्या दृष्टीने फारच गमतीदार विधान त्यांनी केलेलं आहे. ते म्हणतात, ‘ऋषी भ्रष्ट होतो तेव्हा तो क्रूर बनतो आणि संत जेव्हा भ्रष्ट बनतो तेव्हा तो ढोंगी बनतो.’

राम मनोहर लोहिया आणि महात्मा गांधी यांच्यात बाप आणि मुलासारखे नातेसंबंध होते. लोहिया हे गांधीजींचे शिष्याग्रणी होते. तरीही राम मनोहर लोहियांना गांधीजींच्या स्त्री-पुरुष संबंधाबाबतच्या कल्पना, वर्णव्यवस्थेबाबतच्या विचारांबाबत तिरस्कार वाटत असे. भौतिक अर्थाने राम मनोहजर लोहिया यशस्वी राजकारणी पुरुष ठरले नाहीत. त्यांच्या समाजवादाचा विचार मुद्दलातच फसला. खुद्द समाजवादी पक्षाची अनेक शकले पडली आणि मग तो विचार मग अस्तंगत झाला. त्यातली सुरुवातीची शकले पाडण्यात खुद्द लोहियांनी पुढाकार घेतला होता. मग तर समाजवाद्यांना फुटपाडे असेच नामाभिधान प्राप्त झाले. लोहियांच्या मृत्युनंतरही त्यांच्या कल्पनेतील लोकशाही काही या देशात अवतरली नाही. अर्थात् त्यांची ती इच्छाच नव्हती. तरीही त्यांनी स्वातंत्र्योत्तर हिंदुस्थानावर स्वतःची अतिट छाप सोडली. त्यांच्यात अतिविद्वान, पण त्याच वेळी रांगडया असलेल्या माणसाचे मिश्रण होते. ते कॉफी आणि सिगारेटचे शौकिन होते; परंतु त्यांच्या फक्त याच शौकाचे समाजवादी साथी अनुकरण करतात ते लक्षात आल्यवर त्यांनी हे दोन्हीही शौक सोडून दिले !

जवाहरलाल नेहरुंना राम मनोहर लोहियांनी आयुष्यभर कठोर आणि कधी कधी कर्कश वाटणारा असा विरोध केला. नेहरुंच्या धोरणातली विसंगती राम मनोहर लोहियांनी आयुष्यभर अचूक पकडली. जेव्हा ‘ नेहरुनंतर कोण ? ’ असा प्रश्न देशभर विचारला जात होता तेव्हा राम मनोहजर लोहियांनीच त्या प्रश्नाचं उत्तर ‘त्यांची मुलगी ’, असं अचूक आणि उपरोधिक दिलेलं होतं. नेहरुंमधली विसंगती आणि काही प्रमाणात ढोंग अचूक पकडण्याची सवय राम मनोहर लोहियांना बालपणापासूनच लागली होती. लोहियांचे कुटुंब अकबरपूरला राहत असे. लोहिया बालवयात होते तर नेहरु युवा नेते.

कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठी नेहरु अकबरपूरला आले होते. लोहिया कुटुंबाच्या घरीच नेहरुंचा मुक्काम होता. एकदा नेहरुनीं आरसा आणि कंगवा

मागितला. बाल राम मनोहरनी तो नेहरुंना आणून दिला आणि घरातल्या मोठया माणसांना विचारलं, ‘हा टककल पडलेला माणूस कंगवा आणि आरशाचं काय करणा आहे ?’

सत्ताधीशाबाबत इतके खरे बोलणारे लोहियांच्या पश्चात् देशात जन्माला येणे कमी कमी होत गेले. म्हणून त्यांचे स्मरण !

# महात्मा जोतिराव फुले

**जो**तिराव गोविंदराव फुले हे महात्मा फुल्यांचं खरं नाव. खरं तर ' फुले ' तेसुध्दा त्यांचं आडनाव नव्हे. त्यांचं खरं आडनाव गोऱ्हे. मूळचे ते करगुणचे (सातारा). पण गोविंदरावांच्या फुलांच्या धंद्यामुळे त्यांचे नाव ' फुले ' पडलं. आज महाराष्ट्रातला प्रत्येक राजकीय नेता हे नाव स्तःची प्रमिता पुरोगाती आणि समानतेचा पुरस्कर्ता अशी करण्यासाठी विष्णुसहस्त्रनामाप्रमाणे घेतो. ' फुले-आंबेडकर ' असा जप आपल्या भाषणात केला की, आपली सामाजिक जबाबदारी संपते, असा बऱ्याच जणांचा समज असतो; पण जोतीराव

फुल्यांनी ज्या परिस्थितीत आणि ज्या माणसांशी कडवा संघर्ष केला, ती परिस्थिती तपशीलात खूपच बदललेली असली तरी तत्वात फारशी बदललेली नाही. याची जाणीव फारच थोडया जणांना असते.

१८२७ ते १८९० हा जोतीराव फुल्यांचा कालखंड. त्यांचं आयुष्य संपूर्ण बहुजन समाज आणि संपूर्ण स्त्रीवर्गासाठी नव्या जगाचे दरवाजे खुले करण्यासाठी खर्ची पडलं. आज बऱ्याचदा असं दिसतं की, जोतीराव फुले हे माळी समाजाचे सामाजिक, राजकीय नेते होते असा समज काही नेते प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे पसरवत असतात. त्यांच्या या प्रचाराला बहुसंख्य समाज बळीही पडत असतो; परंतु एक ब्राम्हणवर्ग सोडला तर संपूर्ण बहुजन समाजासाठी विद्येचे आणि आधुनिक जगाचे दरवाजे फुल्यांनी उघडले. एवढंच नव्हे तर ब्राम्हणांसकट संपूर्ण स्त्रीवर्गासाठी फुले त्यांच्या काळात एकहाती लढत राहिले. फुल्यांच्या काळात ब्राम्हण, मराठी, महार, मांग या साऱ्याच जातींमध्ये स्त्रियांची स्थिती गुलामाचीच होती. फक्त राहणीमानात काय तो बदल असेल. पुण्यात जेव्हा महात्मा फुल्यांनी मुलींची पहिला शाळा काढली (*सन १९४८*), तेव्हा सनातनी ब्राम्हणांनी फुल्यांना आणि सावित्रीबाई फुल्यांना अपरिमित छळलं. याचं प्रमुख कारण ज्ञानगंगा बहुजन समाजात वाहणार याचं भय जसं होतं तसंच आपल्या घरातल्या बाईला जगाचं आतापर्यंत आपण लपवून ठेवलेलं ज्ञान खुलं होणार, याची भीतीही होती.

ज्योतीराव फुल्यांनी जातीभेद, चातुर्वर्ण्य, ब्राम्हणवर्ग, स्त्रीची गुलामी या साऱ्या मुद्दयांवर सनातन्यांवर मुळातून हल्ला चढवला. हा हल्ला सामाजिक मुद्दयांवर होता तसाच आर्थिक मुद्दयांवरही होता. एकीकडे ' गुलामगिरी ' सारखे पुस्तक लिहून शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रियांवरच्या अन्यायाचे नग्न स्वरुप स्पष्ट केलं, तर दुसरीकडे ' शेतकऱ्यांचा आसूड ' सारख्या पुस्तकात महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या भीषण दिवाळखोरीचे मूलभूत विश्लेषण केलं. दुर्दैवाची बाब अशी की, शेतकऱ्याची परिस्थिती महाराष्ट्रात बऱ्याच प्रमाणात आजही तशीच्या तशीच आहे.

महात्मा फुल्यांनी ' सत्यशोधक समाजा ' ची सीापना केली ती बहुसंख्य पिचलेल्या जातीवर्गांना मुक्त करण्याकरता. त्यांचं स्वप्न होतं ते मानवी स्वातंत्र्याचं. त्यांचा वाद

होता तो विश्वकुटुंबवाद. हे सारं त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाईंच्या साथीने महाराष्ट्रातल्या असंख्य बिनचेहऱ्यांच्या साध्याभोळया मराठी माणसांसाठी केलं. महाराष्ट्रातल्याच नव्हे तर देशातल्या सर्वच स्त्रियांनी तर

जोतीरावांचे कायमच ऋणी राहायला हवे. कारण त्यांनी पुण्यात जेव्हा मुलींची पहिला शाळा स्थापन केली तेव्हा त्यांचा आणि सावित्रीबाईंचा अपरिमित छळ झाला. त्यांचं ते काम किती कठीण होतं याची कल्पना येण्यासाठी दोन-तीन उदाहरणं देतो.

'केसरी 'च्या २ मार्च १८८६ च्या अग्रलेखात बाळ गंगाधर टिळक स्त्रीविषयक सुधारणांवर लिहिताना लिहितात - 'शिवाजी मराठयांच्या राज्याची स्थापना केली, पेशव्यांनी गंगेत, सिंधूत दक्षिणी तट्टे नाहवून अटकेस भगवा झेंडा फडकविला तो काय हायस्कुलात जाऊन चौथी इयत्ता शिकणाऱ्या मुलींच्या जोरावर ! शिवाजी, महादजी शिंदे, थोरले बाजीराव हे काय पंचविसाव्या वर्षी लग्न केलेल्या मुलींच्या पोटी झाले होते ? त्या वेळेस शूद्र ब्राम्हणांची ताटे काय एके ठिकाणी होती का ? ' हे टिळकांसारख्या लोकमान्य राजकीय नेत्यांचं महात्मा फुलेंच्या मुलींच्या शाळेच्या स्थापनेनंतर अडतीस वर्षांनंतरचं उदाहरण आहे. म्हणजे फुल्यांचा मार्ग किती अडचणींचा होता, हे लक्षात यावं.

दुसरं उदाहरण अगदी आजचंच आहे. सरंजामशाहीचं आधुनिक युग आणणाऱ्या (*आणि स्वतःला खानदानी म्हणवून घेणाऱ्या*) मराठयांच्या घरातल्या स्त्रियांना किती स्वातंत्र्य आहे ? आधुनिक शिक्षणाने आणि महात्मा फुल्यांच्या उदात्त आयुष्याने त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनातून काय फरक पडलाय ? तर हाती उत्तर भलंमोठं शून्य येतं. पूर्वी पुण्याच्या सनातनी ब्राम्हणांच्या घरातल्या स्त्रिया जशा मृत्यूपूर्वी कधीच कुणाला मोकळेपणाने वागताना, वावरताना दिसत नसत, तीच स्थिती आज सरंजामदार मराठयांनी आपल्या स्त्रीची केलेली आहे. आज जोतीराव फुले असते तर त्यांनी 'गुलामगिरी-२ ' नावाचा ग्रंथ लिहिला असता.

यातूनच निर्माण होणारे तिसरे ढळढळीत उदाहरण म्हणजे ज्यांनी जोतीराव फुल्यांच्या नावाचा सर्वांत जास्त जप केला त्या सर्व नेत्यांचेच राज्य महाराष्ट्रात आहे. अशा वेळी मंत्रिमंडळात स्त्री मंत्री आहे फक्त 'एक. '

महात्मा फुले यांच्या विचारांची खरी समज महाराष्ट्राला कधीच आली नाही. जोतीराव फुले हे महाराष्ट्राचे सर्वांत क्रांतिकारक असे सामाजिक नेते होते. त्यांच्या

तत्वज्ञानाची यथार्थ समज महाराष्ट्राला जर आली असती तर महाराष्ट्र धर्म हा बलाढय झाला असता. एवढंच नव्हे, तर मानवधर्माला तो समानार्थी शब्द झाला असता.

परंतु दुर्दैवाने ‘सनातनी ब्राम्हण ’आणि तथाकथित खानदानी

‘ मराठयांनी ’ (*अफवाद वगळता*) महात्मा ज्योतीराव फुल्यांना महाराष्ट्राच्या तळागाळापर्यंत पोहोचूच दिले नाही. त्यांना ‘ फुले महामंडळ ’ आणि ‘ राजकिय नामजपमंत्रा ’पुरते मर्यादित करुनन सोडले.

*‘ धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्याने वागावे । ईशासाठी ।।*

*ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राम्हणासी । धरावे पोटाशी । बंधुपरी ।।*

*निर्मिकाच धर्म सत्य आहे एक। भांडणे अनेक । कशासाठी ।।’*

असे म्हणणाऱ्या महात्मा ज्योतीराव फुले यांचा महाराष्ट्रावर आत प्रभाव पडलेला आहे, असे म्हणण्याची हिंमत आपण करु शकु ?

सामान्य शेतकरी मराठा, मुसलमान, ख्रिश्चन, नवबौद्ध हा आजही पिचतोच आहे. जातीव्यवस्थेचा बलदंड भिंती निवडणुका जिंकण्याच्या मिषाने उभारल्या जाताहेत. मुली आज शाळेत जाताहेत; पण त्या कमावत्या गुलाम म्हणून घडाव्या हाच दृष्टीकान बहुसंख्य प्रमाणात दिसतो आहे.

मला तर वाटतं की, महाराष्ट्रातली प्रत्येक जात आणि धर्म महात्मा फुलेंच्या विरोधात उठलेला आहे. त्यांनी सावित्रीबाईंना शिकवून मुलींची पहिली शाळा पुण्यात काढली, तेव्हा त्यांना  अशा सुधारणांचा परिणाम म्हणून घराबाहेर काढण्यात आले. ओघाओघानेच आजपर्यंत आपण  त्यांना महाराष्ट्राबाहेरच काढलेले आहे. बोलघेवडे नेते आपल्या वकुबाचा, आचारविचारालचा विचार न करता जेव्हा महात्मा फुले यांचं नाव घेतात, तेव्हा त्यांच काय करावंसं वाटतं तुम्हाला ?

ज्याचे विचार आपण पायदळी तुडवतो त्याला ‘महात्मा’ म्हटल्याने आपल्या पापांचं परिमार्जन होतं असा महाराष्ट्राचा समज आहे की काय ?

# बाळासाहेब देवरस

आणि एकंदरीतच नेतृत्वाचा विचार करता पुढच्या काळात संघाच्या आयुष्यात तो ‘ फाईनेस्ट अवर’ येईल असे वाटत नाही.

बाळासाहेब देवरसांना अजून चार भाऊ आणि चार बहिणी होत्या. बाळासाहेब त्यातले चौथ्या नंबरचे. त्यांच्यामागचा त्यांचा भाऊ पुढे भाऊराव देवरस म्हणून संघात प्रसिद्ध झाला. बाळासाहेब देवरसांचं संघातल वादातील कतृत्व हे सरसंघचालक झाल्यावर उदयाला आलं असं अजिबातच नाही. उलट ते ऐन तारुण्यात असताना आणि गोळवलकर गुरुजी सरसंघचालक असतानासुद्धा संघटनकौशल्य आणि व्यवस्थापनकौशल्याच्या जोरावर त्यांचा संघात दबदबा होता. खुद्द गोळवलकर गुरुजी सुद्धा बाळासाहेब देवरसांची ‘ मी ज्यांच्यामुळे सरसंघचालक आहे ते हे बाळासाहेब देवरस ! ’ अशी ओळख करुन देत आणि त्यावेळी बाळासाहेब देवरस तिशीतले तरुण होते. खुद्द गुरुजींपेक्षा ते नऊ वर्षांनी लहान होते. यातच काय ते आलं.

हा सारा सन्मानाचा बहर येण्यापुर्वीचा बाळासाहेबांच्या आयुष्यातील काळही तसा यशाचाच होता. कारण त्यांनी संस्कृत आणि तत्वज्ञान विषय घेऊन बी. ए. केलं नंतर एल. एल. बी. सुद्धा. शिवाय देवरसांची नागपूर जिल्हयात चिखली इथे आणि मध्य प्रदेशातल्या बालघाटामध्ये भरपूर शेती होती. देवरस कुटुंब हे मूळचं आंध्रातलं देवराजू. पुढे महाराष्ट्रात येऊन ‘ देवरस ’ झालं. त्यामुळे देवरस हे महाराष्ट्रीयन असल्याचं मानण मुळातून खरं नाहीए.

**आ**ज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक कुप्प सुदर्शन यांची वक्तव्ये आणि त्यांच्या बेछूट विधानांमुळे आख्खा संघपरिवार हादरलेला असताना एका सरसंघचालकाची आठवण प्रकर्षाने येते, ती म्हणजे बाळासाहेब देवरसांची. बाळासाहेब देवरसांचे मूळ नाव होते मधुकर दत्तात्रय देवरस. बाळासाहेब

बाळसाहेब देवरस हे संघस्थापनेनंतर दोनच वर्षांनी संघशाखेवर जाऊ लागले. त्यांच्या आयुष्यातील सर्वात नाटयमय कालखंड १९५३ ते १९६९ हाच होता. या काळाबद्दल कुणाकडेही काहीही नीट पटेल असे स्पष्टीकरण नाही. कारण या काळात बाळासाहेब देवरसांचे गोळवलकर गुरुजींशी काहीतरी गंभीर स्वरुपाचे मतभेद झाले. मतभेद अतिशय गंभीर असावेत. या तर्काला बळ मिळतं ते देवरसांच्या संघकार्यापासून अलिप्त होण्यामूळे. १९५३ ते १९६० या काळात देवरस संघात येत नसत. ते सरळ

आपली शेती करायला निघून गेले. सात वर्षे ते संघातून अलिप्त राहिले. मला स्वतःला हा काळ फार नाटयमय वाटतो. ‘ खरा सरसंघचालक ’ अशी बिरुदावली स्वतः गोळवलकरांनी ज्यांच्यामागे लावलेली होती, त्या गोळवलकरांमध्ये आणि बाळासाहेब देवरसांमध्ये नेमकं काय झालं असेल, इतकं सगळं विकोपाला कसं गेलं असेल, सरळ शेती करायला निघून जाण्याइतकी संघाबद्दलची निर्लेप तटस्थता बाळासाहेब देवरसांमध्ये नेमकी कशामुळे आली असेल  सारा वेळ अहंकाराचा ? आणि मन दुखावण्याचा

असणार ; पण नेमकं काय झालं होतं ते बाळासाहेब देवरस किंवा गोळवलकरांपैकी कुणीच लिहून ठेवलेलं नाही. संघाच्या कुणाला विचारलं तर उगाचच तो काहीतरी अचाट भक्तिरापुर्ण सांगण्याचं काम करतो. आपल्याकडे माहिती आणि प्रसंग लिहून आणि नोंद करुन पुढच्या पिढयांसाठी जतन करण्याची परंपरा नसल्याने अभ्यासकांचं कसं नुकसान होतं त्याचं हे उत्तम उदाहरण आहे.

बाळासाहेब  देवरसांच्या काळात संघ खऱ्या अर्थाने राजकारणाभिमुख झाला. भारतीय जनता पक्षाचा जन्म हा सुद्धा त्यांच्याच काळातला. भाजपच्या जन्मापासून ते पक्ष सत्तेच्या सोपानापर्यंत चढण्याचा काळ बाळासाहेब देवरसांनी स्वतःच्या आयुष्यात पाहिला. तो संपूर्ण काळ रा. स्व. संघ भारतीय जनता पक्षावर वरचढ असण्याचा होता. एका मोठया कुटुंबातल्या वृद्ध कुटुंबातल्या वृद्ध  कुटुंबप्रमुखाने स्वतःचा आदर कसा टिकवायचा असतो, याचं अचूक ज्ञान बाळासाहेब देवरसांना होतं. आणीबाणीच्या काळात आणि नंतर पहिल्यांदा सत्तेची संयुक्तपणे चव चाखताना संघपरिवारातल्या अनेकांची मूल्यविषयक तडजोडींपासून ते मूल्यविषयक पतनापर्यंतची वाटचाल बाळसाहेबांनी पाहिली नसेल असं नाही; पण वृद्ध कुटुंबप्रमुखाने कुटुंबातल्या तरुणांना सत्ता मिळत असताना जसं वागायचं असतं तसंच बाळासाहेब देवरस वागले. त्यामुळेच त्यांच्या काळात संघ प्रचंड पसरला. सामाजिक समरसता मंच, भारतीय किसान संघ, कलाभारती, ग्राहक पंचायत, संस्कारभारती अशा अनेक संस्थांची संघाच्या परिवारात भर पडत गेली. केवळ एवढेच नव्हे तर राजा रविकर्मा, संगीततज्ज्ञ भातखंडेपासून ते रवींद्रनाथ, गांधीजींपर्यंत अनेकांची नावे संघाच्या भारतभक्तीस्तोत्रात करण्यात आली.

परंतु इतिहासाच्या प्रवाहात संघाबाबत विश्लेषण करताना आज एवढंच म्हणता येतं की, या काळात संघ पसरला;  पण वाढला नाही ! संघाची सर्वसमावेशकता ही मूलगामी न बनता ती फक्त वरवरची राहिली. ते धोरण उरले, ती प्रेरणा उरली नाही. त्यामुळे संघपरिवारातल्या अनेक संघटनांना (*भाजपसहित*) आपले ब्राम्हण्य लपवूण धोरण म्हणून

इतर जातींच्या माणसांना पुढे करावे लागले. बाळासाहेब देवरसांना त्यांच्या काळातल्या संघात पुढे येणाऱ्या गोष्टींची अटळ परिणती दिसली नसेल असं नाही; पण संघाच्या मूलस्त्रोतातच बदल घउविण्याची जी गरज होती तो बदल आणण्यासाठी ते बेलगाम तारुण्य लागतं ते बाळासाहेब देवसांपाशी उरलेलं नव्हतं आणि ११ मार्च १९९४ रोजी बाळासाहेब देवरसांनी आपला उत्तराधिकारी नेमले ते राजेंद्रसिंहजी उर्फ

रज्जूभैयांना. ते सुद्‌धा तेव्हा पुरेसे वृद्‌ध झालेले होते. त्यानंतर आलेले कुप्प सुदर्शन हेसुद्‌धा पुरेसे वृद्‌धच ! मूलस्त्रोतातच संघाला लागलेला वृद्‌ध्वाचा शाप आणि काहीही कारन नसतानाच्या कूटनीतीचा बाण संघावरच उलटला आणि अचानक संपूर्ण परिवारातच पतनाच्या नवनवीन सीमा गाठल्या गेल्या. काल ‘ब्रिजेश मिश्रा’ या ऐका माजी सरकारी अधिकाऱ्याने विदयमान सरसंघचालक कुप्प सुदर्शन यांचे विचार ‘ डबक्यातील बेडका ’ प्रमाणे असल्याचं म्हटलं आहे. संघ आणि भारतीय जनता पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांनी एकमेकांवर पतनाचे आरोप-प्रत्यारोप केले. त्यात भ्रष्टाचाराचे आरोपही आहेत. हे बाळासाहेबांनंतरच्या अवघ्या नऊ वर्षात कसं झालं असेल बाळासाहेब देवरसांनी त्यांच्या हयातीत एकदा असं म्हटलं होतं की, ‘सतत व्यक्त केले जाणारे मतभेद आणि त्यातून येणारा अव्यवस्थितपणा म्हणजे लोकशाही, तर शिस्त म्हणजे हुकूमशाही असा भ्रामक समज अनेकांनी करुन घेतलेला असतो. त्या अर्थाने पाहायला गेल्यास संघपरिवारात आता लोकशाही आलेली आहे ! आणि लोकशाही विषयीचे ‘भ्रामक ’ समज परिवारातही पसरलेले आहेत. !

बाळासाहेब देवरसांनी आपल्या हयातीत अजून एक महत्वाची सूचना करुन ठेवलेली होती. ती म्हणजे सरसंघचालकांना ‘परमपूजनीय ’ हे विशेषण लावण्याचे कारण नाही. जणू काही बाळासाहेब देवरसांच्या मुखातून तेव्हा संघाची नियतीच बोलली असावी.

१७ जून १९९६ ला बाळासाहेब देवरस निधन पावले. तेव्हा त्यांनी संघाचा सर्वात छान काळ पाहिलेला होता. त्यांच्या मनातल्या भावनांची गोळाबेरीज करता कृतकृत्यतेची भावना होती. त्यांच्या मृत्यूनंतर संघपरिवारातला थरार संपला, उर्जा संपली आणि आता तर सामान्य शहाणपणाबद्‌दलही असेच म्हणावे अशी परिस्थिती आह! काय ?

# गोळवलकर गुरुजी

तेहतीस वर्षात त्यांनी संघ प्रचंड मोठया प्रमाणात वाढविला. म्हणून जो काही विचार आहे तो गोळवलकर गुरुजींनी देशभर पोहोचविला.

स्त्री वा पुरुष पूर्णत्वाला जेव्हा पोहोचतो तेव्हा तो क्षमाशील होतो आणि या प्रक्रियेमध्ये अनेकानेक अपमान त्याला सहन करावे लागतात. त्यांना तो कसा पचवतो त्यावरच त्याचा कस लागतो. हे वेद आणि उपनिषदांच्या तत्वांच सार आहे; पण गुरुजींनी हे सार नेमकं उलटं करुन संघ विचारात त्याचा समावेश केला.

*एतावानेव पुरुषो यदमर्षी यंदक्षमी ।*
*क्षमावान् निरमर्षश्च, नैव स्त्री न पुनः पुमान् ।।*

*(जो अपमान सहन करत नाही वा क्षमा करत नाही तोच खरा पुरुष होय, जो नेहमीच क्षमा करतो आणि अपमान सहन करीत जातो, तो पुरुषही नव्हे आणि स्त्रीही नव्हे.)*

पुढे संघ विचारामध्ये जो सहिष्णूता आणि क्षमाशीलतेचा क्रमाक्रमाने लोप होत गेला, त्याचं मूळ गोळवलकर गुरुजींच्या या विचारात आहे.

गोळवलकर गुरुजींनी आयुष्यभर अहिंसा या शबदाचा आणि गांधीविचाराचा पराकोटीचा विरोध केला. कोणत्याही समाजगटाला बलवान करण्याचा मार्ग हा शारीर नसतो तर आत्मिक असतो, या तत्वावर गोळवलकर गुरुजींना फार कमी श्रद्धा दाखवली. बलोपासना ही बाहेरची गोष्ट जास्त आहे, आतली कमी अशी विचारांची बैठक संघात त्यांनी स्थापित केली. याचे दूरगामी परिणाम पुढे संपूर्ण संघ परिवारावर झाले. आज इतक्या कालखंडानंतर जेव्हा संघाचे परीक्षण आणि विश्लेषण करायला आपण बसतो, तेव्हा संघ परिवाराच्या आजच्या बऱ्याच समस्यांच मूळ हे गुरुजींच्या तेव्हाच्या वैचारिक मांडणीत होतं, हे स्पष्ट जाणवंत.

हिंदू - मुस्लिम सहअस्तित्वातले जे प्रश्न होत त्यावर ‘ ठकासी व्हावे महाठक ’ अशा स्वरुपाचा विचार जो डॉक्टर हेडगेवारांनी मांडलेला होता, गोळवलकर गुरुजींनी मांडणीमध्ये त्याचा परिपोष करत त्याला पूर्णत्वाला नेलं.

**मा**.स. गोळवलकर या नावाची उतरती सही करुन खाली सरळ रेषा मारणाऱ्या गोळवलकरांना संपूर्ण संघ परिवारात गोळवलकर गुरुजी या नावाने ओळखलं जात असे. अधिकच अचूक बोलायचं झालं तर ‘ गुरुजी ’ या नावाने ते ओळखले जात.

१९२५ साली डॉ. केशव बळीराम हेडगेवार

मुळात मुस्लिमांचा मूलतत्ववाद हा इस्लाममधल्या मानवी स्वातंत्र्य नाकारणाऱ्या व विवेकवादाची कास सोडणाऱ्या, किंबहूना मानवी विवेकाला कस्पटासमान मानणाऱ्या परंपरेत आहे. त्याला त्याच्याच पातळीवर जाऊन  विरोध करणाऱ्यामध्येही आपसूकच ही परंपरा रुजू शकते, याचं भान गुरुजींना नव्हतं. परिणामतः संघामध्येही विवेकवाद आणि खुलं स्वातंत्र्य याचा पहिल्यांदा बळी दिला गेला. गुरुजींकडे सरसंघचालकपद आलं तेव्हापासून क्रमाक्रमाने त्यांची ताकद प्रचंड

वाढतं गेली. त्यांनी मनात आणलं असतं तर संघातले अनेक दोष ते टाळू शकले असते ;  पण ते तसं करु शकले नाहीत. याचं कारण हिंदू विचार म्हणून जे काही त्यांनी स्वीकारलं ते फक्त बाहय स्वरुप होतं. माणूस आतून निर्भय होणं ही खरी त्याची आत्मिक उन्नती असते. हा गांधीविचार (*त्याचं व्यवहारात पुढे काय झालं हे बाजूला ठेवून*) अधिक हिंदूविचार होता. या उलट रोजचा व्यायाम, जिम्नॅस्टिक, लष्करी गणवेश बूट ड्रमबीटच्या तालावर संचलन वगैरे पाश्चात्य देखाव्याचा वास्तविक माणसाच्या बलवान व निर्भय होण्याशी काहीच संबंध नाही आणि नसतोच.

जर मुस्लिमकेंद्री होऊन त्यावर प्रतिक्रिया देणारा दुसरा मूलतत्ववाद आपणाला सजवायचा होता तर आपण निर्भय न होता मुस्लिमांना अधिकाधिक भयभीतच होत राहिलो, असं म्हणावं लागेल. या गोष्टीची साधी जाणीवही गुरुजींना त्यांच्या आयुष्यकालात झालेली दिसत नाही.

संघाच्या संदर्भात गुरुजी हे पहिले आणि शेवटचे असे सरसंघचालक होते, ज्यांच्या हातात तयार संघटना होती आणि ती ते आमूलाग्र बदलूही शकले असते. कारण डॉ. हेडगेवारांकडे संघटना नव्हती आणि पुढच्या सर्व सरसंघचालकांकडे संघ आला, तोपर्यंत संघाचे जे काही व्हायचे ते होऊन गेलेले होते.

एकदा बोलताना गुरुजी म्हणाले होते की, चीनमध्ये एवढा भ्रष्टाचार बोकाळला होता की तिथे क्रांती होणं अपरिहार्यच होतं. तो भ्रष्टाचार हिंदुस्थानात जेव्हा बोकाळला आणि आता त्याने तर जे हिडीस रुप धारण केलं त्याला तर गांधीजी वा मुस्लिम जबाबदार नव्हते ! प्रश्न मूलगामी असतात. त्याच्यावरती उत्तरं वरवरची आणि प्रतिकात्मक काढून चालत नाहीत. कारण अशा उत्तरांनी वेळ मारुन नेता आली तरी इतिहास बदलता येत नाही.

वस्तुस्थितीचे सोपेकरण आणि विवेकवादाला विरोध याने मोठा त्यागही कसा वाया जातो याचं गुरुजींचं आयुष्य हे उदाहरण आहे. एकदा एका लेखात ते म्हणाले होते, '

एकदा निवडून आल्यावर पूर्ण पाच वर्षे आपण आपल्या आरामशीर भ्ररपूर पैसा मिळवून देणाऱ्या खुर्चीचा उपभोग घेऊ शकतो, हे माहित असल्यामुळे पक्ष निवडणुकीच्या वेळेस भरमसाट आश्वासने देतात. असे करण्यात गैर, अनैतिक काही आहे असे कुणालाच वाटत नाही. मतदारांना आपल्या जाळयात ओढण्यासाठी खोटयानाटया गोष्टींचा बेछूट प्रचार करण्याची कल्पकता आणि क्षमता जास्त असते, तेच सत्तेवर येण्याची शक्यता अधिक असते. ' भा.ज. पा. संदर्भात हे स्वतःमध्येच पुरेसं बोलकं आहे. गुरुजींच्या अनुयायांना आता आपण काय सांगावं ?

# राजकीय नेते

# अटलबिहारी वाजपेयी

**त**हलकाच्या कॅसेटस् जेव्हा देशभरातल्या अनेक वाहिन्यांवरुन दाखविल्या जात होत्या, तेव्हा अनेकांना एकाच व्यक्तीबद्दल खात्री आणि आशा होती. ती म्हणजे अटलबिहारी वाजपेयी. पण वाजपेयींनी त्या प्रकरणात काहीही केलं नाही. सरकार पुढे चालू राहिलं. जॉर्ज फर्नांडिस बाहेर गेले आणि परत

उगाच वाटून गेलं की, पुढच्या वेळी निवडणुकांनंतर अटलबिहारी काही पंतप्रधान होत नाहीत. त्यानंतर अजून एकदा मला नेमकं असंच वाटलं. १३ तारखेला वाजपेयींना फॉर्म भरायचा होता. निवडणूकांची रचनाही अशाच खुबीने करण्यात आली होती की, १३ मे रोजी वाजपेयींना सरकार स्थापनेचा दावा करता यावा ! १३ हा वाजपेयींचा अत्यंत लाडका आणि आवडता आकडा. कारण तो त्यांना आणि त्यांच्यामुळे भाजपला शुभ ठरलेला आकडा आहे परंतु नियती भाजपाच्या 'वॉर रुम' च्या सल्ल्याने चालत नाही. साडीवाटपातल्या चेंगराचेंगरीमुळे जे प्रकरण उद्भवलं त्यातून वाजपेयींना पंतप्रधान होणार नाहीत असं वाटण्याची !

जनसंघाच्या काळापासून आपल्या अमोघ वकृत्वाच्या बळावर वाजपेयींनी अनेकदा संसद चैतन्याने भारलेली आहे. जनता पक्षाच्या काळात वाजपेयी परराष्ट्रमंत्री होते. त्या काळात ते चीनला जाऊन आले होते . कम्युनिस्ट चीनला हिंदुस्थानाशी जोडून घेण्याचा प्रयत्न करणारे हे परराष्ट्रमंत्री जनसंघाचे होते!

जनता पक्ष फुटल्यावर भाजपची स्थापना झाली. वाजपेयींनी गांधीवादी समाजवादाचं तत्वज्ञान स्वीकारायला भाजपला भाग पाडलं. परिणामतः १९८५ मध्ये भाजपच्या देशभरात फक्त दोन जागा आल्या. पराभूतांत स्वतः वाजपेयींचाही समावेश होता.

इथून ते देशाचे पंतप्रधान होईस्तोवरचा काळ हा वाजपेयींच्या आयुष्यातला आजवरचा सर्वात कसोटीचा काळ होता. कारण या काळात भाजपवर आडवाणी नुसते छा गए थे ! बाबरी मशीद पडण्याचा आणि रथयात्रेच्या संपूर्ण आंदोलनाच्या काळात वाजपेयी भाजपच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिले. याचाच पुढे त्यांना आणि त्यांच्या पक्षाला अपरिमित फायदा झाला. पुढे अनेक युत्यांचं सरकार बनविण्याची वेळ आली तेव्हा अतिरेकी धर्मवादाचा शिकका नसल्याने वाजपेयी हेच नेतेपदाचे सर्वमान्य उमेदवार ठरले. तिथून ते अगदी कालकालपर्यंत पंतप्रधानपदावर राहिले.

एका मासिकाने अटलबिहारी वाजपेयींच्या फोटोखाली या निवडणुकांच्या निकालाअंती त्यांच्या बद्दल इतिहासात काय लिहिलं जाईल ते ठरेल, असं लिहिलंय. खरचं काय लिहिलं जाईल इतिहासात वाजपेयींबद्दल ?

ते इतिहास कोण लिहितं त्यावर ठरेल !

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषदेने इतिहास लिहिला तर ते वाजपेयींबदद्ल अत्यंत कटूतेने लिहितील. पंतप्रधान असताना वि. हिं. पं. चे साधु-

संत चर्चेसाठी वाजपेयींच्या निवासस्थानी गेले असताना त्यांना चहाबद्दलही विचारणा झाली नसल्याचा इतिहासात उल्लेख असेलच! शिवाय कर्मठ हिंदुत्ववादाला सुरुंग लावणारा नेता असाही त्या इतिहासात त्यांचा उल्लेख होईल.

वाजपेयींबद्दलचा इतिहासातला उल्लेख एखाद्या इतिहासकाराने लिहायचा झाला तर ते आदर्श संधिसाधू होते, असंच लिहावं लागेल. कारण मंदिराचा मुद्दा असो किंवा हिंदु-मुस्लिम सहअस्तित्वाचा, त्यांनी कधीच निःसंदिग्ध भूमिका घेतली नाह. स्वतः व स्वतःच्या पक्षाला सत्तेत ठेवण्याकरीता आवश्यक ते सर्व त्यांनी केलं. बिगरकॉंग्रेसी सरकार पाच वर्ष चालविणारे पहिले नेते म्हणून त्यांच्या उल्लेख होतो पण ते तसं चालवू शकले याचं कारणच कॉंग्रसी संधिसाधूपणा आत्मसात करण्याचे ते आदर्श उदाहरण होतं !

भाजपला कधीही नव्हे असं एक सुवर्ण युग वाजपेयींनी दाखविलं. देशभर अखडित सत्ता कधी हातात येईल असं जनसंघाच्या काळात कुठल्याही नेत्याला कधीच वाटलं नव्हतं. ते युग वाजपेयींनी आणून दाखविलं. त्या काळात मुरली मनोहर जोशींसारखा त्यांचा कर्मठ, विक्षिप्त, विद्वान सहकारी देशतल्या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांच्या मागे हात धुऊन लागला, तर नरेंद्र मोदींसारखा कट्टर मुख्यमंत्री माणसांची आयुष्य उद्ध्वस्त करुन गुजरात नावाची प्रयोगशाळा बनवत राहिला. त्याला राजधर्माचं पालन करण्याचा उपदेश करण्याचं कृत्य ही वाजपेयींना करावं लागलं.

वाजपेयीप्रणीत या सुर्वणायुगाचा भाजपसाठीची अस्त निवडणुकतल्या दारुण पराभवाने झाला. निवडणुकीत वाजपेयींना या उन्हाळयात ( *आणि या वयात*) झेपू नयेत एवढे श्रम घ्यावे लागले. यशाने तरीही हुलकावणी दिलीच. गोळवलकर गुरुजींच्या संकल्पनेतील आदर्श स्वयंसेवक अजिबातच नसणाऱ्या अटलबिहारीवापेयींनी संघाच राज्य देशावर पसरवलं. आता पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यावर एकांतात ते जेव्हा स्वतःशीच विचार करतील तेव्हा त्यांना संघाबद्दल काय वाटेल ? त्यातून ते ज्या कविता लिहितील त्या गाण्याचं धैर्य लता मंगेशकर दाखवतील काय ?

# परवेझ मुशर्रफ

जनरल परवेझ मुशर्रफ या माणसाबद्दल आपण जाणतो खूप कमी आणि बोलतो खूप जास्त. हिंदुस्थानी अतिरेक्यांनी बॉम्बस्फोट केले की आपल्याला परवेझ मुशर्रफ यांची आठवण होते. पाकिस्तान हा आपला शत्रू देश मानला तरीसुद्धा आपल्याला मुशर्रफ यांची जितकी असायला हवी तितकी माहिती नाही.

इतकंच. त्या अर्थाने ते देशभक्तच आहेत आणि अत्यंत योग्यही

तरुणपणी परवेझ मुशर्रफ इंग्लंडच्या रॉयल कॉलेज ऑफ डिफेन्स स्टडीजमध्ये लष्करी शिक्षण घेण्याकरीता गेले होते तेव्हा त्यांच्या निरिक्षकाने त्यांच्यावर जो शेरा मारला तो असा होता, "A capable articulate and extremely personable officer, who made valuale impact here. His country is fortunate to have the services of the man of his undeniable quality." ब्रिटीशांना गुण अचूक जोखणारे हूशार म्हणून जगभर ओळखलं जातं ते उगाच नव्हे ब्रिटीशांच्या या गुणाची पुन्हा एकदा अचूक चुणूक जनरल परवेझ मुशर्रफ पाकिस्तानच्या अध्यक्षपदापर्यंत पोहोचल्यावर आलीच.

जनरल मुशर्रफ यांचा जन्म ११ ऑगस्ट १९४३ चा दर्यागंज- नवी दिल्ली. फाळणीपर्यंत मुशर्रफ हिंदुस्थानात होत. मुशर्रफ यांचे वडील अलिगढ विद्यापीठाचे ग्रॅज्युएट. आई जहिरा हिचं इंग्रजीवरचं प्रभुत्व वादातीत. त्यांची आई १९८६ पर्यंत 'इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन ' मध्ये नोकरीला होती. १९८६ मध्ये ती रिटायर्ड झाली. वडील पाकिस्तानच्या परारष्ट्र मंत्रालयात जॉइण्ट सेक्रेटरी. मुशर्रफ यांची कौटुंबिक पार्श्वभूमी ही अशी मुशर्रफ यांची मुलगीसुद्धा आर्किटक्ट आहे. त्यांचं स्वतःच शिक्षण कुठच्याही मदरशात झालेलं नसून कराचीच्या 'सेंट पॅट्रिक हायस्कुल ' आणि लाहोरच्या 'फोरमन ख्रिश्चन कॉलेज 'मधून ते शिकलेत.

या साऱ्या आयुष्यात धर्मवाद फारसा दिसत नाही किंवा एखादा उदारमतवादी हिंदुस्थानी माणूस उच्चवर्गात जन्म घेतल्यावर ज्या पद्धतीने जातो ती त्याची रेष मुशर्रफ यांच्यापेक्षा काही वेगळी असत नाही. वेगळेपण हे त्यांच्याकडे ज्या देशाचं नेतृत्व आलं त्या देशात आहे. शिवाय ज्या प्रकारच्या भावनांची देशाच्या फाळणीच्या मागे धगधग होती नेमक्या त्याच प्रकारच्या भावना मुशर्रफ यांनी नवाझ शरीफ यांच्या विरुद्ध लष्करी कट केला तेव्हा अख्ख्या पाकिस्तानात धगधगत होत्या. ती पार्श्वभूमी होती कारगिल युद्धाची. त्या युद्धातल्या अपयशामुळे नवाझ शरिफ यांच्याबद्दल राग होता. एप्रिल १९९९ मध्ये जहांगीर करामातना बडतर्फ करुन शरीफनी मुशर्रफना लष्कराच्या 'जॉईण्ट चीफ ऑफ स्टाफ ' च्या कमिटीचं चेअरमन पद दिलं आणि ऑक्टोबर १९९९ मध्ये मुशर्रफ नवाझ शरीफ पदेशात गेल्याचं निमित्त साधून पाकिस्तानचे चीफ एक्झिक्यूटिव्ह बनले. म्हणजेच सर्वसत्ताधीश. परदेशात गेलेल्या पंतप्रधान नवाझ

शरिफांचा कोणताही हुकूम मानण्यास लष्कराने नकार दिला त्यांचं विमान पाकिस्तानात उतरलं ते दोन्ही अर्थाने ! त्यांचा खेळच खलास झाला. शरीफ आता परदेशात विजनवासात असतात आणि पुढे संधी साधून मशर्रफ जून २००१ मध्ये पाकस्तिानचे राष्ट्राध्यक्ष बनले. पाकिस्तानच्या इतिहासतल्या अत्यंत मोक्याच्या क्षणी अतिशय वाकबगार, धूर्त, अत्यंत चलाख आणि साहसी माणूस पाकिस्तनाचा राष्ट्राध्यक्ष होता हे पाकिस्तानचं सुदैवच. कारण अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर जेव्हा हल्ला झाला तेव्हा आशियाई उपखंडात अमेरिकेने युद्ध पेटवलं. अशावेळी अमेरिकेशी उपयुक्तवादी उदारमतवादाची भाषा बोलू शकणारा आणि त्याच वेळी देशातल्या बेलगाम जहालवाद्यांना ताब्यात ठेवू शकणारा  सुयोग्य माणूस मुशर्रफ यांच्याशिवाय दुसरा कोणी असूच शकला नव्हता.

खरं तर मुशर्रफ पाकिस्तानच्या अध्यक्षपदावर असणं हे हिंदुस्थानच्या दृष्टीने सर्वाधिक सोयींच आहे. आपण मुशर्रफ यांचा नेहमी हिंदुस्थानच्या दृष्टीकोनातून विचार करतो. ते अन्यायकारक आहे. कारण नियतीने त्यांच्यावर पाकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षपदाची जबाबदारी सोपवलेली आहे. अमेरिका आणि ब्रिटनला ते बोलणी करण्याएवढे आश्वासक वाटतात. कारण कोणत्याही परिस्थितीत आशियाई उपखंडात हिंदुस्थान-पाक युद्ध या दोन्हीही सत्तांना नको आहे आणि पाकिस्तानची युद्धाची खुमखुमी आवरेल असा मुशर्रफ यांच्या व्यतिरिक्त सुयोग्य मोहरा दुसरा कुणीही नाही.

आग्रा शिखर परिषदेनंतर दोन्हीही देशांच्या पुलाखालून बरचं पाणी वाहून गेलंय. आपल्याला नेहमीच मुशर्रफनी हिंदुस्थानच्या बाजूने बोलावं असं वाटतं. ‘ कश्मीर हिंदुस्थानचा अविभाज्य भाग आहे ’ असं वचन त्यांच्या तोंडी ऐकायला आपण आतुर असतो, पण ते नेमकं याच्या विपरीत बोलतात. त्यामुळे ते आपले खलनायक ठरतात, पण ते असं कसं बोलतील  त्यांना त्यांच्या देशाचा लगाम सांभाळायचाय.  त्यांच्या बोलण्यापेक्षा त्यांची कृती अधिक परिपक्क आहे. झिया किंवा बेनझीरच्या काळापेक्षा इस्लामी अतिरेक्यांचा लगाम त्यांनीच अधिक कसलाय. भले मग तो इंग्लंड-अमरिकेच्या इच्छेमुळे का असेना! त्यांच्या भूमिकेत एक सातत्य आहे. आधुनिक परराष्ट्रनीती आणि व्यापक व्यवहारवाद त्यांना उत्तम कळतो. इस्लामी अतिरेकी साहसवादाविरुद्ध ते स्वतः युद्ध पुकारु शकतच नाहीत. तसं त्यांनी केलं तर त्यांच्या देशातच ते अप्रिय ठरतील.

स्वतः परवेझ मुशर्रफांवर १४ डिसेंबर २००३ आणि लगेचच २५ डिसेंबर

२००३ ला अतिरेक्यांनी खूनी हल्ला चढवला होता. या दोन्हींतून ते आश्चर्यकारकरीत्या वाचले. अशा ज्वालामुखीच्या तोंडावर खदखदणाऱ्या देशाची धुरा सांभाळणं ते हिंदुस्थानचं पंचवार्षिक पंतप्रधानपद सांभाळण्यापेक्षा खरचं खूप कठीण असावं ! याचा अर्थ मुशर्रफ लबाड आणि खोटरडे नाहीत असा नाही, पण त्यांची लबाडी आणि खोटारडेपणा हा समस्त पुरुषवर्गाचा खोटरडेपणा आहे. पाकिस्तानतल्या बलात्कारांवर पाश्चात्य देशातल्या मानवी हक्क संघअनांनी ओरड केल्यावर मुशर्रफ म्हणाले की, “ बलात्कार जगात सर्वत्रच होत असतात, पण पाकिस्तानात हल्ली कॅनडा-अमेरिकेत आश्रय हवा असेल तर बाई बलात्काराचा ओरडा करते. ” यावर प्रचंड गदारोळ उठला तर मुशर्रफनी आपण असं बोललोच नव्हतो असा आव आणला, तर त्यावर मुशर्रफांनी ती ऑडियो कॅसेटच ‘ वॉशिंग्टन पोस्ट ’ ने आपल्या वेबसाईटवर आणलीय.

पण आपण मुशर्रफना खोटारडे आणि लबाड म्हणण म्हणजे आपण बाई असून आपल्यावर बलात्कार होतो आहे हे आपण मान्य करण्यासारखंच आहे ! नाही का ?

# जॉर्ज बुश (ज्युनिअर)

आहे. ज्या खुर्चीत बेंजामिन फ्रॅंकलिन आणि अब्राहम लिंकनसारखी मानवजातीला दीपस्तंभ ठरतील अशी माणसे बसली, तिथे हे ज्युनिअर बुश बसलेले पाहून जगात सध्या हुल्लडबाजांचे पर्व चाललेले आहे हे खरं वाटते.

हे बुश ज्युनिअर ६ जुलैचे. म्हणजे ६ जुलै १९४६ ला सिनिअर बुश यांच्या मुलाने या पृथ्वीवर जन्म घेतला. पुढे मध्यपुर्वेचा आणि एकंदरीतच जगाचा नरक करु पाहणाऱ्या ज्युनिअर बुश महाशयांचा जन्म ज्या ठिकाणी झाला, त्या ठिकाणचं नाव होत- न्यू हेवन ! ज्युनिअर बुश यांनी आयुष्यात अनेक विक्रम केलेले आहेत. पहिला म्हणजे येल विद्यापीठातून त्यांनी डिग्री घेतली. त्यांची भाषणं ऐकण्याइतपत ते शिकलेले असतील, असं वाटत नाही. दुसरा विक्रम म्हणजे आज जरी ते सायकल चालवताना दोनदा पडले असले तरी तरुणपणी ते टेक्सास एअर नॅशनल गार्डच्या इ-९०२ या फायटर विमानाचे पायलट होते. त्यांचा तिसरा विक्रम वाचून कुठल्याही मध्यमवर्गीय मराठी माणसाचा अमेरिकन शिक्षण पद्धतीवरचा विश्वासच उडेल. हे ज्युनिअर बुश महाशय हॉर्वर्ड बिझिनेस स्कुलचे १९७५ चे एम. बी. ए. आहेत. त्यांना चौथा विक्रम हा खरोखच अमेरिकन राजकीय इतिहासातला विक्रम आहे. ८ नोव्हेंबर १९९४ ला ज्युनिअर बुश हे ५३.५ टक्के मतं मिळवून पुन्हा टेक्सास गव्हर्नर म्हणून निवडुन आले. तेव्हा सलग चार वर्षे ( *चार वेळा*) राज्याच्या गव्हर्नरपदी निवडून येण्याचा ऐतिहासिक विक्रम त्यांच्या नावावर जमा झाला. अमेरिकन इतिहासातले तसे ते एकमेव. मुळात ‘ एनर्जी ’ व्यावसायात असल्याने बुश महाशयांना तेलाचं महत्व नीट ठाऊक आहे. शिवाय ते टेक्सासचे. त्यामुळे ते काऊबॉय असणं स्वाभाविकच ! या सगळयाच्याच परिणाम ज्युनिअर बुश यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत दिसून आला.

‘ **आ**पली बरीचशी आयात देशबाहेरुन येते ’, ‘ प्रदूषण हे वातावरण बिघडवत नसून हवा आणि पाण्यातली अशूद्ध तत्वे ते काम करीत आहेत ’ ही व अशांसारखी मुद्दलातच चुकीच्या आणि स्वतःमध्येच विनोद निर्माण करणाऱ्या असंख्य वाक्यांचे जनक आहेत अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश (*ज्युनिअर*)

अमेरिकन इतिहासात बिल क्लिंटन यांची अध्यक्षीय कारकीर्दीची आठ वर्षे ही सोनेरी वर्षे मानली जातात. या काळात शीतयुद्ध संपलेलं होतं येणारं सहस्त्रक अमेरिकन

असणार आहे, याबाबत कुणाच्याच मनात काही शंका नव्हती. अमेरिकेची प्रचंड आर्थिक भरभराट सुरु होती.

बिल क्लिंटन यांची आठ वर्षाची कारकीर्द संपली आणि अल् गोर यांचा पराभव करुन रिपब्लिकन पक्षाचे ज्युनिअर बुश निवडून आले. पुढचा ११ सप्टेंबरचा इतिहास आपणा सर्वांना माहित आहेच ; पण त्यापुढचा इतिहास आपल्यालाच

रचायचा आहे असा समज ज्युनिअर बुश महाशयांनी करुन घेतला.

आपणा हिंदुस्थानींना नेहमीची सवय असलेली चिल्लर, सवंग व एकापेक्षा एक चुकीची भाषणं अमेरिका रोजच्या रोज ज्युनिअर बुश यांच्या तोडून ऐकू लागली 'स्मोक देम आऊट काय किंवा क्रुसेडस् 'काय ! अमेरिकन राजतीनिज्ञांची बुश यांच्या विधानांवर सारवासारव करताना दमछाक होऊ लागली. १९९४ साली एकदा या बुश महाशयांनी मंगळ ग्रहाबद्दल एक भाषण केलं होतं. ते वाचलं तर आपल्याकडचा नववी-दहावीतला मुलगाही मूर्च्छा येऊन पडेल ! (*विस्तारभयास्तव ते मोह असूनही इथे देता येत नाही.* ) अशा चित्तथरारक बुश यांच्या मनाने, हे जग आपल्याला चालवायचे आहे व आपल्या बाबांचा म्हणजे सिनिअर बुश यांचा सद्दाम यांच्याकडून जो अपमान झाला त्याचा बदला घ्यायचा आहे, असे घेतले. ज्युनिअर बुश यांच्या अशा व्यक्तिमत्वामुळे अमेरिकेसारखे महान आणि उदारमतवादी राष्ट्र अचानक संकुचित आणि छोटे वाटू लागले. तसे पाहता अमेरिकेचा राजकिय व्यवहार हा दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळानंतर स्वार्थीपणाचा व आत्मकेंद्रीतपणाचाच होता पण गेल्या चार वर्षाएवढा (२०००-२००४) नागडा संकुचितपणा त्यात कधीच आला नव्हता. या चार वर्षात एक टोनी ब्लोअर सोडले, तर उर्वरित जग ज्युनिअर बुश यांनी मानसिकदृष्टया येनकेन प्रकाराने अमेरिकेचे शत्रू बनवून सोडले. ज्युनिअर बुश यांच्या या चार वर्षाच्या कारकीर्दीनंतर अमेरिकेने हे शतक ' अमेरिकन सेंचुरी ' बनविण्याची संधी कायमचीच गमावली आहे. आता खुद्द अमेरिकेला शत्रूपासून वाचवणे हेच एक मुख्य काम अमेरिकेच्या पुढच्या अध्यक्षांसाठी वाढून ठेवलेले आहे. हे कतृत्व खास ज्युनिअर बुश यांचेच.

हे काम करणारा अध्यक्ष आपणच असावे म्हणून बुश पुन्हा अध्यक्षपदाच्या लढाईत कंबर उतलेत. मध्यपूर्वेत जो सूड घ्यायला व एनर्जी व्यावसायिक म्हणून ज्या तेलसाठयांकरता ज्युनिअर बुशनी अमेरिकेला लढाईत गुंतवलं, त्याचा आता त्यांना जाब

द्यावा लागेल. त्यांच्याच एका चुकीच्या भाषणात  ते अमेरिका हा युरोपचा भाग आहे असं म्हणाले होते. जर ते निवडणुका हरले तर त्यांना युरोप सोडाच  पण अमेरिकेतही फार थेंडे खरे मित्र असतील. अमेरिकन जनतेला नेता देखणा आणि  ‘ माचोमॅन ’ लागतो. प्रतिस्पर्धी केरी यांच्या तुलनेत बुश (*ज्यु.)* यांचा तोच प्लस पॉइंट आहे. या एकाच पॉइंटच्या जोरावर जुळया मुली बर्बरा, जेना आणि पत्नी लारा वेल्थ बुश

यांना घेऊन बुश निवडणुकीत उतरलेत. यात त्यांचा लाडका कुत्रा बार्नीही कधी कधी त्यांच्या सोबत दिसतो. ज्युनिअर बुश यांच्या आयुष्यात हिंदुस्थानचं स्थान काय, असे कुणाला वाटतयं का ? तर बुश यांच्या मांजराचं नाव आहे इंडिया !

# लालकृष्ण आडवाणी

**ला**लकृष्ण आडवाणी भारतीय जनता पक्षाचे अखिल भारतीय अध्यक्ष झाल्यामुळे संपूर्ण भाजपात आनंदाचं वातावरण पसरलेलं आहे. लालकृष्ण आडवाणींच आयुष्य हेच मुळी खूप आशा आणि अपेक्षांनी भरलेलं आहे. शिवाय ते आज इथपर्यंत आले तेही योगायोगाच्या मालिकांमुळेच

लालकृष्ण आडवाणींचा जन्म मुळातला कराचीतला. म्हणजे पाकिस्तानातला. ८ नोव्हेंबर १९२९. कराचीत त्यांचं आयुष्य चांगलं चाललेलं होतं. कराचीतल्याच ‘ सेंट पॅट्रिक ’ स्कूल मध्ये ते शिकले. पुढे

मुंबई विद्यपीठातून कायद्याची पदवी घेतली. १९४७ साली जेव्हा हिंदुस्थान पाकिस्तान फाळणी झाली तेव्हा आडवाणी हे कराचीचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघटक होते परंतु फाळणीने सगळंच होत्याचं नव्हतं झालं. पुढे आडवाणींनी राजस्थानमध्ये रा. स्व. संघाच्या संघटकपदाची जबाबदारी घेतली. १९५१ साली श्यामप्रसाद मुखर्जींनी जनसंघाची स्थापना केली. १९५१ ते १९५७ पर्यंत आडवाणी पक्षाचे राजस्थान राज्य सचिव होते. १९५७ साली आडवाणी दिल्लीत आले. दिल्ली जनसंघाचे सचिव म्हणून जनसंघाच्या संसदीय बोर्डाचेही तेच सचिव होते.

लालकृष्ण आडवाणींचा हा दिल्लीतला प्रवास भाजप केंद्रात सत्तेवर येईपर्यंत प्रतिमा म्हणून अतिशय निर्वेधपणे चालू राहिला. राष्ट्रीय लोकशाही आघाडींच सरकार केंद्रांत सत्तेवर येताच त्या सत्तेच्या तत्वाचं मूळ असणारं हिंदुत्व मानणारे आडवाणी रथयात्रेचं नेतृत्व करणारे आडवाणी आणि गृहमंत्री नि नंतर उपपंतप्रधान झालेले आडवाणी या अक्षरशः दोन व्यक्ती वाटू लागल्या. १९८५ साली भंजपाला आख्ख्या देशात अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्वाखाली फक्त दोन जागा मिळालेल्या होत्या एकात्मिक मावतावादा पासून ते गांधीवादी समाजवादा पर्यंत अनेक फॉम्युले जनसंघाच्या स्थापनेपासून वापरुन झालेले होते. नवीन काहीच सापडत नव्हतं अशा निराशाजनक काळातच आडवाणी भाजपाच्य अध्यक्षपदावर बसले. या काळात त्यांनी भाजपच्या अक्षरशः कायापालट घउवून आणला. भाजप हा एक जहाल हिंदुत्ववादी पक्ष असल्याचं त्यांनी लोकांच्या मनावर ठसवलं त्या अगोदरचा अटलबिहारींच्या ठसाहीन अध्यक्षपदाची परंपरा पुरती कोडीत काढली. या जहालपणाचा उच्चांक गाठला तो अयोध्या रथयात्रेने. या रथयात्रेने आख्खा देश ढवळून निघाला. खरंतर ज्या जहालपणाची प्रतिष्ठापना आडवाणींनी केली ते स्वतः आडवाणी हे व्यक्तिगत आयुष्यात अत्यंत सौम्य प्रकृती गृहस्थ आहेत. ते माफक सौम्य आहार घेतात. ते मितभाषी आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्वात ॠजुजा आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सत्तेवर येण्याअगोदर आडवाणींवर डोळे झाकून विश्वासही ठेवता येत असे इतके ते पारदर्शक होते परंतु रथयात्रेने हिंदुस्थानाचं, आडवाणीचं, भारतीय जनता पक्षाचं आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचंच भवितव्य बदललं.

अयोध्येतील बाबरी मशीद पाडली गेली. त्या संध्याकाळनंतर भाजपचा देशभरातल्या निवडून येण्याच्या उमेदवारांचा दुष्काळ संपला. त्या संध्याकाळी

संघ स्वयंसेवकांनी अक्षरशः मिठाई वाटली. नागपूरच्या संघ कार्यालयात ती रात्र दिवाळीसारखी साजरी होत होती. ज्या कृती मूळे केवळ हिंदुस्थान नव्हे, तर आख्खा आशियाई उपखंड हललां होता. या सर्व उत्पाताचे नायक होते लालकृष आडवाणी त्या नंरतचा भारतीय जनता पक्षाच्या इतिहासातही सर्वश्रुत आहे. त्यानंतर भाजप देशातल्या सत्तासंघर्षातला महत्वाचा पक्ष ठरला गंमत म्हणजे, या नायकत्व बहाल करणाऱ्या घअनेने आडवाणी वेगळया बाजूने खलनायकही ठरले संपूर्ण रथयात्रेच्या राजकारणात स्वतः तटस्थ आणि स्वतंत्र राहण्याची अटलबिहारी वाजपेयी यांची खेळी ही धोरण म्हणून असेल वा प्रेरणा म्हणून असेल, त्या खेळीने वाजपेयींनी आपली लोकप्रियता आणि हिंदू जनतेच्या मनातलं आपलं स्थापन पणाला लावलं होतं. वाजपेयींचा तो जुगार कमालीचे दान घेऊन आला. जेव्हा सहमतींच राजकारण करण्याची वेळ आली तेव्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेते म्हणून अटलबिहारी वाजपेयी हेच सर्वसंमतीचे उमेदवार ठरले. लालकृष्ण आडवाणी नाही म्हणजे अंततः रथयात्रेख्स भाजपला फायदा झाला असला तरी त्याने लालकृष्ण आडवाणींची राजकीय कारकीर्द बहरण्याऐवजी वठलीय. उलट अटलबिहारी वाजपेयींच्या कारर्कीर्दीला नव्याने जीवदान मिळालं. आडवाणींच्या रथयात्रेच्या अंती बाबरी मशीद पाडली जाण्याचा अजून एक परिणाम असा झाला की, देशातल्या हिंदुत्वाच्या राजकारणाने उच्चांकबिंदू गाठला. त्या उच्चांकबिंदूनंतर हिंदुत्व हा निवडणुकीतला मुद्दाच संपला. म्हणजे त्या काळातल्या विजयातच भाजपच्या आताच्या रांगेतल्या पराभवाची बीजं रोवली गेली. या साऱ्या चक्रातून लालकृष्ण आडवाणी जातच होते त्यांनीही मग मनाशी खूणगाठ मारली. हिंदूहित नव्हे तर राष्ट्रहित असं ते लोकांना सांगू लागले या साऱ्यावर रायबरेली कोर्टाने त्यांना सत्तेवर असताना (*उपपंतप्रधान व गृहमंत्री* ) १९ सप्टेंबर २००३ रोजी अयोध्या-बाबरी केसमधून अशोक सिंघल, विष्णू हरी डालमिया, गिरीराज किशोर, विनय कटियार, मुरली मनोहर जोशी, ऋतंबरा, उमा भारतींहून वेगळे मानून निर्दोष सोडले. तेव्हा आडवाणी मी त्या गावातच नव्हतो. मी कारसेवकांना बाबरी पाडू नका सांगायला तिथे गेलो होतो, असं सांगत फिरु लागले. आयोगापुढे त्यांनी अशाच साक्षी दिल्या. हे जुने, बेडर आडवाणी नव्हते. नव्याने सत्तावत्वाचा स्पर्श झाल्याने कारसेवकांच्या

कृतीपासून स्वतःला सोयिस्करपणे वेगळे करणारे हे  नवे  आडवाणी होते.

आणि आज परत एकदा ते जुनं  हिंदुत्व  ती जुनी जादू आणण्याकरीता लालकृष्ण आडवाणींना वाजतगात भाजपचं अध्यक्षपद देण्यात आलयं. इथे एक झेन म्हण आठवते तुम्ही त्याच नदीत पुन्हा पाऊल नाही टाकू शकत.  याचा अर्थ नदी प्रवाही असते. तुम्ही अगोदर पाऊल टाकलेलं पाणी प्रवाहात वाहून गेलयं. आता पाणी नवीन आहे, नदी नवीन आहे आणि तुम्हीही नवीन आहात. आडवाणींना हा अर्थ आज किती तंतोतंत लागू पडतो नाही

# प्रमोद महाजन

**आ**ज भारतीय जनता पक्षाचा जो काही गोंधळ झालेला आहे त्यातून पक्षाला सावरणं अजिबात सोपं नाहीए. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातल्या अतिवृद्ध्यांच्या किंवा काल्पनिक शुचितावाद्यांच्या मार्गाने जर पक्ष गेला तर भारतीय जनता पक्षाच्या चिरफाळया उडाल्याशिवाय राहणार नाहीत. सोव्हिएत युनियनमध्यल्या कम्युनिस्ट पक्षाची जशी जहालवादी आणि सुधारणावाद्यांमध्ये चिमटून इतिश्री झाली होती तशाच स्थितीच्या उंबरठयावर संपूर्ण भारतीय जनता पक्ष

आज उभा आहे. या साऱ्या वैचारिक आणि व्यवहारीक गोंधाळातून भारतीय जनता पक्षाला कोण बाहेर काढू शकेल, हा प्रश्न पक्षाच्या सगळया गोटात भयकारी पद्धतीने फणा काढून उभा आहे. भारतीय जनता पक्षाकडे जे काही मानवी संसाधन आहे त्यामधून प्रमोद महाजन हा एकच माणूस असा आहे की त्याने ठरवलं आणि नियतीने त्याला साथ दिली तर भारतीय जनता पक्षाला या भयानक परिस्थितीत तो पैलतीराला लावू शकतो.

प्रमोद महाजनांच नुसतं नाव घेतलं तर संघपरिवारातल्या आणि परिवाराबाहेरच्याही बऱ्याचजणांच पित्त खवळेल अशी स्थिती आहे पण कोणत्याही माणसाचं ऐतिहासिक मूल्यमापन हे नैतिकतावाद्यांच्या कसोटीवर केलं जाऊ शकत नाही. आपल्याकडे एक जबर चुकीचा समज असा आहे की जो तात्विकदृष्या नैतिकतावादी असतो, तो वैज्ञानिकदृष्या अचूक असतो आणि व्यवहारिकदृष्याही बरोबर असतो. त्यामुळे जो समाजाचे आणि आपल्या संघअनेचे भले करु शकतो. हे गृहितक भयंकर चुकीचे आहे. व्यवहारिक भान आणि व्यवहारिक क्षमता ज्याच्यामध्ये सर्वाधिक तोच खरे तर संघअनेचे आणि समाजाचे काही भले करु शकतो. प्रमोद महाजनांमध्ये ही क्षमता सर्वाधिक आहे. संपूर्ण संघअनेचे गाडे व्यवहारिकदृष्टया कायम रुळावर ठेवण्याचे काम नेहमीच प्रमोद महाजनांकडे आलेले आहे आणि इतर कुणीही पेक्षा वकुबाने त्यांनी पार पाडलेले आहे. साधे रामजन्मभुमी आंदोलनाचे व्यवस्थापन असो किंवा महराष्ट्राच्या राजकाणातल्या भाजपाची भुमिका असो, महाजनांनी राजकीयदृष्या अचूक जे जे काही आहे ते ते नेहमीच केलेले आहे. त्यासाठी संघात कर्मठवाद्यांच्या रोषाला ते नेहमीच बळी पडलेले आहेत. या कर्मठवाद्यांची गंमत अशी की आलेल्या सत्तेची फळं तर त्यांना खायला हवी होती पण त्यासाठी ज्या व्यवहारिक तडजोडी कराव्या लागतात त्याच्याशी आपला काहीही संबंध नसल्याचे भासवून ज्यांच्या त्या तडजोडींशी संबंध आहे. त्यांचे प्रताडन करण्याचा नैतिक आनंदही त्यांना घ्यायचा होता. संघपरिवारातल्या आणि संघातल्या अशा बऱ्याचजणांचे प्रमोद महाजन हे नेहमीच पंचिंग बॅग होऊन राहिलेले आहे.

एकदा बाळ आपटेंनी ( *उपाध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते भाजप*) प्रमोद महाजनांना म्हणे थेटच विचारलं होतं की, प्रमोद, तू उद्धट आहे आणि भोगी आहेस असं बऱ्याचजणांना वाटतं. तुला यावर काय वाटतं महाजनांनी यावर काय उत्तर दिलं तो या लेखाचा विषय नाही परंतु महाजन ज्यांना काचतात त्यांना

नेमके कुठे काचतात ते या प्रश्नात पुरेसे आलेले आहे. वास्तविक भोगी असणे आणि ते स्वच्छंदपणे लोकांसमोर असण्यात गैर काय आहे पण समाजवाद्यांप्रमाणेच संघपरिवारातही दुटप्पी नैतिकवाद्यांचा सुळसुळाट आहे. भोगी असा पण लपवून असा, तुमचे शोरुम योगी असू देत, गोडाऊन भोगी असले तर चालेल, हा त्यांचा संदेश असतो. प्रमोद महाजनांसारखी माणसं अशांची प्रकट शत्रु असतात. महाजनांना बदनाम करण्यात या लोकांचा मोठा वाटा आहे पण उद्धपणाचं वेगळं आहे. एकेकाळी प्रमोद महाजन हे लोकनेते म्हणून ओळखले जात. इलस्ट्रेटेड विकली ने देशातल्या पंतप्रधान होऊ शकणाऱ्या दहा नेत्यांत एकेकाळी प्रमोद महाजनांची गणना केली होती. त्या काळी जनतेला महाजनांनी स्वप्ने विकली होती पण महाजन जसजसे सत्तेचा सोपान चढत गेले तसतसे लोकांपासून तुटत गेले. उद्धटपणाला वाटल्यास दुसरा काही शब्द वापरा पण सत्तेने प्रमोद महाजनांना माणसं जोडता काही आली नाहीत. उलट त्यांच्याकडून माणसं तुटतच गेली सत्तेच्या काळात. लोकांना महाजनांमध्ये स्वप्न दिसणं बंद झालं. कुठच्याही राजकीय नेत्यामध्ये लोकांना स्वप्न दिसणं बंद होणं ही त्याच्यासाठी प्रचंड अशूभसूचक घंटा असते.

प्रमोद महाजनांची उद्योपतींशी असलेली मैत्री वारंवार चर्चेत आणण्यात त्यांचे नैतिकवादी टीकाकार यशसवी झाले. वास्तविक कोणत्या राजकीय नेत्याला उद्योगपतींशी मैत्री केल्याविना मोठया मसलती करण शक्य झालयं पण प्रमोद महाजनांचंच नाव याबाबत चर्चेत आलं कारण त्यांनी सत्तेच्या सर्वोच्य सोपानावर असताना आपला दुसरा मोकळा हात छोटया-फाटक्या कार्यकर्त्यांच्या खांद्यावर ( *न कंटाळता)* ठेवायला हवा होता. सत्ता काय येते आणि जाते. शाश्वत मानवी मूल्यं आणि छोटया माणसाची स्वप्नं तेवत ठेवण्याची आपली जबाबदारी कायमच असते. याची धग मनात कायम ठेवायला हवी होती. ते तसं झालं नाही. जननेता हा व्यवहारवादी असावा लागतो पण तो कर्कश व्यवहारवादी होऊनही चालत नाही. तसं झालं तर जनताच त्याच्यावर करकरायला लागते.

पण या साऱ्यामुळे प्रमोद महाजनांची क्षमता अजिबात कमी होत नाही. चीनच्या इतिहासात चीनची जी अभूतपुर्व प्रगती होत असलेली आपण पाहतोय ती प्रगती डेंग मुळे झालेली आहे. डेंग ने एकदा उद्‌गार काढले होते की, जो उंदीर पकडतंय् तोपर्यंत मांजर काळं की पांढरं आहे याच्याशी मला काही देणंघेणं नाही या उद्‌गारांसाठी पुढे डेंग ला माओच्या काळात

अनेकदा विजनवासात जावं लागलं. कारण हे उद्गार तत्वनिष्ठ कम्युस्टिास तत्वच्युत होते पण डेंग त्या साऱ्या विजनवासांना पुरुन उरला आणि शेवटी त्याने कम्युनिस्ट पार्टीलाच भांडवलशाहीच्या नव्या रस्त्यावर नेऊन सोडले. महाजन म्हणजे डेंग नव्हे. भाजप म्हणजे चीनच्या कम्युनिस्ट पक्ष नव्हे आणि हिंदुस्थान म्हणजे चीन नव्हे पण तरीही हे उदाहरण इथे मी देतोय, याच कारण कोणत्याही व्यवहारवादी नेत्याचा विजनवास हा त्याचा पराभव समजू नये.

प्रमोद महाजन पक्षात आज थैंडेसे बाजुला पडलेत. त्यांचा पक्ष तर राष्ट्रीय आकांक्षा समजून घेण्याबाबत जवळजवळ विकलांगच झालेला आहे. भोवतालचं बदलतं जग, येणाऱ्या तरुण पिढयांची आकांक्षा याबाबत संघपरिवार आणि भारतीय जनता पक्ष यांना कधीच शास्त्रशुद्ध आकलन करता आलं नाही. त्यांचं आकलन आणि त्यावरचे उपाय नेहमीच वरवरचे राहिलेत. त्यामुळेच त्यांना स्मृती इराणी, हेमामालिनी, धर्मेंद्र असे कुणीही कधीही चालले. आज एक मोठ. मूलभूत वादळ पक्षावर घोंघवतय्. अपयशाच्या गर्तेत पक्ष, खोल/ अधिक खोल चाललेला आहे. असं म्हणतात की अपयश खूप शिकवतं. समज व्यापक करायला तर अपयशासारखा मित्र नाही आणि अशा अपयशात स्वतःच्या कतृत्वाने दिल्लीत पोचलेला प्रमोद महाजनांसारखा नेता स्वार होण्यासाठी अपयशाएवढी चांगली संधी नसते हे समजू शकणार नाही, हे शक्य नाही.

पक्षाचं आणि स्वतःच शुभंकर किंवा भयंकर करण्याची सर्वात अधिक शकती या एका माणसात आहे. प्रश्न फक्त हे त्याला स्वतःला तरी माहित आहे का, याचा आहे. माझं हे प्रतिपादन ज्यांना पटणार नाही त्यांना माझं एवढंच म्हणण आहे, थोडं थांबा आणि पहा. उगाच वाद घालू नका.

आता कळलं, बाळ आपटेंच्या प्रश्नाचं महाजनांनी जे उत्तर दिलं ते माहित असूनही मी का लिहिलं नाही ते ?

# लालूप्रसाद यादव

एकीकडे त्यांच्या आवडीचा पदार्थ बनवत फोनवर ते बोलतात.

आतापर्यंत आपण बिहारबद्दल जे काही ऐकलं वाचल असेल ते अत्यंत तोकडं आहे, पाटणासारख्या शहरात राष्ट्रीयीकृत बॅंकेत बुधवारी ड्राफ्ट काढायला गेल्यास आप कल नही आ सकते आज स्टाफ नही है असं स्वतः बॅंक मॅनेजर सांगू शकतो किंवा बिहारच्या या राजधानीत पंचतारांकित हॉटेलचा मॅनेजर सूर्यास्तानंतर बाहेर रस्त्यावर फिरु नका, अशी सूचना हळूच देतो. बिहारमध्ये जसं आत आत जात जावं, तशी गरिबी आणि जातीव्यवस्था अंगावर येतात. यादव, ठाकूर, ब्राम्हण, कूर्मी, मुसलमान सर्वचजण जाती आणि धर्मपरंपरेतले घट्ट कडवे आहेत. सर्व प्रश्न गावठी कट्टा आणि बंदुकांच्या जोरावरच सुटतात, यावर सर्वांचा विश्वास आहे. गरिबी तर इतकी भीषण आहे की, त्यावर सर्वांचा विश्वास आहे. गरिबी तर इतकी भीषण आहे की, त्यावर आख्खं पान लेख लिहून वर एक पुस्तक लिहावं लागेल आणि या साऱ्यांचे नायक आणि केंद्रबिंदू आहेत. श्री. लालूप्रसाद यादव ज्यांचे तेवीस खासदार या लोकसभेत निवडून आलेत (*ज्यातल्या नुकत्याच निवडून आलेल सिवानच्या शहाबुद्दीन या खासदारांवरही एक पुस्तक लिहिता येईल* ) आणि एक दिन में जरुर प्रधानमंत्री बनूंगा असं म्हणत लालूप्रसाद रेल्वेमंत्री बनलेत.

हेच लालूप्रसाद जर अर्थमंत्री बनले असते तर सेंन्सेक्स ०.०० या निर्देशांकावर स्थिरावला असता. एकदा आणि कायमचाच. स्वतःला शहाण्या समजणाऱ्या, शिकल्या-सवरल्या माणसांत लालूप्रसादांचं रेप्युटेशनच तसं आहे.

**ला**लूप्रसाद यादव यांचे गाल अगदी लहान मुलांसारखे मुलायम आहेत, असं त्यांना मेकअप करणाऱ्या पंढरीदादा जुकरनी दिल्लीच्या ईगल स्टुडिओत मला सांगितलं होतं. त्याअगोदर लालूप्रसादांनी पूर्वी कधीही न भेटलेल्या पंढरीदादांना ‘ आप तो फिल्मइंडस्ट्री के पिलर हो ’ असं म्हणून पार विरघळून टाकलं होतं.

जयप्रकाश नारायण यांचं संपुर्ण क्रांती नावाचं कसलीच सुस्पष्टता नसलेलं आंदोलन चालू होतं. तेव्हा स्अेजवर कोपऱ्यात बसलेला गोल चेहऱ्याचा एक तरुण दिसत असे. ते हेच लालूप्रसाद यादव. संपूर्ण क्रांती च्या तेव्हाच्या तरुणांना सरळ मिसाखाली आत टाकले गेले. लालूसुद्धा आणीबाणीत मिसाखाली तुरुंगात गेले. आपण काहीतरी स्वातंत्र्या युद्ध केलेले आहे असा आणीबाणीत तुरुंगात गेलेल्या समाजवादी आणि संघाच्या तेव्हाच्या तरुणांचा आव असतो. लालूप्रसाद, मुलायमसिंग हे त्या समाजवादी चळवळीचे

तरुण नेते होत लालूप्रसादांनी या घटनेची आठवण म्हणून आपल्या मुलीचे नावच मिसादेवी ठेवले. पुढे या समाजवादी तरुणांनी देशाचे किती भले केले ते दिसतेच आहे

लालूप्रसादांबद्दल स्वतःला शहाण्या समजणाऱ्या शिकल्या-सवरल्या माणसांचे मत असते ते वस्तुस्थितीचे सोपेकरण असते. लालूप्रसाद हे आजच्या भारतीय समाजाच्या कमालीच्या ढोंगीपणाचे व कोत्या स्वार्थमय वृत्तीचे ( आदर्श) प्रतिनिधी नेते आहेत. ते सतत कायदा-सुव्यवस्थेवर बोलतात, रेल्वेतील माफिया-राज नष्ट करण्याबद्दल बोलतात. जाती-धर्मविरोधी सेक्युलॅरिझमचे तर ते

(*तोंडाने*) खंदे पुरस्कर्ते आहेत. भ्रष्टाचारविरोधी त्यांचे स्टेटमेंट आपल्या कुणाही नेत्याच्या अगोदर येते. हे पाहताना आपण अचंबित होतो. आपल्याला वाटते दशकाहून जास्त काळ बिहारसारखे नैसर्गिक साधनसंपत्तीनेयुक्त असे राज्य यांच्या ताब्यात असताना तिथे फक्त उफाळून येत राहिलंय. साधू यादव हे लालूप्रसादांचे मेहूणे आणि राबडीदेवींचे बंधू. त्यांच्या नुसत्या नावाचीसुद्धा एवढी दहशत आहे की, त्याबद्दल पाटण्यात जाऊनच पाहयलं पाहिजे. या साधू ची गॉगल लावलेली नुसती छबी पाहयली की, बिहारी सामान्य माणूस जे समजायचं ते समजतो. हे असं असताना लालूप्रसाद एवढं आदर्शवादी कसं बोलू शकतात खरं तर आपल्या छोटया छोटया आयुष्यात आपण हेच तर करत नसतो का भ्रष्टाचार, हिंसा, जात वगैरे आपल्या सोयीची असेल तेव्हा आपण चटकन तिचा फायदा घेतो आणि मग कुठल्यातरी बुवाच्या आर्शीवादाने आपण महान तत्व आणि पोटतिडिकीने भ्रष्टाचारविरोध, अहिंसा आणि जातविरोध बोलायला मोकळे होतो. लालूप्रसाद यादव हे आपणा सर्वांचा लघूत्तम साधारण विभाजक आहेत. त्यांच्या सातत्यपूर्ण आर्श्चयकारक यशाचं रहस्य मुळात हेच आहे. वास्तवात आपण सारेच भारतीय कमी-जास्त प्रमाणात लालूप्रसाद यादव आहोत. आपण आपल्या पापांची सफाई कशी हूशारीने देतो ते आठवा

लालूप्रसादांना रेल्वे खातं मिळालयं. त्यामुळे त्यांची कंदिल ही निशाणी सार्थ झालीय राबडीदेवी या त्यांच्या पत्नी बिहारच्या मुख्यमंत्री आहेत. पॉलिटिक्समध्ये एम. ए. झालेल्या लालूप्रसादांची नजर आता पंतप्रधानपदावर आहे. ते त्यांनी लपवलेलंही नाहीच. बिहारी माणूस ( *अफवाद वगळता*) तासनतास परस्परविरोधी ( *आणि राजकारणावर)* बटबटीत बोलण्यात पटाईत असतो. मिथिलेची नसलेली माणसं, मिथिलेच्या माणसांचं मिठाईदार बोलून संधी मिळताच कोथळा काढणारी माणसं असं वर्णन करतात. तूर्तास मनमोहन सिंग पंतप्रधान आहेत. लालूंची रेल्वे त्यांच्या अंगावरुन पुढे जाणार नाही याची काळजी त्यांनाच घ्यायची आहे.

आपण नेहमीप्रमाणे, लालूंची रेल्वे आहे त्यामुळे ती रुळांवरुन घसरणार नाही या सुखसवप्नात दंग राहू या !

## डॉ. मनमोहन सिंग

**डॉ**. मनमोहन सिंग, हे जेव्हा हिंदुस्थानचे चौदावे पंतप्रधान झाले तेव्हा त्यांचे केंब्रिजमधल्या कॉलेजमधले सुपरवायझर असलेले इयान लिटील म्हणाले की "डॉ. मनमोहन सिंग हे पुन्हा हिंदुस्थानचे अर्थमंत्री होतील असं मला वाटलं होतं; पण पंतप्रधान होतील असं कधीच वाटलं नव्हतं. पंतप्रधान ? छे !" अशी त्यांची प्रतिक्रिया होती. त्याला कारणही तसं खूप बळकट होतं. कारण कॉलेजजीवनात डॉ. मनमोहन सिंग हे खुपच अबोल आणि अंतर्मुख होते. कॉलेजमधल्या पार्ट्यांनाही

नसत ते फक्त ‘ आपल काम बरं की आपण बर ’ या वृत्तीने जगत असतं. डॉ. मनमोहन सिंगचा हा स्वभाव पुढेही कायम राहिला. त्यामुळेच पुढे रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाचे गव्हर्नर म्हणून मुंबईत कारमायकेल रोडवर राहत असतानाही ते मुंबईच्या सोशलसाईटस्‌मध्ये कधीच मिसळले नाहीत. त्यांच्या शेजाऱ्यांनाही त्यांच्या बद्‌दल फार कमी माहिती असायची.

अशा डॉ. मनमोहन सिंगांचं पंतप्रधान होणं ही गोष्ट स्वतंत्र हिंदुस्थानाच्या दृष्टीने ऐतिहसिकच होती. डॉ. मनमोहन सिंगांचा जन्म हा गाह या गावचा पश्चिम पंजाबमध्ये येणारे गाव आता पाकिस्तानात आहे. त्या अर्थाने हिंदुस्थानच्या चौदाव्या पंतप्रधानांचा जन्म पाकिस्तानमध्ये झालाय. सरदार गुरुमुख सिंग आणि सरदारणी अमृत कौर यांचा हा मुलगा जेव्हा तेरा वर्षाचा होता, तेव्हा हिंदुस्थानची फाळणी झाली. डॉ. मनमोहन सिंगांचे कुटुंबीय हिंदुस्थानात परत आले आणि अमृतसरमध्ये स्थायिक झाले पुढे केंब्रिजमध्ये १९५७ साली रेनबरी स्कॉलर (*Wrenbury Scholar*) बनलेल्या डॉ. मनमोहन सिंगांच इकॉनॅमिक्सचं सुरुवातीचं शिक्षण पंजाब युनिव्हतर्सिटीमध्ये झालं. चंदिगडमध्ये शिकलेल्या या अंर्तमुख, अबोल आणि कष्टाळू मुलाने पुढे केंब्रिज आणि ऑक्सफर्ड या दोन्हीही युनिव्हर्सिटीजमध्ये आपल्या बुद्‌धिमत्तेची चुणूक दाखवली.

गंमत म्हणजे सुरुवातीचं अर्थशास्त्रमधलं शिक्षण जिथे घेतलं, त्या पंजाब युनिव्हर्सिटीतच १९५७ ते १९६५ मध्ये डॉ. मनमोहन सिंगांनी शिकवलेलं आहे. ५७ ते ५९ या काळात ते अर्थशास्त्राचे सीनियर लेक्चरर होते. याच काळात त्यांचा गुरुशरण कौर यांच्याशी विवाह झाला (*नेमकं सांगायचं तर २४ सप्टेंबर १९५८*) ५९ ते ६३ या काळात डॉ. मनमोहन सिंग याच युनिव्हसिटीत इकॉनॉमिक्सचे रीडर होते आणि ६३ ते ६५ या काळात ते युनिव्हर्सिटीत इकॉनॉमिक्सचे प्रोफेसर झाले. शिकवण्याचा व्यवसाय आणि तोही हिंदुस्थानात असं म्हणून नाकं मुरडणाऱ्यांना डॉ. मनमोहन सिंगांचा आदर्श ठेवायला हरकत नसावी.

डॉ. मनमोहन सिंगांची सगळी वैचारिक जडणघडण नेहरुयुगाचा प्रभाव असल्याच्या काळात झालीय. त्यामुळे त्यातला जो स्वप्नाळूपणा आणि स्वातंत्र्यप्रियता आहे, ती डॉ. मनमोहन सिंगांमध्ये तशीच्या तशी उतरलीय. शिक्षक, अर्थशस्त्रज्ञ आणि उच्च सरकारी अधिकारी म्हणून डॉ. मनमोहन सिंगांनी नेहमीच मुक्ततेचा पुरस्कार केला आणि आत स्वप्नाळू वाटवा असा प्रामाणिकपणा दाखवला, त्यामागे त्यांची ही जडणघडण बऱ्याच अंशी

कारणीभूत आहे. असंख्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सर्वोच्च पदांवर पोहोचल्यावर आणि अनेक आंतरराष्ट्रीय सर्वोच्च सन्मान मिळवल्यावर एका ऐतिहासिक क्षणी तत्कालीन पंतप्रधान नरसिंह रावांचा डॉ. मनमोहन सिंगांना फोन आला. अर्थात् रावांचा पहिला फोन डॉ. मनमोहन सिंगांना गेलेला नव्हता. आय. जी. पटेलांना तो फोन गेलेला होता. त्यांनी राजकारणात काहीच रस नसल्याचं स्पष्ट केलं, तेव्हा डॉ. मनमोहन सिंगांना रावांनी फोन केला. सुरुवातीला डॉ. मनमोहन सिंगसुद्धा खूपच डावाडौल होते. त्यांना हिंदुस्थानच्या अथमंत्रीपदाची जबाबदारी त्यातल्या राजकारणाच्या भागामुळे सुखावह वाटत नव्हती परंतु अखेर त्यांनी आव्हान स्वीकारलं !

डॉ. मनमोहन सिंगांनी स्वीकारलेलं आव्हान हे स्वतंत्र हिंदुस्थानचा स्वभाव आणि पाया मुळातून बदलून टाकणारे होते. मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार करणं आणि त्यासाठी हिंदुस्थानी समाजाला तयार करणं, हे काम भयंकर कठीण होतं परंतु हिंदुस्थानचा सोव्हिएत रशिया होऊ न देता हे करण्याचं आव्हान डॉ. मनमोहन सिंगांनी स्वीकारलं.

नरसिंह राव हे त्यांच्यामागे ठामपणे उभे राहिले. नरसिंह रावांचं आत्ताच हे जग सोडुन जाणं हेही फार काव्यात्म आहे. जणू हिंदुस्थानची अर्थव्यवस्था त्यांच्यामागे अतिशय योग्य, प्रामाणिक आणि प्रज्ञावान माणसाच्या हातात सुरक्षित असलेली पाहूनच त्यांनी डोळे मिटले आणि तो माणूसही नरसिंह रावांनी निवडलेला होता.

सुरुवातीच्या काळात हिंदुस्थानात फार थोडया नेत्यांना मुक्त अर्थव्यवस्थेची अपरिहार्यता आणि औद्योगिक क्षेत्रावर त्याचे होणारे दूरगामी परिणाम माहीत होते. गोष्ट समजून न घेताच त्यांच भांडवल आणि राजकारण करण्यात जॉर्ज फर्नांडिससारखी मंडळी आघाडीवर होती. मुक्त अर्थव्यवस्थेचे नंतर ज्यांनी भरपूर फायदे उपटले त्या सर्व जुनाट नेत्यांनी त्या काळात डॉ. मनमोहन सिंग हे जणू काही ‘ नोकरशहा व्हिलन ’ आहेत, असे समजून मोहिम चालवली.

पण डॉ. मनमोहन सिंग अबोल, अंतर्मुख होऊन काम करत राहिले. जसं त्यांनी पुढे कॉंग्रसची सत्ता गेल्यावर विरोधी पक्षात राहून केलं, फार थोडया माणसांना हे माहीत आहे की, दिल्लीतल्या १९८४ च्या शीखविरोधी दंगलीनंतर (*इंदिराहत्येमुळे*) डॉ.मनमोहन सिंगांनी दिल्लीतलं आपलं घर विकून टाकलं आणि चंदिगडला घर घेतलं होतं.

डॉ.मनमोहन सिंग हे काही लोकनेते नाहीत  पण त्यामुळेच सोनिया गांधीचा स्वाभाविक चॉइस ते होते. हाऊसमध्ये विरोधी पक्षाचे नेतं म्हणून बोलताना डॉ. मनमोहन सिंग एकदा म्हणाले होते की, ‘ हा देश युद्ध, गरजा, पिळवणूक यांच्यापासून मुक्त व्हायला हवा. गरिबी, अज्ञान आणि रोगराई यांच्यापासून मुक्त व्हायला हवा ’  मुक्त अर्थव्यवस्थेचा मानवीय चेहरा म्हणजे नेमकं काय हे या दोन ओळीतच डॉ. मनमोहन सिंगांनी सांगितलंय. नियतीने सुदैवाने त्यांना ते अमलात आणण्याची संधी दिली. असं क्वचित होतं.

नियतीने डॉ.मनमोहन सिंग या मध्यमवर्गीय स्कॉलरला पंतप्रधान बनण्याची संधी देऊन अजून एक करामत केलीय. या देशाचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग हे ऑक्सफर्डचे एम. ए., डी. फिल आहेत.  अर्थशास्त्रज्ञ आहेत आणि राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम हे शास्त्रज्ञ आहेत. दोघेही साध्या मध्यमवर्गीय कुटुंबातून शिकूनसवरुन आज देशाच्या सर्वोच्च स्थानावर गेलेत. कोणताही भ्रष्टाचार, खूनबाजी त्यांना करावी लागलेली नाही. या देशात राजकारणात सर्वोच्च स्थानावर जाण्याकरीता लालू, मुलायम, पप्पू यादवांसारखचं वागायला लागतं, असं म्हणून आपल्या भ्रष्ट कोशात जगणाऱ्या हिंदुस्थानी मध्यमवर्गाला नियतीची ही जबर चपराक आहे.

डॉ.मनमोहन सिंगांनी कहाणी सांगते हे की, हिंदुस्थान हा गुंतागुंतीच्या कोडयांनी भरलेला देश आहे आणि तुम्ही प्रमाणिक असलात की बाजूला पडता, हे साफ खोटं आहे. खरा प्रश्न नेहमीच वकुबचा असतो  हो की नाही ?

नरसिंह राव

**प**ामुलापर्ती वेंकट नरसिंह राव या नावाचा २८ जून १९२१ रोजी करीमनगर, हैद्राबाद, आंध्र प्रदेशामध्ये जन्माला आलेला मुलगा मुढे जाऊन स्वतंत्र हिंदुस्थानचा पंतप्रधान होईल. केवळ एवढंच नव्हे तर तो दक्षिण हिंदुस्थानातील पहिलाच पंतप्रधान होईल. केवळ ऐवढचं नव्हे तर तो दक्षिण हिंदुस्थानातील पहिलाच पंतप्रधान असेल. ते सुद्धा गांधी-नेहरु कुटुंबाव्यतिरीक्त पहिलाच पंतप्रधान असेल जो पाच वर्षे सलगपणे देशावर राज्य करेल असं भविष्य तर पी. व्ही. नरसिंह रावांच्या जन्मवेळी कुणी सांगितले असते, तर तेव्हा त्याला वेडयातच काढण्यात आले असते आणि त्यानंतर बरोबर सत्तर वर्षांनी त्या

ज्योतिषाला लोक डोक्यावर घेऊन नाचले असते.

पी.व्ही. नरसिंहरावांचे संपूर्ण आयुष्य हे नियतीने नियंत्रित केलेले होते. जेव्हा ते आपली पुस्तके आणि इतर सामान आवरुन परत हैद्राबादला निवृत्त जीवन जगायला निघाले तेव्हा नियतीने त्यांच्यावर पंतप्रधानपदाची जबाबदारी टाकली. ती जबाबदारी पूर्ण करुन दूरगामी योजना बनवण्याची महत्वकांक्षा जेव्हा त्यांनी दाखवली, तेव्हा त्यांना सर्व पदांवरुन पायउतार होऊन फक्त कोर्टकचेऱ्या करण्यात आयुष्य व्यतीत करावे लागेल.

नरसिंह रावांचे आयुष्य अतिशय नाटयपुर्ण होते. पण ते घडविण्यासाठी त्यांनी अपरिमित कष्ट घेतले होते. उस्मानिया, हैद्राबाद, मुंबई विद्यापीठातून त्यांनी विज्ञानातली आणि कायद्यातील पदवी मिळवलेली होती. अनेक भाषा त्यांना ज्ञात होत्या. शिवाय राजकारणातील प्रश्न भिजत टाकून सोडवण्याची कला त्यांना उत्तम प्रकारे ज्ञात होती. ती कला आत्मसात करण्यासाठी किती कडवट विषारी डोस पचवावे लागले होते, याची जाणीव स्वतः नरसिंह रावांनी कादंबरीरुपात लिहिलेल्या स्वतःच्या आत्मचरित्रात दिसून येते. ‘ द इनसायडर ’ ही त्यांची सातशे पानांची कादंबरी त्यांचे स्वतःचे आत्मचरित्र आहे. पंतप्रधानपदावरुन पायउतार झाल्यावरच्या धकाधकीच्या काळात त्यांनी ती कादंबरी लिहिलेली आहे. ती कादंबरी वाचताना नरसिंह रावांना ‘ चाणक्य ’ असे संबोधन काही शहाण्या माणसांनी का दिले होते ते लक्षात येते.

हे एवढे सारे असूनही आपण नरसिंह रावांवर घोर अन्याय केला असे म्हणावेच लागेल. आधूनिक हिंदूस्थानातले त्यांचे योग्य ते स्थान आपण त्यांना दिले नाही. नरसिंह रावांचे या देशावर अपरिमित उपकार आहेत पण ते कळण्यासाठी अर्थशास्त्राचे थोडेसे खोल ज्ञान असणे आवश्यक आहे. ते ज्ञान जर आपल्याला असेल तर आपल्या लक्षात हे येते की, नरसिंह रावांनी हा देश ज्या खाईतून बाहेर काढला तो पराक्रम हा बांगला देश युद्ध जिंकण्याच्या पराक्रमापेक्षा लाखपट मोलाचा आणि कठीण होता; परतु दुर्दैवाने नरसिंह रावांच्या या पराक्रमाला युद्ध जिंकण्याचा करिष्मा नव्हता. ज्यामुळे समज असलेल्या बुद्धिमंताच्या पलीकडे नरसिंह रावांचा हा पराक्रम unsung आणि unhonored राहिला. एवढेच नव्हे तर आयुष्याच्या शेवटच्या आठ वर्षात दिल्लीतल्या उत्तरेकडच्या चमचेगिरीच्या आणि हुजरेगिरीच्या राजकारणात मुरलेल्यांनी दक्षिणेकडच्या या चाणक्यांनी मनमुराद विटंबना केली, अवहेलना केली.

१९९१ साली जेव्हा नरसिंह रावांकडे सत्ता आली तेव्हा बालिश धोरणांनी देशाला अंतर्गत आणि परराष्ट्र धोरणच उरलेले नव्हते. अर्थखाते हा तर जगात विनोदाचा विषय होता. राजीव गांधींची हत्या नसती तर आपली उगाच अडचण नको म्हणून राव परत हैद्राबादकडे गेले असते  पण राजीव गांधींची हत्या झाली आणि दक्षिण अमेरिकेतल्या पूर्णपणे दिवाळे निघालेल्या देशांप्रमाणे आर्थिक स्थिती असलेला हा हिंदुस्थान नावाचा देश नरसिंह रावांच्या खांद्यावर येऊन पडला. परिस्थिती चंद्रशेखर पंतप्रधान असतानाच पार बिघडलेली होती. ती अजून जर बिघडली तर आख्खा देश दिवाळखोरीच्या खाईत लोटला नेला असता.

त्याच वेळी देशासमोर अजून एक संकट आ वासून उभे होते.  आख्खे सोव्हिएत साम्राज्य लयाला गेले होते आणि हिंदुस्थानला म्हणावा असा महामित्र जगात नव्हता. १९८० ते १९८४ या काळात परराष्ट्र मंत्री असलेल्या पंतप्रधान नरसिंह रावांना या परिस्थितीतला भयानक धोका अचूक कळला. डॉ. मनमोहन सिंग अर्थमंत्री म्हणून या संकटात नरसिंह रावांसोबत उभे राहिले. रावांनी अक्षरशः देशाला कळूसुद्धा न देता एक भयानक संकट देशापुढून दूर केले. त्या काळात जर देश आर्थिक मंदीच्या आवर्तात सापडला तर हा हा म्हणता देशाचे तुकडे पडले असते. शिवाय अमेरिका तेव्हा आपली जवळजवळ शत्रूच होती (*आणि पाकिस्तानाची मित्र*) अमेरिका, इस्त्राएल आणि दक्षिण आफ्रिकेसारख्या देशांसोबत रावांनी आत्मसन्मान राखून मैत्री केली. हा आत्मसप्मान राखण्यासाठी देशाच्या आर्थिक आघाडीवर त्यांना जे लढावे लागले, त्याची नीट कल्पना केली तरी आज मन भरुन येते. कल्पना करा, आपण सारेजण एका भोक पडलेल्या नावेत सुखाने झोपलेलो होतो आणि आपल्या त्या नावाडयाला (*म्हणजे पंतप्रधानाला*) त्या पडलेल्या भोकाबद्दल पूर्ण माहिती होती. आपली झोपमोड न होऊ देता त्याला ती नाव किनाऱ्याला लावायची होती. शिवाय आपण झोपेतून मध्येच जागे होऊन अज्ञानाच्या पोटी त्याच्यावर डाफरतही होतो (*रुपयाचे अवमूल्यन केल्यावर नरसिंह रावांवर झालेली टीका आठवा).* अशा परिस्थितीत नरसिंह रावांनी देशाची नाव सर्वार्थाने किनाऱ्याला लावली. हे एखाद्या चमत्कारासारखेच होते आणि हा इतका अद्भुत चमत्कार केल्याबद्दल देशातल्या जनतेने नरसिंह रावांवर अजिबात प्रेम केले नाही. नाहीतर विनाशाच्या खाईत लोटणाऱ्या बोलघेवडया नेत्यांवरही या देशातल्या जनतेने कितीदा जीव ओवाळून टाकलाय. त्यांच्यावर मृत्यूनंतर लोकांनी स्वतःला पेटवून वगैरेही घेतले; पण बिच्चारे

नरसिंह राव मृत्यु पावल्यावर त्यांच्याच पक्षाचे राज्य असतानाही त्यांना दिल्लीत अंत्यविधीसाठी, त्यांच्या स्मारकासाठी अडीच हात जमीन मिळाली नाही. हैद्राबादेतसुद्धा त्यांचा मृतदेह पुर्णपणे अनंतात विलीन झाला आहे. अथवा नाही, हे न पाहाताच सगळेजण आपापल्या घरी निघून गेले.

देशाच्या भीषण आर्थिक दैन्यविरुद्ध एखाद्या योद्ध्यासारखा लढलेला हा माजी पंतप्रधान पदावरुन पाय उतार झाल्यावर सतत आठ वर्षे आपण निर्दोष आहोत, हे सिद्ध करण्यासाठी एकाकी विद्ध होऊन कार्टाच्या पायऱ्या झिजवत होता. मृत्युने नरसिंह रावांना गाठण्याअगोदर ते निर्दोषित्व सिद्ध झाले  पण मृत्युने गाठले तरीही त्यांची अवहेलना संपली नाही.

नरसिंह रावांनी एकदा म्हटलं होतं की, ' इतिहासात माझं नाव देशाचा एक छोटासा सेवक ' असंच नमूद व्हावं या देशाचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा नरसिंह रावांबद्दल एवढंच लिहिलं जाईल की, ' गांधी घराण्यातल्या कबुतरांचं श्रेष्ठतव अबाधित ठेवण्यासाठी चुरगाळून टाकलेला हा एक गरुड होता. ज्याचं नाव होतं पामुलापर्ती वेंकट नरसिंह राव ( पी. व्ही. नरसिंह राव).

# जॉर्ज

**स**त्तरच्या दशकात ‘ जॉर्ज फर्नांडिस पुढे कट्टर संघ-जनसंघाच्या माणसांसोबत सिंधूपूजेत रमलेले मला दिसतात. ’ असे जर कुणी सांगितले असते तर त्याची ज्योतिषी म्हणून कारकिर्दच धोक्यात आली असती. नरेंद्र दाभोळकरांसारख्या अंधश्रद्धाविरोधी समाजवाद्यांनी तर ज्योतिष हे कसे थैतांड आहे हे सोदाहरण सिद्ध करण्यासाठी हे उदाहरण वापरले असे ; पण जॉर्ज फर्नांडिसांनी सर्व समाजवाद्यांनाच खोटे आणि थोतांड ठरविण्यासाठीच आपले आयुष्य वापरले. कारण फर्नांडिसांनी सत्य हे कल्पितापेक्षा अद्भूत असते हे स्वत:साठीच लिहिलेले वाक्य आहे, असा समज करुन घेतला होता.

जॉर्ज फर्नांडिस नावाचं खूप मोठं वादळ होतं, असा भूतकाळालीन उल्लेख करण्याअगोदरच्या काळात *(फर्नांडिस त्यांना जेवढे वाटत होते तेवढे मोठे नव्हते तेव्हा)* एकदा संपूर्ण रेल्वे बंद करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. तेव्हा रेल्वे तर बंद झालीच नाहीच. उलट पोलिसांनीच फर्नांडिसांना बेदम मारले. जखमी अवस्थेत प्लॅस्टर गुंडाळलेले फर्नांडिस केईएमच्या व्हरांडयात झोपलेले होते. तेव्हा त्यांना भेटायला अरुण साधू आणि राजहंस प्रकाशनचे दिलीप माजगावकर गेले होते. त्यांच्याकडे फर्नांडिसांनी आपल्या जखमांविषयी बोलणे केलेच नाही. उलट 'लवकरच मी खरोखरच मी रेल्वे बंद करुन दाखवीन.' असे उद्‌गार काढले. या थक्क करुन टाकणाऱ्या आत्मविश्वासनेच त्यांची बंडखोर प्रतिमा तयार झाली. स.का. पाटलांसारख्या कॉंग्रेसचा खजिनदार असलेल्या दिग्गज नेत्याचा थेट त्याच्याच मतदारसंघात पराभव करुन जॉर्जनी 'जायंट किलर' नावाचे वादळ मुंबईत आणले.

तेव्हाच्या 'बंदसम्राट', 'जायंट किलर' अशा विशेषणापुढे आताचे त्यांचे संरक्षणमंत्री हे विशेषण त्यांच्या तेव्हाच्या सहकाऱ्यांना फारच बुळबुळीत वाटते. संपूर्ण सत्तरच्या दशकात अस्वथ, चिडलेल्या तरुण कामगाराचे आणि डाव्या समाजवादी तरुणांचे जॉर्ज हे 'अमिताभ' होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पुढे अमिताभचे जे झाले तेच जॉर्जचे झाले.

अमिताभ बच्चन आज जेव्हा त्यांच्या अमरसिंह यांचा सहारा शोभत प्रस्थापित अवस्थेत आनंदात फिरत असताना 'याचसाठी का केला होता सारा अट्टाहास ?' अशी विषण्णता त्यांच्या चाहत्यांना अनुभवावी लागते. जॉर्ज जेव्हा आडवाणी वाजपेयींसोबत 'फील गुड' अवस्थेत कन्व्हेनर म्हणून दिसतात तेव्हा हीच विषण्णता त्यांच्या चाहत्यांच्या नशिबी येते.

जॉर्ज फर्नांडिस भाषण करताना त्यांच्या बाजूला साक्षात सरस्वती उभी राहते की काय असे वाटायचे. त्यांची संसदेतली भाषणं ऐकायला पत्रकाराकक्ष तुडूंब भरायचा. परस्परविरोधी बाजूने भाषणंही ते त्याच डौलदारपणे करायचे पण आता कळतं की सरस्वती पाठराखण करत असे ती जॉर्ज फर्नांडिसांची नव्हेच. लक्ष्मीला न जुमानणाऱ्या प्रत्येक बंडखोरासोबत सरस्वती अशीच उभी असते. ज्या दिवशी 'तहलका' च्या कॅसेट देशीर वाजल्या. त्या वेळी संसदेत जॉर्ज फर्नांडिस स्वतःचं समर्थन करायला उभे राहिले तेव्हा त्यांना शब्द सुचत नव्हते. वाक्य सुचत नव्हती. चक्क त त .. पप.. करत त्यांनी

भाषण करता आलेलं नाही. आताशा सरस्वती त्यांच्यावर पार रुसली आहे ‘त्याचीही मला पर्वा नाही, ’ अशा भावात

फर्नांडिस जगत आहेत.

जॉर्ज जेव्हा संरक्षणमंत्री झाले तेव्हा सुरुवातीच्या काळात त्यांनी घरासमोर संरक्षणासाठी घातलेलं कुंपण तोडून टाकलं. त्यांच्या घरात थेट स्वयंपाकखालीपर्यंत जाता येतं आणि संरक्षणमंत्री असूनही संरक्षण न घेता फक्त ड्रायव्हरसोबत फर्नांडिस कुठेही जातात, हे मी स्वतःच अनुभवलेलं आहे पण तरीही ही त्यांची चिरपरिचित बंडखोरी नव्हती, तर बंडखोरीची आठवण जागवणारा तो फक्त अभिनय होता. इंदिरा गांधींनी जेव्हा सर्व विरोधकांना तुरुंगात टाकले तेव्हा ‘ हे सारे सूडाचे राजकारण आहे ’ असा गळा काढणाऱ्यांत जॉर्ज अव्वल होते. त्याच फर्नांडिसांवर संशयाची सुई फिरवणाऱ्या ‘ तहलका ’च्या तरुण तेजपाल आणि इतरांवर सर्व सरकारी यंत्रणेचे सूडचक्र फिरवणाऱ्या जॉर्ज फर्नांडिस व त्यांच्या आत्ताच्या सर्व ढोंगी सहकाऱ्यांना इंदिरा गांधीनी अचूक ओळखले होते, असेच आता म्हणावे लागेल

फर्नांडिसांच्या सर्व आयुष्याचा विचार करताना मला काही प्रश्न पडतात. यांची सारी धडपड कशासाठी होती ? या हिंदुस्थानी समाजाचे काय व्हावे असे यांना वाटत असेल ? दुर्दैवाने जी उत्तरं हातात येतात त्यात (*फर्नांडिसांच्या संपूर्ण आयुष्याचा विचार करताना* ) संपूर्ण समाजाचा विचार त्यात नव्हताच असं दिसतं, होती ती फक्त वैयक्तिक महत्वकांक्षा. त्यासाठी वेगवेगळयांना वेठीला धरत शेवटी ते स्वतःही संघ परिवाराच्या महत्वकांक्षेसाठी आनंदान व स्वखुशीने वेठीला धरले गेले.

फर्नांडिसांसारख्या माणसांच्या आयुष्याबद्दल सर्वांत वाईट हे की त्यांच्याबद्दल वास्तविक ज्ञान त्यांच्या समाजाला उशिराने होते. मात्र हे ज्ञान अचूकपणे इंदिरा गांधीना झाले होते. त्यांनी रा. स्व. संघ व समाजवादी यांना नेहमीच एकाच तागडीत तोलले आणि दोघांनाही देशाचे एक नंबरचे शत्रू मानले.

तरीही जॉर्जचे चाहते देशात कमी नाहीत. ते चाहते अर्थातच तरुण नाहीत. वृद्ध, थकलेले आहेत. त्यांना बडोदा डायनामाइट आठवते, त्यांना चौऱ्याहत्तरचा चक्का जाम आठवतो. त्यांना कोकाकोलाची हकालपट्टी आठवते.. हे वृद्ध चाहते मग फर्नांडिसच्या आयुष्याची स्वतःशी पुनःपुन्हा उजळणी करतात. चित्रपट डोळयांसमोर सरकतो. स्वप्नात सारे काही आलबेल असल्याने स्वप्न ते मग डोळे मिटतात.

# सोरेन गुरुजी

**शि**बू सोरेन यांना त्यांचे चाहते आणि अनुयायी ' दिशोम ' गुरु म्हणून संबोधतात त्यांच अजून एक लोकप्रिय संबोधन म्हणजे ' गुरुजी ' झारखंड प्रदेशात ते ' गुरुजी ' याच संबोधनाने लोकप्रिय आहेत.

आज ' झारखंड मुक्ती मोर्चा ' चे सर्वेसर्वा असलेले शिबू सोरेन स्वतःला आदिवासी भूमिपुत्रांचे प्रेषित मानतात. १९६९ मध्ये शिबू सोरेन यांनी ' सोनाल संथाल समाज ' या कडव्या भूमिपुत्रवादी संघटनेची स्थापना केली. ' सोनाल संथाल समाज ' ही संघटना भूमिपुत्र असलेल्या आदिवासींच्या न्याय्य हक्कांच रक्षण करणारी संघटना होती.

पुढे १९७१ साली ‘ झारखंड मुक्ती मोर्चा ’ ची स्थापना झाली. तेव्हापासून शिबू सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाचे सचिव आहेत. झारखंड मुक्ती मोर्चाचे निवडणूक चिन्ह आहे - धनुष्यबाण.

आज कोळसा आणि खाणमंत्री असलेल्या शिबू सोरेन यांच्यावर वॉरंट बजावण्याकरता झारखंड पोलीस त्यांच्या माग घेत हिंडताहेत पण राजकीय कारकीर्दीत अशा प्रकारचं गंडांतर येण्याची शिबू सोरेन यांची ही पहिलीच वेळ नव्हे. असे असंख्य आरोप आणि दाखल झालेले गुन्हे त्यांनी पचवलेत.

१९८० साली पहित्यांदा शिबू सोरेन लोकसभेत आले. तेव्हापासून ते अनेकदा लोकसभेत आलेत. अनेकांना आठवत असेल की नरसिंह राव सरकारने ‘ कॅश ’ च्या रुपात लाच दिल्याची ज्यांच्याबद्दल चर्चा झाली होती, ते हेच शिबू सोरेन. सीबीआयसारख्या संस्थेने शिबू सोरेन यांच्याबद्दल चार्जशींअमध्ये जे नमूद केलयं ते फारच उत्कंठावर्धक आहे. सीबीआयने म्हटलंय, ‘ शिबू सोरेन 'यांचे उत्पन्न आणि त्यांची मालमत्ता यांचा मेळच बसत नाही.’

साक्षात सीबीआयला ज्या माणसाच्या उत्पन्नातला आणि मालमत्तेतला मेळ साधता आला नाही, तो माणूस साध्या पकड वॉरंटच्या भितीने अजिबात डगमगणारा नाहीए. पुन्हा आताचं जे पकड वॉरंट शिबू सोरेन यांच्या नावाने निघालयं, त्या वॉरेंटचा इतिहास हा व्यक्तिगत गुन्हयाचा कमी आणि राजकीय आंदोलनाचा जास्त आहे. १९७५ मध्ये ‘ डीकूस ’ विरोधी भूमिपुत्र आदिवासींनी केलेल्या आंदोलनात ‘ डीकूस ’ चे *(म्हणजे परप्रांतीय)* बळी गेले. ज्यांमध्ये काही मुस्लिमांचाही समावेश होता. तेव्हा भूमिपुत्र आदिवासींचं नेतृत्व करणाऱ्या शिबू सोरेन यांच्यावर त्या दहा परप्रांतीयांच्या हत्यांचे वॉरंट आज बजावले गेले आहे.

झारखंड मुक्ती मोर्चा, शिबू सोरेन आणि भारतीय जनता पार्टी यांचे सत्तासंघर्षातले बदलते संबंध हे सुद्धा शिबू सोरेन यांच्या बदलणाऱ्या भवितव्याचे कारण ठरले आहे.

झारखंड मुक्ती मार्चा आणि अर्थातच शिबू सोरेन यांचा कोणत्याच राजकीय पक्षाशी जुळवून घ्यायला नकार नसतो. नरसिंह रावांची कॉंग्रेस, लालूप्रसाद यादवांचे राष्ट्रीय जनता दल, भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि आता कॉंगेसप्रणीत केंद्र सरकार या सर्वासोबत झारखंड मुक्ती मोर्चा होताच.

१९९५ साली संथाल परगण्यातले १८ जिल्हे आणि छोटा नागपूर यांचं ‘ झारखंड एरिया ऑटोनॉमस कौन्सिल ’ सरकारने स्थापन केलं. त्याचे चेअरमन होते शिबू सोरेन. पुढे १९९७ साली अल्पमतातल्या लालूप्रसाद यादवांना शिबू सोरेन यांनी पाठिंबा देऊन ‘ स्वतंत्र झारखंड ’ चं बिल पास करुन घेतलं. पुढे केंद्रात ‘ राष्ट्रीय

लोकशाही आघाडी 'सरकार आलं. तिथेही शिबू सोरेन सोबती होतेच.

पण 'स्वतंत्र झारखंड' च्या विधानसभा निवडणूका शिबू सोरेनना फारच वाईट गेल्या. यांचे फक्त १२ आमदार निवडून आले. भाजपचे ३२. अशी सत्ता सुखासुखी कोण जाऊ देईल ? शिबू सोरेन थेट दिल्लीत जाऊन तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या पायावर नाक घासते झाले. त्यांचा वाजपेयींना घातलेला साष्टांग नमस्कार फारच गाजला. तेव्हा सोरेन यांनी स्पष्टीकरण दिलं. 'वाजपेयींनच वय आणि त्यांच नेतृत्व पाहता मी त्यांना असा नमस्कार केला.' पण सत्तेपेक्षा असल्या नमस्कारांची किंमत भाजपने केली नाहीच. जंग जंग पछाडून शिबू सोरेन यांना त्यांच्या स्वप्नातल्या 'झारखंड' या भूमिपुत्रांच्या राज्याचं मुखमंत्रीपद मिळालंच नाही. जनता वेळ पडली तर आपल्या प्रिय नेत्यावरही किती खप्पामर्जी होऊ शकते, यांच हे उत्तम उदाहरण आहे.

जनतेच्या या खपपामर्जीच कारण शिबू सोरेन यांच्या व्यक्तिगत आयुष्यात आहे. सुरुवातीला त्यांनी आपली पत्नी 'रुपी सोरेन' यांना राजकारणात आणलं. निवडणूकीच्या राजकारणात त्यांची डाळ शिजेना. मग शिबू सोरेन यांनी आपल्या मोठया मुलाला 'दुर्गा' ला राजकारणात प्रस्थापित केलं. तो मात्र राजकारणात चांगलाच स्थिरावला. 'जामा' विधानसभा मतदारसंघातून दोनदा निवडून आला. शिबू सोरेनना एकूण चार मुलं. दुर्गा, हेमंत, बसंत हे मुलगे आणि एक मुलगी. पैकी हेमंत आणि बसंत धंदा करतात. 'दुर्गा' चं मात्र गुन्हाबिन्हयांच बऱ्यापैकी रेकॉर्ड आहे.

स्वतः हे मात्र आपण घराणेशाही आणली, याचा इन्कार करतात. ते म्हणतात, 'माझ्या पत्नीला राजकारणात खरोखरच रस होता. मुलाला जर लोकांनीच आणलं तर मी त्याला अडवणारा कोण ?' शिबूंचा मोठा मुलगा 'दुर्गा' आत स्वतः आदिवासींचा प्रेषित म्हणवून घेतो

पी.एन. पांडे नावाचे शिबू सोरेन यांचे अतिनिकटवर्तीय ( *चमचे हो !)* यावर फारच मासलेवाईक बोलतात, 'घराण्यात एक क्रांतिकारक *(म्हणजे शिबू सोरेन)* असला की मुलं त्याचंच अनुकरण करणार !' त्यापेक्षाही त्यांचं हे पुढचं विधान अधिक अर्थवाही आहे. सोनेन घराणं हेच महानतम आहे. 'सोरेन घराण्यातली मुलं फक्त आपली परंपरा चालवताहेत...'

मला स्वतःला शिबू सोरेन व त्यांचं कुटुंब हे हिंदुस्थानी राजकारणाचे 'लघुत्तम साधारण विभाजक' (ल.सा. वि.) वाटतात, आपल्याला ?

# सुशीलकुमार शिंदे

‘ **रा**जा तृप्त झाला की अन् संन्यासी अतृप्त झाला की तो अपयशी होतो’ असं एक वचन आहे. सुशीलकुमार शिंदेंच व्यक्तिमत्व उमदं, आर्कषक, सुसंस्कृत आणि निर्विश आहे पण त्यांच्याकडे पाहताना वरचं वचन आठवत राहतं.

सुशीलकुमार शिंदेंची मुख्यमंत्रीपदाची कारर्कीद अजिबात वादळी नाही. कोणत्याच अर्थाने. आखून दिलेल्या मार्गावरुन ते चालत राहिले. कोणताही धक्का न देता. हे करीत असताना सोलापूर लोकसभा निवडणूकीत त्यांना दोनदा सणसणीत धकके बसले. त्यातला

दुसरा तर भीषण होता. खुद्द सुशीलकुमारच्या पत्नी उज्वला शिंदे पराभूत झाल्या. दुसरा कोणताही सत्ताधीश असता तर पराभवाच्या कारणावरुन व पराभवाला कारण असणाऱ्यांवरुन वरवंटा फिरवता झाला असता पण सुशीलकुमारांनी जेवल्यावर ब्लडप्रेशरची गोळी पाण्याबरोबर गिळून टाकावी इतक्या सहजतेने पराभव गिळून टाकले.

खरं तर सुशीलकुमार शिंदेंचं आयुष्य अत्यंत नाटयमय आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून शिपायापासून इन्सपेक्टर-पर्यंतच्या नोकऱ्या करीत ते शिकले. इतक्या हलाखीतून एक मागासवर्गीय मुलगा पराकोटीचा संघर्ष करीत राज्याचा मुख्यमंत्री होतो हेच खूप सिनेमॅटिक आहे. विषय इंग्रजी शिकण्याचा असो वा राजकारणात येण्याचा असो, सुशीलकुमार शिंदेंमध्ये विद्रोहाची आग दिसते. जुगार खेळण्याची मर्दानगी दिसते. पूर्वायुष्य आणि उत्तरायुष्यातले सुशीलकुमार दोन वेगळे आहेत.

सुशीलकुमार शिंदें एकदा कॉंग्रसमध्ये आले आणि मंत्री झाले. त्यानंतर त्यांच्यातल्या बंडाचा कॉंग्रेसी संस्कृतीने घास घेतला. नंतर सुशीलकुमारांची करियरच्या दृष्टीने प्रगती झाली असती तरी गुणांच्या दृष्टीने सुशीलकुमारांना एकच गुण महत्वाचा उरला. निष्ठावंत असण्याचा.

कॉंग्रसची गांधी घराण्याच्या पायापाशी लोळण घेऊन निष्ठा दाखविण्याची जी टिपिकल उत्तर हिंदुस्थानी परंपरा आहे ती क्रमाक्रमाने नंतर देशभर पसरली. त्यात मागासवर्गीय आणि दलित जातीजमातीतून बंडखोरी करुन नेतृत्व हिसकावून घ्यायला उभ्या असणाऱ्या तरुणांना कण्यातून नष्ट करण्यात आलं. महाराष्ट्राचंच उदाहरण घ्यायचं झालं तर अशा तरुणांना महाराष्ट्रात नेतृत्वच राहिलं नाही. असं एखादं सत्ता केंद्र उभं राहत असेल तर कॉंग्रसश्रेष्ठी सत्तेचा चतकोर त्यांच्यासमोर टाकून निष्ठेची अपेक्षा करतात, जी सहजच मिळते.

राजीव गांधी हयात असताना शरद पवार मुख्यमंत्री होते आणि राजीवच्या आर्शीवादाने महाराष्ट्रात बंड झालं होतं जे शरद पवारांना त्यांची 'जागा' दाखवण्यासाठी होतं. बंडात पवारांच्या मंत्रिमंडळातले निष्ठावंत होते. 'निष्ठावंत' म्हणजे गांधी घराण्याशी निष्ठावंत. ज्यातले एक प्रमुख निष्ठावंत सुशीलकुमार शिंदें. त्या वेळचे बोलतानाचे सुशीलकुमार शिंदे मला आजही जसेच्या तसे आठवतात. सुशीलकुमार म्हणाले होते, 'हमारे लिए राजीवही सबकुछ है ! बस्स !'

वास्तविक सुशीलकुमारांच्या राजकीय प्रवासात पवारांची एक मोठी भूमिका होती पण कॉंग्रसच्या गांधी घराण्याला शिदे काय पवार काय फक्त सोंगटया होत्या आणि आहेत. अ किंवा ब

याच निष्ठेपायी सुशीलकुमार शिंदे कॉंगेसमध्ये सत्ताकेंद्रात मग खूप पुढे पुढे गेले. कॉंग्रसचे सरचिटणीस झाले. सोनियांच्या सत्तावर्तुळात आतले समजले जायला लागले. प्रियांका, राहूलबरोबर वगैरे त्यांचे फोटोबिटो यायला लागले.

हे सगळं व्हायला लागलं तशी त्यांच्या चेहऱ्यावरची समाधानाची वर्तुळे विस्तारायला लागली. सुखी, समाधानी लेखक, कलावंत आणि राजकारणी, ती एक भयानक शोकांतिका असते ती शोकांतिका जन्म घ्यायला लागली पण ती शोकंतिका पूर्णत्वाला तोपर्यंत गेली नव्हती, जोपर्यंत सुशीलकुमारांच्या चेहऱ्यावरच्या समाधानाच्या वर्तुळात अगदी हातातोंडाशी आलेले मुख्यमंत्रीपद हुकल्याची सल दिसत होती.

सोनिया गांधीच्या आर्शीवादाने मग एके दिवशी विलासराव देशमुखांचे मुख्यमंत्रीपद गेले आणि सुशीलकुमार शिंदें महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. समाधानाचे एक वर्तुळ पूर्ण झाले. सुशीलकुमार शिंदें ज्या दिवशी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले त्या दिवशी महाराष्ट्राला खरं तर मनात धगधगती आग असणाऱ्या मुख्यमंत्र्यांची खूप गरज होती. कारण असंख्य अडचणी रेटत, जाळत राज्याला विकासाचा मार्ग दाखवायचा होता.

परंतु सुशीलकुमार शिंदेंकडे असलेली ती आग व्हाया दिल्ली झालेल्या कॉंग्रस पक्षातल्या लांबलचक प्रवासात कधीच शमून गेली होती.

सुशीलकुमार शिंदेंसारखा कष्टाळू आणि उमदा असा मागासवर्गीय जातीतून पुढे आलेला नेता राज्याच्या सर्वोच्च स्थानावर बसतो तेव्हा ती त्याला इतिहासावर आपला ठसा उमटवण्याची एक जबरदस्त संधी असते. ज्या संधीसाठी अनेकांनी आपले रक्त, अश्रू आणि घाम दिलेला असतो. त्या साऱ्यांसाठी सुशीलकुमार शिंदें हे त्या मशालीपर्यंत पोहोचलेले आणि मशाल हातात धरावयास मिळालेले भाग्यवान प्रतिनिधी होते पण सुशीलकुमारांसाठी कॉंग्रस पक्षाचे संस्कार आणि बेडया इतक्या समर्थ होत्या की मुख्यमंत्रीपद हेच साध्य ठरते ते फक्त अजून एक मुख्यमंत्री ऐवढेच राहिले. साधन जेव्हा साध्य ठरते तेव्हा इतिहासात तुमच्यासाठी जागा नसते. इतिहास क्रुर आणि तटस्थ असतो. सुशीलकुमारांना हे माहीत नसेल ?

अमेरिकेतल्या बृहन महाराष्ट्र मंडळाचे दर दोन वर्षांनी संमेलन होते. त्याचे आमंत्रण ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना देतात. येतं संमेलन २००५ साली आहे. त्याचं आमंत्रण मंडळातर्फे सुशील कुमार शिंदेंना दिलं गेलं तेव्हा संमेलनाची तारीख ऐकून ते हसले.

स्वतःविषयी तेव्हा त्यांना काय वाटलं असेल ?

करुणा की वेदना ?

# नरेंद्र मोदी

**न**रेंद्र मोदींना पहिल्यांदा मी भेटलो तेव्हा नुकत्याच गुजरातच्या दंगला होऊन गेलेल्या होत्या. मोदींनी निर्णायक विजय मिळवलेली निवडणूक अजून यायची होती. नरेंद्र मोदींविरुद्ध टीकेचं मोहोळ उठलेलं होतं. परिस्थिती अशी होती की, दुसरा एखादा माणूस असता तर पार डगमगला असता, नरेंद्र मोदींना जेव्हा मी भेटलो तेव्हा जाणवलं की, हा माणूस टीकेच्या प्रचंड गदारोळामुळे किंचित हललेला आहे पण डगमगलेला अजिबात नाहीए. सर्वांत महत्वाचं म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक् संघाचा नरेंद्र मोदींना भक्कम पाठिंबा होता. मी त्या दौऱ्यात संघाच्या

असंख्य प्रतिनिधींना भेटलो. त्यातल्या कुणालाच मोदी चुकीचे आहेत असं वाटत नव्हतं. वास्तविक त्या दौऱ्यात मी संघकार्यालयातच राहायचं ठरवलेलं होतं. गुजरातमध्ये संघ ज्यांनी वाढवला अशा समर्पित माणसांपैकी एक मुकुंद देवभानकर हे आहेत ( नाव मराठी असलं तरी ते आता पक्के गुजरातीच आहेत.) ते अहमदाबादच्या संघाच्या हेडक्वार्टरचे सर्वेसर्वा आहेत. त्यांनी मला संघाची आणि नरेंद्र मोदींची बाजू समजावून सांगितली. प्रत्यक्षात ती संघकार्यालयात न राहता कालुपुऱ्यात एका मुस्लिम माणसाच्या हॉटेलमध्ये उतरलो. देवभानकरांना हे मी सांगताच त्यांनी तात्काळ त्या हॉटेलचे नाव, पत्ता आणि टेलिफोन लिहून घेतला. शिवाय मी कार्यालयातच राहायला यावं असं सौम्यपणे सुचवलं. हे सारं मी अशासाठी लिहितोय की या साऱ्याचा मोदींच्या घडण्याशी खूप जवळचा संबंध आहे.

गुजरात राज्य हे इतर राज्यांपेक्षा मानसिकतेने खूपच वेगळे आहे. हिंदुंच्या एकगठ्ठा मतदानाला हे राज्य अतिशय अनुकूल झालेले आहे. स्वातंत्र्य या संकल्पनेशी लोकांना फारशी आत्मीयता नाही. मुस्लिमाविरोधावर उभी असलेली हूकुमशाहीही त्यांना चालू शकते. हे सरसकट नाही तरी बहूसंख्य हिंदुंचे मन आहे आणि असे मन घडण्यामागे चार गोष्टी प्रामुख्याने कारणीभूत आहेत. पहिली गोष्ट म्हणजे, गुजरातच्या मुसलमानांचा इतिहास आणि इतिहासातली त्यांची अरेरावी. दुसरी गोष्ट म्हणजे कॉंग्रेस राज्यकर्ते असताना धर्मनिरपेक्षतेच्या मूल्याची कसोशीने जपणूक न करता मुस्लिम मतांचे कॉंग्रेसने केलेले लांगूलचालन. तिसरे म्हणजे या साऱ्याचा संघाने उठावलेला अचूक फायदा आणि चौथी सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे गुजराती माणसाचा स्वभाव. या साऱ्यांचा फायदा मिळाल्यामुळे मोदींचा उदय झाला आणि म्हणूनच संघ त्यांच्या पाठीशी उभा राहिला. संघकार्यालयाचे ऑफिस हे एखाद्या गरीब वर्तमानपत्राच्या ऑफिससारखे आहे परंतु देवभानकरांनी फोन केल्यावर मुख्यमंत्री असलेले मोदी तात्काळ फोनवर येतात आणि देवभानकरांच्या म्हणण्याप्रमाणे तत्काळ मला भेटायला बोलवतात. ही गोष्ट इतर कुठच्याही राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना आश्चर्यकारक वाटेल पण संघाचे गुजरातमध्ये काम एखाद्या गृहउद्योगाप्रमाणे चालते. घराघरातून कामाची वाटणी झालेली असते. मोदी हे त्यातलेच एक घटक असतात. नरेंद्र मोदी हे असे आश्र्चयकारक रीतीने उदयाला आलेले नाहीत. त्यांनीही आयुष्यात खूप योजनापूर्वक पावलं टाकलेली आहेत. नरेंद्र मोदींचा जन्म १७ सप्टेंबर

१९५० चा वाडनगर, जिल्हा मेहसाणा. १९७२ सालापासून म्हणजे वयाच्या बाविसाव्या वर्षापासून ते संघाचे प्रचारक बनले. १९७४ साली गुजरातमध्ये जयप्रकाश नारायणांचे नवनिर्माण आंदोलन सुरु झाल्यावर त्यांनी त्यात भाग घेतला. १९७५ साली आणीबाणीविरुद्ध सुरु झालेल्या आंदोलनाससाठी स्थापन झालेल्या लोकसंघर्ष समितीचे ते सरचिटणीस होते. पुढे हा प्रवास असाच सुरु राहिला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ज्या थोडया स्वयंसेवकांना भाजपमध्ये पाठवलं, त्यात मोदींचा समावेश होता. नरेंद्र मोदी मग गुजरात राज्य भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस होते. या साऱ्या काळात मोदींनी स्वतःच्या संघकौशल्याचा आणि संघाचा त्यांना असलेल्या पाठिंब्याचा प्रत्यय अनेकांना आणून दिला. शंकरसिंह वाघेलांना नरेंद्र मोदी सलू लागले हे त्यामुळेच. पर्यायाने मोदींना राज्याचा वनवास स्वीकारावा लागला. मोदींनी या संकटाचाही खुबीने वापर करुन घेतला. दिल्लीत भाजपचे राष्ट्रीय पदाधिकारी म्हणून पक्का जम बसवला. एवढंच नव्हे, तर मुरली मनोही जोशी भाजप अध्यक्ष असताना त्यांच्या एकता यात्रे च्या निमित्ताने देशभराच्या भाजपात आपले नेटवर्क निर्माण केले. दरम्यानच्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. शंकरसिंह वाघेलांनी पक्ष सोडला केशूभाई पटेलांनी मुख्यमंत्री म्हणून जरी सत्ता हाती घेतली तरी त्यांच्या खांद्याला नव्या आकांक्षा जागृत झालेल्या गुजरातची जबाबदारी पेलवेना. तोपर्यत देशपातळीपासून ते राज्यापर्यंत नरेंद्र मोदींनी फणस पिकवत आणलेला होता आणि त्याचा परिणाम म्हणून नरेंद्र मोदींना ७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातचं मुख्यमंत्रीपद मिळालं ते थेट आजतागायत.

गोध्राकांडानंतरच्या दंगलीनंतर गुजरातेत मोदींना बहूमत मिळणार, ही गोष्ट तिथे फिरणाऱ्या सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ दिसत होती. या काळातच मोदींच्या नेतृत्वगुणाची आणि संघटनकौशल्याची कसोटी लागली. मोदी अविवाहित आहेत. त्यांना जवळचं फारसं कुणी नात्यातलं नाही. त्यामुळे त्यांचं अस्तित्व रुक्ष आणि खडबडीत वाटतं. बाकी कला, साहित्य वगैरे विषयांवर ते फारसं काही बोलू शकत नाहीत. मानवतेची वगैरे त्यांच्याकडून आपल्याला अपेक्षा करता येईल असं मला त्यांना पुनःपुन्हा भेटूनही कधीच वाटलं नाही. त्यांचं मला जाणवलेलं अजून एक वैशिष्टय म्हणजे ते नजरेत नजर घालून बोलत नाहीत. समोरच्याच नजरेला नजर भिडवून बोलण्याऐवजी ते तिसरीकडेच पाहत बोलतात पण याचं कारण मला अपराधगंड वगैरे वाटत

नाही. त्याचं कारण काहीतरी वेगळंच असाव असं मला वाटतं. मात्र ते असं बोलतात तेव्हा समोरची व्यक्ती अस्वथ होते, हेही तितकचं खरं आहे. मी नरेंद्र मोदींना त्यांची निवडणूक अगदी तोंडावर आलेली होती तेव्हा भेटलो तो आजतागायत शेवटचा. तेव्हा त्यांच्यासोबत अरुण जेटली होते. त्या दोघांच्या बॉडी लॅंग्वेजमध्ये नरेंद्र मोदी हे अरुण जेटलींचे नेते आहेत हे स्पष्ट कळण्याइतकी दृश्यता होती. नरेंद्र मोदींच्या (मुख्यमंत्र्यांच्या) केबिनमध्ये भेटताना बाहेर संघ-भाजप परिवारातल्या अनेकांची गर्दी केबिनबाहेर रेंगाळत असायची त्यांच्या त्यांच्या आकांक्षा घेऊन मोदींची त्या वेळची अखेरची भेट मी त्यांच्या घरी घेतली होती. तिथे त्या वेळी अनेक जाहिरात कंपन्यांचे प्रतिनिधी त्यांना ( आणि जेटलींना ) भेटायला आलेले होते. त्या सर्वांशी मी थोडया गप्पा मारल्या जवळजवळ दिवसभर मी तिथे होतो. त्या प्रतिनिधींच्या बोलण्यात एकच गोष्ट होती. ती म्हणजे हा जिंकणारा घोडा आहे. त्याचं निवडणूक कॅंपेन मिळण म्हणजे दुहेरी फायदाच आहे. त्यांच्या बोलण्यात वा विचारात गुजरात दंगली वगैरेचा काही मागमूसही नव्हता. त्या दिवशी संध्याकाळी मोदींच्या घरातून मी बाहेर पडलो तर मला कुठेच जाता येईना. कारण माझ्याकडे स्वतःचं वाहन नव्हतं आणि मुख्यमंत्री निवासातून शहरात जाणारी रिक्षा किंवा टॅक्सी असं तिथे काहीच नाहीए. बसेसपण खूप दुरुन सुटतात आणि त्या पूर्णपणे बेभंरवशाच्या आहेत. शेवटी संघाचा कार्यकर्ता असलेल्या नारायण माधू नावाच्या मित्राला मी फोन लावला. तो बाईकवरुन आला आणि तिथून निघालो. बाहेर पडल्यावर समोर स्वामीनारायण मंदिर (*ते प्रसिद्ध*) आहे. ते पाहताना माझी गाडी नसल्यामुळे असहायता दूर झाल्यासारखी वाटली पण त्या गडबडीत नरेंद्र मोदींना खुले आव्हान देणारे हरेन पंडया यांना ठरवून भेटायचे राहून गेले. नंतर मी गुजरातमध्ये गेलो तेव्हा त्यांचा संशयास्पद मृत्यु झालेला होता.

अमेरिकने नरेंद्र मोदींना व्हिसा नाकारला तेव्हा नरेंद्र मोदींना मला त्या संध्याकाळी त्यांच्या घरासमोर अडकल्यासारखे वाटले तसेच वाटले असेल का  गंमत म्हणजे १९९३ साली यंग पोलीटिकल एक्सचेंज कार्यक्रमांतर्गत याच अमेरिकेने तरुण राजकारणी म्हणून मोदींना अमेरिकेत नेले होते. शिवाय २००० साली ग्लोबल व्हिजन २००० या कार्यक्रमांतर्गत वॉशिंग्टन डी. सी. इथे नरेंद्र मोदींनी साठ देशांच्या १००० प्रतिनिधींसमोर भाषणही केले होते  खास पाहुणे म्हणून

आज पुन्हा मोदींविरुद्ध केशुभाई पटेल आणि मंडळींनी बंड केलेय. मोदींचा कमालीचा उग्र हुकूमशाही चेहरा त्यांना आत नकोसा झालाय. वाटतं की, तेव्हा हरेन पंडया हेच तर म्हणत होते. या केशुभाई पटेल, सुरेश महेतांपैकी कुणीच त्यांच्या मागे उभं राहिलं नाही. नंतर तर त्यांचाच जीव गेला.

मला उगाच मोदींच्या निमित्ताने हरेन पंडयाची न झालेली भेट आठवत राहते. काय बोलायचं असेल त्यांना तेव्हा ?

# रामविलास पासवान

**रा**मविलास पासवान यांच्या नावावर तसे अनेक विक्रम जमा आहेत. लोकसभा निवडणुकीत सर्वांत अधिक मताधिक्याने निवडुन येण्याचा विक्रम हा त्यातलाच एक. हा विक्रम थेट ‘ गिनीज बुक ऑफ वर्ल्ड ’ मध्ये नोंदवला गेलाय. रामविलास पासवान हे १९७७ सालापासून आजपर्यंत (*१९८४ ते १९८९ चा काळ सोडल्यास*) सतत लोकसभेवर निवडून आलेले आहेत. म्हणजे आठ वेळा. रामविलास पासवान हे तरुणपणी अहिंसा, लोकशाही या शबदांना पुरेसे सरावलेले नव्हेत. त्यांचा खरा ओढा होता तो नक्षलवादाकडे. सरकारशी सतत

संघर्षात असल्यामुळे त्यांना १९७० साली सात महिन्यांचा तुरुंगवासही भोगावा लागला होता पण त्यांच्या आयुष्यातला हा एकमेव तुरुंगवास नव्हे. नंतर आणीबाणीच्या काळात त्यांना पूर्णकाळ म्हणजे एकोणीस महिने तुरुंगात राहावं लागलं होतं. आणीबाणीचा संपूर्ण काळ हा रामविलास पासवानांसाठी खूप शिकवणारा ठरला. जयप्रकाश नारायण यांच्याशी त्यांचा संबंध आला आणि त्यांची मतं आणि त्यांच्या निष्ठा बदलल्या. अहिंसेचं आयुष्यातलं आणि राजकारणातलं महत्व त्यांनी मान्य केलं. रामविलास हे जयप्रकाशांचे अगदी निकटवर्ती होते. त्यांचा इतिहास हा समाजवादी इतिहास आहे. १९७० साली ते संयुक्त समाजवादी पक्षाचे सहसचिव होते; परंतु जेव्हा आणीबाणी सुरु झाली तेव्हा ते लोकदलाचे सरचिटणीस होते. समाजवादी आंदोलनाचा तेव्हाचा काळ हा भाबडया आणि स्वप्नाळू तत्वांचा काळ होता. रामविलास पासवानांसारख्यांनी त्यात कठोर वास्तव आणले. कारण त्यांना त्याशिवाय पर्यायच नव्हता. लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान वगैरे तरुण त्या काळी जयप्रकाश नारायणांकडे आणि समाजवादी आंदोलनाकडे का वळले याचा विचार नीटपणे केला की लक्षात येतं ते हे की, त्यांना दुसरे पर्याय फारसे उपलब्धच नव्हते.

लालू यादव समाजाचे, पासवान तर दलित. बिहारमधली भयानक जातिव्यवस्था कशी काम करते, याची कल्पना आपल्याला इथे महाराष्ट्रात बसून येणार नाही. कारण बिहारात शाहू महाराज, महात्मा फुले, प्रबोधनकार ठाकरेंसारख्या सत्यशोधकांनी जन्म घ्यावा अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेची मशागतही बिहारमध्ये झालेली नव्हती. ब्राम्हण, राजपूत, कूर्मी, भूमिहार, यादव, दलित वगैरे जातींमध्ये विभागलेल्या समाजात घरातल्या स्त्रीचे नखही कुणाला दृष्टीला न पडणे, हिच प्रतिष्ठेची सर्वोच्च कल्पना मानली जाते. साधं घरातल्या दिराला अंगणात यायचं असेल तर घरातल्या सुनेला त्याच्या अंगावर सावलीही न पडता अंतर्गृहात जाऊन लपावं लागतं. एवढचं काय तर राजपुजाचा घोडा अंगणात लागला तर कनिष्ठ जातीच्या कुटुंबाने असं समजायचं की, त्या घोडयाच्या मालकाला घरातल्या कोणत्या तरी ' स्त्री 'चा भोग घ्यायचा आहे आणि घरातल्या सर्वांनी हसत हसत त्या प्रसंगाचा स्वीकार करायचा. या साऱ्या जातीच्या उतरंडीवरची पासवान यांची जात सर्वांत खालच्या पातळीवर. पासवान हे दलित. बिहारमध्ये दलितांना उच्चवर्णीयांसमोर पायात चप्पल घालण्याचीही

परवानगी नाही, तिथे दलितांचे स्वप्न काय असेल, असा प्रश्न कुणी केला तर त्याला मिळणारे उत्तर धक्कादायक आहे. जातिव्यवस्था म्हणून दलितांना वाटते की, त्यांच्याकडे सुबत्ता, समृद्धी नाही. ती आल्यास तेसुद्धा स्वतःच्या स्त्रियांना पडद्यात आणि घराच्या अंतर्गृहात डांबू शकतील ! अशी व्यवस्था आणि अशी पार्श्वभूमी असलेल्या रामविलास पासवानांना एवढा उत्कर्ष साधून घेण्याचं स्वप्नं पाहणं हे सुद्धा त्या काळात आश्चर्यकारक होतं. मुख्य म्हणजे त्या काळात पाहणं हेसुद्धा त्या काळात आश्चर्यकारक होतं. मुख्य म्हणजे त्या काळात ( *म्हणजे ७० च्या दशकात*) कॉंग्रेस ही राज्यकर्ती होती. संपूर्ण सरंजामी व्यवस्थेला त्याचा पाठिंबा होता. सर्व मस्तवाल सरंजामदार कॉंग्रसच्या सत्तेमागे भक्कमपणे उभे होते. जनसंघाचा फारसा प्रभाव नव्हता. जो प्रभाव होता तो ब्राम्हण आणि उच्चवर्णीयांत. कम्युनिस्टांचं राजकारण थेट नक्षलवादाकडेच घेऊन जाणांर अशा परिस्थितीत भाबडेपणानं वाटलं तरी समाजवादाचं राजकारण हेच पासवान, लालू वगैरेंना सार्यींच होतं. कारण एकीकडे त संविधानात्मक तर होतंच पण दुसरीकडे 'जनेक तोडो ' ( *जानवी तोडा*) वगैरे आंदोलनामुळे आश्वासक उभारी देणारं होतं. राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण वगैरेंच्या हेतूबद्दल कधीच कुणालाशंका नव्हती. त्यांच्या राजकारणात अभाव होता तो व्यवहारवादाचा. खास बिहारी व्यवहारवादाचा. हा बिहारी व्यवहारवाद म्हणजे काय आहे ते आपण जरा समजून घेतलं पाहिले. बिहारमध्ये एखाद्या घराला किवा जातीला प्रतिष्ठा कशाच्या बळावर मिळते तर लाठीच्या जोरावर. एखाद्या घरातून किती लाठया निघतात त्यावर त्या घराची प्रतिष्ठा ठरते. जी गोष्ट घराची, तीच गोष्ट जातीची. लाठी म्हणजे पुरुष. लाठी चालवणारे पुरुष हीच त्या घराची, जातीची प्रतिष्ठा असते. (*त्यामुळे स्त्री जन्म हे घराच्या शोकाचं कारण असतं*) आपली राजकीय प्रतिष्ठा आणि ताकद ही आपल्या लोकांच्या लाठया एकत्र होण्यावर अवलंबून आहे, याची व्यवहारिक जाणीव रामविलास पासवानांसारख्यांनी समाजवादी राजकारणात आणली *( लालू प्रसादांबाबत पण तेच.)* . आपण जेव्हा रामविलास पासवानांकडे बघून 'हे कस करणार बिहारचं हित ' असा विचार करतो तेव्हा आपण हेच लक्षात घेतलं पाहिजे की, ज्या परिस्थितीत रामविलास पासवान काम करत आहेत ती परिस्थिती त्यांनी स्वतः निर्माण केलेली नाहीय. फार तर आपण फक्त एवढंच म्हणू शकतो की, त्या परिस्थितीचा भेद करु शकण्यात त्यांना अपयश आलेलं आहे. रामविलास पासवान यांची महत्वकांक्षा आहे ती देशभरातल्या दलितांचा मसीहा बनण्याची. आज त्यांची लोकजनशकती पार्टी

बिहारचं भवितव्य ठरवण्याच्या उंबरठयावर उभी आहे. केंद्रात अनेकदा महत्वाची मंत्रीपदी भूषविलेले रामविलास पासवान या यशाचा वापर देशभरातल्या दलितांचा नेता बनण्याचा दरवाजा उघण्याकरता वापरतात, का ते लवकरच कळेल.

जामून पासवान आणि सीतादेवी ( *खरं तर सीयादेवी*) या दांपत्याच्या पोटी ५ जूलै १९४६ रोजी जन्माला आलेला हा रामविलास नावाचा मुलगा आयुष्यात इतकं नाव काढेल की बिहारच्या भवितव्याच्या चाव्याच त्याच्या हातात येतील असं त्या माता-पित्याला साक्षात देवाने सांगितलं असतं तरी त्यांना ते पटलं नसतं. कारण बिहारमध्ये दलित आणि स्त्रियांनी स्वप्न साकारण्याची तर दूरच  पण स्वप्नं पाहायचीही सोय नव्हती.

आज रामविलास पासवान यांना नियतीने त्या टप्प्यावर आणून सोडलेले आहे जिथून ते बिहार, दलित, स्त्रिया आणि स्वतःच्या ऐतिहासिक यशाचे दरवाजे किलकिले करु शकतात  पण बिहारमध्ये काय होईल याबाबत महाराष्ट्र बसून अंदाज बांधण चूक आहे. नाहीतरी बिहारी माणूस महाराष्ट्राला पुरुषांचा प्रदेश मानत नाही. कारण ठाऊकाय ? कारण मराठी माणसांच्या स्त्रिया खुलेआम फिरतात म्हणे.

# विलासराव देशमुख

**वि**लासराव देशमुख हे खूप नशीबवान आहेत. राजकारण आणि सिनेमात योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी जन्माला येणं हेच निम्मी यशाची दिशा ठरवते  पण उरलेले ‘ निम्मे ’ मात्र तुम्हाला घालावे लागतात. विलासरसवांनी ते निम्मे आपला हसतमुख चेहरा दुःखी न करता मिळवले हे त्यांचं यश आहे.

विलासराव कॉलेजमध्ये असल्यापासून राजकारणात आहेत. त्यांची राजकीय जीवनाची रेषा सर्वांनाच माहित आहे. कॉलेजचं राजकारण, शंकरराव चव्हाणांचं शिष्यत्व, जिल्हा पातळीवरच्या

राजकारणापासून ते राज्याच्या राजकारणांपर्यंत त्यांनी जी मजल मारली त्यात त्यांच्या कतृत्वाइतकाच त्यांच्या देशमुख असल्याचा आणि कॉंग्रेसमधल्या  मराठा राजकारणाचा वाटा होत. शरद पवारांच्या राजकीय उदयानंतर राज्यभ्र जनसमर्थन आणि लोकनेतेपण न लाभलेले मराठा नेत कॉंग्रेसमधल्या ‘ निष्ठेच्या ’  राजकारणाच्या वळचणीला गेले. शंकरराव चव्हाण हे त्यातलेच एक नेते होत. गांधी कुटुंबावरील निष्ठा हेच त्यांचे प्रमुख भांडवल होते. शरद पवारांच्या स्वयंभूपणाला आवर घालणे व त्यांच्या महत्वाकांक्षांची मुळे मधुनमधून छाटणे, हे त्यांचे प्रमुख काम असे. त्या बदल्यात त्यांना महाराष्ट्रात वतनं आणि जहागिऱ्या देण्यात येत असत.  खुद्द महाराष्ट्राच्या जन समर्थनाशिवाय त्यांचे सत्तेच्या राजकारणात चांगले चालत असे. याचा इथे उल्लेख करण्याचा मुख्य उद्देश विलासरावांचे राजकीय पूर्वसुरी कसे होते, त्याला उजाळा देण्याचा होता. कारण विलासरावांच्या राजकीय प्रवासावर त्याचा खोल ठसा उमटलेला आहे. राजीव गांधींच्या हयातीत शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांच्या विरुद्ध कॉंग्रेसमध्ये एक बंड झालेले होते. ज्या बंडाचा उद्देशच मुळात शरद पवारांना हा ‘ मेसेज ’ देण्याचा होत की तुम्ही गांधी परिवाराच्या मेहेरबानीवर मुख्यमंत्री आहेत, अन्यथं तुम्ही कुणी नाही. या बंडाचे नेते होते विलासराव देशमुख आणि सुशीलकुमार शिंदे ! आता सोनिया गांधीच्या कारकीर्दीत ते दोघेही मुख्यमंत्री झाले हा निव्वळ योगायोग नाही; पण हे होतानाही इतिहासाची अनेक चक्र. फिरलेली होती, पण त्यावर जरा नंतर येऊ.

विलासराव महाराष्ट्रच्या मुख्यमंत्रीपदावर पोहोचले. एकदा नव्हे तर दोनदा. या त्यांच्या यशात त्यांच्या आयुष्यातल्या दारुण अपयशाचा वाटा आहे. १९९५ साली कॉंग्रेसच्या डोक्यावरुन कधीच न माळवळणारा महाराष्ट्रातला सत्तासूर्य मावळला. त्याच काळात विधानसभा निवडणूकीत लातूरमधून विलासरावांना पराभव पत्कारावा लागला. विलासराव तेव्हा बराच काळ सत्तास्थानावर राहिलेले होते आणि अचानक ते साधे आमदारही उरले नव्हते  पण त्याहून भीषण अपयशाची दरी विलासरावांना पाहायचीच होती. पुढे विधान परिषदेच्या निवडणुका जवळ आल्या तेव्हा आमदापदासाठी ‘ उपऱ्या ’ असलेल्या आणि पवारनिष्ठ पराभूत छगन भुजबळांना तिकीट देण्यात आलं. विलासरावांच्या इतक्या वर्षाच्या गांधी परिवाराशी असलेल्या निष्ठा क्षणार्धात कवडीमोल होऊन गेल्या. भुजबळांची उपयुक्तता अधिक बलवान ठरली ! विलासराव इंचाइंचाने अपयशाच्या दरीत फसत चाललेले होते. त्यानंतर त्यांनी कॉंग्रेसमधून बाहेर पडून

अपक्ष म्हणून विधान परिषदेचा अर्ज भरला. सेना-भाजपच्या मदतीने निवडून येण्याचा त्यांचा हा प्रयत्नही फसला. ते इथेही अर्ध्या मताने पराभूत झाले. त्यांच्यासमोर तेव्हा फक्त अंधार होता. विलासरावांना पक्ष नव्हता. मित्र नव्हते, सत्तास्थानं नव्हती. त्यांच्या लातूरमधल्या लोकांनीच त्यांना पराभूत केलेलं होतं. अशा परिस्थितीत न खचता विलासरावांनी आपल्या एकाकीपणाचा उपयोग परिस्थिती समजून घेण्याकरीता केला. त्या काळात बऱ्याचदा विलासराव एकटे बसलेले असत. फार थोडी माणसं त्यांना भेटायला येत. बऱ्याच जणांच्या दृष्टीने त्यांची राजकीय कारकीर्द ‘ डेड एण्ड ’ ला पोहोचलेली होती. शहाणी आणि महत्वकांक्षी माणसं अत्यंत विपरीत परिस्थितीचा वापर आपली समज वाढविण्यासाठी करतात, जी समज त्यांना पुढच्या संघर्षात फार उपयोगी पडते. ती समज असते परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या शक्यता-अशक्यतांचा अचूक अंदाज घेण्याची. अपयशाअगोदरचे विलासराव हे एकदम वेगळे होत. कारण अपयशाच्या काळात विलासरावांनी आपल्याला कुठे पोहोचायचंय आणि परिस्थितीचा अचूक वापर कसा करायचा, याची खोल समज वाढवली आणि हे सर्व त्यांनी स्वभावातला उमेदपणा कमी होऊ न देता केले. नाही तर एवढया भीषण अनुभवाने माणसं किती कडवट होतात त्यांचा मित्र या संकल्पनेवरचा विश्वासच उडतो. विलासरावांच तसं काही झालं नाही याचे पूर्ण गुण त्यांना द्यायलाच हवेत. म्हणूनच या अपयशानंतर पुढच्या तीन-चार वर्षातच महराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सिंहासनावर बसण्याचा अतर्क्य चमत्कार त्यांनी घउवला पण म्हणून इथे विलासरावांची कसोटी आणि परिक्षा संपली नव्हती.

विलासरावांचे असंख्य मित्र आहेत पण त्यांच्यासोबत ‘ हंसो हा जोडा ’ असं म्हटलं जातं *(खर तर म्हटल जात असे असं म्हणायलाच हवं* ) ते सुशीलकुमार शिंदे हे विलासरावांसाठी वेगळाच बार घेऊन आले. ‘ आयुष्यात आपल्याला सगळं कळतंय ’ असं आपल्याला वाटत असतं. यशाचे क्षण जेव्हा येतात तेव्हा नियती आपली चुणूक दाखविण्याकरीता अत्यंत अनपेक्षित कोपऱ्यातून हल्ला करते. या हल्ल्याचा पहिला दणका होता तो विलासरावांना मुख्यमंत्रीपदावरुन हटवून तिथे सुशीलकुमारांना स्थानापन्न करण्यात आले तेव्हा. त्यानंतर विलासरावांना कॉंग्रेसचे सरचिटणीस आणि कर्नाटकचे निरीक्षक वगैरे बनवलं गेलं असलं, तरी तो त्यांच विजनवासच होता आणि त्या विजनवासाला कारणीभूत होता तो ‘ दो हंसो ’मधला एक हंस ! राजकीय अपरिहार्यता म्हणून

इथपर्यंत ठीक होतं ; पण या नव्या मुख्यमंत्र्याकडुन आणि जुन्या मित्राकडून जी कोरडी आणि तटस्थतेची वागणूक या काळात विलासरावांना मिळाली ते पाहून आणि अनुभवून कुणीही माणूस कायमचाच कडवट झाला असता. या प्रसंगातून विलासराव पुन्हा नवीन धडे शिकले पण कडवट मात्र झाले नाहीत. म्हणूनच आंध्रांच्या राज्यपालपदी बसलेल्या आपल्या या मित्राची शान आणि पुरी बडदास्त नव्याने मुख्यमंत्रीपदी बसल्यावर त्यांनी राखली. हैद्राबादपर्यंत सोडण्याकरीता खास विमानही त्यांनी पाठविलं. खरं पाहिलं तर उमदेपणामुळे आणि स्वभावात अजिबात असुरक्षितता नसल्याने विलासरावांनी जेवढी किंमत मोजली, त्यापेक्षाही मोठं वैभव त्यांना प्राप्त झालं. आमदार बहूमताने त्यांना नेता मानून पुन्हा राज्याच्या मुख्यमंत्रीपदी आणतात ते त्यांच्या याच सुरक्षित, विश्वासार्ह, दिलदार आणि उमद्या स्वभावामुळे. आपल्या शंकररावांसारख्या पूर्वसुरींपेक्षा ते नेते म्हणून केव्हाच पुढे निघून गेलेत. जनसमर्थन आणि पक्षातल्या बहुसंख्य आमदारांचं समर्थनही त्यांना लाभलयं. नियतीची करामत म्हणजे त्यांचा पुन्हा एकदा मुकाबला आहे तो खुद्द शरद पवारांशीच. तेही त्यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसशी युती करुन आणि स्वतः पवार प्रत्यक्ष चित्रात नसताना हे त्रांगड विलासराव कसं वाहून नेतात त्यावरच ते या दुसऱ्या इनिंगमध्ये महाराष्ट्रावर किती ठसा उमटवतील ते अवलंबून आहे.

कृपाशंकर सिंहना त्यांची पायरी दाखवून महाराष्ट्राचं स्टीअरिंग झोकात हातात घेणाऱ्या विलासरावांना राष्ट्रवादीचे गिअर वश होतील ? तूर्तास गाडी फर्स्ट गिअरमध्ये आहे म्हणूनच सेफ आहे !

# जे .जयललिता

**ता**मीळनाडूच्या विद्यमान मुख्यमंत्री जे. जयललिता या अत्यंत धाडसी बाई आहेत. त्या तामीळनाडूतल्या सर्वांत महत्वाच्या नेत्या आहेत. त्यांचे नेतृत्व गुण हे निर्विवाद आहेत, हे केवळ माझंच मत नाही तर नुकतंच हेच मत जयललितांचा महत्वाचा विरोधक मानला गेलेल्या रजनीकांतने व्यक्त केलंय. दक्षिणेतला सुपरस्टार रजनीकांत हा डीएमके या करुणानिधींच्या पक्षाचा कट्टर समर्थक मानला जायचा. तो, कमल हसन आणि जयललिता हे नुकतेच एकाच व्यासपीठावर आले. जयललितांना त्या वेळी रजनीकांत शाल पांघरली. या

प्रसंगातून एकच गोष्ट पुन्हा स्पष्ट झाली ती म्हणजे, जयललितांच्या शत्रूंना दोनच प्रकारची गती आहे. ती म्हणजे, त्यांच्या शी हातमिळवणी करणे किंवा नष्टप्राय होऊन जाणे.

जयललितांच्या नावात जो ‘जे ’ आहे तो जयराम या त्यांच्या वडिलांच्या नावाचा परंतु जयललितांच्या आयुष्यावर प्रभाव आहे तो त्यांच्या वडिलांचा नव्हे तर त्यांच्या आई संध्या हिचा. तसं स्वतः जयललितांनाच विचारलं तर त्या त्यांच्या आयुष्यावर तीन माणसांचा प्रभाव असल्याचं सांगतात. एक त्यांची आई संध्या, दोन त्यांच्या शाळेच्या मुख्यध्यापिका मदर सेलिन आणि तीन अर्थातच एम. जी. रामचंद्रन. परंतु या तिघांच्या प्रभावपलिकडेही त्या स्वतःच्या आयुष्याबद्दल जे बोलतात ते सर्वोच्च पदावरच्या एकाकी माणसाचे उद्‌गार वाटतात. जयललिता म्हणतात, ‘ माझ्या आयुष्यातला पहिला एक तृतीयांश कालखंड ही आईच्या प्रभावाखाली गेला. अशा रीतीने आयुष्यातला दोनतृतीयांश कालखंड संपला. आता उरलाय तो फक्त एकतृतीयांश कालखंड. तो कालखंड मी माझ्या पद्धतीने जगू इच्छिते. या काळात मी माझी स्वप्नं आणि ध्येयधोरणं पुरी करु इच्छिते.’

जयललितांचं वय छप्पन वर्षाचं आहे. २४ फेब्रुवारी १९४८ हा त्यांचा जन्मदिवस. गंमत म्हणजे आज ज्या तामीळनाडूच्या त्या सर्वेसर्वा आहेत त्या तामीळनाडूत त्यांचा जन्म झालेलाच नाहीए. त्यांचा जन्म झालाय म्हैसूरमध्ये. सुरुवातीचं त्यांच शिक्षणही बिशप कॉटन गर्ल्स हायस्कुलमध्येच झाल. नंतर प्रेझेंटेशन कॉन्व्हेंट चर्च पार्क या चेन्नईतल्या शाळेत त्या दाखल झाल्या. त्यांनी मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतलेलं आहे. एकदा बोलताना त्या म्हणाल्या ‘ मला वकील व्हायला आवडलं असतं; नव्हे माझं स्वप्नच होतं ’ त्या वकील काही झाल्या नाहीत पण त्यांच्याशी शत्रुत्व घेणाऱ्यांना मात्र प्रथम वकिलाकडे धाव घ्यावी लागतेच.

जे. जयललितांनी आपल्या आयुष्याच्या पूर्वार्धात दक्षिणेकडचा रुपेरी पडदा गाजवला. तिथेही त्यांच यश खूपच कष्टसाध्य होतंच. भरतनाटयम्, मोहिनीअट्टम, कथ्थक, मणिपुरी या चारही नृत्य प्रकारांवर त्यांच जबरदस्त प्रभुत्व आहे.

पण जयललिता हे नावं ऐतिहासक ठरलं ते राजकारणातल्या त्यांच्या प्रवेशामुळे. तामीळनाडूच्या विधानसभेत त्यांनी ‘ मेडन स्पीच ’ दिलं ते १९८२

साली स्वतः एमजी आर त्यांनी त्यांचं कौतुक केलं होतं. १९८४ साली राज्यसभेत त्यांनी ‘ मेडन स्पीच ’ दिल तेव्हा स्वतः इंदिरा गांधींनी त्यांचं कौतुक केलं होतं. राजकारणी लोकांनी हे त्यांच केलेलं कौतुक व्यर्थ नव्हतं, हे देशाने लवकरच अनुभवलं. एमजीआर यांच्या पश्चात त्यांनी पत्नी जानकी यांच्या गटाचा अक्षरशः पालापाचोळा करत जे. जयललिता एमजीआर यांच्या एकमात्र वारस बनल्या. तामीळनाडुच्या विधानसभेत त्यांच्यावर जो हल्ला झाला आणि डीएमकेच्या लोकांनी त्यांचे कपडे फाडले तो दिवस जयललिता आपल्या आयुष्यातला सर्वात काळाकुट्ट दिवस मानतात. तो दिवस त्यांच्या आयुष्यातला निर्णायक दिवसही ठरला, कारण त्या दिवसानंतरच त्यांनी आपल्या विरोधकांना थेट शत्रू मानायला सुरुवात केली आणि शत्रूला कोणत्याही परिस्थितीत माफ करायचं नाही हे सुद्‌धा त्यांनी त्याच दिवशी ठरवलं. वाटेल ती किंमत देऊन विरोधाचं उठणारं प्रत्येक बोट छाटून टाकायचं हे जयललितांनी त्याच दिवशी ठरवलं.

जयललितांना, तुम्ही कुणाला शत्रु मानता असं विचारलं तर त्या दिवसानंतर त्या क्षणभरही विचार न करता सांगतात, ‘करुणानिधींना’ ;  परंतु जयललिता आपल्या शत्रू आहेत असं मानणाऱ्यांची यादी मात्र इतकी मोठी आहे की ती वाचूनही आपल्याला स्तिमित व्हायला होतं. ज्या यादीत करुणानिधी आहेत, मुरासोली मारन होती. बायको आहेत वीरप्पन हातेता, ज्याला अख्खं जग चळाचळा कापतं तो वेलापिल्लई प्रभाकरनही आहे. यातली सर्वांत थक्क करणारी बाब ही की, जयललितांनी आपल्या प्रत्येक शत्रूवर कधी ना कधी मर्मघातक प्रहार केलेला आहे. करुणानिधींना कायद्याचा दणका देऊन उचलून नेलं अन् जेलमध्ये बंद केलं. मरासोली मारनला तर सावरता येणार नाही असे शारीरिक दणके दिले. वीरप्पन खलासच केला. प्रभाकरनच्या  लिट्टे ला तामीळनाडूतून जवळजवळ उखडूनच टाकलं. राहता राहिले वायको. त्यांची दशा काय सांगावी  एनडीए सरकारमधले ते घटकपक्ष होते. त्यांच्यापक्षाचा मंत्री केंद्रात होता वाजपेयी-अडवाणी यांच्या टेबलाला टेबल लावून वायको मीटिंगा करत. एनडीएचं केंद्रांत सुवर्णयुग होतं. अशा काळात वायको यांना जयललितांनी ‘ पोटा ’ खाली तुरुंगात टाकलं लिट्टेशी संबंध असल्याचा आरोप ठेवून आज जे लालकृष्ण आडवाणी  कांचीच्या शंकराचार्यांच्या अटकेनंतर साधूसंतांच्या पाया पडत  आणि प्रेससमोर बोलबच्चन देत फिरताहेत, ते आडवाणी तेव्हा केंद्रात साक्षात गृहमंत्री आणि उपपंतप्रधान होते. आज आडवाणी केंद्राने शंकराचार्याच्या

अटकेत हस्तक्षेप करावा म्हणून मारे  टारझन बनलेत पण तेव्हा त्यांचं सरकार ज्या पक्षांच्या पाठिंब्यावर उभं होतं, त्यातल्याच एका पक्षाच्या नेत्याला याच जयललितांनी तुरुंगात डांबल तरं आडवाणी-वाजपेयी जयललितांची एक काडीसुद्धा इकडची तिकडे करु शकले नाहीत. वायको सुटले ते आडवाणी आणि त्यांचे सरकार खुर्चीवरुन गेल्यावर. संघ परिवार आणि भाजपचा हा वकूब, ताकद आणि पोकळपणा त्या वेळीच जयललितांनी अचूक जोखला. कारण त्याही एकेकाळी एनडीएच्या घअक होत्या आणि त्यांची मनधरणी करायला अशोक सिंघलच्या भाषेत इसाई असलेले जॉर्ज फर्नांडिस जात असत.

खरं तर जयललिता स्वतः उच्चवर्णीय ब्राम्हण आहेत; पण तरीही त्यांनी कांची पीठाच्या शंकराचार्यांना अटक होऊ दिली. कारण जयललितांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या व्यवस्थेत पोलादीपणी आणणे हे आपले जीवनकर्तव्यच मानलेले आहे. जयललितांवर भ्रष्टाचाराचे असंख्य आरोप झाले तरीही गृहमंत्रालयातल्या बढत्या-बदल्यांसाठी त्यांच्या सरकारातल्या कुणी पैसे घेतलेत आणि मंत्री सुटून स्कॅंडलमध्ये पोलीस अधिकारी तुरुंगात गेलेत, असं कधीच झालेल नाही.

जयललितांच्या या पोलादीपणामुळे आणि तामीळाभिमामुळेच उत्तर भारतीय नेते आणि झुंडी तामीळनाडूबाहेर राहून  भले त्यांच्याविरोधी बोलोत  पण तामीळनाडूत जाण्याचं धैर्य करत नाहीत. कारण जयललितांची भुवई वक्र झाली की, जेलमधून बाहेर पडणं कठीण ! आधी वायकोंनी हा अनुभव घेतलाय, आता शंकराचार्यही घेत आहेत.

जे. जयललितांना जवळची माणसं प्रेमाने ‘ अम्मू ’ म्हणतात. मला नेहमी वाटतं की, महाराष्ट्रालाही एखादी अशी ‘ अम्मू ’ लाभायला हवी होती.

# मायावती

**ज्य**ा दिवशी मायावती पहित्यांदा मुख्यमंत्री झाल्या तो दिवस देशभराच्या दलितांसाठी ऐतिहासिक होता. साक्षत् उत्तर प्रदेशाच्या मुख्यमंत्रीपदावर एक दलित महिला बसणे हे २० वर्षापूर्वी तद्दन एक अशक्य स्वप्न होतं. दलित पुरुषही त्या सिंहासनाचं स्वप्न बघू शकत नव्हता, तर स्त्रीची बातच सोडा.

मायावती या जाट व जातीच्या, म्हणजे चांभार. १५ जानेवारी १९५६ हा त्यांचा जन्मदिवस. बिजनोरीमध्ये त्यांचा जन्म झाला आताचे बादलपूर, जिल्हा गाझियाबाद. ऐंशीच्या दशकात त्या राजकारणात आल्या. साधारणतः वयाच्या

चोवीस-पंचविसाव्या वर्षी. त्यांच घर काही धनिक नव्हे. पुन्हा घरात तशी पुरुषप्रधान संस्कृती. मुलीच्या कर्तृतवापेक्षा मुलांच्या कर्तृत्वावर वडिलांचा जास्त विश्वास. ही गोष्ट मायावतींना बहूधा खूपच सलत असावी. त्या स्वतःच्या वडिलांचा उल्लेख करताना ' मेरा बाप ' असा करतात; पण कांशीरामांचा उल्लेख करताना मा. श्री. कांशीराम असा.

मुख्यमंत्री झाल्यावर मायावतींनी घरासमोरुन गावात चांगला रस्ता तयार करुन घेतला आणि वडिलांना ' मुलगी ही मुलांपेक्षा कर्तृत्ववान असू शकते हे पटलं ना ? ' असा थेट प्रश्नही केला. हा किस्सा मी खुद्द मायावतींकडूनच ऐकलेला आहे घरामध्ये मुलींच्या वाटयाला येणारी अतीव मेहनतीची आणि त्रासदायक कामं त्यांना करावी लागत. उत्तर प्रदेशासारख्या आत्यंतिक जातीयवाद राज्यात एका मागासवर्गीय घरातली एक मुलगी. तिला काय स्वरुपाची स्वप्नं पडत असतील ? आणि आयुष्यात आपलं काय होईल असं तेव्हा वाटत असेल ? आज-काल साध्या, फारशा देखण्या नसलेल्या मुलींच्या जीवनावर ' जस्सी ' सारख्या मालिका लोकांना फार आवडताहेत. वास्तवात या मालिकांमध्ये साधेपणा आणि सर्वसाधारण असणं हे मंदबुद्धी असल्याशी जोडलं जातयं. ही शुद्ध विकृती आहे. वास्तवात अशा सर्वसाधारण दिसणाऱ्या मुलींची नाटयमय कहाणी चित्रित करायची झाली तर मायावतींएवढं उत्तम उदाहण दुसरं आढळण मुष्कील.

मायावतींनी कायद्याच पदव्युत्तर शिक्षण दिल्ली विश्वविद्यालयातून घेतलंय, हे शिक्षण साक्षात दिल्ली युनिव्हर्सिटीचं असल्यामुळे उत्तर प्रदेशात डिग्ऱ्या काय सहज मिळतात, असं म्हणणाऱ्यांना फारसा वाव उरत नाही.

याच काळात मायावती बामसेफ आणि बी एस फोरचे संस्थापक नेते कांशीराम यांच्या संपर्कात आल्या. त्या काळात ' बी एस फोर ' ची घोषणा होती. ब्राम्हण, बनिया, ठाकुर चोर बाकी सब है बी एस फोर ! मायावतींनी राजकारणातली सुरुवात अशाच विषारी भाषणांनी केली. महात्मा गांधीबद्दल विषारी उद्गार काढल्यामुळे त्यांचं देशभर नाव गेलं. मिडिया त्यांची दखल घेतो म्हटल्यावर मायावतींनी अशा धडाकेबाज भाषणांचा सपाटाच लावला पण मायावतींची खरी राष्ट्रीय छबी झाली ती अकबरपूरमधून निवडून आल्यावर. त्या थेट लोकसभेतच गेल्या.

कांशीराम यांनी दलित राजकारणाची देशातली दिशाच बदलून टाकली. सुरुवातीला सरकारी कर्मचाऱ्यांची आणि दलितांमधल्या इंटेलक्युअलची

संघटना बांधली. नंतर बहूजन समाज पार्टी १९९८ साली बहूजन समाज पक्षाच्या लोकसभेत चार जागा होत्या. १९९९ साली त्या १४ झाल्या. लक्षात घ्या, या जागा शरद पवारांच्या राष्ट्रवाही पक्षाच्या आजच्या जागांपेक्षाही जास्त आहेत ! बहूजन समाज पक्षाची संपूर्ण कार्यपद्धती द्वेष आणि घृणा यांच्या खांबावर उभी होती पण म्हणून समाजात त्यांनी द्वैत निर्माण केलं असं म्हणता येणार नाही. जे द्वैत समाजात होतं त्याचा त्यांनी फायदा घेतला असं फारतर म्हणता येईल. ‘ तिलक, तराजू और तलवार, इनको मारो जुते चार ’ ही घोषणा जरी मायावती उच्चारत असल्या तरीही हजारो वर्षे पिचून आणि पिळून निघालेल्या हिंदुस्थानातल्या दलितवर्गाची आक्रमक आकांक्षाच त्या बोलून दाखवत असतात. शेकडो वर्षे उच्चवर्णीय हिंदू आणि स्त्रियांच्या दमनामुळे जो विखार मायावतींमध्ये निर्माण झालेला आहे तो त्यांच्या व्यक्तिमत्वामुळे दिसतो, त्या तो तापवण्याचा प्रयत्नही करत नाहीत.

१९७७ चा जनता पक्षाचा प्रयोग फसल्यावर लोहियावादी, समाजवादी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा धीर सुटला. त्यातूनच या तीनही प्रवृत्तीच्या *(‘ तत्वज्ञानाच्या ’ असा शब्द मी मुद्दामच वापरलेला नाहीय* !) नेत्यांनी सत्तेचे नागडे राजकारण देशभर सुरु केले. साध्यसाधनशुचितेला एकदा आणि कायमचीच रजा देऊन आपला खरा चेहरा लोकांसमोर आणला. मायावती आणि त्यांच्या बहूजन समाज पक्षाने या गोष्टीचा अचूक फायदा उठवला. खरंतर स्वतःच्या वर्गाचे आणि पक्षाचे आदिशत्रू असणाऱ्या समाजवादी पार्टी आणि भारतीय जनता पक्ष यांच्या सहकार्याने मायावती त्यामुळेच उत्तर प्रदेशात पुनःपुन्हा सत्ताधारी होऊ शकल्या.

समाजवादी पक्ष आणि भारतीय जनता पक्ष यांच्या सत्तेच्या अनिवार लालसेमुळेच युती करुन अथवा विरोध करुन अनेकदा त्यांना मायावतींसमोर गुढघे टेकायला लागलेले आहेत.

मायावतींचे अनेक अनुयायी, बेहनजी (*म्हणजे मायावती*) स्वतःच्या टर्मस्‌वर राजकारण करतात असं म्हणतात ते काही खोटं म्हणता येणार नाही.

आतापर्यंत तीनदा मुख्यमंत्री बनलेल्या आणि तूर्तास खासदार असलेल्या मायावतींच्या तोंडात म. फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकारांची नावे असतात आणि ही प्रेरणा खोटी नाही. मायावतींच्या शयनगृहात त्या झोपतात त्या

पलंगाच्या वर टेबलावर डॉ. बाबासाहेब आंबेडकारांचा सोन्याचा पुतळा ठेवलेला आहे. तिथे सहसा कुणी जात नाही.

त्यामुळे ते दिखाऊ नाही ! मायावतींच अजून एक वैशिष्ट आहे. खरंतर हिंदुस्थानातल्या दोन व्यक्तींच ते वैशिष्य आहे. सहारा परिवाराच्या सुब्रोतोंच्या मुलाच लग्न होतं. तेव्हा तिथे  देशातल्या सर्व प्रसिद्ध व्यक्ती शुभेच्छा द्यायला येऊन गेल्या. अफवाद दोन व्यक्तींचा होता. दोन्ही व्यक्ती पुरुष नव्हत्या आणि उच्चवर्णीय हिंदू नव्हत्या. पहिल्या सोनिया गांधी. दुसऱ्या मायावती !

# आर.आर. पाटील (आबा)

**ता**सगावात विधानसभेची निवडणूक फारच अटीतटीची झाली. आर. आर. पाटील हे गृहमंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रसचे अध्यक्ष असतानाही त्यांना पुन्हा आमदार होण्यसाठी कडवी झुंज द्यावी लागली. इतर कुणीही राजकारणी असता तर ही बाब त्याचा दोष म्हणून पाहिली गेली असती पण आर. आर. पाटलांबाबत आपण तसं बघू शकत नाही. कारण रुढार्थाने आर. आर. पाटील हे राजकारणी नाहीत.

राजकारणात ‘ पेटी ’ आणि ‘ खोक्यांशिवाय ’ चालत नाही. माणूस राजकारणात साधा नगरसेवक झाला की

त्यांच्या ‘ चंद्रमोळी ’ वर सोन्याची कौलं चढू लागतात, वगैरे सर्व नियमांना आर. आर. पाटील अपवाद ठरत गेले. शिक्षण क्षेत्रातल्या अशाच एका पाटलांच्या शाळेत आर. आर. पाटील श्रमदान करुन शिकले. स्वकष्टाचं अन्न खात शिकण्याचा अनुभव घेताना आर. आर. पाटीलांच्या रक्तात फक्त स्वकष्टाच खाणं भिनत गेलं. वसंतदादा पाटलांनी पहिल्यांदा त्यांच्या पाठीवर हात ठेवला. त्या काळात कुणालाही वाटलं नसेल की हा एका लोकनेत्याने दुसऱ्या लोकनेत्याच्या पाठीवर ठेवलेला हात आहे. पुढे आर. आर. पाटील आयुष्यात कडवा संघर्ष करुन यशाच्या एकेक पायऱ्या चढत गेले. त्यांच्या यशाची खरी झळाळी लोकांना दिसली ती ते ग्रामविकास मंत्री झाल्यावर ग्रामविकास मंत्री म्हणून त्यांनी असं काही काम केलं की, ग्रामविकास खात्यासारख्या अडगळीत पडलेल्या खात्याला ग्लॅमर प्राप्त झालयं. आज अनेक जन ग्रामविकास खात्याच्या पोर्टफोलिओसाठी इच्छुक आहेत. त्याचं श्रेय शंभर टक्के आर. आर. पाटील यांना जातं. पुढे गृहमंत्रीपदापर्यंतचा त्यांचा प्रवास आणि त्याचा इतिहास सर्वांनाच माहित आहे; परंतु त्यातही त्यांनी स्त्रियांवर दाखवलेला विश्वास आणि काहीही भन्नाट विधानं न करता स्त्रियांकरीता केलेलं मूलभूत काम इतर कुणीही ‘ राजकारणी ’ करु शकला नाही. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्री पदाधिकाऱ्यांवर अविश्वास ठराव आणण्याकरीता लागणाऱ्या बहुमताची ताकद दोनतृतीयांशवरुन तीनचतुर्थांशावर नेली. झेंडावंदनासाठी स्त्री पदाधिकाऱ्यांना वंदन करणे जवळजवळ सक्तीचे करुन त्यांच्या अधिकारपदाचा ‘ मेसेज ’ सर्वांपर्यंत पोहोचेल याची काळजी घेतली. शिवाय गृहमंत्री झाल्यावरही मीरा बोरवणकर या महिलेवरच त्यांनी विश्वास दाखवला. न बोलता महिलांसाठी एवढं काम क्वचित कुणा मंत्र्याने केलेलं असेल. या शिवाय हे सारं करत असताना तासगावातलं आर. आर. पाटीलांच घर तसंच अस्ताव्यस्त राहिलं. त्यावर काही सोन्याची कौलं चढली नाहीत. शिवाय आर. आर. पाटीलांची तिन्ही मुलं जिल्हा परिषदेच्या शाळेत जात राहिती. राज्याच्या गृहमंत्र्यांची मुलं ही जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकतात ही राज्याला, जिल्हा परिषदांच्या शाळांना आणि त्या शाळांत जाणाऱ्या इतर मुलांना किती दिलासादायक गोष्ट आहे. नाहीतर ज्या देशात आपण राहतो त्या देशाचे आरोग्यमंत्रीच स्वतःवर उपचार करुन घ्यायला परदेशात जाणार.

आर. आर. पाटीलांना त्यांच्या जवळची ( *व आता त्यांच्या जवळ जाऊ पाहणारी*) माणसं प्रेमाने ‘ आबा ’ म्हणतात. तासगावच्या आबा पाटलांच्या मागे त्यांच्या चांगुलपणाची आणि सत्कर्माची पुण्याई आहे. तशीच शरद पवार

आणि अजित पवार यांच्यावाच्या विश्वासाचीही पुण्याई आहेच. कारण आबा पाटलांच्या मागे मिडिया नेहमीच ठामपणे उभा राहिला. त्या अर्थाने ने त्यांचं सामर्थ आहे पण भुजबळांनंतर गृहमंत्री झाल्यावर स्वतःच्या स्वच्छ प्रतिमेने जरी गृहखात्याची प्रतिमा आबा पाटीलांनी स्वच्छ केली तरी मिडियातल्या काही ‘ पूर्वनिष्ठवंतांना ’ स्वतःबरोबर ठेवूनही आबा पाटील स्वच्छतेचे महत्व पटवून देऊ शकले नाहीत. त्यामुळेच ऐन निवडणुकीनंतर त्यांनी पाटलांचा ‘ कात्रज ’ करण्याचा प्रयत्न केला ‘ आबा पाटीलांची प्रतिमा (*भुजबळांपेक्षा नव्हे तर*) पवारांपेक्षा स्वच्छ आहे ’ असा पध्दतशीर प्रचार सुरु झाला. अशा वेळी हलक्या कानांचे नेतृत्व असते हर त्याने आबा पाटीलांचे पंखच कापले असते. परंतु तसे झाले नाही. याचे श्रेय पवारांच्या शहापणाला द्यावे लागेल.

गंमत म्हणजे शरद पवारांनी त्यांच्या तरुणपणी ज्या ज्या क्षेत्रात स्वतःची प्रतिमा निर्माण केली होती. त्या त्या क्षेत्रात तासगावच्या आबा पाटीलांनी आपली नेमकी प्रतिमा निर्माण केलीय. त्या काळातले दिग्गज एस. एम. जोशी, यशवंतराव चव्हाण वगैरे मंडळी पवारांवर लट्टु होती. पवार महाराष्ट्रात फुले-आंबेडकरांच्या विचारांचे वारसदार ठरणार, असे जवळजवळ भाकीत होते. महिलांसंबंधी पवारांची प्रतिमा अतिशय पुरोगामी होती. मिडिया तर त्या काळात पवरांना ‘ दिल दे चुका थे ’ ! नेमक हेच आणि असंच आज आबा पाटलांबाबत घडतंय. पुढे पवारांचं आणि त्यांच्या प्रतिमेचे जे झालं तो इतिहास आहे. तो इतिहास सोडून देऊन आणि आपल्या कथानायकाकडे वळूया.

आबा पाटीलांची खरी लढाई आता सुरु होईल. स्वतःवर आत्यंतिक प्रेम करणाऱ्या भुजबळांपासून ते स्वतःच्या अकलूजच्या सम्राज्यापलीकडे आणि महसूल खात्यापलीकडे काहीही न सुचणाऱ्या विजयसिंह मोहिते-पाटलांना त्यांनी पहिल्या फेरीत हरवलेलं असलं तरी या पक्षांतर्गत विरोधकांच्या महत्वकांक्षा आबांनी सहजी सुखी होऊ देणार नाहीत. जसजसे वास्तविक राजकारणातल्या धुमश्चक्रीत आबा आत खोलवर जाऊ लागतील, तसतसे त्यांना अण्णा हजारे, चंद्रशेखर धर्माधिकारी, मेधा पाटकर वगैरेच्या शून्य उपयोगाचे साक्षात्कार होतील. रिबेरो, हजारे, धर्माधिकारी, पाटकर वगैरे माणसं शोभेची दारु म्हणून ठीक असतात. वास्तिविक दारु *(युद्धाची; प्यायची नव्हे)* त्यांच्यात असती तर त्यांनीच राजकारण करुन समाज बदलवला असता हे जाणवण्याची आणि मीडिया हा कुणाचाच निष्ठावंत असत नाही हे जाणण्याची वेळ एकच असेल.

मिडिया आज आबा पाटीलांना डोक्यावर घेतो आहे. कारण आबा पाटीलांची सचोटी आणि स्वच्छ प्रतिमा ही मिडियाला 'स्टोरी' म्हणून आवश्यक आहे. वेळ पडली की मिडिया त्या प्रतिमेचे तुकडे करुन त्याचीही 'स्टोरी' करेल महत्वांच म्हणजे ज्या युद्धात आर. आर. उर्फ आबा पाटील पडलेले आहेत त्यात हे सार अटळ आहे. हे सारं त्यांना किंवा कुणालाच टाळता येणार नाही.

राजकारणातल्या या ऐन मध्यान्हीच्या लढाईला जेव्हा तोंड फुटेल ( *आणि ते फुटेलच*) तेव्हा स्वच्छ प्रतिमा मिडियाचा आधार, शोभेची दारु असलेली माणसं या साऱ्यांपेक्षा स्वतः तलवार उपसून गिलच्यांच्या गर्दीत घुसून किती पराक्रमाची शर्थ करता येते यावरच लढाईचा निकाल अवलंबून असतो. तिथे बरोबर -चूक, नैतिक-अनैतिक, योग्य-अयोग्य अशी तुलना नसतेच. तिथे फक्त विजय किंवा पराभव असतो आणि जरी विजय मिळाला तरी त्यानंतर एक तह असतो, ज्यातही फक्त विजय किंवा पराभव असतो.

हसताना किंचित खटयाळ लहान मुलांसारख्या दिसणाऱ्या या सज्जन, सचोटीच्या आणि प्रेमळ अशा तासगावच्या आबा पाटलांवर ऐन मध्यान्हीच्या लढाईसाठी आपण मनापासून शुभच्छा देऊया. तूर्तास आपण तेवढेच करु शकतो.

# फॅमिली

# सर इंदिरा

**दे**वकांत बारुआ नावाच्या आत विस्मृतीत गेलेल्या ‘ कॉंग्रेसमन ’ ने एक घोषणा दिलेली होती – ‘ इंदिरा इज इंडिया ’ कॉंग्रेसजनांची ‘ जी हुजूर ’ करण्याची खास स्टाईल म्हणून या घोषणेकडे दुर्लक्ष करायचं ठरवलं तरीही इंदिरा गांधी हयात असताना ‘ बाई बोले अन् देश हाले ’ अशीच परिस्थिती होती. अगदी इंदिरा गांधी पराभूत झाल्यावरही विरोधी पक्षांचा सारा भर इंदिरा गांधी या एकाच व्यक्तीला धडा शिकवण्याकडे होता.

१९७१ चं पाकिस्तान विरुद्धचं युद्ध जिंकल्यावर इंदिरा गांधीना स्वतःच्या आतला आवाज सापडला, असं म्हटलं जातं; पण हे

खरं नव्हे. कारण असं जर असेल तर अमेरिकेच्या इच्छेविरुद्ध पाकिस्तान विरुद्ध उभं राहून लढा देण्यासाठीचा जो आत्मविश्वास लागतो, तो त्यांच्यात कुठून आला ?

इंदिरा गांधीचं बालपण आणि तारुण्य तुलनेनं एककीपण गेलं. त्यात बालपणी त्यांनी आपल्या आईचा, नेहरु कुटुंबात होणारा मानसिक कोंडमारा अनुभवला होता. वास्तिविक कमला नेहरु या स्वतंत्र प्रज्ञेच्या बाई होत्या.

परंतु आपल्या देशात खानदानाचं नाव खूप मोठं असेल तर त्या खानदानात येणारी सून कितीही गुणी आणि कर्तबगार असेल तरीही तिला खानदानाच्या नावाखाली दबवून टाकण्यात येतं. कमला नेहरुंच नेमकं तसचं झालं हे करण्यात तिच्या नणंदांचा (म्हणजे इंदिराबाईंच्या आत्यांचा ) मोठा वाटा होता. विजयालक्ष्मी पंडित यांचं नाव या संदर्भात घेण्यात येतं. आईचा झालेला हा कोंडमारा इंदिरा गांधींनी पाहिला, अनुभवला आणि त्यांचचं व्यक्तिमत्व खूपच बदलून गेलं. सर्व बाजूंनी कोडमारा झाल्यावर इंदिरा गांधी फणा काढून उठत आणि कडकडून दंश करीत, हे त्यांच्या बालपणीच्या अनुभवातून काढलेल्या निष्कर्षावर आधारलेलं होतं. त्यांनी आपल्या आत्याला कधीही माफ केलं नाही. या गुंतागुंतीच्या व्यक्तित्वाचा देशाच्या भवितव्यावर दूरगामी परिणाम झाला.

संघटना कॉंग्रसविरुद्ध बड, राष्ट्रपतीपदासाठी स्वतःचा उमेदवार उभा करणं, आणीबाणी जाहिर करणं ती आश्चर्यकारारीतीने मागे घेणं, मुदतपूर्व निवडणुका घेणं, घटनादुरुस्ती करुन निवडणुका पुढे ढकलण, पाकिस्तानाबरोबर युद्ध पुकारण, सुवर्णमंदिरात सेना घुसवणं असे असंख्य निर्णय इंदिरा गांधींनी पुरी कोडी झाल्याच्या क्षणी घेतलेले आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात दिल्लीच्या केंद्रीय सरकारने इतके धक्कादायक आणि इतके गरगरणारे निर्णय त्याअगोदर आणि त्यानंतर आजपर्यंत कधीही घेतलेले नाहीत, हेही लक्षात घेण्याजोगं आहे.

इंदिरा गांधीच्या असुरक्षितपणाचा आणि सूडबुद्धीचा देशाला जसा आश्चर्यकारक फायदा झाला तसंच त्याचं नुकसानही देशाला कायमचं भोगावं लागणार आहे. एक म्हणजे नेहरुंच्याद काळात एक उदारमतवादी आणि वैचारिक परंपरा देशात रुजू पाहत होती. देशातील असंख्य बुद्धिवंत, विचारवंत, साहित्यिक, कवी एकत्र येऊन देश घडविण्याची स्वप्ने बघत होते. इंदिरा गांधीनी ती उदारमतवादी परंपराच मोडीत काढली. कॉंग्रेसपक्षातील साध्यसाधनशुचिता संपुष्टात आली तीही इंदिरा गांधीच्याच काळात. सत्त्तेच विकेंद्रीकरण होण्याची शक्यताही इंदिरा गांधीनी नष्ट करुन टाकली. राज्याचा मुख्यमंत्री हा केंद्राचा कारकून असावा. एवढं त्यांचं पंतप्रधानांच्या कार्यालयातून अवमूल्यन करण्यात आलं. निवडून येणं ही एकच

योग्यता माणसाला महत्व देती झाली. त्यामुळे भ्रष्टाचारला ऊत आला. सर्वात महत्वाचं म्हणजे इंदिरा गांधींनी पुढे संजय गांधी आणि राजीव गांधी यांचं नेतृत्व पुढे आणण्याकरीता कॉंग्रेसमध्यल्या शक्यता असणाऱ्या चांगल्या नेत्यांचे पंख कापले. त्यांना घेरुन टाकलं. दुर्बल आणि दुबळं बनवलं. त्यामुळे कॉंगेसच्या विनाशाची बीजचं रुजत घातली गेली. संजय आणि राजीव यांच्या आयुष्याची दोरी इंदिरा गांधीच्या हातात नव्हती. ते दोघेही अकाली गेले आणि मग कॉंगेसची मृत्युघंटाच वाजली. चांगलं नेतृत्व कॉंगेसकडे नव्हत. नेहरु घराण्याव्यतिकरक्त जगण्याची कॉंगेसला सवयच नव्हती. कॉंगेस थेट आयसीसीयुमध्येच गेली.

तरीही इंदिरा गांधी या हिंदुस्थानातल्या एक श्रेष्ठतम नेत्या होत्या. पाकिस्तानच्या सीमेवर लघुशंका करायची झाली तरीही तीनदा अमेरिकेला जाऊन तीनतीनदा करंगळी दाखवून बुश आणि कॉलिन पॉवेलच्या नाकदुऱ्या काढणाऱ्या आजच्या नेतृत्वापुढे इंदिरा गांधी म्हणजे साक्षात दुर्गाच होत्या ! त्यांनी हेन्री किसिंजसारख्या श्रेष्ठ मुत्सदयालाही धोबीपछाड टाकला आणि निक्सनसारख्या अमेरिकेच्या बलवान अध्यक्षाच्या राजनैतिक अधिकाऱ्यांनी 'आपणास काय संबोधावे ?' असा खोडसाळ प्रश्न विचारला असता 'माझे सहकारी मला "सर" असे संबोधतात' असे थेट उत्तर दिले. असे आरपार उत्तर एखादा श्रेष्ठतम नेताच देऊ जाणे. आता रोजच एच. एम. व्ही. ची पिन तुटल्यावर जसे आरपार, आरपार असे शब्द ऐकायला लागावेत तसे ऐकताना हे श्रेष्ठतव खूपच जाणवतं. आज जी देशात हरितक्रांती वा श्वेतक्रांती झालेली दिसते त्याची बीजंही इंदिरा गांधींनीच रुजवली.

आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात त्यांच्या आयुष्यात बरेच तांत्रिक-मांत्रिक प्रवेश करते झाले. एकाकी असुरक्षित वाटणं साऱ्या सीमा ओलांडू लागलं. शत्रू आपल्या विरुद्ध कट करताहेत असं त्यांना सारखं वाटू लागलं. कदाचित शेजारच्या मुजिबूर रहमानचं उदाहरण त्यांच्या डोळयांसमोर असेल. शेवटी अमेरिकेविरुद्ध ठामपणे उभं राहण्यामुळेच त्यांचा बळी घेण्यात आला. निमित्त फक्त खलिस्तानचं होतं. 'डेरिव्हिटिव्हज ऑफ असॅसिनेशन' नावाच्या (*नंतर गायब झालेल्या*) पुस्तकात हे इंदिरा-मृत्युचे धागे-दोरे आलेले आहेत. उपखंडातला विरोध करणारा स्वाभिमानी नेता नाहीसा करुन टाकणे, हे अमेरिकेचं धोरणच आहे.

इंदिरा गांधीच्या मृत्यूनंतर वीस वर्षांनी जाणवतंय ते त्यांच द्रष्टेपण. आणीबाणीत त्यांनी मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादवसहित अनेकांना तुरुंगात डांबलं होतं. आता इच्छा असूनही ते कुणाला शक्य नाहीए. जनता पक्षाच्या काळात एक कोर्ट केस आटोपून परत जाताना जॉर्ज फर्नांडिसांच्या हाताची सावली त्यांच्या गाडीवर पडली तर त्या म्हणाल्या 'अरे हा पहा सैतानाचा हात !'

# सोनिया फॅक्टर

**सो**निया गांधी या इटालियन कुटुंबात जन्मल्या. त्यांचं माहेरचं नाव सोनिया मायनो. इटलीत मुसोलिनी सर्वसत्ताधीश असताना सोनिया गांधींचे वडील मुसोलिनीच्या फॅसिस्ट पक्षाचे सदस्य होते, असं म्हणतात. त्यांच्या घरात मुसोलिनीचा फोटो त्या काळात लावण्याची पद्धत असणार. त्या अर्थाने सर्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते ज्येष्ठ गुरुबंधूच ! कारण संधाचे स्वयंसेवक ज्या गोळवलकर गुरुजींचे फोटो आज भिंतीवर लावतात, त्या गोळवलकर गुरुजींनीचा मुसोलिनीच्या फॅसिस्ट संघटनेचं कौतुक करुन त्याचा आदर्श ठेवण्याची.

संकल्पना सतत संघसमोर मांडली. त्या अर्थाने संघाला आता खरंतर आनंदच व्हायला हवा. कारण ज्या विदेशी तत्वज्ञानाच्या आधारावर संघाचा बीजकल्पना फोफावली त्याचा आता हिंदुस्थानाशी थेट संबंधच येतोय !

पण संघ परिवार आणि सुषमा-उमा गोविंदाचार्य यांना सोनिया गांधीनी खरी शिकवण दिली ती निष्काम कर्मयोगाची ! राष्ट्रवादाचं पान चघळत निष्काम कर्म-योगाच्या चुळा देशभर टाकणाऱ्या रा. स्व. संघ, भाजप नेत्यांना पंतप्रधानपद नाकारुन सोनिया गांधींनी एकदम पुनश्च हरिओम करायला लावलंय. सोनियांच्या या गुगलीने त्यांना निष्काम कर्मयोग तर शिकविलाच पण त्यांच्या सर्व आततायी पुढारी अन् पुढारणींना एकदम बूचबंद बाटलीत बंद केलं आहे.

लिहून दिलेली हिंदी भाषणं वाचण्यापासून ते आज हिंदुस्थानी माणसांशी थेट संवाद साधण्यापर्यंत सहा वर्षात सोनिया गांधीनी स्वतःवर छिन्नीचे घाव घालून जी प्रगती साधली, ती कोणत्याही पूर्वग्रहरहित आणि बिनविषारी माणसाला थक्क करणारीच वाटेल.

मात्र सोनिया गांधींचा हिंदुस्थानी राजकारणातल्या देदीप्यामान विजय हा हिंदुस्थानी जनतेच्या एतद्देशीय नेत्यांबद्दलच्या दुःख, संताप, अश्रू आणि आक्रोशाचा परिपाक आहे. हिंदुस्थानातले अस्सल स्वदेशी राजकीय सरंजामदार नेत जनतेला चरकात घालून पिळताना जनतेबाबत ही आपलीच स्वदेशी जनता आहे, असा तरतम भाव करत नाहीत, असाच जनतेच्या गेल्या ५६ वर्षाचा अनुभव आहे. सोनिया गांधीच्या पूर्वकतृत्वापेक्षाही जनतेच्या या आक्रोशानेच सोनिया गांधीच्या यशाला जन्म दिलेला आहे.

जनतेला सोनिया गांधीबद्दल कदाचित भाबडी आशा वाटते त्याला हिंदुस्थानचा इतिहासच कारण आहे. स्वदेशीवादी नेत्यांनी तो कितीही लपवता तरी तो जनतेला नीट आठवतोय..

गेल्या ५६ वर्षाप्रमाणेच त्याच्या दिडशे वर्षाअगोदर हिंदुस्थानी राजे आणि संस्थानिक देशात राज्य करत होते तेव्हा लोक राजांकरता राबायचे. विदेशी इंग्रज इथे आले तेव्हा त्यांना आर्श्चय वाटलं. पुण्यात बसून एल्फिन्स्टन आणि रॉबर्टसन यांनी ‘राज्य लोकांकरता असतं’ ही हिदुस्थानीच लोकांना पटवणारी व्यवस्था लिहून काढली ! रॉबर्ट क्लाईव्हने प्लासी जिंकली तेव्हा त्याच्याकडे फक्त तीनशे गोरे शिपाई होते. रस्त्यात कडेला उभे असलेले हिंदुस्थानी लोक थुंकले असते तरी ते वाहून गेले असते. असं स्वतः क्लाईव्हनेच लिहून ठेवलंय पण जनता एकद्देशीय राजांच्या ढोंगाना आणि

अत्याचारांना इतकी कंटाळली होती की या शिस्तबद्ध, परिश्रमी माणसांवरच तिचा जास्त विश्वास बसला. देशभर खून करुन लुटमार करणाऱ्या पेंढाऱ्यांच्या टोळयांना तर स्वदेशी राजा व संस्थानिकांचाच पुर्ण पाठिंबा होता, ज्यात सिंदियांसारख्या संस्थानिकांचाही समावेश होता. फिलिप मेडोज टेलरने त्याच्या पुस्तकातच हे लिहून ठेवलंय. हे विदेशी लोकच तमोयुगात नेणाऱ्या देशी दांडगटशहांचा अत्याचार मोडून व्यवस्थाा नीट करतील, असा विश्वास जनतेला होता. विदेशी इंग्रजांनी तो संपूर्णतः सार्थही ठरवला !

सोनिया गांधींना ज्या इतिहासाचा पाठिंबा मिळालय तो हा असा आहे आणि सोनिया गांधींना ज्या वर्तमानाचा पाठिंबा मिळालाय त्याची स्थितीही काय वेगळी आहे ? सामान्य माणसांच्या प्रामाणिक कष्टांना न्याय देईल असा कोणता राष्ट्रीय नेता आहे सोनिया गांधी हिंदुस्थानात येऊन इटालियन मुळ विसरुन निदान इथली भाषा, रितीरिवाज, इथली संस्कृती तरी शिकल्या. याउलट इथल्या ‘ विदेशी विदेशी ’ अशी ओरड करणाऱ्या अनेक नेत्यांची विदेशी बॅंकांतच गुप्त खाती आहेत. इथली देशी जनता टाचा घासून मरत असताना इथलं चलन स्वतःच्या चैनीसाठी विदेशात ‘ लॉंड्रिंग ’ केलं जात आहे ! या नग्न सत्यानेच सोनिया राजीव गांधी या स्त्रीचा उदय घउवलेला आहे.

राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणासाठी सोनिया नको म्हणणाऱ्यांनी जरा मनावर ताण दिला तर ही राष्ट्रीय सेना, राष्ट्रीय व्यवस्था, राष्ट्रीय शहाणपणा आपण ब्रिटिश नावाच्या विदेशांकडूनच घेतलाय, हे लक्षात येईल आणि गंमत म्हणजे स्वांतत्र्य आंदोलनापासून घटनाकारांपर्यंत सर्वजण ती विद्या विदेशातच शिकले होते. गांधी, सुभाषचंद्र बोस, आंबेडकर, सावरकर... स्वतःच्या हिमतीवर स्वदेशीवाल्यांनी निर्माण केले हे तोगडिया त्रिशूळाची भाषा आणि बायकांच्या तोंडावरुन पदर घेण्याचं पारतंत्र्य, एका तमोयुगाची तरतूद..

शरद पवार १५ मे १९९९ रोजी सोनियांच्या विदेशीपणावर बंड करुन उठले होते. १६ मे २००४ रोजी म्हणजे बरोबर पाच वर्ष एका दिवसाने पंतप्रधानपदासाठी सोनिय गांधीच्या नावाला अनुमोदन देण्याची क्रुर शिक्षा त्यांना महाराष्ट्रातल्या जनतेने दिली. या घअनेचा अर्थ महाजन, स्वराज, आडवाणी, संगमा, गोविंदाचार्यांना अजूनही नीट कळलेला नाही. त्यांनी इतिहास आणि स्वतःचा वर्तमान पुन्हा एकदा नीट समजून घ्यायला हवा.

सोनिय गांधी साक्षात पंतप्रधानपद नाकारल्यावर संरक्षण मंत्रालयाच्या लालसेने चौकशी पुरी व्हायला आत मंत्रिमंडळात टुणकन उडी मारणाऱ्या किंवा

पंतप्रधानपदासाठी अनेकदा विफल बंड करणाऱ्या पवारांनाच किमान कायमचा अपराधगंड आला असेल अशी आशा करुया.

तूर्तास स्वतः सोनिय गांधी असतील. कारण त्यांना कळलंय की जनता सार्वभौम आहे. तोपर्यंत त्यांना काळजीचं कारण नाही. त्यांच्या सासूबाईंच्या काळात घराणेशाहीचा मुद्दा देशातल्या सर्व नेत्यांचा लाडका मुद्दा होता पण त्यांचीच मुलं, पुतणे, भाचे, मुली मोठया झाल्या तसा हा मुद्दा मागे पडला. कारण तो कुणाच्याच सोयीचा राहिला नाही. तद्वतच हिंदुस्थानी नेत्यांच्या तिसऱ्या पिढीतली मुलं इथली कॅश विदेशी बॅंकांत ठेवायला जात जात तिथल्या विदेशी मुलींशी लग्न करतील तेव्हा हा विदेशीच्या मुद्दाही निकालात निघेल.

तेव्हा सत्तरीच्या सोनियाबाई त्यांना तेव्हा कसा विरोध झाला होता, हे आठवून खुदकन् गालातल्या गालात हसतील !

# राहूल गांधी

**प**रवा हैद्राबादच्या कॉंग्रसच्या महाअधिवेशनात ‘ राहूल ’, ‘ राहूल ’ असा बारा हजार कॉंग्रस प्रतिनिधी जेव्हा गजर करीत होते तेव्हा एकंदरीतच हिंदुस्थानी असल्याची मला लाज वाटली. गंभीरपणे घ्यायचं झालं तर काहीच महिन्यांपूर्वी ‘ तहलका ’ साप्ताहिकाकडे बोलताना राहूल गांधी म्हणाले होते की, “ माझ्या मनात आणलं असतं तर मी वयाच्या पंचविसाव्या वर्षीसुद्धा हिंदुस्थानचा पंतप्रधान होऊ शकलो असतो. ” त्यावर मोठं काहूर उठलं होतं परंतु मला खात्री आहे की, राहूलनी तसं

ठरवलं असतं तर ते नक्कीच हिंदुस्थानचे पंतप्रधान झाले असते. यात त्यांची जराही अतिशयोक्ती नव्हती. एवढंच नव्हे तर राहूल यांनी मनापासून ठरवलं असतं तर शाळेत असतानासुद्‌धा ते पंतप्रधान होऊ शकले असते किंवा मॉण्टेसरीत असतानासुद्‌धा त्यांना पंतप्रधान होण्यापासून आपण कुणी रोखू शकलो नसतो.

माझा स्वतःचा राजकारण हा प्रांत नव्हे परंतु माझं वय नेमकं राहूल गांधींएवढं आहे. म्हणजे मी त्यांच्या आणि ते माझ्या पिढीचे आहेत. *(आत्मस्तुती वगळता)* मी राहूल गांधींहून अधिक चांगला पंतप्रधानपदाचा उमेदवार आहे ! परंतु माझी आई सोनिया नाही. आजी इंदिरा नव्हती आणि पणजोबा जवाहरलाल नव्हते ही माझ्यात खोट आहे. माझं म्हणणं अतिशयोक्तीपूर्ण किंवा खोटं वाटतंय ? मग राहूल गांधीबद्‌दल थोडं आपण जाणून घ्या.

राहुल गांधीचा जन्म १९ जून १९७० चा. त्यांचं शालेय शिक्षण दिल्लीच्या मॉडर्न स्कूलमध्ये झालं. त्यानंतर १९८९ मध्ये *(म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी)* त्यांनी दिल्लीच्या प्रतिष्ठित सेंट स्टीफन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांना हा प्रवेश शैक्षणिक योग्यतेच्या जोरावर मिळू शकला नाही. मग त्यांना खेळाच्या कोटयातून प्रवेश देण्यात आला. खेळ कोणता ? तर रायफल शूटिंग. त्या अगोदर वा नंतर राहूल गांधींनी रायफल शूटिंगमध्ये कोणताच पराक्रम गाजवला नाही. रायफलचं तर सोडाच, पुढे सेंट स्टीफन कॉलेजमध्येसुद्‌धा राहुल यांनी कोणताच पराक्रम गाजविला नाही. एकाच वर्षाने १९९० मध्ये त्यांनी डिग्री वगैरे न घेता सेंट स्टीफन कॉलेज सोडलं. त्यांचे प्रिन्सिपॉल अनिल विल्सम सांगतात की, ‘ फार थोडा काळ राहुल आमच्या कॉलेजात राहित्याने त्यांच्या हुशारीला कॉलेजातला अनुभव घेता आला नाही. ” वा ! व्वा ! आपण एका वर्षात कॉलेज सोडलं असतं तर आपल्या कॉलेजचा प्रिन्सिपॉल हेच म्हणाला असता काय ? असा प्रश्न मनात स्वतःला विचारुन बघा.

या सेंट स्टीफन एपिसोडनंतर राहूल गांधी थेट हार्वर्ड युनिव्हर्सिटीत अर्थशास्त्र शिकण्यासाठी गेले. अमेरिकेतल्या या सर्वात प्रतिष्ठित विश्वविद्यालयात राहूल गांधींना ग्रेडही न मिळाल्याने शेवटी डिग्रीही मिळाली नाहीच. याच काळात त्यांच्या आयुष्यात त्यांची आताची गर्लफेंड व्हेरोनिका आली. ती कोलंबियन आहे. या नंतर राहूल गांधी काय करीत असत हे अज्ञात आहे. काही जणांच्या मते ते इंग्लंडमध्ये आर्थिक सल्लागार (!) म्हणून काम करीत असत. बऱ्याच

जणांच्या मते ते या काळात इंग्लंड-अमेरिकेत फिरत असतं. १९९९ साली ते परत हिंदुस्थानात आले. त्यानंरही ते कोणतेच शिक्षण-व्यवसास करीत नसतं. ते थेट २००४ साली अमेठीहून खासदार म्हणूनच निवडून आले. नेमके त्यांच्याच वयाचे असताना त्यांचे काका संजय गांधी अमेठीतून निवडून आले होते. ३६ वर्षाचे अविवाहीत राहूल गांधी हैद्राबादला कॉंग्रेस महाअधिवेशनाला उपस्थित राहिले तेव्हा प्रियसंजन दासमुन्शी म्हणाले, “ सर्व देशातल्या तरुणांना एक ‘ चिराग ’ हवाय. राहूलच्या रुपाने तो त्यांना मिळालाय. राहुलनेच आत देशातल्या तरुणांना प्रकाश दाखवावा.” प्रियरंजन दासमुन्शी कमी पडले असावेत असे वाटून अजित जोगी म्हणाले, “ राहूल गांधी यांनीच आता राजीव गांधींच अपूर्ण काम पूर्ण करावं. ” प्रियरंजन दासमुन्शी आणि अजित जोगी कमी पडले असावेत असं वाटल्याने प्रणव मुखर्जी म्हणाले, “ राहूल गांधी हे आमचे नेते आहेत. जवाहरलाल नेहरु अॅवॉर्ड घेण्याकरीता दक्षिण आफ्रिकेत त्यांना बोलवण्यात आलेलं आहे. कारण तेच कॉंग्रसचे आणि देशाचे भावी नेते आहेत. ” प्रियरंजन दासमुन्शी, अजित जोगी, प्रणव मखर्जी ही अव्वल दर्जाची बुद्धिमान माणसं आहेत. त्यांना मानवी इतिहासात राजेशाही आणि घराणेशाही विरुद्ध मानवाने असंख्य बलिदान देऊन मिळवलेल्या लोकशाही स्वातंत्र्याची नीट माहिती आहे. राजेशाहीविरुद्ध ज्या रक्तरंजित क्रांत्या झाल्या त्या मुळात योग्यतेला समान संधी आणि समान न्याय या मुद्यांवर. आज हीच बुद्धिमान माणसं देशाला एका अननुभवी आणि अपरिपक्व माणसासमोर ओवाळून टाकू इच्छितात याला देशाचं किती मोठं दुर्दैव मानावं  राहूल गांधी हे गांधी घराण्यात जन्माला आल्यामुळे त्यांना राजकराणातली कोणतीच संधी नाकारली जाऊ नये, पण केवळ गांधी असल्यामुळे *(च)* त्यांना कोणतीही संधी मिळू नये असं या देशाला आणि समाजाला वाटत नाही हे निश्चित. समान संधी आणि समान न्याय यांना कोणत्याही व्यवस्थेतून वगळलं की ती व्यवस्था मध्यमयुगीन सरंजामी व्यवस्थाच आहोत.

राहूल गांधींकडे पाहता पाहता नायकत्वाचा काटा सरकत जाताना पाहून कोटयवधी तरुणांना काय वाटत असेल असं मनाला कधी कधी वाटतं. कष्टाने शिक्षण, ज्ञान, कौशल्य आणि योग्यता मिळविण्याची प्रक्रिया  एका आडनावापुढे लुळी पडावी ? आपण एक हजार वर्षे पाशवी गुलामगिरीत होतो त्याचंच हे एक्स्टेंशन आहे.

माध्यमांमध्ये राहूल गांधी देशाचे पंतप्रधान २००८ साली की २००९ साली होतील याच्या चर्चा झडू लागलेल्या आहेत. खुद्द पंतप्रधान मनमोहन सिंग हैद्राबाद अधिवेशनात ‘ राहुल ’ ‘ राहुल ’ असा घोष चालू असताना गालातल्या गालात हसत होते. त्याचा अर्थ काय मानावा ? अर्थशास्त्रातल्या वीसहून अधिक पदव्या घेऊनही जे सिंहासन सांभाळणे कठीण जाते ते चाळिशीच्या आतल्या एका तरुणाला चमच्यांच्या आणि हुजऱ्यांच्या गर्जनांमध्ये मिळेल तेव्हा आपण आपल्या जुन्या मारुती ८०० मधून दिल्लीला फेऱ्या मारु की शास्त्रीजी प्रमाणे मध्यंतराची सोय म्हणून इतिहासाच्या पानात गडप होऊन जाऊ. असा विचार पंतप्रधानांच्या मनात असेल काय ?

असो. मी पंतप्रधानपदावरचा माझा दावा सोडलेला नाही ! बघूया, आडनावात किती ताकद असते ती ! राहुल मै यहॉं हूं !

# संत

# आदिशंकराचार्य

आज शंकराचार्य नाव पुन्हा एकदा घेतलं जातंय ; पण ज्या शंकारचार्यांच नाव आज घेतलं जातयं ते शंकराचार्य काही खऱ्या अर्थाने शंकराचार्य नव्हतेच ! खरे शंकराचार्य एकच - आदिशंकराचार्य ! खरं तर उत्तर हिंदुस्थान हा हिंदूंच्या सर्व तीर्थक्षेत्रांचं माहेरघर म्हणून पाहिला, ओळखला जातो. त्या अर्थाने बनारस *(काशी)*, अयोध्या आणि मथुरा ही महत्वाची स्थानंही उत्तर हिंदुस्थानातच येतात ! हिंदू हे आर्य असून उत्तरेतून आले आणि इथल्या द्रविडांशी त्यांचा संघर्ष झाला, असेही मानले जाते. द्रविडी भाषा

आणि द्रविड संस्कृतीबाबत हा दृष्टीकोन असणाऱ्याला धक्का देणारी घटना आजपासून साधाणपणे सत्तावीसशे वर्षे अगोदर घडून आली. ती घटना म्हणजे आदिशकराचार्यांचा जन्म.

आदिशंकराचार्य हे हिंदी भाषिक नव्हते ! ते होते केरळी. आदिशंकराचार्यांची मातृभाषा मल्याळम होती. त्यांची जात नंबुद्री ब्राम्हणाची होती. त्यांच जन्मगाव कलाडी हे पूर्णा नदीच्या तीरावर वसलेलं आहे. आजही ही नदी अस्तित्वात आहे. हिंदू पुराणात जशी गजेंद्रमोक्षाची कथा आहे, तशीच एक कथा आदिशंकराचार्यांच्या बाबतीत सांगितली जाते. ती कथा म्हणजे याच पूर्णा नदीवर शंकराचार्य एकदा पोहायला गेले असता एका मगरीने त्यांचा पाय धरला आणि तो पाय सोडवून घेण्यासाठी ते धडपडू लागले. ती बातमी त्यांची आई आर्यंबा हिच्या कानावर गेली. ती आपल्या मुलाच्या या अवस्थेत पूर्णा नदीवर भेटायला आली. तिने आक्रोश चालू केला तेव्हा आदिशंकराचार्यांनी तिला त्या अवस्थेतून त्यांची सुटका करण्याचा उपाय सांगितला. तो म्हणजे त्यांना संन्यस्त होण्याची परवानगी देण्याचा. बिचाऱ्या व्याकुळ झालेल्या मातेने त्यांना ती परवानगी देऊन टाकली. आणि मग शंकर आपल्या दिग्विजयाला मोकळे  झाले.

शंकराचार्याचे वडील शिवगुरु आणि आई आर्यंबा. घरचे बऱ्यापैकी श्रीमंत असे नंबुद्री ब्राम्हण. तरीही साधेपणाने राहणारे. स्वतःशिवगुरु हे माता राजराजेश्वरीचे उपासक होते. या जोडप्याला मुलबाळ होईना. तेव्हा त्यांच्या एका मित्राने सांगितल्याप्रमाणे त्रिचतीर इथल्या वृशचलेश्वर मंदिरात वृशचलेश्वराची या जोडप्याने आराधना केली. याबाबतही एक कथा सांगितली जाते की, या जोडप्याला दृषांत झाला तेव्हा वृशलेश्वराने विचारलं की, तुम्हाला एकच दिवंगत कीर्तीचा पण अल्पायुषी पुत्र हवा की अनेक दीर्घायू अशी सामान्य मुलं व्हायला हवीत ? तर या जोडप्याने वृशचलेश्वराला साकडे घातले की, त्याला योग्य वाटेल ते व्हावे. पुढे शंकराचार्याचा जन्म झाला. त्यांचे आयुष्य हे अवघ्या बत्तीस वर्षांचे होते हे सर्वविदित आहेच.

शंकराचार्यांना प्राकृत, मागधी, संस्कृत आणि मल्याळम या भाषा ज्ञात होत्या. वयाच्या सोळाव्या वर्षांपर्यंत ते वेदांतावर प्रवचने देऊ लागले होते. शंकराचार्यांनी हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन केले असे मानले जाते; पण ते त्या अर्थाने कर्मठ हिंदू कधीच नव्हते. त्यांनी उलट आयुष्यात कायमच प्रचलित कल्पनांविरुद्ध बंड केल्याचं आढळून येतं. याचं उत्तम उदारहण म्हणजे त्यांची

आई गेली तेव्हा ते तिचं क्रियाकर्म करण्याकरीता कलाडाला परत आले, तेव्हा रुढ हिंदू ब्राम्हण कल्पनांप्रमाणे ते संन्यस्त असल्यामुळे त्यांना आईचे क्रियाकर्म करण्यास धर्मशास्त्राची परवानगी नसल्याचा निर्वाळा तेव्हाच्या ब्राम्हणांनी दिला. ऐवढेच नव्हे तर त्यांच्या आईचे क्रियाकर्म करण्यास, कोणतीही मदत करण्यास त्या काळच्या नंबुद्री ब्राम्हणांनी नकार दिल. शंकराचार्यांनी आईचा मृतदेह खांद्यावरुन नेऊन मागच्या परसात जाळला. त्या काळात ते धर्मविरुद्‌ध मोठंच बंड होतं. आजही कलाडी गावात नबुंद्री ब्राम्हण लोक आपल्या घरातली मोठी व्यक्ती मेल्यावर मागच्या परसात तिला जाळतात !

त्या काळात एक साधी काठी आणि तेलाचा दिवा हातात घेऊन शंकराचार्य अव्दैताचं तत्वज्ञान देशभर पसरविण्यासाठी आख्खा हिंदुस्थान पायी हिंडले कुठे ते आदय शंकराचाय. नाहीतर आजच्या सर्वच शंकराचार्यांच्या मठाकडे शेकडो कोटी रुपयांची संपत्ती असते. आदिशंकराचार्य हे निष्कांचन अवस्थेत देशभर वादविवाद करीत हिंडले. त्यांनी बौध्द तत्वज्ञानाचे ज्ञानी कुमारीलभट्ट यांच्याशी घातलेला वाद सुप्रसिद्‌ध आहे. हा वाद काही दिवस रोज चालू होता. स्वतःकुमारीलभट्टाची पत्नी त्या वादाची पंच होती. तो वाद शंकराचार्यांनी जिंकला. एवढया लहान वयात देशभराच्या ढुढ्ढाचार्यांना पराजित करणे हे अजिबातच सोपं काम नव्हतं; पण शंकराचार्यांनी ते केलं. शंकराचार्यांनी देशभरचे हे दिग्विजय मिळवले. हिंदुस्थानात चार पीठं स्थापन केली आणि मग ते काशीला आले. तिथे त्यांनी ‘स्वतःची पापं धुऊन टाक ’अशी प्रार्थना विश्वनाथाकडे केली.

खुद्‌द शंकराचार्यांनी पापं कोणती ? असा प्रश्न जर तुम्हाला पडला असेल तर खुद्‌द शंकराचार्यांनीच याचं उत्तर देऊन ठेवलंय. परमात्मा ही संकल्पनाच मन आणि बुद्‌धीच्या पलिकडे असताना आणि याची पूर्ण जाणीव असताना शंकराचार्य देशभर या संकल्पनांवर बोलत, प्रवचन देत हिंडले हे पाहिलं पाप. ईश्वर सर्वत्र वसलेला आहे हे ज्ञात असतानाही ईश्वाराची आराधना करुन त्याला वेगळं काढलं हे दुसर पाप. आत्मा आणि परमात्मा हे अभिन्न असल्याचं अव्दैत तत्व आत्मसात असूनही काशीच्या विश्वनाथासमोर शेवटी ते आले हे त्यांचे तिसरे आणि शेवटचे पाप. आहे की नाही हे अद्‌भुत !

वैशाखाच्या पाचव्या दिवशी जन्माला आलेल्या आदिशंकराचार्यांनी आपल्या शिष्यांना ‘ खरा जेता कोण ? ’ असा प्रश्न विचारला होता, तेव्हा स्वतःच त्यांच्या उत्तरादाखल ते म्हणाले होते की, ‘ज्याने स्वतःच्या मनावर

तबा मिळविला आहे तो ! ’

अलिकडच्या काळात स्वतःला धर्मगुरु म्हणविणाऱ्यांनी स्वतःचं मन सोडून इतर सर्वांवर ताबा मिळविण्यांच ठरवलंय असं दिसतयं ! विश्व हिंदू परिषदेसारख्या संघटना यालाच ‘ धर्मरक्षण ’ म्हणतात !

आदिशंकराचार्यांची स्मृती जागवताना हातात एक काठी आणि तेलाचा दिवा घेतलेली तरुण कृश अशी आत्मज्ञानी मूर्ती देशभर पायी संचार करताना डोळयांसमोर येते आणि मग आता त्यांच्या वारशाचा दावा करत हिंस्त्रपणे समोर येणाऱ्या व्यक्ती आणि संघटना डोळयांसमोर येऊन मन भळाभळा वाहते.

# समर्थ कवी रामदास

रामदास स्वामींना ओळखत नाही असा मनुष्य महाराष्ट्रात तरी आढळणार नाही. संपूर्ण संतपरंपरेत जे घडले ते महाराष्ट्राला ‘ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस ’ या ओळीने परिचित आहे. कवी म्हणून तुकारामांनी अक्षरशः कळस गाठला. ज्ञानेश्वरांनी शून्यातून परंपरा निर्माण केली. पुढे नामदेवांनी ज्ञानेश्वरांबद्दल ‘ दिवाकर पावला अस्त । बाप ज्ञानेश्वर समाधिस्त ।’ असं लिहून एका ओळीत ज्ञानेश्वरांबद्दल अचूक काय ते वर्णन केलेले आहे. या संपूर्ण संतपरंपरेला मानवी जीवनाचे आणि मानवी व्यवहारांचे रोकडे

भान आहे पण या साऱ्या परंपरेत मानवी आयुष्याचे थक्क करणारे भान आहे ते रामदासांना. मराठी भाषेला त्यांनी किती नादमय पध्दतीने वापरले ते पाहताना आजही मन थक्क होऊन जाते.

लहान असताना घरात गणपतीस्त्रोत्र आणि मारुतीस्त्रोत्र म्हणायला लावलं जायचं. त्यातल्या मारुतीस्त्रोत्रांच आकर्षण मला फार होतं कारण ते स्तोत्र पाठ असलं की भुतं घाबरतात. शिवाय राक्षसलोक जवळ येत नाहीत असं शिकवलेलं होतं. म्हणजे या शिकविण्याचा एक भाग असा होता की, मारुतीस्तोत्र हे एखाद्या अस्त्रासारखं आहे, जे समोर आलेल्या भुतावर सोडता येतं. त्या वयात हे फारच अद्‌भुत वाटायचं पण इतकी वर्ष गेल्यावर आजही मला मारुतीस्तोत्रातल्या ‘ कोटीच्या कोटी उड्डाणे, झेपावे उत्तरेकडे ’ पासून ते ‘ मनासी टाकीले मागे गतीसी तुलना नसे ‘ पर्यंतच्या ओळी या अस्त्रासारख्या नादमय रीतीने वेगाने टोक येत गेलेल्या आहेत. ही खास रामदासांची पद्‌धत. मराठी भाषा इतकी सुबोध, सहजसोपी आणि तरीही इतकी टोकदार करुन वापरण्याचं कसब रामदासांइतकं मराठीत इतर कुणीही वापरलेलं दिसत नाही.

रामदास स्वामींच ‘शुभमंगल सावधान ’ शब्द ऐकल्यावर बोहल्यावरुन पळून जाणं, मग आख्खं भारतभ्रमण करणं शिवाजी महाराजांबरोबरचा (*आणि नंतर संभाजी महाराजांसोबतचा*) त्यांचा संवाद याबाबत अनेकांनी लिहिलेलं आहे. काही वेळा प्रतिकूलही लिहिलं आहे. ज्यांनी रामदासांबद्‌दल प्रतिकूल लिहिलेलं आहे त्यांनी मुख्यतः दोन गोष्टींवर आक्षेप घेतलेला आहे. एक म्हणजे, त्यांच्या वाग्दत वधूचं आयुष्य त्यांनी फुकट घालवलं. दुसरा आक्षेप रामदासांच्या जातीवर असतो. रामदास हे जातीने ब्राम्हण होते. या एका कारणाने रामदासांना नाकारणारे महाभागही कमी नाहीत परंतु या साऱ्या पलीकडे रामदास स्वामींनी जे लिहून ठेवलयं ते केवळ अद्‌भूत आहे. मराठी भाषेची आणि मराठी संस्कृतीची जी म्हणून वैशिष्टये आहेत, ती रामदासांच्या लेखनात ठळकपणे येतात. मग ते लेखन त्यांनी लेखन त्यांनी सज्जनगडावर बसून केलं किंवा लेखनिक नेमून केलं की नाही हे वाद फिजूल आहेत.

रामदासांचा संपूर्ण आयुष्यकाळ हा राजकीयदृष्टया अशांत होता. जसा तो अशांत होता तसाच तो निर्मितीक्षमही होता. शिवराज्याभिषकाच्या काळात त्या अनुभवांचं वातावरण रामदासांनी अनुभवलेलं होतं. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांना त्यांनी लिहिलेलं पत्र तर सर्वज्ञातच आहे.

कम्युनिस्ट कालखंडात पूर्व आणि पश्चिम युरोपात कवींच्या शब्दांनी राजकीय गणितं ठरवली या उलथवली, ही गोष्ट आपल्याकडच्या कवींच्या आणि आपल्या समाजाची मानसिकता बघता अशक्य वाटते परंतु रामदास स्वामींच्या शबदांना बघून आपल्याही इतिहासात हे कधीतरी घउलं असावं यावर विश्वास बसतो. रामदासांनी देशामध्ये जे उदंड भ्रमण केलं, ते करताना अतिशय छोटया छोटया गोष्टी त्यांनी टिपून ठेवल्या. राजकारणावर व राजकारणी पुरुषाबद्दल त्यांनी उघड भाष्य केलं.

*‘चोर भांडारी करावा । घसरताच संभाळावा ।*
*गोवा मूर्खपणाचा काढावा । हळू हळू ।।’*

किंवा अगदी

*‘नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे ।*
*आपणावरी विकल्पाचे गोंवे । पडोच ने दी ।। ’*

अशासारखे श्लोक हे राजकीय आहेत, आध्यात्मिक नव्हेत. ‘ चोरालाच भंडारगृहाचे प्रमुखपद द्यावे. तो (चोर) चुकला तरी त्याला सांभाळून घ्यावे. त्याला (चोराला) त्याच्या भ्रमितचित्तातून बाहेर काढावे. कोणालाही दुःखी न करता हळूहळू राजकारणात गुंतवावे. नष्ट माणसासमोर तसाच माणूस उभा करावा. वाचाळाशीच घालून घावी. मात्र हे सर्व करताना हे करणाऱ्याने स्वतःवर संशयाची सावलीसुद्धा पडणार याची काळजी घ्यावी.’ या स्वरुपाचे श्लोक रचणं हे लेच्यापेच्याचे माणसाचं काम नव्हेच. वास्तविक ज्ञानेश्वरीला गीतेचं निरुपण मानतात. दासबोधाचं तसं नाही. दासबोधाची संपुर्ण रचना हीच मुळात स्वतंत्रपणे केलेली आहे. ‘ गुरु-शिष्य संवाद ’ अशीच रामदासांनी त्याची रचना केलेली आहे. स्वतः रामदासांच्या शबदांतच सांगायचे झाल्यास,

*‘ नाना कींत निवारले । नाना संशयो छेदिले ।*
*नाना आशंका फेडिले । नाना प्रश्न ।। ’*

असे दासबोधामागच्या सूत्राचे ते वर्णन करतात; परंतु गीतेचे संपूर्ण जीवनकार्य हेच मुळात ज्या तत्वांमुळे उभे आहे ते तत्व आणि दासबोधामागचे तत्व हे समान आहे. हतवीर्य पुरुषांना नैतिकतेच्या नावाखाली स्वतःचा भ्याडपणा आणि दुर्बलता लपवायची असते. तेव्हा अशी नैतिकता ही खरे तर अनैतिकताच आहे हे जाणवून देऊन समाजाचा पुरषार्थ जागा करणे, हे समान तत्व गीतेमागे उभे

आहे तसे ते दासबोधामागेही आहे. पुन्हा गीता हाही व्यासांच्या प्रतिभेतून जन्म पावलेला गुरु-शिष्य संवादच आहे.

रामदासांनी त्यांच्या आयुष्यात विपुल प्रवास आणि तेवढेच विपुल लेखन केले. रामदासांनी लिहिलेल्या लेखनाला विषयांची मर्यादा नाही. भोज्य पदार्थ स्वयंपाकास लागणारी विविध पात्रे यापासून स्वयंपाकाचे विविध पदार्थ, माणसांना होणारे विविध रोग, अस्वच्छतेची लक्षणे, अक्षर सुधारण्यासाठी काय करावे, यापासून बागांची वर्णने आणि बांधकामाच्या विटा कशा तयार कराव्यात, यापर्यंत रामदासांनी लिहिलेले आहे. दुसरीकडे अधिदैविक, अधिभौतिक आणि आध्यात्मिक दु:खे म्हणजे काय ? यापासून, ब्रम्ह म्हणजे काय ? या पर्यंत रामदासांनी लिहून ठेवलेले आहे. ते जितके मोठे तत्वचिंतक होते, तेवढेच मोठे व्यवहारचिंतक होते.

रामदासांनी त्यांच्या आयुष्यात मराठी भाषा, मराठी व्यवहार, सामाजिक नैतिकता आणि रुढी आध्यात्मिक संकल्पनांना नवीनच आयाम प्राप्त करुन दिले आणि तेही एक संतकवी म्हणून.

जगाच्या इतिहासात एवढा व्यवहारी कवी इतक्या संन्यस्तपणे लिहिता झाला नसेल. रामदासांचे लेखन नुसते वाचले तरी मराठी भाषेवर प्रेम बसते.
वाचताना मन उचंबळून येते.

*त्यास उपमें द्यावे जळ। तरी ते निर्मळ निश्चळ।*
*विश्व बुडाले सकळ। परी ते कोरडेचि असे।।*
*नव्हे प्रकाशासारिखें। अथवा नव्हे काळोखे*
*आता ते कासियांसारखे। सांगावे हो ।।*

असं ब्रम्हाबद्दल लिहिणाऱ्या या संतकवीच्या कविता आपण वाचल्यात ? नसतील तर मराठी कशाशी खातात त्यावर कसे बोलू शकतो आपण ?

# विनोबा भावे

**वि**नायक नरहर भावे हे नाव वाचून पटकन कुणाला काही उमजणार नाही पण तेच जर ‘विनोबा’ असे संबोधले तर लगेच लक्षात येईल की, अरेच्चा हे तर विनोबा भावे. ‘विनोबा’ हे नाव महात्मा गांधींनी विनोबांना दिलेले होते. तुकोबा, कान्होबा वगैरे नावे महाराष्ट्रातल्या संतपुरुषांना लावण्याची पद्धत आहे. त्याची नीट उमज गांधींजींना होती.

गांधीजींनी ‘विनोबा’ हे नाव विनोबांना १९१६ साली दिलं होतं. विनोबांचा जन्म १८९५ चा. ११ सप्टेंबर १८९५ हा विनोबांचा जन्मदिवस. म्हणजे

विनोबा १९१६ साली जेमतेम २०-२१ वर्षांचे असतील. त्या वयात गांधीजींनी त्यांना संतपुरुषांच्या परंपरेत नेणारं नाव द्यावं, हे गांधींजींच्या माणसं ओळखण्याच्या क्षमतेचं अद्भूत उदाहरण आहे आणि वयाच्या २०-२१ व्या वर्षी माणसं व संस्था कोळून पिणाऱ्या गांधीजींसाराख्या माणसावर एवढा प्रभाव टाकावा, म्हणजे हे विनोबांच अलौकिकच.

आपली सगळयांची आयुष्ये वागण्या-बोलण्यात अजिबातच ताळमेळ नसणारी माणसे पाहण्यात खर्च होतात. आपण स्वतःही त्याला अपवाद नसतोच ! विनोबांनी श्लोक रुपाने प्रार्थनेत म्हणायच्या व्रतांची मांडणी केलेली होती.

*अहिंसा सत्य अस्तेय ब्रम्हचर्य असंग्रह ।*
*शरीर-श्रम अस्वाद सर्वत्र  भयवर्जन ।।*
*सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना ।*
*ही एकादश सेवार्वी नम्रत्वे व्रतनिश्चयें ।।*

या एकादश व्रतांचं विनोबांनी आयुष्यभर पालन केलं. तेही कष्टसाध्य वगैरे काही नव्हे तर अत्यंत सहजपणे. सहज, शांत आणि तटस्थपणे. विनोबा जितेंद्रिय होते. गांधीजींनी ब्रम्हचर्य खूप कष्टाने प्राप्त केलेले होते. त्यासाठी त्यांना कोणकोणत्या दिव्यातून जावे लागले होते, याचे उल्लेख त्यांच्या ' सत्याचे प्रयोग ' या पुस्तकात आणि प्यारेलाल या सेक्रेटरींनी लिहिलेल्या खंडात्मक गांधीचरित्रात आलेले आहेत. विनोबांचे ब्रम्हचर्य तसे नव्हते. त्यांचे ब्रम्हचर्य हे सहजसुंदर होते, कोणत्याही अपराधगंडाविना आलेले. विनोबांनी ठरवले की ते ब्रम्हचारी आहेत अन् ते ब्रम्हचारी झाले. विनोबा हे खऱ्या अर्थाने प्राचीन ऋषीमर्हर्षींच्या परंपरेतले ब्रम्हर्षी होते. हिंदू तत्वज्ञानाच्या सर्व कक्षा ज्या योगीपुरुषाच्या अस्तित्वात सामावतात त्या वसिष्ठ-शौनक-अगस्तींच्या परंपरेतले.

विनोबांचं वैशिष्य म्हणजे ते अतिशय कमी बोलत. स्वतःबद्दल तर नाहीच नाही. स्वतःबद्दलचा उल्लेख पुढे पुढे ते 'बाबाला वाटलं ','बाबा तर असं म्हणतो असा करत. काहींना त्यांतली हिंदू परंपरा न कळल्याने त्यांनी विनोबांची टवाळीसुद्धा केली. त्यात आपले लाडके लोकप्रिय ( व सवंग) मराठी विनोदी साहित्यिकही होते ! विनोबा हे शरीराचे नाव आहे. आत्मा हा काही विनोबा नव्हे, ही भावना विनोबांमध्ये संपुर्णत्वाला पोचलेली होती. तरीही विनोबा हिंदुस्थानी समाजाच्या समाजिक आणि राजकीय जीवनाचा भाग बनून राहिले. त्यांनी चार वेळा तुरुंगवास भोगला. गोवधबंदीच्या मागणीसाठी सत्यागह केला. काही काळ

का होईना केंद्र सरकारच्या गळी ती मागणी उतरवली. हे सारे एका योगीपुरुषाला का करावेसे वाटले असेल ?

विनोबा नेहमीच त्यासाठी भक्त प्रल्हादाचा श्लोक म्हणत असत,

प्रायेण देव मुनयो स्वविमुक्तिकामाः
मौनं चरन्ति विजनेन परार्थनिष्ठाः ।
नैतान् विहाय कृपाणान् विमुमुक्षुरेकः ।

म्हणजे देव आणि मुनींप्रमाणे मुक्तीची इच्छा धरुन मी या दुबळया लोकांना सोडून एकाटाच मुक्त होऊ इच्छित नाही.

विनोबा भक्त प्रल्हादाच्या या वचनाला अक्षरशः जागले. आयुष्यभर त्यांनी जेवढं काम करुन ठेवलेले आहे तेवढं काम आख्ख्या जगातल्या मोठयात मोठया उद्योगपतीलाही जमणार नाही. त न बोलता सतत आपल्याच तंद्रीत काम करत असत. अपवाद प्रवचनांचा आणि गांधीजींशी बोलतानाचा. विनोबांचा या कर्मयोगाकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा होता त्याबद्दल एक किस्सा सांगतात. जयप्रकाश सुरुवातीच्या काळात विनोबांना भेटायला गेले, तेव्हा विनोबा कोलू ओढत होते. तेलाच्या घाण्याला जुंपलेल्या विनोबांना पाहून जयप्रकाश म्हणले, ‘अशाने तर १०० वर्षे लागतील.’ विनोबा चटकन म्हणाले, ‘तुम्हीही या ना. आपण दोघे मिळून ५० वर्षात काम आटपूया.’

विनोबांना जेवढे उत्तम संस्कृत येत असत तितकीच उत्तम अरबी येत असे. विनोबांनी जेवढया सहजतेने गीता मराठीत आणली, तितक्याच सहजतेने कुराणही मराठीत आणले. अनेक भाषांवर कमालीचे प्रभुत्व असणाऱ्या विनोबांनी घर सोडले ते १९१६ साली. त्या अगोदर त्यांनी आपली मॅट्रिकची वगैरे सर्टिफिकेटस् जाळून टाकली. विनोबांना इंग्रजी आणि फेंच भाषाही उत्त्तम येत असे. घर सोडल्यावर इंग्रजी शिक्षकाची नोकरीही त्यांनी काशीला जाऊन केली होती. पण विनोबांना आयुष्याचं ईप्सित काशीतच मिळालं ते फेब्रुवारी १९१६ रोजी. बनारस विश्वविदयादयात गांधीजींच्या एका अत्यंत गाजलेल्या धक्कादयायक भाषणामुळे गांधीजी हिंदुस्थानभर प्रसिध्द झाले. त्यातल्या निर्भीड स्पष्टवक्तेपणामुळे ॲनी बेझंट आणि इतर हिंदुस्थानी राजे-महाराजे ते भाषण चालू असताना सभात्याग करुन निघून गेले. त्या भाषणामुळे विनोबांचे गांधीजीविषयक कुतुहल आणि आकर्षण वाढले *(विस्तारभयामुळे ते भाषण वा त्यातील अंश देता येत नाही पण ते मुळातूनच वाचावे असे आहे. बेझंटाबाईंनाही*

*ते सहन झाले नव्हते, हे वाचनांनी लक्षात घ्यावे.).*

आज विनोबा मुख्यत्वे आपल्याला माहीत आहेत ते भूदान सर्वोदय, डाकूंची शरणागती आणि आणीबाणीत मौनात असताना एका कागदावर 'इमर्जन्सी अनुशासन पर्व ' असे लिहिण्यासाठी भैतिकदृष्टया या साऱ्या गोष्टी अपयशाच्या वाटतात. नव्हे, त्या तशा आहेतच.

पण याहीपेक्षा विनोबा आणि गांधीजींच्या पहिल्याच संभाषणात या साऱ्या राजकीय यशापयशाकडे गांधीजी कसे बघत आणि त्याचा विनोबांवर परिणाम कसा झाला होता ते दिसते. गांधीजी त्यांना म्हणाले होते, 'आपणां बधां कामोनु परिणाम मींडू छे. आपणो तो सेवा करीत छुटीऐ ' ( *आपल्या सगळया कृतींचा परिणाम शून्य आहे. आपण फक्त सेवा करुन सुटूया !)*

महापुरुषांची समज ही स्थकालातीत असते ती अशी.

# रजनीश ओशो

**स्व**ातंत्र्योत्तर हिंदुस्थानात उदयाला आलेल्या अत्यंत प्रतिभाशाली पण तितक्याच वादग्रस्त माणासंची यादी करायची झाली तर रजनीशांच नाव अत्यंत वर लिहावं लागेल.

रजनीशांचं मूळ नाव रजनीशचंद्र मोहन होतं. ते मूळचे मध्य प्रदेशातले. सागर युनिव्हर्सिटीत ते तत्वज्ञान विषय शिकवत असत. ते तत्वज्ञानाचे एम. ए. होते. असं म्हणतात की, आयुष्याच्या एका टप्पयावर त्यांनी आयुष्यात मिळवलेली सर्व सर्टिफिकिटं गुंडाळी करुन विहिरीत टाकून दिली. या घटनेला बळ देणारा त्यांच्या लहानपणीचा एक

किस्सा आहे. ते सायकलवरुन शाळेत जात असत. एकदा सायकल शाळेच्या आवारात नेल्यावर समोरच्या सहाध्यायांची गर्दी हटवण्याकरीता ते सायकलची बेल सतत वाजवत राहिले. सहाध्यायी तर हटले नाहीतच. उलट मुख्याध्यापकांनी त्यांना दम दिला आणि वर सांगितलं की, उद्या इतर कुठल्याही वाहनाने ये; पण उद्यापासून सायलक शाळेत आणायची नाही. इतर कोणतेही वाहन रजनीशांना परवडणारं नव्हतंच  पण त्यांनी पुढच्या आयुष्यात आपण काय करणार आहेत याची चुणूक दाखवणारी बुद्धी चालवली. गावातल्या माहुताला पटवून दुसऱ्या दिवशी ते हत्तीवरुन शाळेत गेले. त्यांना पहायला सारी शाळा लोटली. मुख्याध्यापक हतबद्ध झाले. त्यांनी रजनीशांच्या सायकलवरची बंदी तत्काळ उठवली.

रजनीशांच्या आयुष्यात कित्येक विरोधाभास होते. मानवी जीवन तसेच असते, असे त्यांचे त्याला उत्तर असे. ते जन्माने जैन होते पण आयुष्यात त्यांनी सर्वच धर्माच्या रेजिमेंटेशनमधून माणसाने बाहेर यावं असं प्रतिपादन केलं जैनांची अहिंसा आणि शाकाहार हे सारं एक प्रकारचं कंडिशनिंग आहे, असं त्यांच म्हणणं असे. त्यांच्या आयुष्यात त्यांनी मासांहार करण्याचा तरुण वयात एकदा प्रयत्न केला होता. त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे त्यांना रात्रभर आपल्या पोटात बकरे फिरताहेत असा भास होत राहील. वमन केल्यावरच त्यांना शांत वाटलं. आयुष्यभ्ंर ते स्वतःमग शाकाहारी राहिले.

नोकरी सोडल्यावर ते प्रवचनं देत फिरु लागले. त्यांनी आपल्या जगावेगळया नवसंन्यास कल्पनेला प्रत्यक्षात आणण्याकरीता स्वतंत्र्यप्रिय मुंबईऐवजी रुढीवादी पुण्याची निवड केली हाही एक विरोधाभासच. सुरुवातीच्या काळात त्यांच्याभोवती दहा-एक माणसं असत. रजनीशांची खरी प्रसिद्धी (*!*) झाली ती त्यांच्या संभोगातून समाधीकडे या संकल्पनेमुळे. त्या काळात ही कल्पना इतकी स्वैर आणि स्वस्तपणे वापरली गेली, की या नावाचं एक हिट आणि हॉट नाटकही आलं होतं. स्वयंघोषित सस्कृतीरक्षकांनी आणि रुढीवाद्यांनी असा समज पसरवला की, रजनीशांनी खुलेआम संभोग करण्याचा तमाम पब्लिकला संदेश दिलाय.. यातूनच पतितपावन संघटनेच्या विलास तुपेंनी रजनीशांवर चाकू फेकला होता...

वास्तिविक ‘ सर्व उर्जेचा, प्रतिभेचा आणि समाधी अस्वस्थेकडे जाण्याचा मूलस्त्रोत मानवी शरीरात कामउर्जेतूनच येतो; पण कामऊर्जेला फक्त संभोगातच अडकवून ठेवू नका. तिच्या सहाय्याने समाधी अवस्थेप्रत पोहोचा. ” हे रजनीशांचे खरे प्रतिपादन होते पण इथल्या लोकांना त्यांच्या प्रतिपादनातल्या संभोगात अधिक रस होता, समाधीत नव्हता ! ती खरी शोकांतिका आहे.

रजनीश प्रतिपादन करताना त्यातल्या मुद्दयांना आपलया अकाटय तर्कशकतीद्वारे प्रचंड स्फोटक बनवत. अणुबॉम्बहूनही स्फोटक. आधूनिक काळात

अमेरिकानांच्या भूमीत जाऊन त्यांना केवळ बुद्धीच्या बळावर निःशस्त्रपणे धडकी भरवणारे ते एकमेव पौर्वात्य पुरुष होते. भांडवलदारांच्या त्या मक्केत १०५ रोल्स रॉइल्सचा ताफा, स्वतंत्र राज्य निमार्ण करणाऱ्या या तीक्ष्ण पुरुषाला दग्याने तुरुंगात थेलियम देण्याचा प्लॅन व इतर शंभर देशांना अध्यक्षीय कार्यालयाकडून त्यांना आश्रय न देण्याचा इशारा भयाच्या अपार धडकीशिवाय शक्य नव्हता.

एकदा मी ' मॉ अमृत साधनां ' शी बोलताना त्या म्हणाल्या की, रजनीशांच्या स्पर्शात गुरुची माया असे. पुरुषी कामुकतेचा त्यात अंशमात्रही नव्हता. ' मा अमृत साधना ' या रजनीशांच्या सुरुवातीच्या शिष्यगणांपैकी एक. त्या आता ' ओशो टाईम्स ' आशियाच्या संपादिका आहेत.

पौर्वात्य असो वा पाश्चात्य, अनेक योगीपुरुषांवर व तत्ववेत्यांवर रजनीशांनी भाष्य केलेले आहे. बऱ्याचदा त्या महापुरुषांची काळाच्या ओघात पुटं चढलेली मूर्ती हातोडयाच्या घावाने छिन्नभिन्न केली. आयुष्याची पुर्नरचना करण्याची क्रांतीकारकता ज्यांना भावली ते रजनीशांच्या मार्गाने त्यांच्या मागोमाग गेले. त्या काळात त्यांच्या मागोमाग जाणाऱ्यांना आपल्या समाजात जवळजवळ अनैतिक असल्यासारखी वागणूक देण्यात येत असे.

रजनीशांवर वुडलॅण्ड हॉटेलमध्ये दुसऱ्यांदा हल्ला झाला होता. एका माणसाने त्यांना ते आपल्या नावामागे भगवान लावता ' ते त्यांनी हे विश्व निर्माण केल्यामुळे का ', असा उपरोधाने खोचक प्रश्न विचारला होता. तेव्हा रजनीशांनी त्याला ' होय ' असे सांगून ' पण हे कोणाला सांगू नकोस. नाहीतर इतके भयंकर अवस्थेतले जग निर्माण केल्याबद्दल लोक माझ्यावर चिडतील, ' असे सांगितले. चिडून जाऊन हिंसक होत त्याने रजनीशांवर हल्ला चढवला होता.

आयुष्याच्या अखेरीला थेलियमचा परिणाम रजनीशांच्या शरीरावर दिसू लागला. त्यांची आई नि पाच भाऊ त्यांचे अगोदरच शिष्य झाले होते. सगळया जगात रजनीशांचे शिष्यगण पसरलेले होते. किरणोत्सर्गी विषाचे परिणाम त्यांनी धैर्याने सहन केले. मृत्युवर त्यांचं ' डेथ ' चा कॅसेटमध्ये सुंदर प्रवचन आहे. त्यात ' मृत्यु हा एक उत्सव आहे ' असं वाक्य आहे.

रजनीश गेल्यावर त्यांच्याच शिकवणीनुसार त्यांच्या शिष्यांनी उत्सव साजरा केला. असाधारण यातना नि भोग भोगून रजनीशांचा स्वतःवरचा विश्वास कायम राहिला. तो कधीच टाळला नाही. त्यांच्या वास्तवामुळे पुण्याच्या बाबतीत उलट घडावे, अशी त्यांची अपेक्षा असणार; पण त्यांच्या अपेक्षेप्रमाणे न घडता त्यांच्या स्वतःच्याच प्रमाणे घडले.

पुण्याचाही स्वतःवरचा विश्वास कायम राहिला !

# वाचलेले कुणी

# नरहर अंबादास कुरुंदकर

**म**राठी भाषेत अनेक असाधारण कुशाग्र बुद्धीचे लेखक आणि विचारवंत होऊन गेले आहेत पण या साऱ्यांमध्ये नरहर अंबादास कुरुंदकरांचं स्थान निर्विवादपणे वेगळं आणि श्रेष्ठ आहे. कुंरुंदकरांची विश्लेषणाची पद्धत ही त्यांच्या वेळच्या इतर विश्लिेषकांहून एकदम वेगळी होती. त्यांनी स्वतःचे म्हणून वेगळे मापदंड प्रस्थापित केले.

१५ जुलै १९३२ रोजी नरहर कुरुंदकरांचा जन्म झाला. नांदापूरसारख्या मराठवाडयातील छोटय गावात जन्माला आलेल्या कुरुंदकरांचं बालपण त्यांच्या

मामांकडे गेलं. तो काळ निजाम राजवटीचा होता. स्वतः कुरुंदकरांनी आठवीत असताना निजाम राजवटीविरुद्धच्या स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतला होता. त्यांच्या विश्लेषणाच्या पद्धतीचा पाया मराठवाडयासारख्या त्या काळी मागास असलेल्या निजामी अमलाखालच्या प्रदेशात कसा घातला गेला असेल, याचं फार कुतूहल कुरुंदकरांच लेखन वाचताना वाटत राहतं.

कुरुंदकरांनी त्यांचा पहिला टीकालेख लिहिला तो ' प्रतिष्ठान ' च्या अंकात डिसेंबर १९५३ मध्ये. म्हणजे कुरुंदकर तेव्हा अवघे २१ वर्षाचे होते. कुरुंदकरांचं पहिलं पुस्तक आलं ते १९६४ साली. ६४ साली आलेल्या ' रुपवेध ' या पुस्तकामागोमाग त्यांची ' मागोवा ', ' जागर ' , ' धार ', आणि काठ ' , ' शिवरात्र ', ' वाटा:तुझ्या माझ्या ' , ' भजन ' अशी सहा *(एकूण सात)* पुस्तकं आली. नरहर कुरुंदकरांना कोणत्याही विषयाचं वावडं नव्हतं. त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय, वाङ्मयीन, भाषाशास्त्र, धर्म, इतिहास या सगळया विषयांवर प्रचंड लिहून ठेवलं आहे. त्यांची लेखनशेली प्रवाही होती वाचणाऱ्याला ती चटकन आकर्षित करुन घेते. इतिहास असो, धर्म असो वा राजकारण असो, वाचकाला कुरुंदकर जी बाजू प्रतिपादत आहेत त्याहून वेगळी बाजू असू शकेल, यावर कुरुंदकर आपल्या लेखनात विश्वास ठेवूच देत नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज, गोवळकर गुरुजी, गांधीजी, नेहरु आदींवर परंतु समाजवाद्यांमध्ये स्वतःचा म्हणून एक ' फॅसिझम ' असल्यामुळे परंतु समाजवाद्यांनी पूर्णार्थाने कुरुंदकरांना कधीच आपलं मानलं नाही. ढोबळमानाने त्याची दोन कारणं होती. त्यातली एक म्हणजे ' जागर ' या पुस्तकात कुरुंदकरांनी मुस्लिम धर्म आणि पवित्र कुराणाची कमालीची चिरफाड केली आहे आणि पवित्र कुराण हे राष्ट्रवादाच्या संकल्पनाच मानत नाही, हे सप्रमाण सिद्ध करुन दाखवलं. एवढंच नव्हे तर राष्ट्रवादी म्हणून गौरविले गेलेले कित्येक मुसलमान नेते वास्तवात संधिसाधू असून त्यांची राष्ट्रवादावर कधीच श्रद्धा नव्हती, हे सुद्धा कुरुंदकरांनी त्या पुस्तकात सप्रमाण सिद्ध केलं. या त्यांच्या लेखनामुळे समाजवादी परिवार (*अपवाद वगळता*) बिथरला. समाजवाद्यांच्या मुसलामानांबाबतच्या थातुरमातुर धोरणाला कुरुंदकरांनी कायमाचात सुरुंग लावला. दुसरं म्हणजे कुरुंदकरांनी मुलाची दणक्यात मुंज केली. ही तर समाजवाद्यांच्या दृष्टीने भयानकच गोष्ट होती; पण कुरुंदकरांनी समाजवाद्यांच्या या कळपबाजीला कधीच भीक घातली नाही. त्यांची ' स्वयमेव ' मृगेंद्रता जी होती ती त्यांना त्यांच्या तैलबुद्धीतून प्राप्त झाली.

होती.त्यांचं ‘जागर ’ पुस्तक हे त्यांना हिंदुत्ववादी व मुस्लिमद्वेष्टे ठरवतं झालं १९७० साली जागर नंतर १९७१ साली त्यांचं ‘शिवरात्र ’ हे पुस्तक आलं. त्यांत त्यांनी ‘गोवळकर गुरुजी आणि महात्मा गांधी ’, ‘गोवळकर गुरुजी आणि चातुर्वर्ण ’, ‘गांधीहत्या आणि मी ’ असे तीन अप्रतिम लेख सामाविष्ट केले आहेत. ‘शिवरात्र ’या पुस्तकाने कुरुंदकरांवर हिंदुत्ववादी प्रचंड नाराज झाले पण हे त्यांनी आधीच गृहीत धरलं होतं. शिवरात्र पुस्तकाच्या प्रस्तावनेतच त्यांनी हे म्हटलं आहे. कुरुंदकर म्हणतात. ‘हिंदू जातीयवाद अगर मुस्लिम जातीयवाद असे जातीयवादाचे गट पाडणंच फारसं शास्त्रीय नाही. कारण कोणताही जातीयवाद हा एका प्रतिगामी (*मागे नेणाऱ्या*) राजकारणाचा बुरखा असेता. ‘जागर ’ मधील लेख वाचून मला हिंदुत्ववादी ठरवणं किंवा शिवरात्र मधले लेख वाचून महा हिंदूद्वेष्टा ठरवणं या दोन्ही प्रतिक्रिया स्थूल असल्या तरी मी वाचांकडून अपेक्षिलेल्या आहेत. चिकित्सकांना असल्या प्रतिक्रियांचा उथळपणा पुन्हा सांगण्याची गरज पडू नये.

कुरुंदकरांनी गांधी हत्येनंतरच्या महाराष्ट्रातल्या दंगलीमधली संधिसाधू वृत्तीही अतिशय मर्मग्राही पद्धतीने उघड केली आहे. कुरुंदकर म्हणतात, गांधींना ते निष्ठावंत अनुयायी मिळाले त्यात आप्पा पटवर्धन, दादा धर्माधिकारी, अण्णा सहस्त्रबुद्धे, शंकरराव देव, विनोबा भावे,आचार्य जावडेकर, भागवत, साने गुरुजी, आचार्य भन्साळी अशी कार्यकर्ती मंडळी महाराष्ट्रीय ब्राम्हणच होती. १९३६ नंतर केशवराव जेधे त्यांच्या नेतृत्वाखाली बहुजन समाज कॉंग्रेसजवळ आला. त्यांच्या त्याग देशनिष्ठा यांचं कौतुक केल्यावर एक प्रश्न विचारावास वाटतो. यातले किती जण गांधीवादी होते ? गांधीजींच्या तत्वज्ञानाला वाहून घेतलेले किती कार्यकर्ते आणि नेते ब्राम्हणेत्तर समाजने महाराष्ट्रातून दिलेत ? गांधीहत्येची जबाबदारी ब्राम्हणवर्गावर टाकण्याचा ब्राम्हणेतराला काहीच नैतिक अधिकार नव्हता. तरी ती टाळली गेली. जिथे गांधीवधामुळे ब्राम्हणांविरुद्ध दंगली झाल्या, त्या दंगलीचं नेतृत्व गांधीजींविषयी ज्यांच्या मनात श्रद्धा नव्हती अशांनी केलं.

कुरुंदकरांनी गांधीजींच नाव घेत महाराष्ट्रात केलं जाणारं मराठयांचं संधिसाधू, ढोंगी आणि तत्वहीन राजकारण व त्याच अंतरंग अत्यंत बेडरपणे उघड करुन ठेवलं आहे. आज काळाच्या कसोटीवर ते शंभर टक्के सत्य ठरलं आहे. जातीयवादविरोध म्हणजे मराठावाद नव्हे, याची धोक्याची जाणीव कुरुंदकरांना होती. ब्राम्हणवाद आणि मराठावाद या दोन्हींनाही विरोध हे खरं

जातीयवाद विरोधाचं स्वरुप असायला हवं, हे त्यांच्यातल्या चिंतकाने पुनःपुन्हा मांडल आणि पदरात हिंदुत्ववाद्यांसोबत समाजवाद्यांचाही विरोध ओढवून घेतला; पण याचा त्यांना कधी विषाद नव्हता. ते कर्मयोगी होते. १० फेब्रुवारी १९८२ रोजी एक वैचारिक भाषण करतानाच ते कोसळले, ते पुन्हा न उठण्याकरताच. ते तेव्हा अवघे ५० वर्षांचे होते.

वाटतं, कुरुंदकर अजून ३० वर्ष जगले असते तर ते आज हयात असते आणि अजून खूप खूप जणांचं शत्रूत्व ओढवून घेत खऱ्याखूऱ्या विचारवंतासारखे जगले असते !

# भालचंद्र नेमाडे

उदाहरणार्थ, मी आता भालचंद्र नेमाडयावंर लिहिणार आहे. भालचंद्र नेमाडे हे गृहस्थ जरी मराठीत कादंबरीकार या भल्याथोरल्या विशेषणाने युक्त असले तरीही ते खरे कवी आहेत. मराठी भाषेच्या दुर्दैवाने भालचंद्र नेमाडेंनी ‘ कोसला ’ नावाची कादंबरी आधी लिहिली. तिच्यात कादंबरीचे अनेक गुण होते. तिच्या भाषावैशिष्ट्यामुळे तिने तीन-एक पिढयांवर कमालीचं गारुड केलं. जगण्यातल्या अमानुषतेवर वरवर कोरडया वाटणाऱ्या; परंतु आतमध्ये करुणा स्त्रवणाऱ्या एका उपरोधाने नेमाडयांची

कादंबरी घडलेली आहे. कोसला १९६३ साली आली. मी तेव्हा जन्मालाही आलेलो नव्हतो. मी स्वतः 'कोसला' कॉलेजात असताना १९८६ मध्ये वाचली. मी काही मराठी किंवा कोणत्याच भाषेचा अभ्यासक नाही; परंतु 'कोसला' ने माझ्यावरही तेव्हा तेवढंच गारुड केलं. वाटलं, लेखक बापमाणूस आहे 'कोसला' तल एक वाक्य 'सगळयांनाच थोडे थोडे पैसे मिळाले पाहिजेत. नाहीतर आपण सगळेच कम्युनिस्ट होऊन जाऊ.' तेव्हा फारच पटलं होतं. आजही आवडतं. कारण तेव्हा आणि आताही तेच आहे !

नेमाडेंची बाकी सारी पुस्तकं वाचून काढायला मी वेळ लावला नाही. बिढार, जरीला आणि झूल या तिन्ही कादंबऱ्या चट्कन वाचून संपवल्या. वाचताना एक गोष्ट प्रकार्षाने जाणवली. स्त्री-पुरुष शरीरसंबंधाबाबत नेमाडे त्यांच्या कादंबऱ्यांत बोलायला बुजतात. मराठी समाजावर भाष्य करणाऱ्या एवढया थेट कादंबऱ्या मराठीत दुसऱ्या कोणत्याही क्वचितच आढळतील पण लेखनाच्या या बुजरेपणामुळे त्या कादंबऱ्यांना एकारलेपणा येतो. 'मेलडी' आणि 'देखणी' हे दोन कवितासंग्रह जर मी वाचले नसते, तर नेमाडेंबद्दल माझं मत मी अगदी वेगळं लिहिलं असतं. पण १९९० साली मी 'मेलडी' हा कवितासंग्रह वाचला १९९२ मध्ये 'देखणी' नेमाडेयांच्या कवितांनी मला अक्षरशः झपाटून टाकलं. त्यांच्या कवितांचा पहिला चांगला परिणाम म्हणजे (*वाचकांचा दृष्टीने*) मी कविता लिहिणं बंद केलं.

शब्दांचं वनज, शबदांचा परिणाम, शब्दांची लय, जगण्याचे संकेत आणि जगताना मध्येच एकाकीपनाचा धक्का, या साऱ्या बाबी नेमाडयांच्या कवितेत इतक्या डौलाने येतात की त्या कवितेचा खोल अंतरंग पाहण्याचा अगोदरही आपण तिच्या नुसत्या बाहय दर्शनाने स्तिमित होतो. मग हळूहळू आपण नेमाडयांच्या कवितांमध्ये शिरतो तेव्हा आपल्या लक्षात येतं की हा मराठीतला एक खूप मोठा कवी आहे. भालचंद्र नेमाडे हे फक्त 'मेलडी' आणि 'देखणी' हे दोनच कवितासंग्रह लिहून थांबले असते तरीही ते आजच्याऐवढेच मोठे आणि महत्वाचे साहित्यिक असते.

नेमाडे समीक्षक म्हणूनही इतर मराठी समीक्षकांहून सर्वार्थांने वेगळे आहेत. मराठी साहित्य आणि मराठी कादंबरी यातल्या सर्व वाईट प्रवृत्तींवर झोड उठविणारी अशी समीक्षा नेमाडयांनी लिहिलेली आहे. भाषा व्यवहारात स्वत्व ठेवण्याची आणि परकीय भाषांवर पृष्ट न होण्याची कळकळ इतक्या थेट

शब्दांत क्वचित कुणी व्यक्त केली. असेल, भालचंद्र नेमाडयांच्या ‘ देशीवादा ’ च्या संकल्पनेबद्दल अनेक आक्षेप घेणं शक्य आहे पण एक गोष्ट मान्य करावीच लागते. अन् ती म्हणजे नमोडेंनी मराठी साहित्यातला अनेक पुस्ताकांची आणि साहित्याची अत्यंत तर्कसंगत अशी चिरफाड केली, जी चिरफाड एवढया तर्कसंगतपणे करण्याचं धैर्य आणि वकूब आतापर्यंत कुणीच दाखवला नव्हता. इतक्या दमदारपणे आपल्या साहित्य भाषेतील पूर्वसूरींवर तूटून पाडायला लेखकामध्ये जबर दम लागतो. तो निश्चितपणे नेमाडेमध्ये आहे. ते काय म्हणताहेत हे न कळलेलेही केवळ त्यांच्या तर्कशुद्ध चिरफाड शेलीवर लट्टू झालेले मी पाहयलेत. नेमाडेंना त्यांच्या शेलीमुळेच कमालीचे प्रशंसक  आणि जीवघेणे विरोधक यांचा सामाना करावा लागला.

मला आठवतं, जेव्हा ‘ टीका स्वयंवर ’ या नेमाडयांच्या समीक्षा ग्रंथाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला, तेव्हा अरुण टिकेकर हे ‘ लोकसत्ता ’ चे संपादक होते त्यांनी ‘ छाछूगिरीला पारितोषिक ’ असा अग्रलेख लिहिला होता. अरुण टिकेकरांचा  विरोधी मते असण्याचा अधिकार मान्य करुनही तेव्हा वाटलं होतं की हा विषम संघर्ष आहे. कारण प्रतिवाद करायला नेमाडयांना उलट तीच अग्रलेखाची जागा मिळणार नाही. शिवाय एखाद्या साहित्यिकच्या *(खरं तर माणसाच्याच)* आयुष्यात काही तरी शुभंकर घडल्यावर तरी अशी टोकाची तीव्र प्रतिक्रिया देता कामा नये. अशी प्रतिक्रिया नंरतही देता येते पण नेमाडेंचं आयुष्य या सार्‍यालाच अफवाद आहे.

नेमाडेंनी त्यांच्या चाहत्यांना आणि विरोधकांना एका बाबतीत खूप वर्षे झुलवलेलं आहे. त्यांची ‘ हिंदू ’ ही कादंबरी बरीच वर्षे येते आहे. कादंबरीच्या नावामुळे अनेक साहित्यबाहय व्यक्ती आणि शकतींनाही त्या कादंबरीची प्रतिक्षा आहे ! पण ही कादंबरी लवकरच येणार आहे असं ऐकू येतं. असं पुन्हा बरीच वर्षे ऐकणारे सांगतात. ही कादंबरी लवकरच येऊ दे. नेमाडेंची ‘ कोसला ’ पासूनची काळासोबत बदलत जाणारी ‘ साहित्याची भाषा ’ वाचकांना पुन्हा नव्या टप्प्यावर वाचायला मिळू दे आपण प्रार्थनेखेरीज दुसरं काय करु शकतो ?

गंमत म्हणजे नेमाडेंना मी व्यक्तिशः ओळखत नाही; पण आठवडयातून एखादेवळेस पाहतो नक्की. माझ्या शेजारच्याच इमारतीत ते राहतात. कित्येकदा संध्याकाळी बाजारहाट करायला बाहेर पडतात तेव्हा दिसतात. साध्या

नगरसेवक किंवा गावगुंडाला मानवंदना देऊ इच्छिणाऱ्या रस्त्यावरच्या लोकांना मराठीतला एवढा महत्वाचा साहित्यिक-विचारवंत रस्ता आपल्यासोबत शेअर करतोय, याची काहीही पडलेली नसते. मलाही वाटतं, आपण पुढे होऊन विचारावं- ‘ हिंदू ’कुठपर्यंत आलीय ? पण मग मी संकोचाने तसं करत नाही. नेमाडे रस्त्यावरुन एकटेच फिरत राहताना दिसतात !

# कवी  नारायण सुर्वे

**गि**रणगावाचे ‘ अप्पर वरळी ’ होण्या अगोदरची गोष्ट आहे. खूप अगोदरची. नारायण सुर्वे हे आपला जन्म दिवस १५ ऑक्टोंबर १९२६ लावतात.  त्या दिवशी अनाथ अशा बालकाला सुर्वे नाव देऊन गिरणी कामगार जोडप्याने स्वतःकडे आश्रय दिला. त्या बालकाला लहानाचं मोठं केलं. मुख्य म्हणजे त्या बालकाला नारायण गंगाराम सुर्वे बनवलं. कवी नारायण गंगाराम सुर्वे !

नारायण सुर्वे हे मराठीतल्या ‘ कवी ’ या सदराखाली जे आचरट चाळे चालू होते, त्याला जबरदस्त छेद देणारे कवी आहेत. ‘ सारस्वतांनो, मी थोडा गुन्हा करणार आहे,’

असे म्हणत, तोपर्यंतच्या ‘जे न देखे रवी ते देखे कवी ’ अशा प्रकाच्या मराठीतल्या भंपक वल्गनांना सुर्व्यांनी छेद दिला. जगण्यातली अस्सल कविता लिहायला सुर्व्यांनी सुरुवात केली. कामगार, स्त्रिया, वेश्या या साऱ्यांचं मराठी कवितेला जे वावडं होतं, सुर्व्यांनी त्या सर्वांच अस्तित्व कवितेत साकार केलं.

कवी नारायण सुर्वे हे कम्युनिस्ट पार्टीच्या ऑफिसरमध्ये त्यांनी शिपायाची नोकरीही केलेली आहे. मार्क्सवर (*म्हणजे कार्ल मार्क्स*) त्यांनी कविताही केलेल्या आहेत. सुर्व्यांनी ज्या काळात कविता लिहायला सुरुवात केली तो काळ जगभर कम्युनिझम जोरात असण्याचा होता. प्रोलेतरीअन म्हणजे सर्वहारा वर्ग हाच पृथ्वीवर राज्य करणारा वर्ग असेल, असे ( *निदान*) मानण्याचा तो काळ होता. अविकसित राष्ट्रांमध्ये वेगाने कम्युनिझम पसरत चाललेला होता. अभिजन वर्गाला कम्युनिझमचा दहशतीमुळे का होईना बहूजन वर्गाची दखल घेणे भाग पडत होते. हा सर्वहारवाद आरामखुर्चात बसून लिहिणारे तेव्हाही मराठीत खूप जण होते पण सुर्व्यांच आयुष्यच त्यांच्या कवितेत व्यक्त व्हायला लागलं. सुर्व्यांचं जाहिरनामा, सनद, माझे विद्यापीठ, ऐसा गा मी ब्रम्ह या संग्रहांतून ज्या कविता आलेल्या आहेत, त्या सर्व थेट जगण्याशी नाळ जोडलेल्या कविता आहेत. त्यांचा आरामखुर्ची लेखनाशी सुतराम संबंध नाही.

आज आपण जी दलित कविता वाचतो त्याचे नारायण सर्वे हे आद्यपुरुष आहेत. शोषितांचे आणि तळागाळातल्या मूक दुःख सहन करणाऱ्यांचे दुःख इतक्या सर्वस्पर्शीपणे आणि इतक्या सर्वंकषपणे मराठी कवितेत इतर कुणीही व्यक्त केलेले नाही.

स्वतः कम्युनिस्ट असूनही नारायण सुर्वेंनी लिहिलेली कविता ही कधीही प्रचारकी कविता झाली नाही. त्यांच्या कवितेतला कार्ल मार्क्सही हसून त्यांना त्यांच्या कवी असण्याबद्दल विचारतो आणि वरती गटे हा आपला आवडता कवी असल्याचे सांगतो ! नारायण सुर्व्यांची कविता ही अगोदर कविता असते आणि नंतर ती सर्वहारा वर्गाशी आपले नाते सांगते.

मूकपणे दुःख सहन करणारी जनता, ‘कामगार आहे मी, तळपती तलवार आहे ’ , म्हणत सुर्व्यांच्या कवितेत आली तरी वास्तवात त्यांच्या या कामगाराला तळपती तलवार होण्याचे भाग्य लाभले नाही. संपूर्ण कामगार आणि शेतकरी वर्गच नेस्तनाबूत होत गेला. कम्युनिझम राज्ये स्वतःच्या वजनानेच कोसळली. ज्या वातावरणाने नारायण सुर्वे नावाच्या कवीला जन्म दिला होता ते वातावरण लोप पावले.

नारायण सुर्व्यांना कम्युनिझमच्या लोप पावण्याबद्दल विचारले तर ते म्हणतात, ‘ तत्वज्ञान कधीही नष्ट होत नाही. त्याच्या अंमलबजावणीत चुका होऊ शकतात. ’ हा कवीचा आशावाद झाला. पण वास्तवात माणूस, कलावंत आणि समाज यांचे आंतरिक नाते असतेच. कलावंतांला त्याच्या आंतरिक प्रतिभएवढीच त्याच्या सभोवतालची परिस्थिती जन्म देते. नारायण सुर्वांसारख्या जीवनवादी कवीबाबत तर हे जरा जास्तच खरे आहे.

नारायण सुर्व्यांकडे बघताना कवितेचं एक युग आपल्यासाठी आहे असं वाटत राहतं. कविता ही स्थलकालातीत असते. ती तशी असावी अशी आपण अपेक्षा करतो. कवीबाबत आपली तशीच अपेक्षा असते. सुर्व्यांची कविता ही अपेक्षा पुरी करते  पण खुद्द कवी सुर्वे ही अपेक्षा पुरी करत नाहीत.

कवी नारायण गंगाराम सुर्वे हे त्यांच्या काळातच गोठल्यासारखे वाटतात. गेल्या काही महिन्यांत-वर्षात नारायण सुर्व्यांच्या नवीन कविता आपल्या कुणालाच वाचताना आलेल्या नाहीत. मला स्वतःला यांचचं फार आश्चर्य वाटतं की, एक ओजस्वी कवी नव्या कविता न लिहिता इतका काळ कसा राहू शकतो ?

आधुनिक काळात मराठीत निर्माण झालेले मूळ कवी पाच. मर्ढेकर, विं दा. करंदीकर लेखन-सन्यास घेऊनसुद्धा लिहिताहेत. ग्रेसांची लेखणी तळपत्येय. कालटकरांची लेखणी उत्कृष्ट कविता प्रसवतेय.

बाकी उरलेत ते कवी नारायण गंगाराम सुर्वे. त्यांचं मन मार्स्कबाबांच्या शोधात इतस्ततः फिरतंय. त्यांच्या कामगाराच्या मानेवरुन आधीच तळपती तलवार फिरलीय. सुर्व्यांना नवीन कविता येत नाही की कम्युनिझमच्या तत्वज्ञानाचे सुर्वे झाड झालेत ?

त्यांच्या नवीन कविता येणार नसतील तर जुन्याच आठवू या. दुसरं काय !

# श्रीपु

**अ**लिकडे श्रीपुंचं नाव फारसं चर्चेत नसतं. प्रकृतीनंही ते थकलेत. श्री. पु. भागवतांनी एकेकाळी मराठी साहित्य आणि मराठी साहित्यिकांचं जग स्वतःभोवती फिरवलं होतं. त्यांच्यात आणि लेखकात मालक-लेखक असे संबंध त्यांनी दृढा केले होते. त्या काळात ' मौज ' आणि ' सत्यकथा ' या दोन नावांभोवतीच बहुतेक मराठी लेखकांच्या कृतकृत्यतेच्या भावना निगडित असत. मराठी साहित्याचं जग अर्थात (*आताप्रमाणेच*) तेव्हाही छोटंसंच होतं. मौज प्रकाशन (*आणि साप्ताहिक*) आणि सत्यकथा हे मासिक आपल्या

विष्णुपंत भागवत या थोरल्या बंधूच्या संपादन कामात सहभागी होऊन श्री. पु. भागवतांनी भरभराटीला आणलं. मौज प्रकाशानाने आपलं पुस्तक स्वीकारलं की त्या काळात मराठी लेखकांना दोन प्रकारच्या भावना होत असत. पहिली भावना आपण खरेखुरे लेखक आहोत की काय याची असे, तर दुसरी भावना आपलं वय झालं की काय याचा संशय येणारी असे.

पांढरेशुभ्र कपडे घातलेले श्रीकृष्ण पुरुषोत्तम भागवत आपल्याकडे पाहून किंचितसे हसले की अनेक लेखकांना आपल्याला मान्यता मिळाली असं वाटे. हे सारं मी कुणाकुणाकडून ऐकलंय. मी स्वतः श्रीपुंना पाहिलं तेव्हा ‘ सत्यकथा ’ केव्हाच बंद पडून गेलेलं होतं.सत्यकथा, मौज आणि त्या विरुद्धच्या बंडांच वारंही पूर्णपणे विरुन गेलेलं होतं. फक्त मराठी साहित्याच्या एका कालखंडात श्रीपुंनी जी खूण उमटवली होती, त्याची निशाणी त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असे ! तसं बघायला गेलं तर श्रीपुंवर खूप गमतीशीर आरोप त्या काळात होत असत. म्हणजे आज काहीच उरलेले नसल्यामुळे ते आरोप गमतीशीर वाटतात. त्या काळात ते आरोप वाड मयीन जगासाठी गंभीर होते आणि ज्यांना त्रास होत होता त्यांच्या दृष्टीने ते आरोप खरेही होते.

‘ मौजेचा कंपू ब्राम्हणवादी, मध्यमवर्गीय जाणिवेच्या पलीकडे पाहूच शकत नाही ! ’ पासून ते ‘ सत्यकथेचे लेखक हे नसून सत्यकथेच्या सुवासिनी आहेत आणि सत्यकथा बंद पडल्यावर ते लेखक सत्यकथेच्या विधवा म्हणवून घेण्यात धन्यता मानतात. ’ इथपर्यंत असंख्य आरोप त्या काळी ‘ मौज परिवारावर आणि त्या परिवाराचे कर्तेधर्ते म्हणून श्री. पु. भागवतांवर होत असत. आज इतिहास चाळताना आढळलं की श्री. पु. भागवतांनी आपल्यावर आणि आपल्या परिवारावर होणाऱ्या आरोपांना कधीच उत्तर दिली नाहीत. एवढंच नव्हे तर ‘ मौजे ’च्या साहित्य व्यवहारातही त्यांनी कधीच क्रांतिकारक बदल केले नाहीत. खूप आत्मविश्वास असल्याशिवाय माणूस असं वागू शकत नाही.

पुर्वसुरींपेक्षा अतिक्रांतिकारी नाही आणि तरीही पूर्वसुरींपेक्षा वाङ्‌मयीनदृष्ट्या आधिुनिक आणि पुरोगामी भूमिका श्री. पु. भागवतांनी घेतलेली होती. त्यांच्या काळात म्हणजे पन्नास, साठ आणि साठच्या दशकात ती भूमिका आधुनिक आणि पुरोगामी होती, असा श्रीपुंचा दृष्टीकोन होता. श्रीपुंच्या विरोधात बंडाचं निशाण फडकवणाऱ्यांना श्रीपु आणि त्यांचा साहित्यपरिवार प्रतिगामी आणि संकुचित वाटत होता. अर्थात त्याला श्रीपुंचाही इलाज नव्हता. श्रीपुंच्या दृष्टीने त्यांचचं सर्वांत मोठं सामर्थ्य म्हणजे त्यांना त्यांच्या मर्यादा ठाऊक होत्या.

त्यांच्या विरोधकांमध्ये या एका सामर्थ्याचा मोठाच अभाव होता. त्यामुळे श्रीपुंनी त्यांच्या मर्यादांच्या चौकटीत राहून मराठी साहित्यविश्वाला काहीतरी संचित दिलं. काहीतरी ठसा उमटला आणि मित्रपरिवार तसेच विरोधकांच्याही आयुष्याच्या केंद्रस्थानी तेच राहिले. त्यांच्या फार थोडया समकालिनांना हे जमलं.

‘ मौज ’ प्रकाशनाच्या उंबरठयावर लेखक किंवा कवींनी आपल्या पुस्तकाचं हस्तलिखित दिलं की वर्षानुवर्षे लेखक वा कवी आपलं पुस्तक आज येईल, उद्या येईल याची वाट पाहत दिवस कंठत असे. ज्यांचचं हस्तलिखित श्रीपुंनी स्वीकारलेलं असे त्यांची ही परिस्थिती होती. ज्यांचचं हस्तलिखित स्वीकारलंच नाही अशांच तर दुःख हतवीर्य माणसाचं असे. अर्थात् लेखक किंवा कवींच्या पुस्तकांसाठी एवढा वेळ लागणं हे काहीभुषणास्पद नव्हे पण ज्या अर्थी अगोदरच्या लेखक किंवा कवींचे काय झाले ते माहित असूनही नवा लेखक वा कवी पुन्हा ‘मौजे ’ ची वाट चोखायला असे त्यातच खरी गोम होती. मला वाटतं तेच श्री. पु. भागवतांनी मराठी वाङ्मयविश्वावर केलेलं गारुड होतं ‘मौज ’ आपल्या पुस्तकाच्या निर्मितीमूल्याबाबती कोणतीही तडजोड करत नसे. त्या काळात हे फार नवलाईचं होतं आज खूप प्रकाशन संस्था मौजे च्या तोंडीचं काम करीत असल्यामुळे आता अशा दर्जाचं आणि निमिर्तीमूल्यांचं फारसं अप्रूप राहिलेलं नाही; पण या पलिकडचा भाग म्हणजे संपादनाचा ‘ मौजे ’ च्या आणि श्री. पु. भागवतांच्या संपादनाबाबत जेवढं आदरानं बोललं गेलंय, तेवढचं त्यावर आक्षेपहो घेतले गेलेत. त्यातला मुख्य आक्षेप म्हणजे श्रीपु प्रत्येक पुस्तक हे त्यांच्या लेखकाकडून आपल्या सौंदर्यधारणा आणि साहित्यकल्पनांप्रमाणे पुनःपुन्हा लिहून घेत असतं. त्यामुळे अंततः ते पुस्तक लेखकांच न राहता श्रीपुंचं आणि मौजेचं होऊन जाई. श्रीपुंच्या सौंदर्यशास्त्र व साहित्यकल्पनांच्या विशिष्ट आग्रहामुळे पुढे दलित साहित्याची जी लाट मराठीत आली, तिचा अंदाज ‘मौज ’ परिवाराला आणि श्रीपुंना पुरेसा आलाच नाही. किंबहुना, श्रीपुंचं वाङ्मयविषयक शहाणपण हे हजारो वर्षे गावकुसाबाहेर ठेवलेल्यांना कधीच उपयोगाचं नव्हतं. यातली श्रीपुंच्या बाजूने सर्वात मोठी शोकांतिका ही होती की, जी काही चांगली -वाईट मराठी भाषा पुढल्या काळात टिकणार होती, वाढणार होती, ती या गावकुसाबाहेरच्यांमुळेच. त्यामुळे या दृष्टीने श्री. पुं. भागवत द्रष्टे ठरले

नाहीत किंबहूना आत्ममग्न स्वप्नाळू बनले.

श्री. पुं. भागवतांचा सर्व वाङ्ःमयीन संसार ज्यांच्या खांद्यावर उभा होता, त्यातल्या बहूतेकांची मुलं अमेरिका-इंग्लंडमध्ये स्थायिक झाली आणि एकजात सर्वांची नातवंड कॉन्हवेंटमध्ये शिकू लागली. त्या अर्थाने वाङ्ःमय वंशाची त्यांची पिढी ही शेवटचीच होती. त्यातलेच काही आजही (*बरं-वाईट*) लिहितच आहेत परंतु मराठी भाषेच्या भविष्याचा वेध घेणारी पुढची पिढी श्रीपुंच्या गढीबाहेर राहिली त्याअर्थाने श्रीपुंनाच त्यांच्या भविष्याचा वेध घेत आला नाही, असं म्हणाव लागेलं त्या अर्थाने श्री. पुं. भागवत आणि ‘मौजे’ चा (*तेव्हाचा*) परिवार हे मराठी भाषेतलं एक हिरवं बेट होतं जे स्वखुशीने इंग्रजीच्या पाण्याखाली गेलं. ते तसं जाणार याची बीजं त्यांच्यात तेव्हाही होती. शिवाय श्रीपुंचे काही विरोधक ओरडून हेच सांगत होते परंतु श्रीपु आपल्याला ‘मला तुम्ही काय म्हणता ते ऐकू येत नाही,’ या मुद्दयावर ठाम राहिले. तो त्यांचा हेवा वाटावा असा आत्मविश्वास आहे आणि हेवा वाटवा असा पराभवही. श्रीपुंविषयी आणि त्यांच्या युगाविषयी आजही कुतूहल वाटतं ते त्यामुळेच. मी त्यांच्या काळात जन्माला आलो असतो अन् हा लेख घेऊन त्यांच्याकडे गेले असता तर त्यांचं कदाचित मला पत्र आलं असतं (*काय आत्मविश्वास !*) लेख वाचला. पुन्हा लिहावा लागेल. तरच स्वीकारण्याविषयी विचार करता येईल.

न. र. फाटक आणि गोवर्धन परिखांच्या या शिष्याच्या एका अशा पत्रासाठीसुद्धा अनेक लेखकांनी आख्खं आयुष्य वाट पाहिलेली आहे !

# जीए

**द**हावीत असताना पहिल्यांदा मी जी. ए. कुलकर्णींचा ‘ सांजशकुन ’ हा कथासंग्रह वाचला. त्यातली अश्वथाम्याच्या आणि गौतमाच्या भेटीची गोष्ट मला थक्क करुन गेली. आजारपण, वृद्धावस्था आणि मृत्यूच्या, दु:खाच्या मुळाचा शोध घेण्याचा गौतचा प्रवास सुरु असताना त्याला ‘ मृत्यूपेक्षाही भीषण काय असतं तर ते अमरत्व ’ असं सांगणारा अश्वत्थामा भेटतो. ‘ मृत्यूमध्ये तर सुटका तरी आहे ; पण अमरत्वामध्ये फक्त चिरकाल टिकणारा दाह आहे, ’ असं सांगणारा अश्वथामा मग

माझा हीरो झाला. जी. ए. कुलकर्णीच्या पहिल्या  वाचनाने त्याची लेखक म्हणून एक प्रतिमा माझ्या मनात तयार झाली. ती जवळजवळ अश्वथाम्यासारखी होती.

पुढे बऱ्याच काळाने काळा गोंगल लावलेला त्यांच्या फोटो मी पाहिला. त्याने माझ्या मनातल्या जी. ए. कुलकर्णीच्या मूळ प्रतिमेचे वरवरचे टवके उडाले, तरीही त्यातला अश्वत्थाम्याचा आत्मा कायम राहिला.

चांगले-वाईट, खरे-खोटे, नैतिक-अनैतिकच्या पुढे जाऊन मी असं म्हणेन की, जी. ए. कुलकर्णी हे मराठीतले एकमेव असे लेखक होते की, ज्यांचं अनुकरण करण्याचा मोह त्यांच्या वाचकांना अनावर होतो. जी. ए. कुलकर्णी लेखनप्रवासात ज्या वाटेवरुन गेले ती वाट मळलेली नव्हती. गुढकथा, मिथकं, तत्वज्ञान, ग्रीक संस्कृती, रमल, नियतीची भीषणता या साऱ्यांच अर्थपुर्ण मिश्रण म्हणजे त्यांच्या कथा आहेत. 'इस्कीलार ' हे नाव मला नाही वाटत जी. ए. च्या व्यतिरीक्त मराठीत कुणी वापर करु धजावला असता. 'इस्कीलार - अल- सेरीपी ' या तीन शब्दांभोवती जी. ए. जो मानवी आयुष्याच्या अर्थपूर्ण निरर्थकतेचा पट विणतात तो वाचताना मती गुंग होते.

ग्रीक, अरब, पर्शियन पुराणातलं वातावरण निर्माण करुन त्याचं केवळ शब्दांच्या सहाय्याने वाचणाऱ्याच्या मनावर जे गारुड जी. ए. करतात, ते पुन्हा शब्दांत वर्णन करणं अशक्यचं ! जी. ए. स्वतः चित्रकार होते. त्यांच्या एका कथासंग्राहाला त्यांनी काढलेलं मुखपृष्ठ आहे. ती चित्रकारिता त्यांच्या  लेखनातून सतत व्यक्त होत राहते. जी. ए. जेव्हा जेव्हा कथा लिहीतात तेव्हा तेव्हा त्यांच्या डोक्याशी त्याचं चित्र फिट्ट बसलेलं असतं. चित्रामागून चित्रं उलगडत जातात. ज्या उलगडण्यात मानवी आयुष्यातला थरार आणि त्यातून हाती उरणारी निरर्थकता मनाला विद्व करत राहते.

जी. एं. च्याच भाषेत लिहायचं झालं तर, स्मशानात रात्रीच्या वेळी धुनी पेटवून येणाऱ्या -जाणाऱ्या वाचकांसोबत कवडया खेळत त्याचं रमल सांगणारे ते लेखक होते. त्यांच्यासोबत जो कवडया खेळायला म्हणून बसला, तो त्यांच्याच झाला म्हणून समजावे !

' माणसे : अरभाट आणि चिल्लर ' नावाचं त्यांचं एक पुस्तक आहे. त्यातला विनोद वाचताना मी हसून अक्षरशः लोळलेलो आहे. विनोद एका असाधारण उंचीवर पोचवून त्याचं तत्वज्ञान  करण्याची जी. एं. ची हातोटी विलक्षण होती. हीच हातोटी त्यांनी त्यांच्या बालसाहित्य लेखनात खूप

परिणामकारतेने वापरलेली आहे.

माणूस म्हणून ‘जी. ए.’ अत्यंत गुंतागुंतीचे होते. ते सहजासहजी कुणाला भेटत नसत. तीन माणसांनी त्यांची गढी आतून नीट पाह्लेय. जयवंत दळवी, सुभाष अवचट आणि अप्पा परचुरे. तिघांचीही पद्धत वेगवेगळी होती. दळवी हे त्यांच्या ठणठणपाळ पद्धतीने ‘जी. एं.’ च्या गढीत घुसले. ‘जी. ए.’ नीही त्यांना भरभरुन प्रतिसाद दिला. अवचट त्यांच्या चित्रकला आणि फोटोग्राफिच्या माध्यमातून जी. ए.च्या गढीत शिरले. त्या सर्व सहवासावर त्यांनी पुस्तकही लिहिलेले आहे. ‘जी. ए.’ साठी प्रतीक म्हणून त्यांनी त्यात कुलूप वापरल्येय जे अक्षरशः खरे होते. अप्पा परचुरे अंगभूत मार्दव आणि लेखकांबद्दच्या प्रेम व आदरामुळे ‘जी. ए.’ चा विश्वास संपादन करु शकले. बस्स माहितीतली इतर फार थोडी माणसं धारवाडच्या ‘जी. ए.’ च्या गाडीत शिरु शकली.

धारवाडला कॉलेजात‘ जी. ए.’ इंग्रजी शिकवायचे. त्यांच्या आयुष्यात त्यांना बक्षिसं आणि स्त्री या दोन्हीही लाभल्या नाहीत, असा त्यांचा समज होता. त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. त्या पुस्तकाच्या प्रकाशन दिवसावरुन क्षुद्र व्यक्तींनी वाद उकरुन काढला, त्यामुळे ‘जी. ए.’ नी पुरस्कार परत केला. त्यांना त्याचा फार मनस्ताप झाला.

तरुणपणी जिच्यावर खूप प्रेम केले ती व्यक्ती ऐनवेळेस ठरल्याप्रमाणे घर सोडुन आलीच नाही. त्याने ‘जी. ए.’ ना खोलवर धक्का बसला असं म्हणतात. खरं-खोटं ‘ जी. ए.’ च जाणो पण हे खर असेल तर त्यांच्या लेखनात स्त्रियांबाबत त्यांचा एक दृष्टीकोन दिसतो. त्याची मुळं या प्रसंगात असतील. विल्यम गोल्डिंग हा नोबेल पारितोषिक विजेता लेखक. त्याचं लॉर्ड ऑफ द पलाईज हे पुस्तक ‘जी. ए.’ नी मराठीत आणलं. प्रकाशन समारंभाला स्वतः विल्यम गोल्डिंग उपस्थित होता पण ‘ जी. ए.’ अनुपस्थित राहिले.

जी. ए.च्या या साऱ्या मनोविभ्रमांचा उलगडा त्यांनी त्यांच्या विद्वान मैत्रिणीला-सुनीता देशपांडयांना - पाठवलेल्या पत्रांमध्ये केलेला आहे पण हा उलगडाही खूपसा अप्रत्यक्ष आहे.

मला स्वतःला जी. ए. आणि सुनीताबाईमधला हा पत्रव्यवहार वाचक म्हणून फारसा आवडला नाही. कारण त्यात जगभरच्या साहित्य व्यवहाराची, तत्वज्ञानांची,

शास्त्रांची, विज्ञानांची चर्चा करतात पण हे ज्या प्रेमाच्या आसुसल्या ओढीने ते सुनीताबाईंकडे करतात त्याचा उल्लेख तिथे प्रत्येक

दोन ओळींमध्येच राहतो. लेखनात येत नाही. सुनीताबाईही 'जी. ए.' च्या या संकोचाच्या फुग्याला फोडत नाहीत. जन्माचं एक नाटक चालू राहतं.. त्यात थेटपणा येतच नाही. एक शक्यता वाया जाते..

अविवाहित जी. ए. गेले तेव्हा त्यांच्या अनेक वाचकांना अस्तित्वाचा एक भागच गेल्यासारखं वाटलं. आश्चर्याचं हे की अस्तित्वाचा तो भाग खऱ्या अर्थानं कधी व्यक्तच झाला नव्हता !

# अरुण साधू

**अ**रुण साधू मराठीतले एक अद्‌भूत लेखक आहेत. तरीही ते प्रदर्शनवादी नाहीत हा एक दुर्मिळ योगायोग आहे. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी त्यांचं नाव पुढे आल्यावर बरं वाटलं. नाहीतरी मराठी साहित्य संमेलनात ‘ संतां ’ ना मंत्र्यांनी हरवण्याची परंपरा (*सर्वार्थाने*) आहेचं अशावेळी आता साधूंनी अध्यक्षपदाच्या स्पर्धेत आपलं नशीब अजमावून पाहायचं ठरवलं. आपण त्यांना फक्त शुभेच्छा देऊ शकतो. गंमत म्हणजे मराठी साहित्यातले साधू (*अरुण साधू*) आणि संत *(इंदिरा संत)* यांच्या नावाप्रमाणेच निघाले. सभ्य

आणि सुसंस्कृत.

अरुण साधूंची पत्रकारितेची काराकीर्द इतकी मोठी आणि भव्य आहे की, एक आख्खा लेख त्यांच्या पत्रकारितेतल्या यशसवी कारकीर्दीवर लिहावा लागेल. सर्वसाधारणपणे मराठी पत्रकार मराठीत आणि इतर भाषिक पत्रकार इंग्रजीत काम करत असत, त्या जमान्यापासून अरुण साधूंनी इंग्रजी पत्रकारिता गाजवलेली आहे. अरुण साधूंची लेखन कारकिर्द बहरली तो काळही मोठा बहारीचा होता. देशात आणि जगातही तरुणांच्या बंडखोरीने प्रस्थापित व्यवस्थांच्या नाकीनऊ आणले होते. कोणतेही तरुण, संवेदनाक्षम माणूस लेखक असेल तर तो प्रस्थापित व्यवस्थेच्या बाजूला असण्याला प्रतिष्ठा नव्हती. अरुण साधूंच्या लेखनाचे जे रसायन तयार झाले त्यात त्यांच्या काळाचे जहाल अर्कही मिसळलेले होते. मराठीत श्री. ग. माजगावकरांनी त्यांच्या ‘ माणूस ’ साप्ताहिकात वेगवेगळया प्रकारचे कसबी लेखक लिहिते केले. अरुण साधू यांपैकीच एक. चे गव्हेरा, फिडेल कॅस्ट्रोची क्युबातली क्रांती असो वा माओची चीनमधली सांस्कृतिक क्रांती असो, अरुण साधूंनी आपल्या लेखणीच्या नजाकतीने महाराष्ट्रातल्या हजारो तरुणांपर्यंत त्या प्रस्थापित विरोधाची धग पोहोचवली. साधूंची रिपोर्ताज लिहिण्याची एक खास स्आईल होती. ती इतकी प्रभावी होती की, साधूंनी लिहिलेले रिपोर्ताज नंतर कित्येक वर्षांनी वाचता येत. ते कळू लागल्यावर मी वाचलं तेव्हा मी विलक्षण अस्वथ झालो. आजही कुणी अरुण साधुंचे तेव्हाचे रिपोर्ताज वाचले तर त्याला वा तिला तत्काळ सामाजिक जाणिवांचं भान येईल.

अरुण साधू हे लेखक म्हणून जग बदलायला निघालेल्या पिढीचे प्रतिनिधी आहेत. या पिढीने आयुष्यभर क्रांतीची वाट पाहिली. साधू मितभाषी, संयमी आणि मध्यमवर्गीय मनुष्य असले तरी त्यांच्या (*अगदी अलिकडच्या वगळता*) लेखनात सामाजिक आणि राजकीय क्रांतीचे बिगूल वाजताना दिसतात. साधूंना वरवर ओळखणाऱ्या माणसाला आपण ओळखतो ते अरुण साधू आणि लेखनात जे भेटतात ते अरुण साधू भिन्न वाटतात ते त्यामुळेच पण अशाप्रकारे जीवनवादी लेखन करताना त्यांच्या लेखनात कधीही प्रचारकीपणा जराही डोकावला नाही. याचं एक कारण म्हणजे अरुण सांधूंच्या लेखनात मानवी करुणेचा धागा कधीही तुटत नाही. शेवटी या साऱ्या लढाया, हे सारं लेखन माणसाला बरं, समाधानी आणि आटोपशीर आयुष्य जगायला मिळावं म्हणून आहे, याचं

भान साधू लिहिताना कधीही विसरलेले नाहीत.

मराठीतच नव्हे तर जगातल्या अनेक भाषांमध्ये राजकीय कादंबरी लिहिणं हे पेलवायला कठीण असं शिवधनुष्य आहे. ' मुंबई दिनांक ' आणि ' सिंहासन ' या अरुण साधूंच्या कादंबऱ्या ज्यांनी वाचल्यात त्यांना हे शिवधनुष्य साधूंनी किती लीलया पेललयं, हे सहज कळून येतं. या कादंबऱ्यांच्या अर्कातून विजय तेंडुलकरांनी ' सिंहासन ' हा चित्रपट लिहिला. आजही तो चित्रपट राजकीय वास्तवातून जो बोध होतो त्याच्या सारांशाचा वस्तुपाठच आहे. त्या अर्थाने अरुण साधूंच हे लेखन अक्षर अन् काळाला समांतर जाणारे ठरले.

अरुण साधू माणूस म्हणून अतिशय संकोची आहेत. आयुष्यात त्यांना सर्वात कठीण बाब वाटत असणार ती कुणाला कठोरपणे काही बोलण्याची. त्यांना त्यांच्या गाडीत बसताना पूर्वी मी पाहत असे तेव्हा मला प्रश्न पडत असे की, आता साधू त्यांच्या ड्रायव्हरला आज्ञा द्यायची वेळ आली की ते कशी देत असतील पण एवढा संकोची आणि नम्र स्वभाव असूनही साधूंनी अंगावर पडलेल्या सर्व जबाबदाऱ्या आपले ' मेटल ' सिद्ध करत पार पाडलेल्या आहेत. त्यांची मतं ठाम असतात. ती मांडताना साधू कधीही आवेश आणत नाहीत, उलट साधू जेव्हा स्वतःची मतं मांडतात तेव्हा ते स्वतःच्याच मतांचं विच्छेदन करुन ती अधिक बरोबर करत नेताहेत, असं वाटत राहतं. साधूच्या कादंबरीतलं ' डिकास्टा ' हे पात्र (*तेव्हाच्या* ) जॉर्ज फर्नांडिसांवर बेतलेलं आहे असे मानणारे बरेच जण आहेत. ' जॉर्ज फर्नांडिस हे तेव्हा राजकीय कांदबरीतले पात्र व्हावे असेच जीवन जगत होते. डाव्या विचारसरणीच्या अनेक लेखकांना जॉर्ज तेव्हा प्रेरणादायी वाटत असत. या जॉर्ज फर्नांडिसांची दुसरी इनिंग आणि तिचा सामाजिक अर्थ याबाबत खरोखरच संवेदनेने जर कुणी लिहू शकेल तर ते अरुण साधूच. त्यांच्या डिकास्टाचा दुसरा भाग जर त्यांनी लिहिला तर त्यांच्या पिढीच्या लेखकांचं क्रांतिकारकत्व आणि त्यातली प्रस्थापितविरोधकाची धग मालवत का गेली, या प्रश्नांची उत्तर नक्की मिळू शकतील.

अरुण साधू, कुमार केतकर आणि दिनकर गांगल हे तिघे घट्ट मित्र आहेत. एकाला लागलं तर दुसऱ्याला दुखतं इतकं; पण राजकीय तत्वज्ञानाच्या बाबतीत हे तिघे स्वतःचे स्वतः आपल्याला मठाचे शंकराचार्य आहेत. गांगल ग्रंथालीच्या माध्यमातून तर कुमार लेखणीच्या माध्यमातून सतत लोकांसमोर असतात. फक्त अरुण साधू तेवढे पुण्याला पत्रकारितेच्या कॉलेजचे प्रमुख म्हणून गेले. त्यानंतर काहीसे आज्ञातवासात गेले. मध्ये कधीतरी परत मुंबईत आले तरी शांत बसून

त्यांचे लेखन चालू होते. चिनी ड्रॅगनवर त्यांचे पूर्वी लेखन झालेले होते परंतु चीनचा संपूर्ण आवाका आणि अर्थ समजून सांगणारे साधूंचे नवे पुस्तक काही दिवसांपूर्वीच आले. अलिकडच्या साधूंच्या पुस्तकात ' साधू मॅजिक ' असलेले हेच पुस्तक. अलिकडच्या साधूंच्या कादंबऱ्यांमध्ये किंवा त्यांच्या वर्तमानपत्रातल्या स्तंभामध्येही मला त्यांची जुनी जादू सापडत नव्हती, ती ' ड्रॅगन ' वरच्या पुस्तकात सापडली. मी जेव्हा लिहायला सुरुवात केली तेव्हा सुरुवातीच्या काळात (*सुमारे दहा वर्षांपूर्वी*) मी एका दिवाळी अंकात निखिल वागळे, माधव चव्हाण, मेधा पाटकर व विवेक पंडित यांच्या कामाचं मूल्यमापन करुन ते दहा वर्षांनी कुठे असतील, यावर टीकात्मक प्रदीर्घ लेख लिहिला होता. तो लेख मी या चौघांशी बोलूनच लिहिला होता. त्या लेखनातल्या टीकेत एक पोरसवदा उत्साह होता. त्यामुळे या उत्सवमूर्ती माझ्यावर खूपच संतापल्या होत्या. त्या वेळी अरुण साधूंनी खास मला फोन करुन लेख आवडल्याचं व माझे विश्लेषण बरोबर असल्याचं सांगितलं होतं. आज दहा वर्षांनी ते विश्लेशण बऱ्यापैकी अचूक ठरलं असल्याचं दिसतयं; पण तेव्हा माझा टीकेचा उत्साह टिकवणारे अरुण साधूच होते.

अरुण साधू जर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले तर तो सोलापूर, मुंबईसह महाराष्ट्राच्याच मराठी भाषेचा सन्मान असेल. कारण साधू सोलापूर किंवा मुंबईचे लेखक नसून ते मराठीचे लेखक आहेत, किंबहूना ते लेखक आहेत. त्यांना इतकंच पुरेसं आहे.

# बाबासाहेब पुरंदरे

**बा**बासाहेब पुरंदरेंच भारुन टाकणारं एक व्याख्यान मी शाळेत असताना ऐकलेलं होतं. सलग दहा दिवस छत्रपती शिवाजी महाराजांवरची व्याख्यानं ऐकताना आपण नकळत कधी शिवकाळात जातो तेच कळायचं नाही. ते वय काही बाबासाहेबांशी ओळख करुन घेण्याचं नव्हतं. किंबहूना, त्या काळात अशा मोठ्या माणसांशी ओळख करुन घ्यायची भिती वाटायची. समोरचा माणूस नकळत आपल्यावर ओरडून आपला अपमान तर करणार नाही ना, अशी भीती सतत वाटायची. तशाही स्थितीत बाबासाहेबांच्या तोंडून शिवचरित्र ऐकल्या

ऐकल्या मी त्यांना भेटायला गेलो. प्रसंग मोठा बाका होता. बाबासाहेब त्यांच्या खास डौलात. मी हाफ चड्डीत. मी कसाबसा त-त-प-प करत बाबासाहेबांना त्यांच घर कुठे आहे असं विचारलं. बाबासाहेब खूप गोड हसले आणि म्हणाले, ‘ पुण्याला आमचं एक छोटंसं घर आहे. ’ तेव्हा मी पुणं पाहिलेलं नव्हतं. महाराष्ट्रातलं मुंबई हेच एक शहर मला ठाऊक होतं पण बाबासाहेबांच्या तोंडून पुण्याचं त्यांचं छोटंसं घर आणि त्या अगोदरचं शिवचरित्र ऐकल्यावर मला पुणं हे शहर खूप गूढ आणि ऐतिहासिक वाटू लागलं. पुढे अगदी वेगळया कारणाने ते खरंही ठरलं ते वेगळं ! पण बाबासाहेबांशी माझी ती पहिली ओळख. बाबासाहेबांची व्याख्यानं ऐकल्यावर मग मी त्यांनी लिहिलेली सगळी पुस्तकं वाचून काढली. ती पुस्तकं वाचताना स्वतः बाबासाहेब आपल्याशी बोलताहेत असंच वाटतं. नंतर बऱ्याच काळानंतर कॉलेजमध्ये असताना मी पुन्हा एकदा बाबासाहेबांच व्याख्यान ऐकलं. तोपर्यंत माझ्या आयुष्यात खूपच बदल झालेला होता. बरचंस जग पाहून झालेलं होतं. शिवाय नाना विचारांची आणि नाना प्रकाराची पुस्तकं मी वाचलेली होती. आता बाबासाहेबांच व्याख्यान ऐकताना तेवढं भारुन जायला होणार नाही, असं मला वाटत होतं; पण माझं हे वाटणं खोटं ठरलं. मला त्या व्याख्यानातला बाबासाहेबांचा डौल पूर्वीएवढाच भावला. आवाज हळू करत नेऊन मग अचानक वाढवण्याची त्यांची जुनी ढब मला तेव्हाही तितकीच परिणामकारक वाटली. त्यांच्या शबदातलं गारुड तसंच कायम होतं.

वर्तमानातलं आयुष्य जगताना कित्येकदा आजुबाजूची आझी इतकी जड वाटतात की आपल्याच उदात्त इतिहासाचं विस्मरण व्हायला लागतं पण बाबासाहेब गेली साठ वर्षे अव्याहतपणे आपल्याला शिवकालाचं स्मरण करुन देण्याचं काम कराताहेत. त्यांच्या नसानसात छत्रपती शिवाजी महाराज आहेत. प्रत्येक गड-किल्यावर असंख्य वेळा मिळेल त्या वाहनाने पोहोचून महाराजांचा इतिहास पुनःपुन्हा उलगडून पाहणे हे काही सोपे काम नव्हे. या साऱ्या काळात बहुतेक वेळेला त्यांचं वाहन सायकल असे किंवा बऱ्याचदा तर ते पायीच जात. ही उर्जा त्यांच्याकडे कुठून आली असेल ?

उन्हाळा असो, पावसाळा असो की थंडी असो. बाबासाहेब पुरंदरे नावाचा माणूस शिवकाळाचा धांडोळा घेत फिरत राहिला. काही माणसांना नियती निवडते म्हणतात. बाबासाहेब पुरंदरे यांना मी नियतीने निवडलेल्या माणसांपैकी मानतो. बाबासाहेबांनी त्यांच्या आयुष्यात इतर अनेक इतिहासपुरुषांवर आणि विषयांवर

व्याख्यान दिलेली आहेत. सुरुवातीच्या काळात शिवाजी महाराजांबरोबर ते या इतर विषयांवर व्याख्यानं देत असत पण लोकांनी त्यांचं शिवचरित्राचं व्याख्यान इतर कशापेक्षाही अधिक उत्साहाने आणि प्रेमाने स्वीकारलं, नव्हे; डोक्यावर घेतलं.

खरंतर महराष्ट्राला शिवचरित्र नवं नव्हतं. महाराष्ट्रात इतिहाससंशोधकांचीही मोठी परंपरा आहे. तरीही त्यात बाबासाहेब पुरंदरे वेगळे आहेत. त्यांच वेगळेपण नेमकं कशात आहे ते शोधून काढणं थोडं सूक्ष्मात जाण्यासारखं आहे; पण बाबासाहेबांचं एक मोठेपण हे आहे की, जो इतिहास फक्त इतिहाससंशोधक आणि गडकिल्लेप्रेमींसाठीच राखीव होता, तो इतिहास बाबासाहेबांनी सामन्य माणसासाठी खुला केला. अगदी सामान्य, रस्त्यावरचा माणूससुद्‌धा पन्हाळयावरुन सुटकेची किंवा आग्र्याहून सुटकेची तारीख आणि तिथी-वार सांगू  लागला. हे खरं बाबासाहेबांच यश मराठी माणसाला बाबासाहेबांनी, हा इतिहास आपला आहे त्याची आपण जपणूक केली पाहिजे. असं वाटायला लावलं.

बाबासाहेब वेळेचे प्रचंड काटेकोर आहेत. ते वेळ आणि शब्द कसोशीने पाळतात. वेळ पाळण्यात समोरच्या माणसाकडून उशीर झाला तर बाबासाहेब ही गोष्ट स्पष्ट शबदात सांगतात. एवढ एक सोडलं तर बाबासाहेब खूप गोड माणूस आहेत. शक्यतोवर कुणाविषयी कटू बोलत नाहीत. तशी वेळच आली तर मुद्‌दा थोडा घोळदार करतात पण आपल्या वाग्बाणांनी कुणालाच घायाळ करणं त्यांना आवडत नाही. त्यांना दुखावणारे आणि घायाळ करणारे प्रसंग त्यांच्या आयुष्यात आले नसतील असं नाही; पण त्याच्या खुणा त्यांनी स्वतःच्या चेहऱ्यावर आणि मनावर उमटू दिल्या नाहीत.

बबासाहेब पुरंदरांनी वयाची ऐंशी वर्षे केव्हाच पार केलीत. त्यांच्यावर पाच शस्त्रक्रिया नुकत्याच झाल्यात. काही दिवसांपूर्वीच राज ठाकरेंनी ई. टी. व्ही. साठी त्यांची रायगडावर मुलाखत घेतली. तिथे मी हजर होतो. ऐंशी पार केलेले आणि पाच शस्त्रक्रिया नुकत्याच झेपलेले शिवशाहीर बाबासाहेब रायगड पाहिल्यावर तरुण झालेले मी डोळयाने पाहिलेत.

प्रसाद पुरंदरे असाच सख्खा मित्र. तो आणि अमृत पुरंदरे आपल्या वडिलांची काळजी घेत होते. राज ठाकरे स्वतः बाबासाहेबांना काय हवं नको ते पाहत होतेच; पण या यासाऱ्यापलीकडे स्वतः बाबासाहेब होते. रायगडावर त्यांची एक खास तंद्री लागते. ती तंद्री एका धूनमस्त फकिराची असते. तिथेच त्यांनी

कवी भूषण त्यांची छत्रपती शिवाजी महाराजांवरची कविता जेव्हा म्हणून दाखवली तेव्हा आम्ही सगळेच अवाक् झालो. कारण ती कविता म्हणताना बाबासाहेबांच्या अस्तित्वामधून वय नावाची गोष्टच लोप पावली होती.

बाबासाहेबांनां पुन्हा एकदा मोठया कालखंडानंतर पाहताना एक गोष्ट मला पुन्हा जाणवली. छत्रपती शिवाजी महाराजांवर बोलताना बाबासाहेबांच्या बोलण्यात माझ्या शाळकरी वयात मला जाणवलेली जादू अजून तशीच टिकून आहे. किंबहूना वाढलेलीच आहे.

एका ओळखीच्याकडे जेवताना मी बाबासाहेबांच्या बाजूलाच बसलो होतो. तेव्हा ते महाराष्ट्राच्या वर्तमानाबद्दल चिंतित होते. ती चिंता, ती काळजी त्यांच्या ... रायगडावर नव्हती. जणू ते तिथे आपल्या प्रांतात होते. आपल्या लाडक्या राजांच्या राज्यात आणि तिथे नेहमीप्रमाणे ते एकटे नव्हतेच. बरोबरच्या सर्वांनाच घेऊन गेलेले होते !

# पीटर ड्रकर

**पी**टर ड्रकर यांचं नाव जगभराच्या असंख्य विचारवंतांना कायम स्फूर्तिदायक ठरलेलं आहे. कालच्या ११ नोव्हेंबरला (*११ नोव्हेंबर २००५*) शहाण्णवव्या वर्षातसुद्धा अतिशय तल्लख आणि ताजेतवाने असताना आणि नवनवे उपक्रम योजत असताना त्यांचा मृत्यू झाला. पीटर ड्रकर यांचं नाव बऱ्याचजणांच्या कानावरुन गेलंल असतं; पण त्यांची नेमकी भुमिका काय होती किंवा त्यांच्या विचारांच्या कक्षा कोणत्या विषयापर्यंत रुंदावल्या होत्या, याची जाण बऱ्याचजणांना नसते. आपण जगतो त्या

जगाचा विश्लेषणातून अर्थ लावण्याचा आणि त्यातूनच मग छावी जगाविषयी भाकित करण्याचं काम विचारवंत करतात. सर्वसाधारपणे एक विचारवंत एक किंवा दोन विषयांचा अभ्यास करुन त्यांच संशोधन आयुष्यभर करतात. पीटर ड्रकर यांनी मात्र असंख्य विषयांत विचारविहार केला. सर्वच क्षेत्रातल्या व्यवस्थापनशास्त्राची मूलतत्वे शोधून काढली. त्यांनी शोधून काढलेली काही तत्वे चुकली परंतु बहुतेक बरोबर आली. त्यांनी आयुष्याच्या पूर्वार्धात पत्रकार म्हणून अनेक विषयांशी संबंधित कामे केली. त्यात एका नियतकालिकात स्त्रीयांविषयीच्या पानाचे ते कार्यकारी संपादकही होते !

पीटर ड्रकर यांचा जन्म १९०९ सालचा. व्हिएन्नामध्ये (*म्हणजे देश ऑस्ट्रेलिया*) ज्यू बुद्धिवाद्यांचा जो अड्डा होता, पीटर ड्रकर हे त्याचे सार्थ प्रतीक होते. पीटर ड्रकर यांचे वडील उच्च मध्यमवर्गीय सरकारी अधिकारी होते. १९३१ मध्ये इंटरनॅशनल आणि पब्लिक लॉमध्ये त्यांनी फ्रॅंकफुर्ट युनिव्हर्सिटीतून डॉक्टरेट मिळवली. तो काळ ॲडॉल्फ हिटलरच्या उदयाचा काळ होता आणि हिटलरच्या अमानुष राजवटीने अनेक शास्त्रज्ञ, विचारवंत, लेखक, कवी युरोपातून अमेरिकेत स्थलांतरीत झाले. त्यात पीटर ड्रकर हेसुद्धा होते. पीटर ड्रकर यांच नाव आज व्यवस्थापनशास्त्रातले आद्य गुरु म्हणून घेतल जातं परंतु त्यांची जी पहिली दोन पुस्तकं बाजारात आली (*‘ द एण्ड ऑफ इंडस्ट्रीयल मॅन ’ –१९३९ व ‘ द फयुचर ऑफ इंडस्ट्रडीयल मॅन ’ –१९४२*) त्या पुस्तकांनी त्यांना दोन अत्यंत परस्परविरोधी प्रतिक्रियांना सामोर जावं लागलं. त्यात सुखावणारी प्रतिक्रिया होती ती विन्स्टन चर्चिल यांची. ते पीटर ड्रकर यांचे चाहाते बनले; परंतु विचारवंतांच्या जगात या दोन पुस्तकांवर प्रचंड तिखट टीका झाली, कारण या पुस्तकांमध्ये एका विषयावर टिकून राहण्याची वैचारिक शिसत न पाळता पीटर ड्रकर यांनी अनेक विषयांतून संचार केला होता. या एका गोष्टीमुळे वाया गेलेला विचारवंत असा शिक्का ड्रकर यांच्यावर बसून त्यांचं विचारवंत हे सीनच खरं तर धोक्यात आलं असतं परंतु अमेरिकेतल्या तेव्हाच्या अतिरथी कंपनीने (*जनरल मोटर्स*) ड्रकर यांच्या ‘ द फुचर ऑफ इंडस्ट्रीयल मॅन ’या पुस्तकातल्या एका प्रतिपादनाकडे विशेष लक्ष दिलं. ते प्रतिपादन होतं. ‘ उद्योगांना सामाजिक पैलू आणि त्याचसोबत आर्थिक

हेतु असतात. ' ड्रकरना जनरल मोटर्सने बोलावून उद्योगासंबंधी चिंतन करण्याची संधी दिली. त्यातून ड्रकर यांच 'द कन्सेप्ट ऑफ द कार्पोरेशन ' हे पुस्तक साकारलं त्या पुस्तकाने जगभर अक्षरशः खहवळ माजवली. औद्योगिक साम्राज्यांच्या विकेंद्रीकरणाचा पायाच घातला. हे पुस्तक 'बेस्टसेलर ' तर ठरलच, पण अमेरिकाच नव्हे, तर जपान, दक्षिण कोरियापर्यंतच्या औद्योगिक जगातला या पुस्तकाने आधुनिकतेच्या टप्पयावर आणून सोडलं.

पीटर ड्रकर यांचं वैशिष्य म्हणजे ' सर्व आधुनिक व्यवस्थांचा व्यवच्छेदक अवयव ' अशी व्यवस्थापनशस्त्राची त्यांनी मांडणी केली. या व्यवस्थापन-शास्त्राला त्यांची प्रगतीशील लोकशाही आणि मानव केंद्री बनवलं. त्यामुळे राजकीय व्यवस्था, राजकीय संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या, एवढचं नव्हे, तर स्वयंसेवी संघटनांमध्येही पीटर ड्रकर यांचं तत्वज्ञान निर्णायक महत्वाचं ठरलं.

पीटर ड्रकर आपल्याकडे फॅशन म्हणून किंवा तोंडी लावण्याचं नाव म्हणून आले, पण त्यांच्या तत्वांनी जगाला मुळापासून गदागदा हलवून सोडलं. *(ज्यातली काही नव्वदच्या दशकानंतर आधुनिक जगात हळूहळू कालबाहयही झाली)* ती तत्वं ना आपल्या औद्योगिक साम्राज्यांनी स्वीकारली, ना आपल्या राजकीय संघटनांनी घेतली, ना आपल्या स्वयंसेवी संस्थांनी त्यातून काही बोध घेतला. बिल गेट्स व्यवस्थापनशास्त्रावरच्या कोणत्या पुस्तकाकडे गांभीर्याने पाहतात, ही विचारणा केल्यावर स्वाभाविकपणे 'पीटर ड्रकर ' असे उद्गार त्यांनी काढले होते. त्यामुळे स्वाभाविकच इथले टाय लावलेले देशी साहेब हुरळल्या मेंढीगत पीटर ड्रकर, पीटर ड्रकर करत फिरताना दिसतात. त्यातल्या खरचं कितीजणांनी ड्रकर वाचले असतील बरं !

पीटर ड्रकरनी आयुष्यात ३९ पुस्तकं लिहिली. असंख्य विषयांवर शोधनिबंध लिहिले. महर्षी वेदव्यासांच्या लिखाणाचाही त्यांनी अभ्यास केला होता. पीटर ड्रकर यांनी आधुनिक सरकारांवर अतिशय मार्मिक आणि मर्मग्राही असं विधान केलेलं आहे. त्यांच्या मते, आधुनिक सरकारं फक्त दोनच गोष्टी चांगल्या प्रकारे हाताळू शकतात. एक युद्ध, दोन चलनवाढ. पीटर ड्रकरनी हे विधान केल्यावर आजतागायत जगातलं कोणतंही सरकार त्यांचं हे विधान खोटं पाडू शकलेलं नाही.

पीटर ड्रकर यांच्या मृत्यूनंतर त्यांचं स्मरण करताना जाणवंत  की, आपल्याकडे अशी ज्ञानपरंपरा नाही, त्यामुळे विचारवंतांना प्रतिष्ठा नाही त्यामुळे कोणत्याच व्यवस्थेमध्ये चैतन्यमय बदलही नाही. अशा परिस्थितीत दूर तिकडे अमेरिकेत कुणी पीटर ड्रकर होते काय किंवा गेले काय, आपल्याला काय फरक पडतो ?

# मैत्र

# कुमार केतकर

कुमारला मी आमची ओळख झाल्यावर फार तर फक्त आठेक दिवस ‘ अहो–जाहो ’ अशी हाक मारली असेल. बाकी नेहमीच मी त्याला ‘ अरे कुमार ’ म्हणत आलोय. कुमार केतकरांवर लिहितानाही मी तसचं लिहिन. दुसरं म्हणजे कुमाराबद्‌दल मी ओळखीच्या इतर अनेक क्षेत्रांतल्या अनेक माणसांबद्‌दल लिहितो तसं तटस्थपणे नाही लिहू शकणार. कारण कुमारबद्‌दल लिहिताना माझा स्वतःचा खूप उल्लेख होणं अटळ आहे. मी स्वतःचा उल्लेख करण्याचं मुख्य कारण म्हणजे कुमारबद्‌दल त्यांचं एकंदरीत आयुष्य

लिहीण्याऐवजी मला तो जेवढा आणि जसा भेटला तेवढंच लिहिणं मला अधिक आनंददायक आहे. त्याच्या माझ्यापाशी ज्या आठवणी आहेत त्या मी लिहितो. त्यातून तो तुम्हाला वेगळा भेटतो का ते पहा. कारण कुमार त्याच्या मार्गाने रोज तुम्हाला भेटत असतोच. तोच कुमार पुन्हा लिहिण्यात मला काही हशील वाटत नाही.

कुमार माझ्या शेजारच्याच इमारतीत राहत असे, हे मला त्याची ओळख झाल्यावर कळलं. तो आजही तिथेच राहतो. गेली चार वर्षे मीच तिथे राहात नाही. कुमार मध्यंतरीच्या काळात ' महाराष्ट्र टाईम्स ' चा संपादक असताना ठाणे सोडून ऑफिसने दिलेल्या वांद्रयाच्या जागेत राहायला गेलेला होता, तेव्हा आमच्या इथल्या ' बॅंक ऑफ बडोदा ' च्या कॅशयरला सहज ही बातमी मी सांगितली. तर तो म्हणाला, ' अरेरे ! केतकरांनी ठाणे सोडलं ! आता पावसाने ट्रेन बंद झाल्यावर ठाणेकरांचे हाल होतील त्याविरुद्ध आवाज कोण उठविणार ? '

कुमारला मी पहिल्यांना भेटलो ते चर्चगेट स्टेशनच्या बाहेरच्या रस्त्यावर. तेव्हा कुमार ऑब्झर्व्हचा कार्यकारी संपादक होता. मी महाराष्ट्रातल्या ऊसतोड कामगारांवर संशोधन करीत होतो. कुमार मला प्रचंड सिनिअर होता. मी तेव्हा फक्त बाविशीचा होतो. कुमारने त्या भेटीत मला ऊसतोड कामगारांबर काहीतरी (*ऑब्झर्व्हसाठी*) लिहि असं सांगितलं मी लिहिण्याबाबत तेव्हा खूपच बेशिस्त आणि बेपर्वा होतो. मी ते काही लिहिलं नाही. नंतर साधारणतः वर्षभराने कुमार ' महाराष्ट्र टाईम्स ' मध्ये संपादक म्हणून आला. मधल्या काळात आम्ही जवळजवळ रोजच भेटू लागलो होतो. खरं तर त्याच्या-माझ्या राजकीय-सामजिक विचारसरणीत आणि पार्श्वभूमीत तसं काहीच साम्य नव्हतं. त्याच्यासमोर मी बराच अपरिपक्व ही होतो. तरीही कुमार नुसतं जमवून घेऊनच नव्हे तर रसरसून माझ्याशी बोले. मला आपणाहून माणसांशी बोलायला आवडत नसे. कुमार त्याबाबत अपवाद ठरला. ' महाराष्ट्र टाईम्स ' मध्ये गेल्यावर कुमारला ग्रीटींग द्यायला मी त्याच्या ऑफिसला गेलो. लाल विजयी झेंडयाचं चित्र असेलेलं ते ग्रीटींग त्याने केबिनच्या काचेवर दर्शनी भागाकडे तोंड करुन लावलं होतं. त्याच भेटीत अगदी निघताना कुमारने, त्याचासोबत वृतपत्रात काम करणार का ? असं मला विचारलं. आयुष्यात मला नोकरी करण्याचा अनिवार मोह झाला तो हा ऐकमेव प्रसंग. याचं मुख्य कारण कुमारचं स्वातंत्र्यप्रेम आणि लोकशाही वृत्तीत होतं. कुमार जितक्या स्वातंत्र्याची इतरांकडून अपेक्षा करतो,

त्याहून कांकणभर अधिकच स्वातंत्र्य त्याच्या सहकाऱ्यांना देतो. एवढंच नव्हे तर व्यवस्थापनाचे सर्व घाव स्वतःच्या अंगावर झेलून आपल्या सहकाऱ्यांना 'क्रीएटिव्ह स्पेस' कायम उपलब्ध करुन देतो. याची तेव्हाही मला पुर्ण माहिती होती. शिवाय तेव्हा मी तेवीस वर्षाचा होतो आणि खिशात पैसे असायला हवेत असं पहिल्यांदाच वाटत होतं. गंमत म्हणजे आम्हा दोघांच्या एका सिनियर मित्राने मला काहीही न विचारता (*बहूधा काही वेगळया हेतूने*) कुमारला परस्पर मी फारसां उत्सुक नाही असं सांगितलं त्यामुळे ते तिथेच राहिलं. याच काळात कुमारचे सोनिया गांधींवरचे अग्रलेख मला बिथवायला लागले होते. मी त्याच्याशी महाराष्ट्रातल्या इतर अनेक जणांप्रमाणे वाद घालत असे. त्यावेळी माझा मुद्दा असायचा की, कुमारला त्याची मतं असायला असलेलं स्वातंत्र्य आणि त्याचा अविष्कार करण्याची त्याची पद्धत या भिन्न गोष्टी आहेत. पैकी दुसरं अंगावर येण्याऐवढ थेट आहे. ज्या भाषेत मी हे लिहिलंय त्या भाषेत मी तेव्हा बोलत नसे. मी बराचसा आक्रास्ताळा आणि थोडासा अपरिपक्व असा काहीतरी बोलत असे. कुमार अजिबात न रागावता माझी समजूत पटेल असं बोलत असे. कधी युक्तिवाद, कधी संदर्भ, कधी वास्तवता वगैरेंची मदत घेऊन कुमार न थकता आणि न चिडता असतानाही त्याने हे केलंय. तो तेव्हा म.टा. चा संपादक होता ! मी तेविशी–चोविशीचा एक त्याच्या मताचा नसणारा मुलगा. त्यामुळे कुमारला आख्ख्या पृथ्वीनेही कधी असहिष्णू मानलं तरीही मी तसं करु शकत नाही. पुढे याच वादांचा अतिरेक होऊन मी कुमारशीया विषयांवर बोलणं बंद केलं. तो माझा अबोलाही एकतर्फीच होता. कारण कुमारला मी वेगळया मतांचा असल्याने अबोल होतो, हे गंमतीचं वाटत असावं.

तो सर्व विषयांवर माझ्याशी बोलत असे. माझी खुशाली विचारत असे. एकदा ट्रेनमध्ये आम्ही भेटलो असताना मला मिळत असलेल्या फेलोशिपच्या पैशासंबंधी वगैरे विचारणा करुन माझी फेलोशिप संपलीय, हे कळल्यावर त्याने 'अस्सं अस्सं' असं म्हणून क्षणभर विचार केला. मग लगेचच रोमिला थापरांचं एक पुस्तक माझ्याकडे परीक्षणाला पाठवलं. ते परीक्षण काही तरी कारणाने राहूनच गेलं.

या साऱ्या काळात कुमारच्या घरातली हजारो पुस्तकं हा माझ्या प्रचंड आकर्षणाचा विषय होता. यातल्या एकेक पुस्तकाबद्दल कुमार माझ्याशी तासन्

तास बोललेलो आहे. कुमारचं हे पुस्तकप्रेम अस्सल आणि अभिजात आहे. कारण त्याचा पंडिती बडेजाव आणि एशियाटिकशी त्याचे संबंध वगैरे गोष्टीची त्याने कधी फिकीर वा वाच्चता केली नाही ! कुमारने ‘महाराष्ट्र टाईम्स ’सोडला. त्याच्या आसपास मी ठाणे सोडलं होतं माझ्या आणि कुमारच्या भेटीनंरत कमी कमी होत गेल्या. कधीमधी फोनवर बोलणं किंवा भेटी तेवढयाच होत राहिल्या. कुमारचा सहवास कमी झाल्याने कुमारबद्दल विचार करायला मला एक ‘स्पेस ’ मिळाली. ज्यात मला जाणवलं की, कुमारमध्ये समोरच्या माणासचा आदर करण्याचा अंगभूत गुण आहे. त्यातल्या सहजतेने तो चटकन कळत नाही पण सहजतेने हे सिद्ध होतं की हा गुण बाणावलेला नाहीए, तो जन्मजात आहे. आज संपूर्ण हिंदुस्थानी पत्रकारितेत ‘स्वातंत्र्य ’ या मूल्याची नीट समज, त्याचा स्वप्नाळू आणि व्यवहारीक अर्थ कुमारइतका अचूक दुसऱ्या कुणाला क्वचितच समजला असेल. कुमार शत्रूंच्या हल्ल्यांनी कधीही बिथरत  नाही. उलट, शत्रुंच्या मधोमध तो सर्वात जास्त आनंदात असतो. हे मात्र तो शिकलेला आहे. कारण त्याच्यासारख्या उदारमतवादी आणि बुद्धिवान माणसाचे शत्रू हे वैचारीक दुबळे असतात; पण त्यामूळेच दुष्ट असतात पण त्यामुळेच ते थेट अंगावर येत नाहीत; पण गुप्तपणे वार करु इच्छितात. अशांच्या समोरासमोरच उभे ठाकणे हे सर्वात मुत्सद्दीपणाचे असते. बुवाबाजी व संघपरिवारासारखे शत्रू तुमच्या वैचारिक आक्रमणाचे तर्कसंगत व बुद्धिशाली उत्तर कधीच देत नाहीत, तर ते व्यवस्थापनाकडे धाव घेऊन सहयांची मोहिम वगैरे राबवून या माणसाला दूर करा, हा माणूस भयंकर आहे, असा  कांगावा करतात आणि तुमचा बंदोबस्त करतात. वैचाकित दुबळेपणातून येणाऱ्या दुष्टतवाचा अनुभव मी नंतर घेतलाच पण या अनुभवांतून आलेल्या शहाणपणचे बोल मी कुमारांकडून अगोदरच ऐकलेले होते. तेही थेट नव्हे तर खास कुमार स्आइल हसवणाऱ्या रुपक कथांतून. आपल्या वैचारिक शत्रुंशी आपले वैयक्तिक वैर नसते, हे बरेच जण बोधवचनांद्वारे सांगतात. कुमार  प्रत्यक्षात ते कसोशीने पाळतो.

अर्थात कुमारच्या काही गोष्टी फार भयंकरही आहेत. अत्यंत सुमार माणूस त्याला एकदा आवडला की, त्याची तो वाट्टले तेवढी स्तुती करीत राहतो इतकी की त्याला संपविण्याकरताच कुमार हे करतो की काय अशी शंका यावी ! संघपरिवार आणि सामजवाद्यांची तो एवढी टवाळी, निंदा करतो की यामुळे हे दोन्हीही वैचारीक गट सावध आणि शहाणे होतील की काय अशी सतत भीती मला वाटते !

आजही कधी मी ठाण्याला गेलो की ‘हुंडिवाले ’ ब्लॉक्स मधल्या तळमजल्यावरच्या शारदा आणि कुमारच्या घराकडे नजर टाकतो. तिथे  एक खिउकी आहे. ज्यात कुमारची कुमारइतकीच तल्लख आई बसलेली असे. ती मला कुमार कुठे आहे काय करतोय याची इत्यंभूत खबर द्यायची. ती खिडकी आताशा रिकामीच असते. कुमारची आई मध्ये कधीतरी गेली. मला ते खूप महिन्यांनंतर कळलं. त्या रिकाम्या खिउकीमुळे कुमारची पक्की खबर मला मिळत नाही. मग मी माझे पाय माझ्या घराकडे वळवतो.

# बंग

**अ**भय बंग लयीत एकेका शब्दाचा नीट विचार करुन मुद्दा स्पष्ट करत बोलतो. तो खराखूरा गांधीवादी असल्याची जाणीव त्याला करुन दिली की तो संकोचतो पण मनामध्ये झालेला आनंद त्याला लपवता येत नाही त्याच्या चेहऱ्यावर तो उमटतोच. डॉ. अभय बंग हा खराखुरा अन् शेवटचा कर्तृत्वावान गांधीवादी आहे. अभयमध्ये गांधीवाद्यांमध्ये सर्वसाधारणपणे नसलेला एक गुण आहे. तो म्हणजे त्याची प्रतिपादनातली अत्यंत प्रखर तर्कशुद्धता. या त्याच्या तर्कशुद्धतेचा मला एक छान अनुभव आला. आमच्या ओळखीच्या सुरुवातीच्याच काळात आला होता. माझा

एका लेखाला घेतल्या गेलेल्या आक्षेपाला मी स्वतः उत्तर देण्याअगोदर अभयने उत्तर दिलेलं होतं. साल होतं १९९३ त्यात अभयने माझ्या वयामुळे माझ्या तर्कशुद्धतेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही, असं काहीसं लिहिलं होतं. माझं वय तेव्हा बावीस होतं. त्या संदर्भात हा वयाचा उल्लेख होता.

अभय तर्कशुद्धतेचा फार मोठा चाहता आहे. त्याने केलेल्या दारुमुक्ती आंदोलनामागे सुद्धा आदिवासींच्या अनेक प्रश्नांमागचे खरे कारण दारु हीच आहे. या तर्कशुद्ध शोधाची अटळ परिणती होती.

डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग या जोडप्यामध्ये काही काही गमतीशीर विरोधाभास आहेत. उदा. राणी खूपच उत्स्फूर्त आहेत. याउलट डॉ. अभय खूपच मेथॉडिकल आहे. काही बोलायचं असेल तर अभय त्याची नीट टिपणं काढेल अन् शब्द न शब्द नीट घासूनपुसून स्वच्छ करुन बोलेल. राणी बोलतील तेव्हा त्या शबदांची अजिबात काटकसर करणार नाहीत. आपल्या तीव्र भावना आधी तुमच्या पर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करतील. मला कधी-कधी वाटतं, अभय या मारवाडी आहे आणि राणी या अय्यांगार आहेत, त्याचा हा परिणाम नसेल ? हे डॉ. बंग जोडपं जॉन हॉपकीन्स या अमेरिकेतल्या आरोग्यविषयक श्रेष्ठ अशा संस्थेचं स्कॉलर आहे, याचा तुमच्याशी बोलताना अजिबात सुगावा लागू देत नाही. बोलण्या-रहाण्यातली सहजता, मार्दव आणि मानवी आयुष्यासंबंधीची समज अभय-राणीच्या सोबत असताना तुम्हाला सतत अनुभवता येते. साधा पश्चिम महाराष्ट्रातील कॅपिटेशन फी भरुन पोस्ट ग्रॅज्युएट केलेला डॉक्टर हल्ली ज्या भागात राहतो-बोलतो ते पाहता अभय-राणी हे देव तर नाहीत ना असा प्रश्न खरंतर महाराष्ट्राला पडायला हवा.

डॉक्टर झाल्यावर अभय-राणी या जोडप्याने गडचिरोलीसारख्या भागात आपलं काम सुरु केलं. त्याचा एक टपपा अभय-राणी या दोघांनाही ‘ महाराष्ट्र भूषण ’ दिलं गेलं तेव्हा पूर्ण झाला पण खरी गंमत अशी की, सरकारला अभय-राणी यांच म्हणण काय होतं, याचा नीट विचारचं करता आला नाही. आपण या थोर दांपत्याला महाराष्ट्र भूषण दिलं त्या अर्थी आपलं काम झालं, असा सोयीस्कर समज सरकारने करुन घेतला, ‘ कोवळी पानगळ ’ या पुस्तकात अभयने फार मार्मिकपणे याचं विवेचन केलेलं आहे. लहान बालकांच्या मृत्यूचं प्रमाण राज्यात फार मोठं आहे. त्याचं विवेचन करताना अभयने म्हटलंय, ‘ ही बालकं आंदोलन करु शकत नाहीत, बंद करु शकत नाहीत, ती मतं देऊ

शकत नाहीत, त्यांची व्होट बॅंक नसते. ती शांतपणे मरुन जातात. ' ही हृदयद्रावक आहे हे

महाराष्ट्राच्या राजकीय दिवाळखोरींचे, अधःपतनाचे आणि अमानवीपणाचे एवढया कमी वाक्यात इतके मार्मिक वर्णन मला नाही वाटत इतर कुणी करु शकेल. आपल्याकडे कार्यसम्राट खूप होतील. झालेही आहेत; पण कर्मयोगी एखादेच बंग दांपत्य.

लेखणी चालवून मनं हलवून टाकण्याची अभयची ही एकमेव वेळ नाही. हृदयविकाराचा झटका आल्यानंतर त्या अनुभवांवर, ' माझा साक्षात्कारी हृदयरोग ' नावाचं एक पुस्तकच लिहिलंय. त्या पुस्तकाने महाराष्ट्रातील अनेकांची हृदय अक्षरशः हलवून टाकली. इतकी मी अभय त्याच्या इतर महत्वाच्या कामांपेक्षा त्याच्या हृदयविकारासाठीच अधिक प्रसिद्ध होतो की काय, अशी भीती मला वाटायला लागली !

अभयच्या बाबतीत माझ्या भावना खूप सकारात्मक असल्या तरीही त्याच्याबाबत एक सल कायम राहतो. त्याला जाहीर मुलाखतीतही मी त्याबद्दल विचारलं होतं. त्याने कायम राजकारण जाणीवपूर्वक टाळलंय. तर्कशुद्धपणे जात गेलं तर, अनेक प्रश्नांचा मागोवा घेत गेलं तर जवळजवळ सर्व प्रश्नांच मूळ राजकीय व्यवस्थेच्या दारुण अपयशात आहे. स्वतः अभयही हे अमान्य करणार नाही; पण अभयने तो मार्ग जाणीवपुर्वक टाळलाय. गांधीजी प्रथम तिथेच भिडले होते. मागच्याच भेटीत तो म्हणाला होता ' आपल्यापाशी तर्काचं आणि शास्त्रशुद्ध युक्तिवादाचं हत्यार आहे. राज्यव्यवस्थेला आव्हान देणारं दुसरं कोणतंच हत्यार नाहीय आज. ' अभय, मान्य पण आजचे राजकीय नेते अंध आणि बहिरे आहेत ( *ज्यांना फक्त बोलता येतं व आपलं तेवढंच जनतेने ऐकावं असं त्यांना वाटतं*) तर त्यांच्यासमोर कोणता तर्क आणि कसला युक्तिवाद चालणार ? ' कोवळी पानगळ ' नंरतचा तुझा अनुभव दुसरं काय सांगतो ? सांग ? बोल ? बदलतोस विचार ? नानाजी देशमुखांना जीवनगौरव देताना ' कार्लाइल ' चा हवाला देऊन सूर्यास्ताची वेळ आली की छोटया माणसांच्या सावल्या मोठया होता, असं नरेंद्र मोदी, मायावती व लालूप्रसादांच उदाहरण देऊन तूच तर म्हणाला होतास. मग रात्र होण्याची आपण वाट पाहायची का ?

# अनंत सामंत

**अ**नंत सामंत यांचे चाहते जबरदस्त फॅनॅटिक आहेत. ते अनंत सामंतांचं नाव घेतल्यावर किंवा त्यांच्या लेखनावर बोलताना अनेक सुस्कारे टाकतात. मराठीत लेखकाला असे ‘ डाय हार्ड ’ फॅन मिळणं म्हणजे ग्रेटच त्यातली सर्वात गमतीची गोष्ट म्हणजे अनंत सामंतांनी हे सर्व चाहते आपल्या पहिल्या पुस्तकातच मिळवलेले आहेत. ‘ एम ए़ी आयवा मारु ’ हे त्यांचं च पहिलं पुस्तक. त्या पुस्तकाने मराठी वाचकांच्या मनावर एकदम गारुड केलं . खरं तर त्या पुस्तकाची जन्मकथा हीसुद्‌धा त्या पुस्तकातल्या कथेइतकीच वर्णन विलक्षण

आणि संघर्षमय आहे. हे लेखन करण्याकरीता थोडं आजारपण, थोडा एका सुहृदयाचा आग्रह, हे सारं कारणीभूत ठरलं लिहून झाल्यावर सामंतांनी ते पुस्तक प्रकाशकांमागून प्रकाशकांकडे दिलं. त्या पुस्तकाला छापखाना दिसतोवर खूपच संघर्षमय दिवस काढावे लागले, पण एकदा ते पुस्तक प्रकाशित झालं आणि झंझावाती ठरलं. पदार्पणातच एखाद्या फलंदाजानं त्रिशतक करावं असं यश सामंतांना मिळालं.

अनंत सामंतांनी लिहिलेल्या या कादंबरीचं मोल इतकं आहे की, जेव्हा केव्हा मराठी चित्रपट आशयसंपन्न आणि श्रीमंत होईल आणि हॉलीवूडच्या चित्रपटांसारखा मराठी चित्रपट करण्यासाठी मराठी सशकत कथेची गरज पडेल, तेव्हा ‘ एम ई आयवा मारु ’ चाच विचार होईल.

अनंत सामंतांनी ‘ आयवा मारु ’ नंतर झपाटल्यासारखं लेखन केलं. अविरत, त्रिमाकासी मादाम, ऑक्टोबर एण्ड, के फाइव्हसारख्या कांदबऱ्या आणि अनेक कथा त्यांनी लिहिल्या. कधी कधी तर मला या गोष्टीचं कुतूहल आणि जिज्ञासा वाटते की, एवढया अल्पावधीत सामंत एवढी मोठी कादंबरी लिहितात तरी कसे ? अर्थात स्वतः सामंतांना या प्रश्नांची उत्तरं विचारली तर ते हसून प्रश्न टाळतात किंवा काहीतरी अतर्क्य उत्तर देतात.

सामंतांच्या लेखनाचा एक मोठा गुण हा की ते खूप सिनेमॅटिक असतं. त्यांची कादंबरी वाचताना आपण मोठया पडद्यावर चित्रपट पाहतोय असं वाटतं. ‘ आयवा मारु ’ मध्ये हा गुणा त्यातल्या सूक्ष्म बारकाव्यांसहित आलेला आहे.

परंतू सामंतांच्या नंतरच्या लेखनात त्यांनी या सिनेमॅटीक लेखनातली सूक्ष्मता आणि नात्यातल्या हळूवारपणाचे बारकावे संदिग्ध ठेवायला सुरुवात केली. तपशीलांमधल्या विस्तारातही सामंतांनी ती सूक्ष्मता संदिग्ध ठेवली. लेखनामध्ये एकप्रकारचा ‘ माचो ’ पण आणण्याचा सामंतांचा प्रयत्न त्यांच्या लेखनातून ठसत राहिला; पण इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सामंतांच लेखन हे भाऊ पाध्येंच्या अंगाने जाणारं सामाजिक आणि राजकीय जाणिवांचं लेखनं नव्हतं. त्यामुळे त्यात अंगभूत ‘ माचो ’ पण नव्हता. सामंत मुळात व्यक्तिकेंद्री लिहितात आणि पुन्हा सूक्ष्मात जाणं नाकारतात. हेच सामंतांच्या लेखनाचं अजब आहे.

अनंत सामंतांना जर तुम्ही विचारलंत की, त्यांच्या लेखनातलं त्यांचं स्वतःचं आवडतं लेखन कुठलं ? तर ते म्हणतील की, 'मला माझं सगळचं लेखन आवडत; पण खरं तर माझं ग्रेट लेखन अजून यायचंच आहे.' त्यावर दर्शना

सामंत (*म्हणजे मिसेस सामंत*) म्हणतील की, हे म्हणजे जरा अतिच झालं !

लेखकाचा स्वभाव आणि त्याचं आयुष्य यांचा  त्याच्या आयुष्यावर नेहमीच मोठा प्रभाव पडतो. खरं तर लेखक जे लिहितो ते त्याचं स्वतःचंच आयुष्य असतं. फक्त त्या आयुष्याचा तो आपल्या प्रतिभेने आपल्या लेखनात नवे आयाम देतो. 'इन्स्टियूट ऑफ केटरींग टेक्नॉलॉजी ॲण्ड ॲप्लाइड न्यूट्रीशन' या संस्थेतून पदवी घेतल्यावर बोटीवरुन देशांमागून देश भटकत राहिले. त्यांनी खऱ्या अर्थाने जग बघितलंय. अशा नोकरीतून जग बघताना एकप्रकाराचा 'टफ' पणा अंगात (नसला तरी) आणवा लागतो. अस्तित्वाचाच तो प्रश्न असतो. सामंतांना जे लोक जवळून ओळखतात, त्यांना सामंतांच्या मनाचा हळूवारपणा लगेच कळतो. त्याचबरोबर बॉडीलॅंग्वेज, आवाजाचा टोन, बोलण्यातून ते एक 'टफ' पणा ॲक्वायर कराताहेत. हेही लक्षात येतं. त्यामुळेच मित्रांवर लिहिताना-बोलताना भरभरुन लिहिणारे - बोलणारे सामंत प्रथम दर्शनी तसे उग्र वाटतात, तटस्थ वाटतात. समोरच्याला ते आपल्याविषयी बेफिकीर आहेत असंही वाटू शकतं. किंबहूना मलाच त्यांच्या पहिल्या भेटीत तसं वाटलं होतं.

पण गंमत म्हणजे त्याच रात्री माझी गाडी चुकली अन् मला त्यांच्याकडेच रहायला लागलं. (*त्या काळात दळणवळणासाठी ट्रेनखरीज इतर वाहने आहेत याचीही मला कल्पना नव्हती.*) त्यानंतर सामंताविषयी माझं मत बदलत गेलं. अर्थातच चांगल्या अर्थाने !

अनंत प्रभाकर सामंत हा लेखक स्वतःच्या लेखनाविषयी फारसं बोलतं नाही. अनेक बक्षिसं मिळवणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या या खरं तर दृकश्राव्य माध्यमात काम करणाऱ्यांसाठी आव्हानविषयक आहेत पण बहूधा 'लोकेशनस' आणि 'प्रॉडक्शन कॉस्ट' खूपच वाढेल या भीतीने त्यांच्या लेखनाचं अजून दृकश्राव्य माध्यमात काही झालेलं नाही; पण ज्या दिवशी त्यांच पहिलं पुस्तक (कोणतंही) दृकश्राव्य माध्यमात येईल त्यानंतर टी. व्ही. आणि सिनेमावाले पुस्तकांच्या हक्कांसाठी त्यांना भंडावून सोडतील याची मला खात्री आहे.

नुकतीच सामंतांची बायपास  सर्जरी झालेली आहे. अर्थात हे गुपित मी फोडावं हे योग्य नाही ! कारण 'बायपासचे दिवस'  या नावाचं त्यांच वृत्तपत्रीय लेखन चालू आहे. त्या स्तंभात अजून त्यांची 'बायपास सर्जरी'  झालेली नाहीए ! ( हा लेख प्रसिद्ध

होईस्तोवरही ती झालेली नसेल !) या बायपास सर्जरीमुळे सामंत पंधरा ते वीस वर्षांनी तरुण झालेले आहेत. अशा तारुण्यात

लेखकाने काय करावं हे सामंतांना मी सांगण आमच्या वयातल्या फरकाच्या दृष्टीने योग्य होणार ना; पण तरीही ती आगळीक करुन मी म्हणेन की, ‘सामंत, तुमचं खरं ग्रेट लेखन जे अजून यायचंय ते आता लिहा.’

हा वाचकाचा आगाऊपणा आहे. मित्राचा नव्हे ! (यावर दर्शना सामंत म्हणतील ‘अनंत तू हितशत्रूंपासून सावध राहा !’)

# सुनिल कर्णिक

**म**ाझ्या व्यावसायनिमित्ताने अनेक माणसांशी संपर्क येतो. काही माणसं विसरुन जाण्याजोगी असतात. काही माणसं मनात रुतून बसतात. काही माणसं थेट तुमच्या आतंर्आयुष्यात प्रवेश मिळवतात. अशी माणसं गुणवत्तेने निर्विवादपणे श्रेष्ठ असतात. निदान माझा तरी असाच अनुभव आहे. अशा अत्यंत दुर्मिळ पेशींच्या माणसात सुनील कर्णिक येतात. सुनील कर्णिक हे नाव मराठी पुस्तक आणि वृत्तपत्रजगात सुपरिचित आहे. ते गेले पस्तीस वर्षे या व्यवसायात आहेत. सर्व मोठया प्रकाशन संस्थांमध्ये त्यांनी

संपादन केलेले आहे. मौज, मॅजिस्टीक, पॉप्युलर, राजहंस, ग्रंथाली या सर्व मोठया प्रकाशन संस्थांत त्यांनी काम केलेलं आहे. महाराष्ट्रातली अनेक दैनिके, साप्ताहिके, मासिके यांच्यासाठीही त्यांनी संपादन केलेलं आहे. अर्थात माझ्या दृष्टीने हे सुनील कर्णिक यांचं लौकिक कर्तृत्व.

पण सुनील कर्णिक यांचं अलौकिक कर्तृतव हा खरं तर माझ्या आजच्या लेखनाचा मुख्य विषय आहे. सुनील कग्रिकांना मी पहिल्यांदाच विजय तेंडूलकरांचा घरी भेटलो. तेव्हा मी कर्णिकांच ' न छापण्याजोग्या गोष्टी ' हे पुस्तक नुकतंच वाचलेलं होतं. ते पुस्तक पुरेसं खळबळजनक होतं. प्रकाशन व्यवसाय आणि लेखकांबद्दल खरोखरीच्या न छापण्याजोग्या गोष्टी त्यात सभ्यतेच्या मर्यादा पाळून लिहिल्या गेल्या होत्या पण त्यामुळे माझा कर्णिकांबद्दलचा ग्रह भलताच झाला. ते पुस्तक वाचून मी सुनील कर्णिक हा डेंजरस माणूस आहे, अशी मनाशी गाठ मारली होती. शिवाय त्याआधी त्यांचे भाऊ प्रदिप कर्णिक यांच्याशी माझ्या झालेल्या जाहीर वादातही सुनील कर्णिक यांचा उल्लेख होताच; पण प्रत्यक्षात सुनील कर्णिकांची भेट ही माझ्या त्यांच्याविषयी पूर्वग्रहांना छेद नेणारी होती. सुनील कर्णिक हे अतिशय सहिष्णू, मितभाषी आणि प्रचंड साक्षेपी वाटले. त्यांच्याबद्दलचे हे माझे मत आजतागायत बदलेले नाही. त्या भेटीत कर्णिकांनी मला लिहित राहण्याचा आग्रह केला. हा आग्रह नंतर ' पिच्छा पुरवता ' या परिस्थितीत बदलला. यानंतरच्या कालखंडात सुनील कर्णिकांची माझी ओळख जसजशी वाढत गेली, तसतसं मला सुनील कर्णिकांचं महत्व आणि दुर्मिळत्व पटत गेलं.

मराठी समाजात अचूकतेचा घ्यास घेणारी, अभिजाततेचा आग्रह धरणारी, आणि स्वतः कोणत्याही प्रसिद्धीचा मोह न बाळगता आपलं काम अतिवप्रेमाणे माणसं अक्षरशः हाताच्या बोटावर मोजण्याइतकी दुर्मिळ आहेत. सुनील कर्णिक हे अशाच लोकांपैकी आहेत. एखादया लेखकाकडून लिहून घेणं हे नेहमीच खूप कठीण असतं. अशा वेळी चिकाटी आणि संपादनकौशल्य यांची कसोटी लागते. सुनील कर्णिक या कलेतले ' मास्टर ' आहेत. एकदा एक मोठा लेख माझ्याकडून त्यांना हवा होता. मी त्यांना ' आज –उदया ' करुन रोज पुढच्या दिवसाचे आश्वासन देत होतो. शेवटी एके दिवशी मी त्यांना लेख पूर्ण झालेलाच आहे. फक्त शेवटचा हात फिरवतोय असं सांगितलं तर सुनील कर्णिक म्हणाले, ' ते ठीक आहे; पण आधी लेख लिहायला सुरुवात तर करा.!

चिकाटीने पुन:पुन्हा पुनर्लेखन करत लेखन सुधारत नेण्याची आणि ते

अचूकते कडे नेण्याची परंपरा मोडीत निघालेली आहे, असं वाटण्याच्या काळात सुनील कर्णिक आपला परिपुर्णतेचा ध्यास सोडत नाहीत. आज परिस्थिती अशी आहे शुद्धलेखनाचे सर्व नियम लावून लेखन नीट तपासून पहाणे हे जुनाट पणाचे वाटावे पण दर्जा उंचवणारे हे जुनाटपण सुनील कर्णिक ज्या इमानाने करता त्या इमानाकडे पाहिल्यावर ते कलावंत आहेत ते पटतं.

मराठी पत्रकारीतेत आणि एकंदरीतच लेखन जगतात आपण विद्वान, व्यासंगी आहोत या समजाने  अहंमन्य आणि विकृत झालेले काही काही लेखक वावरतात. अशा वेळी अस्सल आणि नक्कल यांच्यात फरक करायचा झाल्यास सुनील कर्णिकांचा लिटमस वापरावा हे उत्तम. ही माझी टेस्ट आहे बरं. कर्णिक फारसे बोलत नाहीत. त्यांचा बहुतेक भर हा कृती करण्यावर असतो. फोनवर ते मुद्दा सांगून झाल्यावर फोन ठेवून देतात पलिकडचा इकडचं तिकडचं, आघळपघळ बोलत राहिला तर त्याला कर्णिकांच्या बाजूला ऐंगेज टोन ऐकू येतो. सुरुवातीला कर्णिकांच्या या कृतीचा मला धक्का बसायचा; पण नंतर सवय होत गेली.

सुनील कर्णिक एवढे गुण असूनही खूप भिडस्त आहेत. स्वतःविषयी बोलताना ते संकोचून जातात. त्यांच्याविषयी दुसरं कुणी बोलू लागलं तर अशा वेळी आपण नेमकं काय करावं, हे संकोचून त्यांना कळत नाही पण ती स्तुती ते हसण्यावारी नेतात. त्यांच्यासारख्यांचे भाषा आणि भाषाव्यवहारावर किती मोठे उपकार असतात हे आतमध्ये काम करणाराच जाणो.

सध्या मराठी भाषेची स्थिती चांगली नाही असं म्हटलं जातं. त्याचं कारण प्रेयसीवर चार ओळी खरडल्या की चांगली कविता म्हणणाऱ्यांची आणि तद्दन भिकार लेखनाला अक्षरवाङ्‌मय मानणाऱ्यांची चलती आहे. अशाने भाषा टीकत नाही. लेखकाचं पुस्तक एकवेळ प्रकाशकाच्या मर्जीवर अवलंबून असेल; पण भाषेच अस्तित्व तिच्या स्तुतीपाठकांवर अवलंबून नसतं तर तर ते चांगल्या टीकाकारांवर अवलंबून असतं. सुनील कर्णिकांच्या हातात कोणतही चांगलं लिखाण पडलं की आधी ते त्याच्या लेखकाला त्यातल्या फटी दाखवून देतात. त्या फटी लेखकाने बुजवल्या की नव्याने निर्माण झालेल्या फटींकडे कर्णिक लक्ष वेधतात. ही प्रक्रिया लेखन छापून बाहेर येईस्तोवर अखंड चालू राहते. लेखनावर आणि लेखकांवर खऱ्या अर्थानं केलं गेलेलं हे प्रेम आहे. हे प्रेम करणारा माणूस मराठी भाषेची ठेव आहे; पण हे जाणून घ्यायलाही आज कुणाला वेळ नाहीए. सुनील

कर्णिकांच्या भिडस्त स्वभावामुळे आणि संकोची वृत्तीमुळे त्यांचा योग्यतेएवढा गाजावाजा झाला नाही. ते फडमारु नाहीत. संशोधकाच्या वृत्तीने

इतरांना पुढे करुन आपलं काम बरं की आपण बरं, अशा वृत्तीने ते आपला व्यासंग पणाला लावतात. त्याची आजची चमकेश जगाला कदर नाही परंतु मराठी भाषा जर जागतिक होणार असेल आणि जगणार असेल तर ती सुनील कर्णिकांसारख्या माणसांनी पायाचे दगड भक्कम घातल्यामुळेच ती जगेल. कर्णिकांना आयुष्यात अनेकांनी गंडवलंय, लुबाडलंय, त्याबद्दल ते बोलत नाहीत. इतरांचे गुण सांगण्यावर त्यांचा भर असतो. इतरांच्या दोषांमुळे स्वतःला आलेल्या त्रासाचं ते चर्वितचर्वण करत नाहीत पण तरीही त्यांच्या चेहऱ्यावर त्याच्याबद्दल विषादाची एक रेषा दिसतेच; पण त्यांना खरी काळजी लागलेली असते ती या समाजात लेखकाला जगवण्याची कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नसल्याची. त्यावर ते भरभरुन बोलतात.

मला बऱ्याचदा अनेक गावांमध्ये लोक विचारतात की मराठी भाषा वैभवाला कशी जाईल ? माझं उत्तर मी आज देतो. सुनील कर्णिकांसारख्या माणसांच्या मागे बळ उभं करा. भाषा आणि भाषाव्यवहाराबद्दल त्यांची स्वप्नं ऐका. ती अमलात आणा. मग भाषा वैभवाला नाही पोचली तर मी काय पण हरेन लावता पैज ?

# विनय सहस्त्रबुद्धे

**वि**नय सहस्त्रबुद्धे हे नाव काही गावागावात आणि घराघरात पोहोचलेलं नाहीय पण काही वर्तुळांमध्ये हे नाव त्याच्या निश्चित कर्तृतवासहित माहित आहे. विनय भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचा सदस्य होता. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचा डायरेक्टर जनरल आहे. कपार्टचा चेअरमन आहे आणि अशा असंख्य संस्थांचा कुणी कुणी आहे. सर्वांत महत्वाच म्हणजे तो असंख्य माणसांचा मित्र आहे, जसा माझा.

पुढे लवकरच एक काळ असा येईल की भारतीय जनता पक्षात

प्रामाणिक, कमिटेड आणि व्यापारी (!) उद्दिष्ट नसलेली माणसं काम करत असत, यावर लोकांचा विश्वासच बसणार नाही. त्यावेळी विनय सहस्त्रबुद्धे भारतीय जनता पक्षाला फार उपयुक्त ठरु शकतो. कारण विनय अजूनही संघाच्या सीापनेवेळची मूल्यव्यवस्था मनापासून मानतो, तिचं पालन करतो. माझा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी दूरान्वयेही संबंध नसताना मी विनयशी कोणत्याही राजकीय विश्लेषणासंबंधी मोकळेपणाने बोलू शकतो. तो सल्ला देतो तेव्हा अत्यंत कळवळून देतो पण तो देताना त्याच्या बोलण्यात संकोच असतो. आपण सल्ला देणारा म्हणजे कुणी मोठे आहोत असा 'मेसेज ' आपल्या बोलण्यातून जाऊ नये, असा बोलताना त्यांचा कटाक्ष असतो. तो ज्या 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ' या संस्थेचा डायरेक्टर जनरल आहे त्या संस्थेचे अध्यक्ष प्रमोद महाजन आहेत. यावरुन स्वतःकडे मोठेपणा न घेण्याचा गुण विनयने किती प्रतिकूल परिस्थितीत टिकवून ठेवलेला आहे, हे सुज्ञांच्या लक्षात येईलच ! अर्थात या साऱ्याची स्वतःविनयला अजिबात गंधवार्ताही नसते.

आज भारतीय जनता पार्टीत सत्तेचे लोणी खाणारे अक्षरशः ' लोकशत्रू ' म्हणावे असे नेते गाव, राज्य व देशपातळीवर पोहोचलेले दिसतात; पण त्यांना हे सत्तेचे दिवस ज्यांनी दाखविले ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे असंख्य कार्यकर्ते अज्ञात राहिले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी असंख्य मतभेद असूनही हे मान्य करावंच लागेल की, त्यांनी पीळ असलेले असंख्य कार्यकर्ते निर्माण केले. ज्यांनी घरेदारे, लग्नकार्य काही काही केलं नाही आणि तळमळीने समाजात आधी जनसंघ आणि मग भाजप पोहोचवला. त्यांनी केलेल्या आत्मयज्ञाच्या उर्जेतून भाजपला आज सत्ता मिळाली. विनय याच ऊर्जेची मशाल घेऊन पुढे जाताना मला दिसतो. अस्सल संघ कार्यकर्त्यांप्रमाणे तो उत्कृष्ट संघटक आहे. स्वतः पडद्यामागे राहून सत्तेचं विकेंद्रीकरण करत इतरांकडून काम करुन घेत त्यांच्यातले नेतृत्वगुण विकसित करण्याची त्याच्यात अपार क्षमता आहे. आख्ख्या हिंदुस्थानात ' रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ' सारखी संस्था महाराष्ट्रातच उभी राहिली, कारण महाराष्ट्रात विनय सहस्त्रबुद्धे होता. यात कणभरही अतिशयोक्ती नाही. कारण अशी भव्य विद्वतसंस्था उभी करण्याकरीता त्याची जबाबदारी घेणारी मंडळी सहिष्णू असावी लागतात. संघाच्या कडव्या स्वयंसेवकांमध्ये नसणारा हा गुण विनयमध्ये आहे. तो पराकोटीचं विरोधी मतसुद्धा अत्यंत खिलाडूपणे ऐकुण घेतो. एवढं नव्हे तर ते

मत बरोबर असेल तर स्वीकारण्याची तयारी ठेवतो. उगाच नाही डाव्यांचे अनेक सेमिनार्स 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ' ते साजरे झालेले आहेत...

'त्याच अंस आहे... 'अशी आपल्या प्रतिपादनाची सुरुवात करुन विनय आपल्या किंचित अनुनासिक स्वरात आपली मतं मांडतो, तेव्हा आपल्या सारख्या माणसांचा जमाना नाहीए ही काळजी लपवू म्हणता याला लपवता येत नाही. खरं तर तो अत्यंत आशावादी अन् उमदा आहे; पण परिस्थिती अत्यंत निराशाजनक आहे त्याला तो तरी काय करणार जेव्हा जेव्हा त्याच्यात 'फिलगुड ' पक्षाच्या एकेक नेत्याबद्दलच्या सुरस आणि चमत्कारिक कहाण्या मी त्याला ऐकवतो तेव्हा तेव्हा माझ्या प्रतिपादनातील एखादी फट शोधत विनय त्या फटीतून शिरुन माझं प्रतिपादन तात्विक स्तरावर नेतो. माझ्या म्हणण्याला त्याचा पाठिंबा आहे की विरोध हे तो जामं कळू देत नाही हे सुद्धा खास संघ स्वयंसेवकांसारखं. तेंडूलकरांनी जेव्हा नरेंद्र मोदींबद्दल उद्गार काढले होते तेव्हा एका वर्तमानपत्रात त्यावर गुजरातीत खूप विनोदी भाष्य लिहून आलं होतं. विनयने तेंडुलकरांना फोन करुन ते वाचून दाखवले त्याच्या प्रेमाखातर तेंडुलकर 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ' तही गेले होते आख्ख्या संघात असं करु शकणारा विनय एकटाच.

विनयचं वय तसं फार नाहीए. त्याचा मुलगा आशय यंदा दहावीला बसतोय पण वृत्तीने विनय (*चांगल्या अर्थाने* ) मागच्या पिढीचा प्रतिनिधी आहे. ज्यांच्या ज्ञानोपासनेच्या कष्टांच्या जोरावर खूप माणसे समृद्धी पाहतात त्यांपैकी विनय आहे. भारतीय जनता पक्षाला व्यवस्थापन शास्त्राच्या आधूनिक तंत्राच्या सहाय्याने अधिकाधिक मजबूत करण्यासाठी जी माणसं सतत धडपडताहेत त्यात विनय एक आहे. त्यात तो यशसवी होतही आहे पण भाजपची बोटे व्यवस्थापन शास्त्राच्या पाण्यात बुडत नसून संघाने पाऊनशे वर्ष कंठरव केलेल्या नैतिक मुल्याच्या पाण्यात भाजपची बोटे बुडत चालेली आहे . तिथे पडलेली भोक भगदाड स्वरुपाची आहे. विनय सारखी माणसे हताशपणे बघतबसण्याऐवजी काहीही करु शकत नाहीत.

यावर विनयचं प्रतिपादन हे 'सगळया पक्षांचीच ही गत आहे,' असं पुर्णतः लंगड आणि पराभूत असतं मी जेव्हा ' कॉंग्रेस आणि भाजप मध्ये काय फरक आहे ? सांग ' असा प्रश्न विनयला करतो किंवा 'इतर पक्षांहून महान स्वप्न तुझ्या आयडिऑलॉजिकल पूर्वजांनी पाहिलेली होती त्याचं काय ? ' असं विनयला विचारतो, तेव्हा विनयला त्याचं उत्तर देता येत नाही. उत्तर माझ्यापाशी

असतं. विनयसारख्या विद्वान व निरुपद्रवी व्यक्तीला आज पक्षात मान आहे, मोदी असो वा अडवाणी, त्याचे फोन घेतात. परत फोन करतात. हे सर्व पक्षांच्या नेत्यांच्या बंगल्याबाहेच्यापेक्षा वा फोन संस्कृतीपेक्षा वेगळे आहे. फायदा वा उपद्रवी माणसापलीकडचा माणसांकडूनच देश घडवला जातो त्याची जाणीव त्याच्या पक्षाला असावी असे त्यामुळे उगाचच वाटते..

विनय, आशेला वाव आहे रे... !

# डॉ. प्रकाश आमटे

**डॉ**. प्रकाश आमटे हे बाबा आमटेंचे चिरंजीव आहेत; पण डॉ. स्वतःच आता खूप थोरले आहेत. तीस वर्षांपूर्वी भामरगढच्या जंगताल आपली नवीनच लग्न करुन आलेली पत्नी डॉ. मंदा हिला सोबत घेऊन डॉ. प्रकाश जेव्हा आदिवासींमध्ये राहायला आले, तेव्हा आपण एक इतिहास रचणार आहोत याची डॉ. प्रकाश आमटे यांना कल्पनाच नव्हती. रोजच्या जगण्याचा संघर्षच एवढा तीव्र होता की फार पुढच्या भवितव्याच्या योजना बनवणं तेव्हा शक्यच नव्हतं.

तेव्हाचा भामारगढ आणि तेव्हाचं

हेमलकसा जर सुखाने नागर आयुष्य जगणाऱ्या कुणी पाहिलं असतं  तर त्यांच्या अंगावर काटेच आले असते. जूनमध्ये एकदा पाऊस सुरु झाला की हेमलकसाशी बाहेरच्या जगाचा संपर्कच तुटत असे. अन्न, भाज्या, फळे, मीठ वगैरे काहीच मिळत नसे. ऑक्टोबर-नोव्हेंबरपर्यंत मग हेमलकसा एक घनदाट अरण्यातलं बेट बनून जाई. प्रश्न अनेक होते. आदिवासींच्या आरोग्याचा प्रश्न सर्वांत भयावह होता. आदिवासींना सामान्य आरोग्याबद्दलही ज्ञान नव्हतं. शिवाय सर्पदंश, अस्वलांचा व वाघांचा हल्ला ते रोजचे प्रश्न होते.

डॉ. प्रकाश आमटेंनी अत्यंत अपुऱ्या साधनांनिशी या साऱ्या समस्यांशी लढायला सुरुवात केली. तेव्हापासून अल्बर्ट श्वाएटझनंतर मोनॅको या देशाने डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदा आमटे यांच्यावर तिकीट काढले. इथपर्यंचा त्यांचा प्रवास हा अत्यंत विषम संघर्षाचा होता. तो प्रवास आता बऱ्याच जणांना ठाऊक झालेला आहे. मी त्यांची ‘ संवाद ’ या कार्यक्रमात ईटीव्हीमराठीवर मुलाखत घेतली, तेव्हा यातला बराचसा भाग डॉ. प्रकाश आमटेंच्या बोलण्यात आलेला होता. त्याची पुनरुक्ती करण्यात अर्थ नाही. विलास मनोहरांच ‘ नेगल ’ पुस्तक आलं त्यातही या साऱ्या चित्तथरारक संघर्षाची कहाणी आलेली आहे. खरा थरारक भाग यापुढेच आहे.

डॉ. प्रकाश आमटे यांनी तीस वर्षांपूर्वी ज्या दुर्गम भागात आदिवासींसाठी वैद्यकीय सेवा आणि शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली, तिथले प्रश्न आजही मुळातून सुटलेले नाहीत. डॉ. प्रकाश आमटेंचा प्रत्येक दिवस आजही नवीन विवंचना घेऊन उजाडतो. या विवंचना मुख्यत्वेकरुन आर्थिक असतात. शाळा आणि हॉस्पिटल चालवण्याकरीता कायमस्वरुपी मोठी यंत्रणा अस्तित्वात नसल्यामुळे सतत डॉ. प्रकाशना दात्यांकडून येणाऱ्या मदतींवर अवलंबून राहावं लागतं. आपल्या शहरांमध्ये बहूसंख्य डॉक्टर्स एकीकडे फार्मास्युटिकल्स कंपन्या आणि दुसरीकडे पेशंटकडुन स्वतःचे उखळ पांढरं करुन घेत असतात. देशातल्या डॉक्टरांनी देव असण्याचा काळ कधीच मागे पडलाय. डॉक्टर्स ही (*अपवाद वगळता*) देशातली सर्वात भ्रष्ट व्यवस्थांपैकी एक आहे. सामान्य माणूस कल्पनाही करु शकणार नाही अशा पद्धतीने डॉक्टर्स सामान्य माणसाला लुटत असतात.‘ कट प्रॅक्टिस’ ही तर काहीतरी पद्मश्री असावी अशा ठेसात आता डॉक्टर्स त्यात बुडालेले आहेत. अशावेळी डॉ. प्रकाश आमटेंसारखा डॉक्टर तीस वर्षांपूर्वी जी. आर. ई . देऊन अमेरिकेत जाण्याऐवजी हेमलकसा गाव, तालुका भामरगढ, जिल्हा गडचिरोलीला गेला. ही त्याची कृती देशातल्या नव्हे तर

राज्यातल्या डॉक्टर्सना, राजकारण्यांना, नोकरशाहांना विचार करायला लावत नसेल तर देशाचं खूप कठीण आहे.

फार्मास्युटिकल्स कंपन्यांच्या जोरावर चंगळ करण्याकरता डॉक्टर्स ज्या पाटर्या रोजच्या रोज महाराष्ट्रभरातल्या मोठमोठया हॉटेल्समध्ये झोडत असतात आणि शेवटी कीव येईल, अशा रीतीने नशाबाजी करुन एकमेकांच्या अंगावर भेलकांडत असतात, त्या पाटर्यांमधला दहा टक्के भाग कमी करुन तो निधी जरी डॉ. प्रकाश आमटेंकडे पोचला तर समस्त डॉक्टर वर्गाच्या पापक्षालनाची एक टक्का व्यवस्था होईल. सोबत डॉ. आमटेंच्या आदिवासींचे प्रश्न सुटायला एक मदत होईल ते वेगळंच.

डॉ. प्रकाश आमटेंशी बोलताना मी त्यांना विचारलं, ‘देशातल्या सर्व व्यवस्थापनांचं पतन ज्या वेगाने होत आहे त्यावर गांधीजींच्या मार्गाने जाऊन उपाय काढणं शक्य आहे काय ? ’ प्रकाश आमटेंचं त्यावरचं म्हणण फार बोलकं आहे, ‘तू म्हणतोस तसा गांधीजींचा मार्ग थिअरी म्हणून बरोबर वाटतो पण प्रत्यक्षात आता भ्रष्टाचार आणि हे पतन गांधीजींच्या मार्गापलीकडे गेलयं. हे आता अहिंसेने सुटेल असं वाटत नाही. ’ डॉ. प्रकाश आमटेंना असं का वाटतं हे जाणून घेण्यासाठी हेमलकसाच्या त्यांच्या लोकबिरादरी प्रकल्पाच्या हॉस्पिटलमध्ये येणारे आदिवासी पेशंटस् डोळयांनी पाहायला हवेत. राजकारणात रोजच्या रोज हजारो पेटी (*लाख*) आणि खोक्यांवर (*कोटी*) व्यवहार होतात, त्यातल्या काही पेटयांवर आणि खोक्यांवर या जंगलात नाडल्या जाणाऱ्या गरीब माणूस त्या आपल्या पेटयांची आणि खोक्यांची मागणी करायला गावागावात शिरेल, तेव्हा त्याच्या क्रोधात भस्म होणाऱ्या चंगळवादी राजकाराणी आणि डॉक्टर्सना डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदा आमटे आठवतील. त्यांच कार्य आठवेल.

इंद्रावती नदीत वडिलांच्या अस्थिविर्सजन करायला गेलेल्या चार मध्यमवर्गीय मुलांचा भोवऱ्यात सापडून एकामागोमाग अंत झाला. ती बातमी वाचून डॉ. प्रकाश आमटेंनी जे पाणी भोवऱ्यातून खेचतं ते बाहेर फेकत असणार हा भौतिकशास्त्राचा नियम खरा आहे का ते पाहण्याकरता नदीच्या भोवऱ्यात उडी मारली आणि बाहेर येऊन दाखवलं. आज लांडगे, कोल्हे, अस्वल, बिबळे, सिंह, तरस, गरुड असे असंख्य प्राणी डॉ. प्रकाशचे मित्र आहेत. डॉ. प्रकाश आमटेंमधली करुणा, अगम्य साहस आणि जिद्द यांची खूण प्राण्यांना पटलेली

आहे  पण माणसांना पटलेली नाही. नाहीरत एखादा शहरी डॉक्टर दात विचकटून ‘काय करणार समाजाच किडलाय. आम्ही समाजाचेच घटक आहोत ! ’असं स्वतःच्या पतनाचं समर्थन करु धजावला नसता आणि पोस्ट खात्याला ‘जस्सी’ नावाच्या ‘मंद’ पात्राचं तिकीट काढण्याअगोदर आमटे दांपत्याची एकदा तरी आठवण झाली असती. आपण निवडणुका कुणासाठी घेतो ? असा प्रश्न हे वाचल्यावर तुम्हाला नाही पडत ?

# अविनाश धर्माधिकारी

**‘ अ**स्वस्थ दशकाची डायरी ’ नावाचं पुस्तक अविनाशने जेव्हा लिहिलं तेव्हा त्याला कल्पनाही नसेल की येणारी दशकं त्याला एकाहून एक अस्वस्थ करणारी ठरतील. त्याचं नाव विनोबा भावेंना खूप आवडलं होतं. अविनाश धर्माधिकारी ! नावात आणि आडनावात आणि आडनावात पौर्वात्य आध्यात्मिकता झळकते.

अविनाश राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार खूप मानतो. एक काळ असा होता की अविनाशला ‘ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ’ म्हटलं की चेतनामय वाटायचं. त्याला तेव्हा ठाऊक नव्हतं की त्याच्यासाठी ‘ राष्ट्रीय

स्वयंसेवक संघा ' ने एक महाभारत राखून ठेवलेलं आहे. ज्याचा अभिमन्यू तो स्वतःआहे आणि सरसंघचालकांपासून इतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघातले इतर अनेक श्रेष्ठी त्या महाभारतातले धृतराष्ट्र, भीष्म, द्रोण असणार  आहेत. या साऱ्याची सुरुवात अविनाशने त्याचा आय.ए. एस. केडरची नोकरी सोडण्यापासून झाली. रज्जूभैयांपासून इतर अनेक संघनेत्यांनी आणि भाजप श्रेष्ठींनी त्याला तुमच्यासारखा माणूस नोकरीचा त्याग करुन राजकारणात (*म्हणजे भा. ज. प.माध्यमातून*) येतोय ही फार मोठी बाब आहे. असं सांगितलं. त्याच्यावर योग्य ती जबाबदारी सोपविण्यात येईल, असंही आश्वासन त्याला देण्यात आलेलं होतं.

नैतिक मूल्यांचा उद्घोष उठता-बसता करणाऱ्यांच्या केवळ शबदांखातर आपलं आयुष्य आणि सर्वस्व पणाला लावलं अशी नोकरी सोडण्याचा हा स्वतंत्र हिंदुस्थानातला पहिलाच प्रसंग असावा परंतु अव्वल दर्जाची बुदिध्मत्ता राजकारणातली कुटिलता समजण्यासाठीचा जो दृष्टपणा लागतो तो देतेच असं नाही. संघनेत्यांनी दिलेल्या आश्वासनांचा झोपाळाही काल्पनिक होता, याची जाणीव झाली.

भाजपच्या दृष्टीने तो काळ अत्यंत महत्वाचा होता. आज भाजपातून आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरचे मुद्दे बोलण्याकरीता तीन-चारच्या वर नावे महाराष्टातून निघत नाहीत. त्यांची महाराष्ट्र भाजपात तेव्हा व्यवस्था होत होती ! अनेक जुने -जाणते नेते प्रवाहाबाहेर राहणे पसंत करत होते किंवा बाहेर फेकले जात होते. नेमक्या त्याच काळात अविनाशने स्वतःसाठी भाजपच्या जागा मागितली. अविनाश खूप स्वप्नाळू होता व आहे. त्याला त्याच्या  देशाची प्रामाणिकपणे सेवाबिवा करायची होती. या साऱ्यांसाठी त्याने रा. स्व. संघ व भाजप हे योग्य माध्यम आहे असं मानलं ..

तिथेच अविनाशची शिकार व्हायला सुरु झाली...

अधिकारी असताना अविनाशकडे, रोज फोटोबिटोत देशसेवा करायला सांगतात अशा मोठमोठया नेत्यांची भ्रष्टाचाराची सुरस आणि चमत्कारिक प्रकरणे आलेली होती. नोकरी सोडल्यावरही त्याने याची वाच्यता कुठेही केली नाही. अफवाद फक्त संघाच्या वरिष्ठ नेत्यांचा. त्यांनी अविनाशला ' देखेंगे ' ' करेंगे' टाईप आश्वासने दिली. अविनाश त्यांच्यावर विश्वास ठेवत राहीला. या साऱ्यावर

कळस चढला तो अविनाशच्या ' नेहरु युवक केंद्रा ' तल्या नेमणुकीने. ते पद सेक्रेटरी दर्जाचं आहे. कॅबिनेट मंत्र्याएवढया पॉवर्स त्या पदावरच्या माणसाला असतात. तिथे अविनाशला ' फर्स्ट सर्कल' चं विश्वरुपदर्शन झालं. तिथे अविनाशकडुन तडजोडीची मोठी अपेक्षा होती असं अविनाशच्या लक्षात आलं. तिथे अविनाशने तडजोडी करुन काम करत राहायला पाहिजे होतं असं अनेक ढुढ्ढाचार्यांच म्हणणं असतं. त्यांना एकदा त्या तडजोडी करायच्या झाल्यास काय करावं लागेल हे अविनाशने सांगायला हवं. म्हणजे स्वांतत्र्यानंतर छपपन वर्षांत देश किती गाळात गेलेला आहे आणि किती विकला गेलेला आहे याचं भान त्यांना येईल. अविनाशला एकटयाला दिल्लीत या विरुद्‌ध लढावं लागलं. कारण त्या तडजोडी करावयास त्याने नकार दिला. देशाचं वस्त्रहरण होत असताना संघनेतृत्व गप्प बसणार नाही हा त्याचा होरा मात्र साफ चुकला. अविनाशच्या लढयाला पाठिंबा देऊन आयती हाती असलेली सत्ता गमाविण्याची संघनेतृत्वाची अजिबात अजिबाद इच्छा नव्हती. आयुष्यभर त्यागाच्या गप्पा झोडणाऱ्या संघश्रेष्ठींनीं कसोटीच्या क्षणी भोगाच्य बाजूने कौल दिला. अविनाशला अत्यंत  अपमानस्पदरीतीने नेहरु युवक केंद्रातून जावं लागलं. एवढच नव्हे तर त्याच्या या बंडखोरीमुळे आणि लढयामुळे  संघात अत्यंत वरच्या वर्तुळात असणाऱ्या त्याच्या सासऱ्यांना म्हणजे दादा उर्फ अनंत नारायण गोगटे यांना खास संघाच्या पद्‌धतीने पंख कापत कापत पुरतं जायबंदी करण्यात आलं. हे नेमकं महाभारतासारखं होतं. या नव्या महाभारताचे दुर्योधन कोण दुःशासन कोण ? याचा फैसला इतिहास करेलच पण धृतराष्ट्र, भीष्म, द्रोण यांच्या वर्तनाची त्यांना लाज वाटायला लावणारा  कृष्ण मात्र या महाभारतात नव्हता.

वास्तविक अविनाशचे काय चुकले ?  तो देशभक्त आहे, बुद्‌धिमान आहे, भ्रष्टाचाराविरोधी आहे, बंडखोर आहे, तरुण आहे... हीच तर देशातल्या तरुणांकडून संघाची एकेकाळी अपेक्षा होती...

पण त्याच्याकडे नाही अशी एक गोष्ट आहे त्याला ' राष्ट्रवाद' आणि ' व्यावहारिक राष्ट्रवाद ' यातला फरक कळला नाही. डी. पी. यादवसारख्या अव्वल दर्जाच्या गुन्हेगाराला पक्षात घेऊन चार दिवसांत आपण त्यातले नव्हेच, असा आव आणण्यातली जी अव्वल दर्जाची ' व्यावहारिक देशभक्ती ' (!) ती अविनाश अंगी बाणूव शकला नाही. त्यामुळे ज्या चक्रव्यूहात तो गेला तो चक्रव्यूह तो भेदू शकला नाही.

देशाचे जे व्हायचे ते होते आहे. आता देश वाचवू म्हणून कुणी वाचवू

शकणार नाहीए. असे अनेक अविनाश या चक्रव्यूहाने गिळलेत. सत्येंद्र दुबे त्यातलाच, ‘ व्यावहारिक ’ माणसं अशांना येडे असं संबोधतात..

अविनाश आता आनंदात आहे. कारण करण्यासारखे फारसे काही उरलेले नाहीए, कारण करायला हवे होते आणि केले नाही, असे त्याच्या दृष्टीने काहीही राहिले नाहीए.

मीही आनंदात आहे ! आपणही आनंदात असा ! ! आपण सगळे आनंदात राहूया! !

लेटस् फील गुड ! !

# साळगावकर

**ज**यंत साळगावकर माझे मित्र आहेत. त्यांना पप्पा साळगावकर म्हणतात. ते आता ‘ अमृत महोत्सव ’ साजरा करताहेत. वयाच्या दृष्टीने पाहता त्यांना मित्र असं संबोधण काहीजणांना माझ्या बाजूने झालेला उद्धटपणा (*असेही*) वाटू शकेल; पण मी खूप विचार केलाय. ज्या व्यक्तिशी आपण कुठल्याही विषयावर मनमोकळेपणाने बोलू शकतो, कुठल्याही समस्येवर सल्ला विचारु शकतो अन् ती व्यक्ती जर आपल्या बोलण्यावर किंचित मिष्कीलपणे योग्य असाच सल्ला देत असेल, तर संबोधन जरी ‘ पप्पा ’ असलं तरी ती

व्यक्ती आपला मित्रच लागते.

'मी सांगू का तुम्हाला' अशी सुरुवात करुन साळगांवकर जेव्हा त्यांच्याकडे किस्से उर्फ आधुनिक बोधकथा सांगतात, तेव्हा ऐकणारा एकदम चाट पडतो. महाराष्ट्रातला असा एकही मोठा माणूस नाहीए की जो मोठा लौकिकपात्र आहे आणि साळगांवकरांपाशी त्याच्याबद्दल सांगण्यासारखं काही नाहीए. मला तर साळगांवकरांशी बोलताना बऱ्याचदा असं वाटतं की हे सारं साळगांवकर लिहून का नाही काढीत ? कारण मित्रांशी साळगांवकर जे बोलतात ते जर त्यांनी लिहून काढलं, तर ते पुस्तक कालनिर्णयपेक्षाही मोठं 'बेस्ट सेलर' ठरेल.

जयंत साळगांवकरांनी अजून एका कारणासाठी लिहिलं पाहिजे. त्या माणसानं जे पाहिलंय, जे भोगलयं ते फार थोडया माणसांनी एकाच आयुष्यात पाहिलं आणि भोगलं असेल. चांगल्या आणि वाईट दोन्ही अर्थाने. घरादारावर जवळजवळ जप्ती आल्यावर आणि दिवाळं निघाल्याची बोंब झाल्यावर त्यातूनही फिनिक्स पक्ष्यासारखी उठून उभी राहत कितीशी मराठी माणसं पुन्हा अग्रगण्य उद्योपती झालीत ? त्यांच्या या कसोटीच्या दिवसांत नवीन बिझिनेस चालू करण्याच्या खआटोपीत साळगांवकर धउपडत होते, तेव्हा त्यांना उत्तेजन देण्याच्या, मदत देण्याच्या भूलथापा देत त्यांना महाराष्ट्रातल्या बडया कुटुंबियांनी कसं झुलवलंय ते त्यांनी मनाच्या कुपीत लपवून ठेवलंय. साळगांवकर हळवे झाले की ती कुपी उघउते. तरी पण तुम्ही या साऱ्यातून परत कसे उभे राहिलात ? असं विचारल्यावर ते म्हणतात, 'माझ्या गणपतीने माझ्यासाठी धंदा शोधून ठेवलेला होता.'
'मिसेस साळगांवकरांची विनोदबुद्धी आणि तीक्ष्ण उपरोधिक कॉमेंटस् करण्याची क्षमता अफलातून आहे. एकदा एका विदुषीचं 'महात्म्य' लिहिण्यात माझ्याकडून काही चूक झाली. त्या विदुषीने मिसेस साळगांवकरांपाशी थोडा तक्रारीचा सूर काढला तर त्या म्हणाल्या, 'सगळा बरां आणि चांगलाच लिहल्यानू मा... मग कीत्याक तक्रार करतंस..'
मालवण हे साळगांवकरांचे गाव आणि मालवणी ही भाषा. मिसेस साळगांवकरांच्या तोंडून ती ऐकताना त्यांच्या इतकीच मायाळू आणि प्रेमळ होते ; पण साळगांवकरांच्या आयुष्यातल्या त्या कसोटीच्या काळाबद्दल त्यासुद्धा खूप हळव्या होतात. साळगावकर संकटातून बाहेर पडावेत म्हणून त्या माऊलीने किती गाऱ्हाणी अन् नवस केलेत ते तीच जाणो. पुढे साळगावकरांना बरे दिवस आल्यावर कित्येक काळ मिसेस साळगावकर ते नवस फेडत होत्या. त्यातला एक नवस तर खूपच कष्टाचा,

गावातल्या मारुतीचा होता.

मी मीस्टर आणि मिसेस साळगावकरांच्या समोर बसून त्यांच्या आयुष्याबद्दल ऐकतो, तेव्हा मला आपण फारच लेचेपेचे आहोत याची जाणीव होते. साळगावकरांची देवावर इतकी श्रद्धा आहे, की ते मूर्तीपूजेच्या पलीकडे पोहोचलेले आहेत. गणपती येतात त्या काळात एकदा तरी त्यांच्याकडे मी जातो. 'देव म्हणजे केवळ ही मूर्ती नाही. देव ही त्याहूनन खूपच विशाल संकल्पना आहे. ती सहज कळणं शक्यच नाही. ' प्रत्येक गणपतीत एकदा तरी ते मला ही गोष्ट सांगतात. जगाची सर्व कटू रुपं पाहिल्यावरही ही श्रद्धा, हा ओलावा, ही सहिष्णूता त्यांनी कशी टिकवली असेल ? 'येतो ' असं सांगून वेळी-अवेळी येणाऱ्या माणसांची त्यांच्याकडं नुसती रीघ असते. डायबिटीक साळगावकरांच्या जेवणाच्या वेळा त्यामुळे चुकतात पण साळगावकर येणाऱ्या माणसांच स्वागत जणू तो त्यांच्याकडे येणारा पहिलाच माणूस आहे आणि भरल्या पोटाने अभ्यंगस्नान करुन ते त्याचीच वाट पाहत आहेत असं करतात. माणसं आपल्याकडचीच ती. तीही मग लाडावल्याने दिलेली वेळ न पाळता कधीही येतात. मिसेस साळगावकरांना ही शिस्त मोड अजिबात आवडत नाही. त्या करवादतात. त्यावर साळगावकरांचं उत्तर तामम पुरुषजातीचं प्रतिनिधिक "मी काय येणाऱ्या माणसाला उशीर झाला म्हणून 'चालता हो ' असं सांगू ? "

मिसेस साळगावकर कुणालाही भेटत नाहीत. त्यांना जी माणसं आवडतात त्यांनाच त्या भेटतात. साळगावकरांचं जरा वेगळं आहे. त्यांना जी माणसं भेटतात त्यांना ती आवडतात. साळगावकर डायबिटिक आहेत पण घरात ते जिथे बसतात त्याच्या बाजूला टेबलावर काही स्टीलचे डबे आहेत. ते डबे उघडल्यावर त्यात लाडू आढळतील. बेसनाचे, रव्याचे. खास साळगावकरांच्या आवडीचे. मिसेस साळगावकरांनी बनवलेले हे लाडू साळगावकरांच्या डायबिटीक्सला चालतात. मी त्यांच्याकडे गेलो की ते डबे माझ्यापुढे धरातात. एक लाडू खाऊन माझं कधीच समाधान होत नाही. मग दुसरा, तिसरा. खाण्याच्या वेळी मला संकोच वाटायला लागतो. मग मिसेस साळगावकर घरी नेण्याकरीता लाडू सरळ बांधूनच देतात. हे करताना पप्पा -आई असलेल्या मिस्टर आणि मिसेस साळगावकर सुमंगल पब्लिशिंग कंपनीच्या मालक-मालकीण आहेत, यावर क्षणभर विश्वास बसत नाही.

साळगावकरांना ' कालनिर्णय ' मध्ये जेवढं यश मिळालं, 'वर्तमान 'मध्ये तेवढंच अपयश आलं. त्यांचे गुरु धुंडिराजशास्त्रींनी म्हणे त्यांना ' हे काही खरं

नाही ' अस आधीच सांगितलं होतं. तरी पण त्यांनी ' वर्तमान ' का काढलं  मी हा प्रश्न त्यांना कधीच विचारला नाहीए. साळगावकरांचा खरा दबदबा आणखी एका क्षेत्रात आहे. तो म्हणजे भविष्यात. त्यांच्या तोंडून असंख्य मोठया माणसांची भविष्यं मी ऐकलीयत. २००४ साली मराठी माणूस पंतप्रधान होणार हे भविष्य तर त्यांनी माझ्या कार्यक्रमातच सांगितलंय ;  (*गरजूंनी नोंद घ्यावी*) पण मी त्यांना आजवर माझं भविष्य विचारलेलं नाहीए. एक म्हणजे ते आता भविष्य बघत नाहीत. दुसरं म्हणजे ते आपले मित्र आहेत म्हणजे आपलं भविष्य उज्वलच असणार याची मला खात्री आहे.

साळगावकर पंच्याहत्तर वर्षाचे झाले म्हणजे कॅलेडच्या जगात मोठीच उलथापालथ झाली. त्यांनी स्वतःचं कालनिर्णय युग निर्माण केलं. देशातल्या सगळया भाषांत त्यांची कॅलेंडर्स जातात. असा दुसरा मराठी लेखक नाही. प्रश्न असा पडतो की, महराष्ट्रभूषण, महाराष्ट्रभूषण म्हणतात तो याहून वेगळा असतो काय ?

# डॉ. प्रवीण म्हात्रे

**आ**पल्या देशात एका संशोधकापेक्षा एका नगरसेवकाची खातिरदारी जास्त होते. जणू काही संशोधकापेक्षा नगरसेवकच जनतेची आणि समाजाची जास्त सेवा करता. ही विधानं नीट पटण्याकरीता डॉ. प्रवीण म्हात्रे यांना भेटायला पाहिजे. दोन वर्षापुर्वी बीबीसीने ‘ मॅन ऑफ इ ईयर ’ घोषित केलं. त्यावेळी बीबीसीवर डॉ. प्रवीण म्हात्रे यांची मुलाखत घेणारी मुलाखतीकर्ती सुरुवातीला म्हणाली की, ‘ आजवर वैद्यकशास्त्रातलं आधुनिक ज्ञान पश्चिमेकडून पूर्वेकडे गेलेलं आहे; पण आज पहिल्यांदाच अशी वेळ येते आहे की,

डॉ. प्रवीण म्हात्रेंच्या रुपाने हे ज्ञान पूर्वेकडून पश्चिमेकडे येत आहे. डॉ. म्हात्रे तुमच्या देशात प्रचंड उत्सवी वातावरण असेल ना यामुळे ?

वाक्य ऐकून आनंदलेले डॉ. प्रवीण म्हात्र प्रश्नांकर्तीच्या प्रश्नामुळे जवळजवळ गोठालेच. आपणापैकी देशात कुणालाच डॉ. प्रवीण म्हात्रेंनी वैद्यकिय क्षेत्रात का क्रांती केलीय ते ठाऊकच नव्हतं. स्त्रियांच्या शरीरातील ओव्हरीज (बीजांडकोश) स्त्रीच्या स्त्री असण्यात अत्यंत महत्वाचा घटक असतो. स्त्री वयात आल्यावर तिच्या शरीरात बदल होतात. तिचाी वाढ व्हायला लागते आणि ती पुनरुत्पादनाला समर्थ होते, त्याचं कारण स्त्रीच्या शरीरात असणाऱ्या 'ओव्हरीज' आहे; पण काही दुदैवी मुलींच्या शरीरात जन्मतःच या बीजकोशांच अभाव असतो. अशा मुलींच्या बाबतीत वयात येण्याची प्रक्रियाच सुरु होत नाही. अशा मुलींची आयुष्यगाथा कधी पुढे जात नाही. अशा मुलींचे प्रमाण २०००:१ असे आहे. कर्नाटकात घरातल्या सुद्ढ मुलीच्या लग्नात असे बीजांड नसल्यामुळे वाढच न झालेल्या मुली घरकामासाठी भेट देण्याची पद्धत होती. या जन्मजात वैगुण्यावर जगात कुठेही कोणताच उपाय नव्हता. फक्त हार्मोन्स देऊन फार तर त्या मुलीला शारीरिक गोलाई थोडीशी प्राप्त करता येत असे परंतु डॉ. प्रवीण म्हात्रेंनी जगात पहिल्यांदाच बीजांडाचं अवयवरोपण करण्यात तंत्र शोधून काढलं ओव्हरीज ट्रान्सप्लान्ट करता येण्याची शस्त्रक्रिया त्यांनी २००२ साली यशसवी करुन दाखवली. नंतर अनेक अभागी मुलींवर त्यांनी ही शस्त्रक्रिया यशसवी केली. हा स्त्रीरोगशास्त्रातला चमत्कार होता. कारण तो पर्यंत ओव्हरी ट्रान्सप्लान्ट कुणी करु शकेल, यावर कुणाचाच विश्वास नव्हता. अमेरिकन डॉक्टर असं मानत होते की, अशा प्रकारचं ट्रान्सप्लान्ट करण्याकरता मानवाला अजून किमान पाच ते सात वर्ष लागतील; परंतु डॉ. प्रवीण म्हात्रेंनी अशक्य ते शक्य करुन दाखवलं. तेही अशा प्रकारच्या संशोधनाला अत्यंत प्रतिकूल असणाऱ्या वातावरणात. हे प्रतिकूल वातावरण त्यांच्या वाटयाला सुरुवातीपासून आलंय. खरं तर एम. डी. पर्यंतच्या सर्व परीक्षा डॉ. म्हात्रे डिस्टिंक्शन आणि सुवण्रपदकासहित उत्तीर्ण झालेत. एम. डी. तर त्यांनी गुणांचा केलेला विक्रम हा विद्यापीठाच्या साठ वर्षाच्या इतिहासातला मैलाचा दगड होता. तरीही एम. डी. च्या तोंडी परीक्षेत पाच परिक्षांनी त्यांना या प्रकारच्या ओव्हरीज नसण्याच्या वैगुण्याला काय उपाय करशील, असा प्रश्न केला असता (सन १९७८) डॉ. म्हात्रे तत्काळ उत्तरले, 'मी ओव्हरीज् ट्रान्सप्लान्ट करीन' तेव्हा ते तज्ज्ञ स्त्रीरोगतज्ज्ञ असेलेले वरिष्ठ परीक्षक उद्गारले,

‘मुला, तू हुशार आहेस; पण याबाबतीत मात्र तू मूर्खांच्या नंदनवनात राहतोस ’

२००२ साली डॉ. म्हात्रेंनी ओव्हरीज रोपणाची यशसवी शस्त्रक्रिया केली तेव्हा त्यातला एका परीक्षकांनी डॉ. म्हात्रेंना फोन करुन आम्हीच तेव्हा मूर्खांच्या नंदनवनात राहत होतो अशी कबुली दिली. ग्रँट मेडिकल कॉजेजमधला अजून एक प्रसंग डॉ. म्हात्रेंच आयुष्य घडवायला कारणीभूत ठरला. ह्दयरोपणाच्या तंत्रातले पितामह असलेले अमेरिकन डॉक्टर के. ई. एम. मध्ये आलेले होते. त्या वेळेला दुर्दैवाने त्यांच्यासाठी उपलब्ध केला गेलेला स्लाइड प्रोजेक्टर बंद पडला आणि सर्वात भयानक म्हणजे एकामागोमाग एक असे पाच-सहा प्रोजेक्टर बंद पडत गेले. तेव्हा ते महान अमेरिकन ह्दयरोगज्ज्ञ म्हणाले की, “ हिंदुस्थान देशाला ह्दयरोपणाच्या ज्ञानाअगोदर स्लाइड प्रोजक्टरचा ज्ञानाची खरी गरज आहे. ” त्यांचे हे उद्‌गार डॉ. प्रवीण म्हात्रेंचं काळीज चिरत गेलं. डॉ. म्हात्रेंनी त्या दिवशी मनाशी शपथच घेतली की, मी आयुष्यभर अवयवरोपणातलं एक तंत्र हिंदुस्थानातलं एक तंत्र संशोधन करुन ते या फिरंग्यांना स्वीकारायला लावीन.

परंतु देशभक्तीचा डॉ. म्हात्रेंचा हा प्रवास स्वदेशबांधवांनी सुकर, सुफल आणि संपूर्ण केला असं जो मानेल तो मूर्खांच्या नंदनवनात राहतो असंच म्हणायला लागेल. डॉ. म्हात्रे हे संशोधक आहेत. त्यामुळे उच्चपदस्थ बाबू नोकरशहांच्या दृष्टीने ते अतिसामान्य माणूसच. डॉ. प्रवीण म्हात्रे यांच्या नावामागे नगरसेवक, आमदार, खासदार, मंत्री किंवा किमान आय. ए. एस. वगैरे बिरुदावली नसल्यामुळे त्यांच्या संशोधनामध्ये नोकरशाही यंत्रणेने असंख्य अडथळे आणले. महाराष्ट्र हे प्रगत राज्य असल्याचा डांगोरा पिटणाऱ्यांनी एकदा डॉ. म्हात्रेंचे अनुभव कानात साठवून घ्यावेत. मग महाराष्ट्र कशाबाबत प्रगत आहे ते लगेच त्यांच्या लक्षात येईल. डॉ. म्हात्रे ही बीजांडरोपणाची शस्त्रक्रिया मोफत करतात पण त्यासाठी त्यांना प्रत्येक वेळी शासकिय अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते. एरवी किडनी रोपणचा व्यवसाय करणारे रॅकेटियर जेव्हा सुटून जातात तिथे हा जागतिक दर्जाचा संशोधक डॉक्टर नर्व्हस ब्रेकडाऊनच्या पायऱ्यांवर कसा खोल खोल उतरत जातो, ते भीषण वास्तव शबदांत सांगणे अशक्यच ! फक्त दोनच उदाहरणं मी इथे देतो. जेव्हा डॉ. म्हात्रे मानवाला वरदान ठरेल अशा आपल्या संशोधनाची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना देत असत तेव्हा त्यांचा सल्ला आणि घोशा एक असे ‘ तिकडे इंग्लंड-अमेरिकेत असलं संशोधन झालेलं नसताना तुम्ही इथे काय खूळ काढलंय. आधी तिथे या प्रकारचं संशोधन होऊन

अशा शस्त्रक्रिया होऊ देत. मग तुम्ही प्रयोग करा.' दुसरं उदाहरण याहूनही भयानक आहे. ज्या शस्त्रक्रिये मुळे डॉ. प्रवीण म्हात्रेंनी जगभर हिंदुस्थानचा नावलौकिक पोचवला मी क्रांतिकारी शस्त्रक्रिया करण्याची परवानगी डॉक्टरांना अनेक वर्षांच्या मिनतवाऱ्यांनंतर मिळाली पण ही परवानगी एक अटीवर मिळाली. जर ती शस्त्रक्रिया अयशसवी झाली तर डॉक्टरांचा वैद्यकिय परवानाच रद्द केला जाईल ही ती अट होती. ! तणावामुळे तेव्हा डॉक्टर अनेक रात्री झोपले नव्हते. असा आपला प्रगत महाराष्ट्र आणि आपली प्रगत सरकार ! या काळात डॉक्टरांची पत्नी आणि मुलंही त्यांच्यामागे कायम ठामपणे उभी राहीली.

आजही डॉक्टारंचा हा लढा संपलेला नाही. नेत्रदान, किडनीदानाप्रमाणे बीजंडदान ही संकल्पना रुजवण्याचा डॉक्टरांचा प्रयत्न आहे. स्त्री बीजांडाची बॅंक (*जगात पहिल्यांदाच* ) बनविण्याच्या प्रयत्नात डॉक्टर आहेत. कोणत्याही स्त्री ला स्वतःचे काहीही न गमावता बीजांडदान करता येईल. फक्त त्याचे सुरक्षित राहणे गरजेचे आहे. ती सुरक्षितता देणारी एक मशीन वीस लाख रुपयांची आहे. ( *जी इंग्लंडमधून आयात करावी लागेल*) सध्या डॉक्टर त्यासाठी दात्याच्या प्रतीक्षेत आहे. मग बीजांडदानाच्या प्रचारमोहिमेला ते सुरावात करतील.

दादर, शिवाजी पार्क इथे मोहन निवासमध्ये राहणारा हा देशातला थोर संशोधक, डॉक्टर आणि पेशंटस् सोडून फार लोकांना ज्ञात नाही उलट अनुप जलोटांच्या खालच्या मजल्यावर राहतात ते डॉ. म्हात्रे अशी पटकन त्यांची ओळख सांगितली जाते हे या समाजाचे दुर्दैव नाही काय ? डॉ. प्रवीण म्हात्रेंच्या संशोधनाला जग डोक्यावर घेऊन नाचत होतं तेव्हा 'टाइम्स ऑफ इंडिया' त्यांच्या संशोधनाला आतल्या पानावर कोपऱ्यावर टाकून दाबत होतं. याला संपुर्ण महाराष्ट्राची मानसिकता जबाबदार आहे. ती मानसिकता मंत्रिमंडळ, नोकरशहांची आहे तशीच जनतेचीही आहे. याला काय म्हणायचं ?

# अच्युत गोडबोले

**अ**च्युत गोडबोलेंच आडनाव अगदी सार्थ आहे. त्यांच्या फ्रेंचकट दाढीमध्ये लपलेल्या ओठांतून नेहमीच गोड शब्द बाहेर पडतात. ते एखादा कठोर मुद्दासुद्धा मऊसूत करुनच मांडतात.

गोडबोले मूळचे सोलापूरचे. सोलापूरच्या हरिभाई देवकरण हायस्कूलमध्ये मराठी माध्यमात शिकलेले. पुढे बोर्डात आल्यावर आय. आय. टी. त थेट प्रवेश मिळतो ( *तेव्हा मिळत असे*) हे माहीत नसल्यामुळे पुन्हा आय. आय. टी एन्ट्रन्सला बसून प्रवेश मिळवणारे.

गोडबोले आज अनेक पैलूंसाठी

प्रसिद्ध आहेत. कॉम्पुटरच्या तांत्रिक बाबींसंबंधी देशात आणि परेदशात गाजवणारी दडपून जावं अशा जोडीची पुस्तकं लिहिण्यापासून संगीताच्या क्षेत्रात मुशाफिरी करत भीमसेन जोशींच्या हस्ते थेट कुमार गंधर्व अॅवॉर्ड मिळविण्यापर्यंत त्यांनी मजल मारली. गोडबोल्यांचं एक पुस्तक ‘डेटा कम्युनिकेशनस अॅण्ड नेटवर्क ’ हे जगभर गाजतंय. दुसऱ्या ‘ऑपरेटिंग सिस्टम ’ या पुस्तकाची विसावी रिप्रिंट निघालीय. शिवाय ‘ वेब टेक्नॉलाजी ’ आणि येऊ घातलेलं ‘ फाऊंडेशन ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी ’ हे पुस्तक किमान सातशे पानी आणि इंग्रजीत !

गोडबोलेंना त्यांच्या मराठी माध्यमात शिकल्यामुळेच इंग्रजीबद्दल आय. आय. टी. त कुणीतरी काहीतरी बोललं. त्यानंतर गोडबोलेंनी इंग्रजी व्याकारण आणि साहित्य यातलं जे जे हाताला लागेल त्याचा फडशा पाडला अन् अख्ख्यी इंग्रजी भाषा अगस्तीसारखी पिऊन टाकली.

आय. आय. टी. त असताना अच्युम गोडबोलेंवर मार्क्सवादाचा खूप खोल परिणाम झाला. तळाच्या माणसाला समृद्ध करु शकणारे हेच एकमेव तत्वज्ञान आहे असं त्यांना तेव्हा वाटायच. महाराष्ट्रात तेव्हा खूप गाजलेला अतिडाव्या तरुणांचा एक गट धुळे जिल्हयात शहाद्यात काम करायला गेला. त्या ‘ मागोवा ’ गटाचे अच्युत गोडबोले हे संस्थापक सदस्य होते. पोलिसांच्या लाठया, तुरुंग वगैरे त्यांनी पाहिलेले आहेत. एवढा मार्क्सवादी तरुण पुढे जाऊन कॉर्पोरेट जगात एवढी दणकट मुशाफिरी करेल यावर तेव्हा खुद्द गोडबोलेंचाही विश्वास बसला नसता. पटनी कॉम्प्युटर्सच्या जनरल मॅनेजरपदापासून सुरुवात करुन सिंटेल चं मॅनेजिंग डायरेक्टपद ‘लार्सन अॅण्ड टुब्रो इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी ’ चं मॅनेजिंग डायरेक्टपद ‘अपार ’ चे मुख्य कार्यकारी अधिकारपदी आणि आता दिशा टेक्नॉलॉजीज चं एक्झिक्युटिव्ह डायरेक्टरपद ही एवढी बहाराची कारकीर्द घडवताना प्रत्येक संस्था त्यांच्या काळात पाच ते सहापटीने वाढलीय.

गोडबोले झपाटल्यासारखे काम करतात. त्यांच्यापलीकडे सभा-समारंभात पाहताना ते खूप रिलॅक्स वाटतात. नव्हे ते तसे असतातच. संगीताच्या त्यांच्या व्यसनाने त्यांना बळ दिलंय. आज त्यांना मार्क्स तेवढयाच महत्वाचा वाटतो का असं विचारलं तर त्यांचं उत्तर ‘ हो ’ असतं; पण त्याला ते उपकलम जोडतात. ते म्हणतात, ‘ पुर्वी मला फक्त मार्क्सच महत्वाचा वाटायचा; पण आता त्याच्यासहित इतर अनेक तत्वज्ञ, विचारवंत, शास्त्रज्ञ महत्वाचे वाटतात. ’ गोडबोलेंना दोनदा पंतप्रधानांच सॉपऱ्टवेअर निर्यातीसाठीचं अॅवॉर्ड मिळालंय.

शिवाय २००० साली आय. आय. टी. ने सर्व आय. आय. टी. यन्स मधून निवड करुन ' डिस्टिंशन अॅल्यूमिनस' असा त्यांचा सन्मानही केलाय, शिवाय त्यांना मिळालेलं उद्योगरत्न पारितोषक वेगळं.

हे एवढं पेलवायला अवघड वाटावं असं यश मिळवण्याकरीता गोडबोलेंनी आयुष्याच्या एका टप्प्यावर संपूर्ण जगण्याची दिशाच बदलली. सिगारेट, मद्य अयाुष्यातून पूर्णपणे हद्दपार केले. पहाटे चार वाजता उठून एका दिवसात दोन दिवसांच काम करायला सुरुवात केली. ते जर मी केलं नसतं तर आजही एक आत्मसंतुष्ट जनरल मॅनेजर किंवा तत्सम म्हणून कुठल्या तरी सॉफ्टवेअर कंपनीत मी नोकरी करीत राहिलो असतो, हे त्यावरचं गोडबोलेंचं म्हणणं.

एक मराठी माणूस मराठी माध्यमातून शिकून आयुष्यात काय काय करु शकतो त्याचं गोडबोले हे एक उदाहरण आहे. खुद्द गोडबोलेंना महाराष्ट्रातल्या प्रत्येक माणासाला (*निदान कामाच्या ठिकाणी तरी)* उत्तम मराठी यायला हवं, असं वाटतं. संपूर्ण कारभाराची भाषा मराठीत असावी असा त्यांचा आग्रह असतो. अर्था अत्युत्कृष्टता ही कोणत्याही प्रांत किंवा जातीने येणारी गोष्ट नाही अशी पुस्ती ते जोडतात.

आयुष्याच्या या एवढया यशसवी वळणावर गोडबोले ' आशियाना ' ही ऑटिस्टिक मुलांसाठीची शाळा चालवतात. मालदे दांपत्यासारखे अनेक जण त्यात त्यांच्या सोबत आहेत. गोडबोलेंचा एकुलता एक मुलगा ऑटिस्टिक आहे पण तो गोडबोलेंनी काढलेल्या शाळेत जात नाही. त्याला गोडबोलेंनी दुसऱ्या शाळेत घातलयं. मुलगा ऑटिस्टक असण्याचा प्रचंड धक्का मुलगा एका वयाचा झाल्यावर गोडबोलेंना आणि त्यांच्या पत्नीला पचवावा लागला. डॉक्टरांनी तो ऑटिस्टिक असल्याचं निदान केल्यावर गोडबोले खचून गेले नाहीत त्यांनी आयुष्याशी आपली मैत्री कायम ठेवली अन् आव्हानांशी दोन हात करणंही.

गोडबोलेंचे आता पुढचे बेत पराकोटीचे महत्वकांक्षी आहेत, ज्यात कोटींचे विचार आहेत. ते ऐकताना गोडबोले बहुधा परप्रांतीय असावेत असा मला संशय येत आहे!

# सुरेश खोपडे

**गे**ली काही वर्षे मी संपूर्ण पोलीस यंत्रणेचा अभ्यास करतो आहे. मोजकेच काही अधिकारी आणि पोलीस कर्मचारी वगळता बुद्धी, प्रतिभा, मानवी संवेदनशीलता आणि विवेक यांचा वापर पोलीस यंत्रणेतही करता येतो आणि वेळोवेळी जो केला पाहिजे याचा विचारच पोलीस यंत्रणेतून लोप पावत चाललेला आहे. अशा यंत्रणेत सुरेश खोपडेंसारखे अधिकारी हे ' ओॲसिस ' सारखेच आहेत.

सुरेश खोपडेंच नाव मी सुरुवातीला ' ग्रंथाली ' मध्ये वाचलं होतं. त्या वेळी भिवंडी दंगलीवरचं त्यांचं पुस्तक गाजत होतं;

परंतु अनेक पोलीस अधिकारी दोन प्रकारची आयुष्य जगतात. एकीकडे इंटलेक्चुअल समाजात प्रतिष्ठा मिळविण्यासाठी अलंकारिक नम्रपणा, माध्यमंमध्ये चार-दोन तात्विक मुद्यांची चर्चा आणि एक-दोन पुस्तकं लिहिणं करतात. त्याच वेळेला त्यांच्या पोलीस दलातला दुसरा चेहरा कार्यतर असतो. तो चेहरा हडेलहप्पी, स्थितीवादी, बराचसा क्रुर आणि असंवेदनशील असतो. त्यामुळेच सुरुवातीच्या काळात मी सुरेश खोपडें दोन चेहरे घेऊन वावरणारे पोलीस अधिकारी नव्हेत हे मला  नंतर ओघाओघाने कळलं. त्या काळात माझी आणि सुरेश खोपडेंची सुदेश हिंगलासपूरकरने ओळख करुन दिली. मला खोपडे काहीसे अबोल, अंतर्मुख आणि घुम्या स्वभावाचे वाटले. ते जे काही बालेले ते मला फारसं ओलावा असलेलें वाटलं नाही पण एक आश्चर्य मला त्यांच्याबद्दल वाटत राहिलं ते फार तत्वज्ञानयुक्त बोलले. साधारणपणे पोलीस अधिकारी असं बोलत नाहीत. ‘ पोलीस अधिकारी ’ नसल्यासारखं खोपडे बोलत होते. देशभरातल्या अनेक पालीस अधिकाऱ्यांना आणि इंटेलिजन्स एजन्सीमधल्या अधिकाऱ्यांना मी वेगवेगळया काळात वेगवगळया कारणांनी भेटलेला आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणेत  अपवाद कोण आहे हे मला लगेच ओळखता येतं. सुरेश खोपडे हे अपवाद आहेत याची माझ्या मनानं नोंद केली.

पुढे बऱ्याच वर्षानंतर मी माझ्या कार्यक्रमात (*संवाद*) मुलाखत देण्याकरीता आलेल्या सुरेश खोपडेंना भेटलो ( *त्यालाही आता वर्षापेक्षा जास्त काळ लोटला असेल*). मुलाखतीमध्ये सुरेश खोपडे नेमकं काय बोलले ते आता  आठवत नाही पण त्यांचं बहुतेक बोलण हे आधुनिक  व्यवस्थापनशास्त्र आणि  मानवी तत्वज्ञान या विषयावर होतं *(एवढंच आता आठवतं*). त्याच काळात सुरेश खोपड एका विषम संघर्षातून जात होते. तो संघर्ष पोलिसी व्यवस्थापन  पोलिसी यंत्रणा विरुद्ध सुरेश खोपडे असा काहीसा होता. फार थोडया माणसांना सुरेश खोपडेंनी केलेल्या  या संघर्षाची माहिती आहे. खरं तर या संपूर्ण संघर्षाची चित्तरकथा स्वतः सुरेश खोपडेंनी त्यांच्या ‘ नवी दिशा ’ या पुस्तकात लिहिलेली आहे परंतु सुरेश खोपडेंना मी न विचारलेल्या एक अनाकलनीय प्रश्न आहे. या प्रश्नातच हा सुरेश खोपडेंचा संघर्ष कोटयावधी लोकांपर्यंत पोहोचला का नाही त्याचं उत्तर आहे. तो प्रश्न म्हणजे त्यांचं पुस्तक (*नवी दिशा*) त्यांनी एवढं अव्यावसायिक पद्धतीने काढलं ? ते कोणत्याच प्रथितयश प्रकाशकाकडे का गेले नाहीत ? असो.

सुरेश खोपडेंनी त्या पुस्तकात आपल्या आयुष्यात आपण सोडावलेल्या केसेसची उदाहरण घेत घेत पोलीस यंत्रणेला आणि पोलीस प्रशासनास अमानुष असा गैरव्यवहार उघड केलेला आहे. आश्चर्य म्हणजे त्यांनी या साऱ्या अमानुषतेसाठी आणि हडेलहप्पीसाठी कुणाही व्यक्तिला दोषी मानलेलं नाही, तर संपुर्ण पोलीस यंत्रणेची आणि पोलिस प्रशासनाची बांधणी हीच मुळात अत्यंत ढिसाळ आणि दिवाळखोर पायवर उभी आहे, हे त्यांनी सोदाहरण दाखवून दिलेलं आहे. मूलभूत बदलांशिवाय आता पोलीस प्रशासन आणि पोलीस यंत्रणा फार काळ तग धरुन मार्गक्रमण करुच शकणार नाही, हेही त्यांनी दाखवून दिलेलं आहे. टॉम पीटर पासून ते मॅक्सवेबरपर्यंत असंख्य तज्ज्ञांचा मुळातून अभ्यास करुन पोलीस प्रशासनाला जागं करण्याचा जो प्रयत्न खोपडेंनी केला, त्याची या पुस्तकात तपशीलपणे माहिती आहे. वास्तवात या पुस्तकातलं  जे खोपडेंचं म्हणणं आहे ते मान्य केलं तर पोलीस दलाला आणि पोलीस प्रशासनाला सोन्याचे दिवस येऊ शकले असते आणि आता जी पोलीस यंत्रणेची नाचक्की आणि दिवाळखोरी रोज लक्तरांसारखी मध्यमांमधून सर्वांसमोर येतेय ती टहली असती; पण वास्तावात सुरेश खापडेंच्या दुरदृष्टी आणि तात्विक विचारांसाठी त्यांची यंत्रणेतल्या त्यांच्या वरिष्ठांनी शिकार करायला सुरुवात केली. त्यातूनच खोपडे अनेकदा मानसिक नैराश्यात गर्तेत पुनःपुन्हा जाऊन त्यातून बाहेर येण्याकरीता त्यांनी पुन्हा स्वतःवर प्रयोग करणं चालू ठेवलं निराशेच्या गर्तेत पुनःपुन्हा जाऊन बाहेर येणे, असंख्य कार्यालयीन कारावायांचा ससेमिरा अंगावर घेत पुन्हा सत्याचा झेंडा फडकवत ठेवणं ही वाटते तेवढी सोपी गोष्ट नाहीए. शिवाय यातली सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे  पोलीस दलातून सुखाने रिटायर्ड होऊन गीतेतलं कर्मयोगाचं तत्वज्ञान सांगणारे अनेक महानुभाव पोलीस अधिकारी मला माहित आहेत किंवा स्वतःच्या सत्यप्रियतेने पिचून जाऊन पोलीस दलाला रामराम ठोकून स्वतःची सुटका करुन घेणारेही बरेच पोलीस अधिकारी माझे मित्र आहेत; परंतु यातलं काहीही न करता यंत्रणेतच राहून सतत संघर्ष अंगावर घेणारे फक्त खोपडेच.

मुळात पोलिसांच्या बाबतीत मानसशास्त्राचा उपयोग करुन यंत्रणेला मानवी चेहरा देण्यात राजकर्त्यांना स्वातंत्र्योत्तर काळात पूर्ण अपयश आलेले आहे. पालीस यंत्रणा म्हणजे जवळजवळ अर्धलष्करी दल आहे. हीच संकल्पना पूर्णतः चुकीची आहे. आज निर्माण होणाऱ्या  गुन्हेगारीमधली ३० ते ४० टक्के गुन्हेगारी  सदोष पोलीस यंत्रणेमुळे आणि सदोष तुरुंग यंत्रणेमुळेच निर्माण होते आणि सर्वात धोकादायक म्हणजे संपूर्ण पोलीस प्रशासन हे आयपीएस (तेही थेट

यूपीएससीमधून झालेले) अधिकारीकेंद्री आहे. आयपीएसखाली जी पोलीस यंत्रणा आहे त्यांना मानवी करुणेचा स्पर्शच होऊ दिला जात नाही. शेवटी तीही माणसंच आहेत. त्यांनाही काही प्रश्न आहेत. जीवनात आनंद आणि सृजनशीलता मिळविण्याचा प्रत्येक पोलिसाला अधिकार आहे आणि त्यासाठी 'स्पेस' निर्माण करणं हे पालीस प्रशासनाचे कर्तव्य आहे. या प्रयोगशीलतेसाठी राज्यकर्त्यांनी आता तयार व्हायला पाहिजे. या साध्या पण मूलभूत प्रतिपादनासाठी सुरेश खोपडेना पोलीस दलात अथक संघर्ष करावा लागला. त्यांच्या पोलीस कारकीर्दीत त्यांनी भिवंडीपासून धुळयापर्यंत असंख्य प्रयोग केले. त्याचा एक विशाल वृक्ष बनला असता तर पोलिसी यंत्रणेचे असंख्य प्रश्न सुटले असते. जगभर खापडेंच्या प्रयोगांची आणि लेखनाची दखल घेतली गेली. अमेरिकन लायब्ररी ऑफ कॉंग्रेस, वॉशिंग्टनतर्फे त्यांना ' रिसर्च ऑथर ' म्हणून मान्यता मिळाली; पण त्यांच्या यंत्रणेत मात्र वाटयाला शिकार होणंच जास्त वेळेला आलं.

सुरेश आबाजी खोपडे नावाचा १ जून १९५१ रोजी जन्माला आलेला एक अस्वस्थ विचारवंत आजही पोलीस दलातच आहे. त्यांना राष्ट्रपती पदकासह राष्ट्रपती शौर्यपदक वगैरे अनक सन्मान मिळालेले आहेत त्याच वेळेला त्यांच्या पोलीस प्रशासनाच्या ' मानवी चेहऱ्यांच्या ' आग्रहासाठी त्यांना अनेकदा खूप पीडा सहन करावी लागली.

सुरेश खोपडेंचा हा संघर्ष जनतेने समजून घेतला तर आपल्याला पोलीस जसे नको आहेत तसे ते नसतील आणि जसे हवेत तसे ते असतील. जर खोपडेंच्या युक्तिवादांकडे आपण जर दुर्लक्ष केलं तर जनता आणि पोलीस दोन्हीही दिवसेंदिवस अमानुष होत जात एक दिवस पुरे कोलमडतील. आपल्याला काय हवं आहे नेमकं ?

# दत्ता इस्वलकर

**द**त्ता इस्वलकर आता सत्तावन्न वर्षाचा आहे. त्याचा लढा सर्व आघडयांवर नाकेबंदी करुन रोखला गेलाय दत्ता इस्वलकर एकेकाळी स्वतःला समाजवादी म्हणवून घेत असे. आता मी त्याला, ‘ तू स्वतःला समाजवादी मानतोस का ? ’ असा प्रश्न केला तर तो म्हणाला, ‘ अजिबात नाही. आता मी फक्त कामगार कार्यकर्ता आहे. ’ समाजवाद्यांसहित सर्वच राजकीय पक्षांनी अडीच लाख गिरणी कामगारांना कसे मातीत मिळवले, याची जिवंत कथा बनून दत्ता समोर येतो.

दत्ता इस्वलकरचे वडील मॉर्डन मिलमध्ये  जॉबर होते. १९७० साली वयाच्या तेविसाव्या वर्षी दत्ता मॉर्डन मिलमध्ये नोकरीला लागला. या मिलची कहाणीसुद्‌धा मराठी माणसासारखी आहे. सुरुवातीला ही मिल शिरुर-चंदावरकर या मराठी माणसांच्या मालकीची होती. नंतर ती जाठीया या मारवाडी मालकाकडे गेली. १९८७ मध्ये मी बंद झाली. १९९४ साली ती परत चालू झाली. पुन्हा कालच्या १५ मार्चला ती कायमचीच बंद झाली.

१९८७ सालापासून दत्ता गिरणी कामगारांच्या वसाहतीच्या फुटलेल्या धरणात स्वतः बांध बनून लढतोय. १९८२ साली ' दत्ता' या नावाच्याच सामंतांनी सर्वविनाशक संप घउवून  गिरणी कामगारांच्या आयुष्याला मरणटोले दिले. १९८९ मध्ये स्वान मिलची तीन युनिटस् आणि न्यू ग्रेट ईस्टर्न, मॉर्डन, रघुवंशी, कमला, मुकेश, श्रीनिवास, ब्रॅडबरी या दहा मिल बंद करण्यात आल्या गिरणी कामागारांना कोणी वालीच उरला नाही. २ ऑक्टोंबर १९८९ ला ' बंद गिरणी कामगार संघर्ष समिती ' स्थापन झाली. या समितीचा दत्ता इस्वलकर एक निमंत्रक होता. विनाशाच्या वादळाला रोखण्यासाठी.

बरोब्बर एक वर्षानं म्हणजे २ ऑक्टोंबर १९९० ला दत्ता सहकाऱ्यांसहित बेमुदत उपोषणाला बसला. उपोषणाच्या नवव्या दिवशी तेव्हाचे मुख्यमंत्री सुधारक नाईक यांच्या मध्यस्थीने ते उपोषण सुटले. नंतर १९९१ सालीच '  विकास नियंत्रक कायदा ' आणण्यात आला आणि गिरणी मालकांना गिरण्या विकण्याची परवानगी मिळाली. मुंबईच्या ह्‌दयात म्हणजे लालबाग-परळ भागांत ५८ गिरण्या होत्या. त्या विक्रिचा हा खुला परवाना मिळाल्यावर बंद होत होत आजघउीला फक्त दोन (*बॉम्बे डाईंग, सेंच्युरी*) गिरण्या चालू आहेत. जेमतेम दहा हजार मराठी गिरणी कामगार कसेबसे नोकऱ्या टिकवून आहेत दत्त्ताला या साऱ्या वाताहतींमध्ये २,५०,००० गुणिले किमान ७ एवढया मराठी माणसांनी 'काहीच हालचाल कशी केली नाही ? 'असं विचारलं तर तो म्हणतो, ' सगळया राजकीय पक्षांना टाटा, मफतलाल, ठारसी, पिरामल, भंडारी,रुईया यांचीच पाठराखण करायची होती. लालबाग परळमधल्या मराठी माणसाला जेवणचीच भ्रांत होती. त्याचा कणाच साफ मोडून टाकला होता. तो काय लढतो ? सर्व शेटजींना त्याची चोख नाकेबंदी केली होती. सगळे राजकीय पक्ष मालक लोकांचीच सेवा करण्यात मग्न होते.' अशा रीतीने ज्या लालबाग – परळने मराठी माणसांच्या

व्रजमुठीच्या जोरावर लोकमान्य टिळकांच्या अटकेनंतर उत्फूर्त हरताळ पाळला आणि त्यानंतर प्रत्येक राजकीय चळवळीचा कणा बनण्यात पुढाकार घेतला, ते लालबाग-परळ ‘अप्पर वरळी ’करण्यात आले. या आत्यंतिक भीषण अशा सुप्त संहाराचा दत्ता इस्वलकर भाग आहे, साक्ष आहे. आजही त्याविरुद्ध मिळेल त्या माणसांना सोबत घेऊन तो लढतो आहे त्याला विचारल, तुला निराशा नाही येत ? तो म्हणतो ‘ येते ना खूप निराश वाटतं. माझीही मिल बंद पडलीय. फार  गळून गेल्यासारख वाटतं पण काहीतरी केलचं पाहिजे ना ! थांबून कसं चालेल ? ’

गणेश चतुर्थी आली की इथल्या बारा-तेरा लाख मराठी माणसांची लगबग सुरु व्हायची. गावाला जाणाऱ्या एस. टी. बसेस सुटायच्या आरास, मखर, सिल्कचे झुळझुळीत शर्टस् आणि गणपती बाप्पा मोरया चा गजर घुमू लागायचा. उदबत्या आणि साठयाच्या करंज्यांचा अस्सल मराठी वास आसमंतात दरवळायचा. येत्या काही वर्षात हे काहीच असणार नाही. मराठी गिरणी कामगार टाचा घासत भिकेला लागून नाही होत जाणार. त्याच्या छाताडावर बेलिंग ॲली आणि शॉपिंग मॉल उभे राहणार. जसे फिनिक्स मिलच्या जागेवर मॉल आणि बिग बाझार उभा राहिला. तिथे अत्यंत झुळझुळीत कपडयातले शाकाहारावर व्याख्यान देणारे जैन, मारवाडी किंवा पंजाबी, बिहारी आपल्याला गाडया घेऊन सौदे करायला, नाही तर चैन करायला येणार. त्याच वेळी बाजूच्याच छोटया कार्यालयात दत्ता इस्वलकर गिरणगावात रोजगार समिती नावाच्या नव्या आशेची जुळवाजुळव करीत बसलेला असणार. निर्माण होणाऱ्या मॉल, बिग बाझार किंवा बेलिंग ॲलीमध्ये गिरणी कामगारांच्या कुटुंबातील किमान एकाला नोकरी मिळावी असा जी. आर. दत्ता आणि त्याच्या सहकाऱ्यांनी शासनाकडुन पास करुन घेतलाय. ते कामगारांनाच माहीत नाही याची चिंता दत्ताला सध्या लागलीय. धावाधाव करुन सर्व गिरणगावाला हे माहीत करुन देण्याच्या उद्योगाला तो लागलाय पण त्याच्या  वेगापेक्षा विनाशाचा वेग कित्येक पट जास्त आहे. मुलीच्या लग्नासाठी पैसे नाहीत म्हणून वय वाढलेली मुलगी घरात आहे. मुलगा शिक्षणसोडून टोळीबाजी  करीत राडे करतोय. आई दुखण्याने अंथरुणाला खिळलीय. बाप तणावाने आलेला दमा आणि त्याने आलेली खोकल्याची उबळ बायाकोची झोपमोड होऊ नये म्हणून रात्रभर दाबतोय.. अशी लक्षावधी

शापित मराठी कामगार कुटुंबे देशोधडीला लागतील. दत्ता त्यांचीच चिंता करतोय. देशात निवडणुका होताहेत. एकेक उमेदवार किमान पाच-पाच कोटी रुपये (*अनधिकृत पणे*) उधळतोय..

या सगळया उमेदवारांना त्यांच्या नेत्यांसहित रांगेत उभे करुन त्यांचे हे देशद्रोही पापाचे धडे वाचून दाखवावे. ठो SS ठो S SS ..

# संजय मेमाणे

**सं**जय किसन मेमाणे नावाचा एक मराठी सिनेमॅटोग्राफर जागतिक दर्जाची सिनेमॅटोग्राफि करतो. तरीही त्याच्या कॅमेरा आणि लाईटस्च्या जोरावर अभूतपुर्व यश मिळवणारे दिग्दर्शक आणि निर्माते त्याचं नाव क्वचितच घेताना दिसतात. असं असूनही त्याबद्दल कटुता न बाळगता संजय मेमाणे त्या क्षुद्र वृत्तीकडे दुर्लक्ष करुन नव्या कामांकडे वळतो.

संजय मेमाणेने सुमित्रा भावेचे ‘ दहावी फ’ आणि ‘ वास्तुपुरुष ’ हे चित्रपट केलेत. ‘ दहावी फ’ हा त्याचा पहिला चित्रपट. ‘ वास्तुपुरुष’ चित्रपटामध्ये

संजयने जी छायाप्रकाशाची कमाल केलीय ती असारणपण प्रतिभेशिवाय कुणाला करता येणं शक्यच नाही. मराठीत आता गाजत असलेल्या ‘श्वास’ हा संजयचा तिसरा चित्रपट. त्या संदर्भात संजयचं नाव सर्वात कमी ऐकू येतं; पण वस्तुतः ‘श्वास’ च्या यशाचा ताळेबंद मांडायचा झाल्यास बालकलाकार अश्विन चित्तळे आणि सिनेमॅटोग्राफर संजय मेमाणेच्या भक्कम पायांवर हा चित्रपट तोलला गेलाय आणि त्यावर मग चित्रपटाचा सर्व डोलारा उभा आहे हे सिनेमा समजणाऱ्या माणसाच्या लगेच लक्षात येतं. तरीही ‘श्वास’ च्या सर्व टीम मध्ये सर्वात मागे संजय मेमाणे उभा असतो. एक भास्कर चंदावरकर वगळले तर त्यांच नाव कुणीही घेत नाही. संजयलाही पुढे पुढे करायला आवडत नाही. त्यामुळे हा अनुल्लेख त्यालाही मनापासून पसंत असावा

संजय मेमाणे मुळचा पारगावचा. सासवड, पुणे हा त्याचा जन्मगावचा प्रदेश. आई-वडील फार शिकलेले नसल्याने मुलाने शिकावं म्हणून संजयला त्यांनी मुंबईला काकांकडे पाठवलं. डिलाईट रोडवर त्याच्या काकांचं घर आहे. दहावीपर्यंत शिकल्यावर संजयला त्याच्या कॅमऱ्याच्या वेडामुळे स्वस्थ बसवेना. तोपर्यंत स्थिर छायाचित्रणात त्याने हात चालवून पाहिलेला होता.

संजयच्या आयुष्यातला सर्वांत भयानक कालखंड तेव्हा सुरु झाला. महालक्ष्मीच्या फेमस स्टुडिओच्या चकरा संजयने मारायला सुरुवात केली. सुरुवातीला त्याला फक्त ‘लाइटमन’ ( शुटिंगच्या वेळेला लाइटस्‌ची हलावालहव करुन व्यवस्था बघणारा) व्हायचं होतं. तो शिरकावही करुन घेणं सोपं नव्हतं फार दूर नाही १९९३-९४ साल असेल. संजय सकाळी सात वाजता उठून चालत डिलाईल रोडवरुन महालक्ष्मीच्या फेमस स्टूडिओच्या बाहेर जाऊन उभा रहायचा. त्याला आत येऊ दिलं जायचं नाही. लाइटमन च कार्ड काढायला २५ हजार रुपये लागतील, असं सांगून घाबरवलं जायचं. संजयकडे तर ट्रेनच्या तिकिटीलाही पैसे नसायचे. खूप मुष्किलीने संजयने फेमस स्टुडिओत प्रवेश मिळवला तेव्हा त्याची भीषण फसवणूक करण्यात आली. लाइटमन ला दिवसाला शंभर रुपये मिळतात. संजयला तिथल्या लोकांनी तीन दिवसांचे फक्त १५ रुपये द्यायला सुरुवात केली. कार्ड काढण्याकरता इतर पैसे बाजूला टाकण्यात येणार आहेत, असं कारण त्याला सांगण्यात आलं.

या सगळया दुष्टचक्रांना संजय पुरुर उरला. लाइटमनचा चौथा असिस्टंट

झाला. १६ मि. मी. फिल्मच काम त्याने पहिल्यांदा चारुदत्त दुखडयांकडे पाहिलं. जागा, स्टुडिओ आणि दिग्दर्शक बदलत संजय चौथ्या असिसटंचा तिसरा, दुसरा असिसटंट होत गेला. पुन्हा त्याने चित्रपटासाठी लाइटमन चं काम केलं.

या साऱ्या प्रवासातली एक बोचरी आठवण संजय कधीच विसरु शकत नाही. एका मराठीतल्या निर्माता, दिग्दर्शक, कॅमेरामन असलेल्या व्यक्तीसोबत तिसरा अस्टिटंट म्हणून काम करताना भर सेटवर सर्वांसमोर तो कॅमेरामन (तेव्हा तो फक्त कॅमेरामनच होता) संजयला म्हणाला, ' ××× कुळवाडया, तू रे कसला कॅमेरामन होणार ? लायकी आहे का रे तुझी ? ' संजयने त्याला उत्तर दिलं नाही. तेव्हा परिस्थिती इतकी दुर्बळ होती की संजय काय उत्तर देणार ? आजवर तो कॅमरामन एकही चित्रपट शूट करु शकलेला नाही. आयुष्याच्या शर्यतीत संजयने त्याला केव्हाच मागे टाकलंय, संजयच्या मनात त्या व्यक्तीबाबत अजिबातच कटुता नाही. उलट अशा प्रसंगांनी पेटवलेल्या आगीनेच संजयला इथपर्यंत आणलंय. संजयने हिंदीत विपुल काम केलंय पण बनचुकेपणा कधी केलेला नाही. आता संजयच्या, ' करिष्मा ', ' ये मेरी लाईफ है, ' ' साक्षी, ' कही किसी रोज ' या मालिका वेगवेगळया हिंदी वाहिन्यावर चालू आहेत. आतापर्यंत संजयने ३० हिंदी मालिका स्वतंत्रपणे कॅमेरामॅन म्हणून केलेल्या आहेत. त्यातल्या ११ मालिका एकता कपूरच्या होत्या. संजयने स्वतंत्रपणे कॅमेरामन म्हणून सहा हजार हिंदी एपिसोडस् शूट केलेत.

महेश भट्ट निर्मित आणि दिग्दर्शित तुमसा नही देखा या येणाऱ्या चित्रपटाची सिनेमॅटोग्राफीही संजयचीच आहे.

संजयला चित्रपटातल्या त्याच्या लाइट्सच्या आणि कॅमेऱ्याच्या करामतीसाठी अनेक बक्षिसं मिळालीत. त्यातल्या अनेक दृशातलं थक्क करुन टाकणारं लायटिंग संजयने हाती कोणतीही साधनं नसताना कौलं काढून सूर्यप्रकाश वा घरगुती बल्बच्या प्रकाशात केलेलं आहे.

संजय हिंदी चित्रपटातल्या महागडया सिनेमॅटोग्राफसारखा लायटिंगसाठी शुटींग तुंबवून ठेवत नाही. जिथे साधनं नसतील तिथे तो आपली थक्क करुन टाकणारी प्रतिभा वापरतो. ' वास्तुपुरुष ' चित्रपटात एका घंगाळातला पाण्याचं संजयने जे लायटिंग केलेल आहे आणि त्यातून जो परिणाम साधला जातो, तो पाहून अंगावर रोमांच उभे राहतात.

संजयचं साधं सोप तत्वज्ञान आहे, ‘ मी बोलून समाजावू शकत नाही. कुणाला . मी फक्त शंभर टक्के चांगल काम करु शकेन. तेच मी करतो. ’ हे शंभर टक्के काम करुन मागे राहण्याचा त्याच्या स्वभावामुळेच १० टक्क्यांतली घरं मागणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कारविजेत्या कलावंत व दिग्दर्शकांच्या गर्दीत परवा मुख्यमंत्र्यांकडे संजयने मौन कायम ठेवलं. १० टक्क्यांसाठी आत्मसन्मान लयाला नेणाऱ्या लाचार (अफवाद वगळून) कालाकार, दिग्दर्शकांच्या गर्दीत संजय शंभर टक्क्यांच्या कामाने मूक राहतो, तेव्हा वाटतं की महाराष्ट्राचा कणा अजून पुरा लिबलिबीत नाही झालेला !

# डॉ.राजीव कर्णिक

**मा**झ्या आयुष्यात एका अत्यंत तणावाच्या क्षणी मी.डॉ. राजीव कर्णिकांना भेटलो होतो. माझ्या नातेवाईकांची ॲंजिओग्राफी आणि मग ॲंजिओप्लॉस्टी करण्याची गरज येऊन पडली होती. डॉ.राजीव कर्णिकांचं नाव मी माझ्या अनेक डॉक्टर आणि बिगर डॉक्टर मित्रांकडून ऐकलेलं होतं. वांद्रे-कुर्ला काम्प्लेक्सला एशियन हार्ट इन्स्टिटयूटमध्ये डॉ.राजीव हे सीनियर कार्डिऑलॉजिस्ट म्हणून काम करत. या साऱ्या गोष्टींचा परिपाक म्हणून माझी आणि त्यांची भेट झाली. सुरुवातीला दुपारी आम्ही भेटलो. मग रात्री उशिरा

त्याच दिवशी रात्रीपर्यंत ॲंजिओप्लास्टी (जी इमर्जन्सी होती) झालेली होती. या सर्व काळात माणसाचं मन आणि त्याचं शरीर यांचा सतचा संबंध कसा असतो यावर सातत्याने विचार करणारा एक माणूस माझ्याशी बोलत राहिला. त्याचं नाव डॉ.राजीव कर्णिक. आमच्यात बोलता बोलता भावनिक बंध तयार झाला. असं बोलून दाखवणं हा माझा स्वभाव नाही, पण डॉ.राजीव कर्णिकांचा ती अपवाद केला. बहुधा त्यांचाही तसा स्वभाव नसावा, पण त्यांनीही अपवाद करुन माझं म्हणणं सहर्ष मान्य केलं.

वर लिहिलेली बाब खरं तर ही फार व्यक्तिगत बाब आहे; परंतु आयुष्यात आपल्यापैकी कुणीही आणि कधीही आजारी पडू शकतो. साध्या आजारापासून ते असाध्य आजारापर्यंत कोणताही आजार आपल्या होऊ शकतो, पण याची जाणीव आपण आपल्या मस्तीत जगत असताना आपल्याला क्वचितच असते आणि एकदा का ती जाणीव आपल्याला झाली की आपण गर्भगळीत होतो. आपला जगण्यातला चांगलेपणावरचा विश्वासच उडून जायला लागतो. ही जाणीव आपल्यात स्वतःच्या किंवा स्वतःच्या अत्यंत जवळच्या आणि प्रिय व्यक्तींच्या आजारपणाने निर्माण होते आणि ती जाणीव एकच प्रश्न स्वतःसोबत घेऊन येते. तो प्रश्न म्हणजे ‘ हे माझ्याच नशिबी का ? ’ असे प्रश्न विज्ञानाने मुळातून सोडवण्याचे अनेक यशस्वी प्रयत्न केलेले आहेत आणि शरिर हे यंत्रासारखे असून कुशल डॉक्टर त्यावर विज्ञानाच्या आधुनिक शोधांद्वारे यशस्वी दुरुस्ती करु शकतो हे डॉ.राजीव कर्णिकांसारखे प्रज्ञावंत डॉक्टर्स अनेकांना पटवून देत असतात.

डॉ.राजीव कर्णिक त्यांच्या करीयरमधले एक श्रेष्ठतम पुरुष आहेत. मेडिकल करीयमधली सहा सुवर्णपदकं त्यांच्या गाठीला आहेत. डी.एम.कार्डिओलॉजी हे हृदयरोगतज्ञ म्हणूनच सुपर स्पेशलायझेशन्, शिवाय इंग्लंड अमेरिकेत उच्च शिक्षण. हे सारं प्राप्त केल्यावर आधी बॉम्बे हॉस्पिटल आणि आता एशियन हार्ट इन्स्टिटयूटमध्ये अद्भुत काम. याव्यतिरिक्त २००२ सालचं राष्ट्रीय रत्न ॲवॉर्ड हे सारं वयाच्या त्रेचाळीसाव्या वर्षापर्यंत त्यांच्या गाठीला आहे. अशा माणसाला आपल्या आय.सी.यू.तल्या पेशंटच्या केसातून हात फिरवत त्याला ‘ फार काही झालेलं नाहीए, तो आता पूर्ण बरा झालाय,’ हे समजावताना पहिलं की ‘ आदर्श डॉक्टर ’ कसा असायला हवा याचं वेगळं उत्तर शोधावं लागत नाही. आज वैद्यकीय क्षेत्रात अशी परिस्थिती आहे की साधा जनरल प्रॅक्टिशनर जर त्याची प्रॅक्टिस तुफान चालत असेल तर तुमच्या घरातल्या म्हाताऱ्या-कोताऱ्या

माणसासाठी व्हिजिटला यायला टाळाटाळ करतो. माझ्या अनेक मित्रांच्या घरच्या वृध्दांसाठी किंवा हलू न शकरणाऱ्या पेशंटस्‌साठी डॉक्टर राजीव कर्णिक स्वतः व्हिजिटला गेलेले मला माहीत आहे. (त्यांचा दिवस पहाटे सुरु होतो तो रात्री दीड-दोनपर्यंत चालू राहतो) माणसाच्या चांगुलपणावर आणि त्याला आपल्या आयुष्याचा आणि ज्ञानाचा अधिकाधिक उपयोग करुन देण्याचा श्रध्देचं दुसरं नाव डॉ.राजीव कर्णिक आहे.

अशा या डॉ.कर्णिकांना मी एशियन हार्ट इन्स्टिटयूटमध्ये भेटल्यावर पुन्हा दीड महिन्याने भेटायचं असं आम्ही दोघांलीही ठरवलेलं होतं, कारण मधला दीड महिना ते क्लिव्हलॅंडला हृदयविकारासंबंधीचं अधिक ज्ञान घेण्याकरता जाणार होते; परंतु ते क्लिव्हलॅंडहून परत हिंदुस्थानात आले. त्यालाही आता दीड महिना उलटून गेला, पण मी त्यांना भेटू शकलेलो नाही, कारण अमेरिकेतून परतल्यावर त्यांना पाठीत आणि छातीत अचानक खूप अस्वस्थ वाटू लागलं आणि त्या अस्वास्थ्याचं निदान निमोनिया आणि ॲक्यूट मायलॉइड ल्यूकेमिया अशा गंभीर दुहेरी आजारात झालं. पैकी ल्यूकेमिया असल्यामुळे त्यांना टाटा कॅन्स इस्पितळात दाखल करावं लागलं. या प्रकारच्या आजारात रक्त बदलणे आणि केमोथेरपी या उपचार पध्दतीचा इतर अने औषधांसोबतच वापर करत राहावा लागतो. रुग्णाला इतर कुणाकडून नवं इन्फेक्शन होऊ नये म्हणून उपचार करणारे डॉक्टर्स आणि जवळचे नातेवाईक वगळता कुणालाच त्यांना भेटू देत नाहीत. डॉ.राजीवबद्‌दल, त्यांच्या आजाराबाबत मला अगदी पहिल्य दिवशीच ‘ टाटा इस्पितळा ’ मधून कळलं. तोपर्यंत ते माझ्या आयुष्यातले ‘ अजीज ’ व्यक्ती बनलेले होते. आपल्या जिवलग व्यक्तीबाबत असं काही घडलं की पहिली प्रतिक्रिया हीच उमटते की, ‘ अरे, या जगात काही देवबिव आहे की नाही ? एवढया माणसांच्या वेदना नाहीशा करुन त्यांना सुदृढ आयुष्य देणाऱ्या या पापभिरु माणसाला या यातना कशाला ? ’ आपल्या जवळच्या माणसाला जगाच्या कुठल्याही पाठीवर वेदना झाल्या की आपणही मनाच्या एका कोपऱ्यात त्या वेदना भोगत राहतो. आपण मिष्टान्न खातो, समारंभ साजरे करतो, नवीन कपडे घालतो, विनोद झाल्यवर खळखळून हसतो, पण डॉ.राजीहव कर्णिकांच्या त्रासाने आणि वेदनांनी आपल्या मनाचा एक कोपरा हुळहुळा केलेलाच असतो. सारे आनंद साजरे करताना मनातली तीव्र कसक जात नाही.

परवा नववर्ष सारं करताना, मनाने सर्वात प्रथत नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या त्य डॉ.सौ.कर्णिकांना आणि डॉ.राजीव कर्णिकांच्या दोन मुलींना.

त्यांचा बाप हा एक महान योध्दा आहे. अत्यंत कुशलपणे विज्ञानाचा वापर करुन त्याने मृत्यूच्या दाढेत पोहचलेल्य अनेकांना साक्षात मृत्यूशी लढत देऊन मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढलेलं आहे. डॉ.कर्णिकांचे सासरे, त्यांच्या डॉक्टर पत्नी आणि त्यांच्या मुली ज्या मानसिक आंदोलनातून जात असतील त्याची मला जागेपणीच्या प्रत्येक क्षणी कल्पना असते. डॉक्टर राजीव कर्णिकांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक माणसाची संवेदना त्या चौघांपेक्षा वेगळी नसेल. डॉक्टर कर्णिकांवर प्रेम करणारे हजारो मित्र आहेत. शिवाय हजारो पेशंटस् वेगळे. त्यातल्या प्रत्येकाने जरी आपल्या आयुष्यातले एक सदृढ वर्ष डॉक्टर कर्णिकांच्या नावे केले तरी डॉक्टर कर्णिक प्राचीन ऋषीमुनींसारखे हजार वर्षे हृदयरोग्यांवर उपचार करताना दिसतील. यातला कल्पनेचा भाग जरी वजा केला तरी श्रध्देचा भाग हा मात्र शंभर टक्के चिरेबंदी आहे. अमिताभ बच्चन आपल्या दिलाची धडकन आहेत. डॉ.राजीव कर्णिक हे त्या धडधडत्या दिलाने धन्वंतरी आहेत. फार थाडी माणसं वैद्यकीय शाखेच्या या टप्प्यावर जाऊन पोहोचलेली आहेत. (डॉ.नितीन गोखले, डॉ.जगदीश हिरेमठ वगैरे काही बोटांवर मोजण्याजोगे मराठी डॉक्टर आहेत.) नव्याने वयात आल्यवर एखाद्या मुलाकडे किंवा मुलीकडे पाहिल्यावर हृदयात धडधडायला लागतं. ते हृदय तसंच कायम तरुण राहावं म्हणून दिवसाचे बावीस सात काम करत राहणारा डॉ.राजीव कर्णिक नावाचा, चव्वेचाळीत वर्षांचा आपला जिवलग जे युध्द लढतोय ते तो जिंकणारच आहे. कारण माझा एकही मित्र आजवर ज्या युध्दात उतरला ते युध्द तो हरलेला नाही ! डॉ. राजीव कर्णिकांच्या केमोथेरपीचं पहिलं सायकल पूर्ण झालयं. सतत रक्त बदलण्याकरता त्यांना रक्ताची गरज पडते. त्यांचा रक्तगट आहे ‘ ए प्लस ’ सुदैवाने माझाही रक्तगट तोच आहे आणि तुमचा ?

डॉ. राजीव कर्णिक बरे होऊन परत त्यांच्या क्लिनिकमध्ये आले की पहिल्याच दिवशी मी उगाचच स्वतःच्या हृदयाचा ई.सी.जी.काढून घेणाराय. खूप काळ एखाद्याची चिंता केल्यावर हृदयाचा एक कोपचार थोडासा स्वभात बदलत असेलच ना ?

# अखांड धाडपड

# माधव गडकरी

‘ **लो**कसत्ता ’ च्या संपादकपदी जेव्हा माधव गडकरी होते तेव्हा वर्तमानपत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाच्या दृष्टीने ते हिरो होते. मी तेव्हा शाळा कॉलेजात होते. माधव गडकरींचं वैशिष्ट्य म्हणजे ते हातात असलेल्या वृत्तपत्रात आंदोलन बनवत असत. त्यांच्या लेखनात आव्हान असे, आवाहन असे. एकप्रकारचा थेटपणा असे. मुळातच गडकरी ‘लोकसत्ता’ पर्यंत अनेक वृत्तपत्रामधून प्रवास करुन; पण यातली सर्वांत आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे एखाद्या वृत्तपत्राचे इन्फ्रास्ट्रटर हे त्याचे बलस्थान न

बनता माधव गडकरींचे लेखन हेच त्या वृत्तपत्राचे बलस्थान बदत असे. उत्तम उदाहरण द्यायचे झाले तर ‘ गोमंतक ’ आणि ‘ मुंबई सकाळ ’ मधली माधव गडकरींची कारकीर्द दाखवता येईल. ‘ गोमंतक ’ आणि ‘ मुंबई सकाळ ’ ची प्रतिमा त्यांनी ठोस भूमिका असलेले वृत्तपत्र अशी केली. वृत्तपत्रसमूहाची ‘ सकाळ ’ वृत्तपत्रसमूहाची जी वैशिष्टे आहेत त्यात त्यांच्या गावपातळीपर्यंत बातम्या गोळा करण्याच्या सामर्थ्यापासून ते वितरण आणि खपाच्या सातत्यापर्यंत अनेक बलस्थानं येतात. त्यात अग्रलेख आणि अग्रलेखाचं पानही माधव गडकरींनी त्यांच्या कारकीर्दीतबदलून टाकलं. ‘ मुंबई सकाळ ’ हे वृत्तपत्र त्याच्या अग्रलेखांमुळे आणि घेतलेल्या भूमिकांमुळे गाजू लागलं. ‘ गोमंतक ’ सुध्दा त्यांच्या काळात गोव्यातलं महत्वाचं वृत्तपत्रं बनून राहिलं होतं. राजकीय घडामोडींवर वृत्तपत्राने आपला प्रभाव टाकण्याची क्षमता संपवली की त्या वृत्तपत्राचा खप किती आहे हे फिजूल असतं. ‘ केसरी’ किंवा ‘ मराठा’ चा खप आजच्या खपांच्या उच्चांकाच्या तुलनेत काहीच नव्हता; परंतु ‘ केसरी ’ किंवा ‘ मराठा ’ ने इथल्या समाजाच्या इतिहासाला कलाटणी दिली. माधव गडकरींनी हे अचूक ओळखलेलं होतं. वृत्तपत्राचा ‘ कोअर कॉम्पिटन्स ’ असतो त्याच्या राजकीय आणि सामाजिक बदलांबाबतच्या दिशा ओळखण्याच्या व दिशा देण्याच्या सामर्थ्यांमध्ये. हे ‘ वृत्तपत्राचं गाभ्याचं ’ बलस्थान संपादकाने वापरायचं असतं. जेव्हा मालक आणि संपादक एक व्यक्ती असते तेव्हा परिस्थिती वेगळी असते. (उदा. टिळक, अत्रे); परंतु जेव्हा मालक आणि संपादक या वेगवेगळया व्यक्ती असतात तेव्हा परिस्थिती थोडी गुंतागुंतीची बनते. अशा वेळी संपादकाची नेमकी भूमिका काय असली पाहिजे हे जाणून घ्यायचं झाल्यास माधव गडकरींचं उदाहरण द्यावं लागेल. खुद्द गडकरींना या साऱ्या प्रक्रियेत मालकांची काय भूमिका असते असं विचारलं, तर ते त्यांच्या आयुष्यात आलेल्या मालकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. गडकरी जेव्हा ‘ मुंबई सकाळ ’ चे संपादक होते तेव्हा बानू कोयाजी ‘ सकाळ ’ च्या सर्वेसर्वा होत्या. दिवस आणीबाणीनंतरच्या निवडणुकांचे होते. माधव गडकरींनी उत्तर हिंदुस्थानचा दौरा करुन कॉंग्रेसचा रायबरेलीपासून अनेक ठिकाणी पराभव होईल असं भाकीत व्यक्त केलेलं होतं. तो लेख प्रसिध्द होण्याअगोदर त्या लेखाची जाहिरात प्रसिध्द झाली तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांचा बानू कोयाजींना फोन केला. बानू कोयाजींनी तत्क्षणी शंकररावांनी स्पष्ट शब्दांत सांगून टाकलं की, ‘ आम्हीआमच्या संपदाकांच्या अशा कामात ढवळाढवळ करीत नाही.’ हे सांगताना परत कॉंग्रेस सत्तेवर आली

तर काय होईल ? याचा हितसंबंध जपणारा विचार त्यानी क्षणभरही केला नाही.

स्वतः माधव गडकरींना ' गोमंतक ' चे तेव्हाचे मालक विश्वासराव चौगुले याच कारणासाठी आठवतात. त्यांनीही गडकरींना कधीच ' हे ' कर किंवा ' ते ' करु नकोस असं सांगितलं नाही.

माधवरावांची वृत्तपत्रीय कारकीर्द चाळीस वर्षांची. म्हणजे खरं तर पन्नास वर्षांची पण सुरुवातीची वर्षे ' निर्धार ' साप्ताहिकातली !

माधव गडकरींना मी एकदा त्यांच्याच केबिनमध्ये भेटलो होतो. मी त्यांच्याशी तेव्हा नेमके काय बोललो होतो ते आता आठवत नाही; पण त्यांच्या मागे लावलेला लोकमान्य टिळकांचा फोटो माझ्या अजूनही स्मरणात आहे. ' लोकसत्ता ' मध्ये असताना माधव गडकरींनी महाराष्ट्र अक्षरशः ढवळून काढला. छोटेछोटे प्रश्न आणि लहान माणसांच्या समस्या त्यांनी कायम धसाला लावल्या. ' लोकसत्ता ' हे वृत्तपत्र त्यांनी एका विराट जनआंदोलनात परावर्तित केलं. मला त्यांची जनमानसात काय प्रतिमा होती, त्याचा एक किस्सा आजही आठवतो. त्या किश्श्यातला बालीशपणा वगळला तर माधव गडकरी लोकांमध्ये किती खोल पोहोचले होते, ते तत्काळ लक्षात येतं. मी आणि माझा एक मित्र एका वत्कृत्व स्पर्धेची तयारी करीत होतो. विषय बोफोर्स तोफांमधल्या भ्रष्टाचारासंबंधी होता. त्या वेळी विरोधी पक्षांनी वातावरण निर्मिती अशी केलेली होती की राजीव गांधी परदेशात निघून जातील असं खरंच वाटायचं. माझा मित्र बोलताना पटकन म्हणाला, ' राजीव गांधी असं खरंच परदेशात जातील काय निघून ? ' त्याचं हे वाक्य पूर्ण व्हायच्या आत तिथेच आमची एक मैत्रीण उभी होती. ती चटकन म्हणाली, ' राजीव गांधीची काय बिशाद ? माधव गडकरी त्यांना तात्काळ पकडून आणतील. ' आधुनिक काळात जनमानसावर एवढा खोल आणि एवढा व्यापक प्रभाव असलेला संपादक (अगदी एक-दोन अपवाद वगळता) कुणीही नाही.

अंतुलेंचं ' प्रतिभा प्रतिष्ठाण ' प्रकरण गाजत असतानाची गोष्ट. अंतुलेंच्या कथित भ्रष्टाचाराविरुध्द माधव गडकरींनी झोड उठवलेली होती. अशात अंतुलेंनी माधव गडकरींना जेवायला बोलावलं. गडकरी जेवायला गेले. अंतुलेंनी आपल्या पत्नीशी माधव गडकरींची ओळख एका वाक्यात करुन दिली, ' हे आपल्या विरुध्द सतत लिहितात ते गडकरी.' वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना त्यांनी गडकरींना ' आमचे शिपाई वृत्तपत्र वाचतात. आम्हाला वेळ कुठे असतो वृत्तपत्र वाचायला ? ' असं सांगून वर ' कागदाच्या

कोटयात कपात झाली ते बरंच झालं. त्यामुळे दोन पानं उपद्रव कमीच होईल आता आम्हाला !' असं वर

ऐवकलं होतं. राजकारणी माणसांची वाचनाची सवय उत्तरोत्तर कशी कमी होत गेली, याचे माधव गडकरी हे साक्षीदार आहेत.

माधव गडकरींना आजच्या वृत्तपत्रांविषयी बोलायला खरं तर खूप आवडेल; पण ऐकून घ्यायला आज कुणाला वेळ आहे ?

वृत्तपत्राचं सामर्थ्य काय असतं त्याची सीमा माधव गडकरींसारख्यांनी सतत विस्तारत नेली. गडकरींचं ' चौफेर ' हे सदर म्हणजे उभ्या महाराष्ट्राची चावडी होती. गडकरींना ' चौफेर मंडळ ' स्थापन करायची होती. जेणेकरुन लोकांचे प्रश्न तळमळीने सोडविणारे गट महाराष्ट्रभर निर्माण व्हावेत; पण तेव्हा त्यांना ते कामाच्या व्यापाने जमले नाही. त्यांच्यातला निर्भिड, निःस्पृह आणि तळमळीचा पत्रकार त्या आठवणीने आजही कळवळतो. राजकारण्यांशी ओळख-मैत्री असायला काही हरकत नाही; पण लिहिताना निर्भीडपणे लिहिण्याकरिता जे अंतर आवश्यक आहे ते ठेवायलाच पाहिले, असं ते कळकळीने सांगतात. त्यांचा तेव्हा गाजलेला शरद पवारांवरचा 'साबरमती ते बारामती ' हा लेख हे या उपदेशाचं उत्तम उदाहरण आहे. आजही गडकरींना समाज जागा करायचा आहे. लोकांचे प्रश्न धसाला लावायचे आहेत; पण आता हातात काठी आलीय. शिवाय रात्रीचं त्यांना दिसतही नाहीए. अशा परिस्थितीत केवळ शरिर साथ देत नाही म्हणून गप्प बसायला लागतंय. नाही तर पुन्हा समाज गदागदा ढवळून काढला असता असं गडकरी म्हणतात तेव्हा तरुण कोण ? आपण की ते ? हा प्रश्न मला पडतो.

# मेधा पाटकर

**ध**रणग्रस्तांच्या प्रश्नांवर इतका मोठा आणि इतका प्रदीर्घ काळ चालणारा लढा कोणी देईल, यावर मेधा पाटकरांच्या अगोदर कुणाचाच विश्वास बसला नसता. धरणांचा प्रश्न हा मेधा पाटकरांनी एवढा ऐरणीवर आणला की यानंतर हिंदुस्थानातल्या सर्व मोठया धरणांचा अभ्यास करताना कालखंडाची विभागणी करायची झाली तर मेधापूर्व आणि मेधा पाटकरोत्तर अशीच करावी लागेल.

अगदी इंग्रजांच्या काळापासून धरण बांधताना विस्थापित होणाऱ्यांना वाऱ्यावर सोडून देऊन नवविकासाच्या या

महास्त्रोताला आपण नव्या धरणाच्या रुपाने जन्माला घालतोय, अशी भावना बाळगणाऱ्यांची चलती होती. आज मेधा पाटकर ' नर्मदा बचाव ' चा नारा देताना पदोपदी गांधीजींचं नाव घेतात; पण मराष्ट्रात टाटांनी मुळशीचं धरण बांधायला घेतलं तेव्हा गांधीजींना स्मरुन सेनापती बापटांनी मुळशीच्या धरणाविरुध्द आंदोलन सुरु केलं, तेव्हा गांधीजींनी बापटांना नव्हे तर टाटांना पाठिंबा दिला होता आणि बापटांना आंदोलन मागे घ्यायला सांगितले होतं. अर्थात सेनापती बापट हेसुध्दा अस्सल मराठी असल्याने गांधीजींना ते बधले नाहीत; पण अखेर विजय टाटांचाच झाला. मुळशीचं धरण झाले. विस्थापित हरले.

त्या अर्थाने मेधा पाटकरांचे पूर्वसूरी सेनापती बापट ठरतात, गांधीजी नव्हे आणि धरणग्रस्तांच्या लढयात विजयापेक्षा पराजय हाही पूर्वसूरी ठरतो. तरीही मेधा पाटकरांचं नाव घेतल्यावर काहीतरी सात्विक वाटतं. याचं कारण म्हणजे एका अजस्त्र पराभवासमोर लढायची आत्मिक शक्ती त्यांनी नर्मदातीरावरच्या आदिवासींमध्ये ओतली. ही लढाई निःशस्त्र होती, विषम होती. कधी कधी ती अतिरेकीही होती; पण सारा विकास हा पेटया आणि खोक्यांची भाषा करणाऱ्यांसाठीच होतो आहे अशी परिस्थितीत कोणीतरी गावकुसाबाहेरच्यासाठी आपण आवाज उठवला; ज्यांच्या जगण्या-मरण्याने मध्यमवर्गीयांना साधा ओरखडाही उमटला नाही. मेधा पाटकर यांच्याकडे गेल्या आणि विकासाच्या विषमतेचा प्रश्न त्यांनी आपल्या सर्वांच्या आयुष्यात कायमचा घुसवला. मध्यमवर्गाला अत्यावश्यक असा एक अपराधगंड त्यांनी दिला. मेधा पाटकरांनी विकासाचे जे प्रश्न उभे केले ते त्यांच्याअगोदर कुणीच केले नव्हते असं नव्हे; पण ' नर्मदा बचाव ' ची परिणामकारकता त्यात नव्हती; पण या प्रश्नांच्या उत्तराबाबत संभ्रमावस्था खुद्द मेधा पाटकरांचीही होतीच. विकासाला विरोध म्हणजे किती विरोध ? तंत्रज्ञानाला विरोध म्हणजे वेगळया प्रकारचा विनाश नव्हे काय ?याची समाधानकारक उत्तरे आजही ' नर्मदा ' आंदोलनाला देता आलेली नाहीत.

किंबहुना विकास आणि तंत्रज्ञान हे मानवी इतिहासात पुढे पुढे जाणारच आहे आणि पुढे जाताना ते माणसांचा बळी घेत जाणार आहेत, त्यावर अधिक सृजनशील आणि अधिक कल्पक मार्ग आणि विचारसरणी शोधली पाहिजे, हे मेधा पाटकरांना त्यांच्या प्रवासात उमगलेले दिसत नाही.

जुन्याच समाजवादी साथींबरोबर राजकीय-बिगरराजकीयची ' दगड की माती ' ची त्या अजून किती काळ खेळणार आहेत कुणास ठाऊक ? समाजवादी

आंदोलनाचा संपूर्ण इतिहास हा द्वेषाचा इतिहास आहे. नेहरु, इंदिरा गांधीपासून ते आपापसातल्या द्वेषापर्यंतच्या या प्रवासात आंतरिक विध्वंसाशिवाय काहीही समाजवाद्यांनी निर्माण केले नाही. आता तर त्यांच्याच दुबळयाचा दुष्टपणा आलेला आहे. अशा वेळी मेधा पाटकर त्यांच्यातूनच काही नवनिर्माणाची अपेक्षा करतात, हा अजाणतेपणा म्हणायचा की राजकीय भोळसटपणा ?

वास्तविक लढा ही एक सृजनशील ताकद असते. ती ताकद वापरणाऱ्यांवर तीचा चिरकाल परिणाम होतो. एवढा मोठा लढा लढल्यावर या देशातले प्रश्न राजकीय आंदोलनाने सुटणार की नाहीत हे उमजण्याची व तशी कृती करण्याची अपेक्षा मेधा पाटकरांकडून होती. मी त्यांना एकदा विचारलं होते की, ‘ तुम्ही तरुणांच्या ‘ रोल मॉडेल ’ नाही. तरुणांचे ‘ रोल मॉडेल ’ कोक, पेप्सी पिणारे क्रिकेटर नाही तर सिनेनट आहेत. यावर तुम्हाला काय वाटतं ? ’ तर त्यांचं उत्तर मोठं कल्पक होतं. त्या म्हणाल्या, ‘ आम्ही कदाचित असेच गाडले जाऊ, जसं बी गाडलं जातं;पण जर बी सकस असेल तर उद्या पीक आमचंच येईल. उत्तर कल्पक आणि मनोज्ञ असलं तरी त्यातली पराभव मान्य केल्याची अटळ नाही.

विजयी होण्याकरता नुसती चिकाटी, कल्पकता आणि विजिगिषू वृत्ती पुरेशी नसते. त्यासाठी अतीव कल्पकतेसोबत काळाबरोबर राहणारी प्रवाही लवचिकता लागते. राजकीय पक्ष व राजकीय नेते यांच्या आर्थिक भ्रष्टाचारावर टीका करण्याने त्यात बदल होणार नाही, जसा त्यात सामील होण्यानेही तो होणार नाही, इथपर्यंत सर्वांनाच कळतं. मेधा पाटकरांमध्ये जी सात्विकता आहे तिचा या दोन गोष्टींपलीकडे प्रभाव पडतो की नाही यावर तिची क्षमता यापुढे मोजली जाईल.

मध्यंतरी मेधा पाटकर राजापूरमधून उभ्या राहणार असल्याच्या बातम्या होत्या. त्यांची एक चाहती म्हणाली, ‘ बस्स, एवढयासाठीच हा एवढा खटाटोप ? ’ मग त्या उभ्या राहणार नसल्याची बातमी आली. तेव्हा तिचीच प्रतिक्रिया होती, ‘ म्हणजे अजून पाच वर्षे गेली.’

अशा अवस्थेत जी बीजं गाडली जातात त्यांची पिकं येत नाहीत आणि विश्वास ठेवा अथवा न ठेता; मेधा, लोकांना बीजंही हवी आहेत आणि पिकंही हवी आहेत !

# अण्णा हजारे

‘ **अ**न्नाने बोला है ये सब करने का, जादा बकबक नही करने का, क्या?’अशी वाक्यं देमार हिंदी चित्रपटात आपण बऱ्याचदा ऐकलेली आहेत. हा अन्ना आणि मी ज्या अण्णांबद्दल आज लिहिणार आहे ते अण्णा एकदम वेगळे आहेत. तरीसुध्दा या अण्णांच्या डाव्या-उजव्या हाताच्या माणसांची भाषा मात्र तीच आहे.

तर अण्णा म्हणजे अण्णा हजारे. अण्णा लष्करात ड्रायव्हर होते. १९६५ चं हिंदुस्थान-पाक युध्द त्यांनी अनुभवलंय. जे सहकारी आता आता जिवंत होते, ते क्षणार्धात मृत होताना माणसाचं जे काही

होत असेल ते त्यांनी पचवलंय. त्यांना या युध्दात डोक्यावर एक जखमही झालीय. त्याची स्पष्ट खूण अण्णांच्या डोक्यावर आहे. म्हणजे देशासाठी जखमी होण्याची अण्णांची आपण पाहतो ती वेळ पहिलीच नव्हे !अण्णांना आत्महत्या करावी असेही तीव्रपणे वाटलेलं आहे त्यांच्या म्हणण्याप्रमाणे विवेकानंदांच्या विचारांनी त्यांचचं आयुष्य बदलवलं.

अण्णा लष्करातून परत येऊन आपल्या गावी राळेगणसिध्दीला गेले. तिथे त्यांनी पाणी व्यवस्थापनाचं आणि ग्रामसुधारणेचं काम सुरु केलं. खरे तर पाणी व्यवस्थापनाच्या या प्रयोगाचे मूळ पुरुष अण्णा नव्हते. या प्रयोगाचे खरे मूळ पुरुष विलास साळुंखे होते; पणलोकप्रियता आणि प्रसिध्दीत अण्णांनी विलास साळुंखेंना हा हा म्हणता मागे टाकले. त्यात काही आश्चर्यकारक नव्हते. ग्रामसुधारा आणि पाणी व्यवस्थापनाच्या कामातून बाहेर पडत अण्णा एक दिवस रॉबिनहूड बनले होते. लष्करात एकेकाळी ड्रायव्हर असणाऱ्या या माणसाने महाराष्ट्राच्या एकाहून एक बनेल राजकारण्यांना सळो की पळो करुन सोडायला सुरुवात केली. राज्य कॉंग्रेसचे असो, युतीचे असो वा आघाडीचे असो. अण्णांना जिकडेतिकडे भ्रष्टाचार दिसू लागला. लोकांनाही हे भलतेच आवडू लागले.

अमिताभयुग म्हणून जे ओळखले जाते ते सरल्याचा हा कालखंड होता. अमिताभ नट म्हणून आजही लोकप्रिय असेल; पण‘अमिताभयुग ’ म्हटले जाते त्याचा सर्वात महत्वाचा डायलॉग ‘ये कुर्सी तेरे बाप की जागीर नहीं ’ हा होता. अण्णांनी नेमका हाच डायलॉग वेगवेगळया प्रकारे राज्यकर्त्यांना ऐकवायला सुरुवात केली. अण्णांची एक गंमत म्हणजे त्यांचा पोशाख आणि बोलायची भाषा ही अहिंसेची होती. बोलायची भाषा अशासाठी की प्रत्यक्षात अण्णांचा अहिंसेवर व त्यातून मतपरिवर्तन होईल यावर विश्वास असावा, असे वाटत नाही. कारण अण्णांच्या गावात दारुबंदी मोडून दारु पिणाऱ्याला झाडावर नाहीतर विजेच्या खांबाला बांधून फटके देण्याची शिक्षा स्वतः अण्णा देत असत. तरीपण अण्णा हे काही करतील, बोलतील ते गोड मानून त्यांच्यामागे जाण्याची जनतेची तयारी होती ;कारणडोळयांदेखत फार्म हाऊस आणि बंगल्यांवर जाणारी संपत्ती आणि तिचा दौलतजादा करणाऱ्या राजकारण्यांना जाब विचारणारा कुणीतरी पुरुष निर्माण झाला होता. शहाणे, वेडे, बुध्दिमान, विचार करणारे, कृतिशील सगळे जण

अण्णांच्या दिशेने धावू लागले. अण्णा जणू कही दुसरे गांधीजीच असावेत असे चित्र निर्माण झाले होते. इथेच नेत्याचा कस लागतो आणि अण्णा कसाला खरे उतरले नाहीत. भगवान बुध्दांची एक गोष्ट सांगातात, एक साधूपुरुष बुध्दांकडे आला. म्हणाला, 'मला तुझ्यासारख्यांची गरज काय ? मी सर्वसंगपरित्याग केलेला पुरुष. मला कसलाही मोह नाही. माझ्यासारखा मीच. तुझी गरज या मूर्ख अशिक्षितांना,' असे म्हणून त्याने बुध्दांच्या गरीब-अशिक्षित भिख्खूकडे बोट दाखवले. भगवान बुध्दांनी एक दोरा तात्काळ हाती घेतला. त्याला अगदी सैलसर गाठ मारली. जी दुरुन दिसत होती. ती सोडवायला त्या साधूपुरुषाला सांगितलं. त्याने लगेच सोडवली. नंतर बुध्दांनी त्याच दोऱ्याला आत्यंतिक ताणून गाठ मारली जी जवळूनसुध्दा दिसू नये. साधूपुरुषाला ती सोडवायला सांगितले. ती त्याला सोडवता येईना. तो म्हणाला, ' गाठ दिसतसुध्दा नाहीए, तर सोडवू कशी ? ' भगवान बुध्द म्हणाले, ' हेच तुझं उत्तर आहे.' अण्णांचे हेच झाले. अण्णांभोवती आज खूप संधीसाधू नवशे-गवशे गोळा झालेले आहेत (महाराष्ट्राच्या दुर्दैवाने). अण्णा हजारेंनी आपल्याभोवतीच्या माणसांची नीट रचना केली नाही. महत्वाच्या माणसांना मुळाशी ठेवून आंदोलने चालू करणे, मागे घेण्याचे ' झटका ' प्रयोग सुरु केले. अण्णांच्या निर्मोही वृत्तीमुळे व खऱ्याखुऱ्या फकिरीमुळे त्यांच्याबद्दची सहानुभूती कायम असली तरी त्यांचा फोलपणा जाणवू लागला. अण्णांची अहंकाराची गाठ दिसत नसली तरी सोडवायला कठीण अशी पक्की होत गेली. बरं, अशा अहंकाराच्या जोडीला मुत्सद्दीपणाही अण्णांकडे नव्हता. त्यामुळे शरद पवारांच्या तालमीत तयार झालेल्या राजकारण्यांनी अण्णा नावाचे वादळ गुंडाळायला सुरुवात केली. ' माझ्याविरुध्द कुणी कुणी, काय काय करायचे हे स्वतः शरद पवारांनी प्रत्येकाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये बसून सांगितले ' असे उद्‌गार कांगावा करीत अण्णांनी काढले. माझ्या दृष्टीने अण्णांचा आपल्या जिभेवर आणि मनावर ताबा नसल्याचं हे उत्तम उदाहरण आहे. म्हणजे अण्णा बोलले ते खरं नसेल असं नव्हे, तर ते खरंही असेल; पण जननेत्याने बुध्दिबळात मात खाल्ली तर लगेच कुस्तीवर उतरायचे नसते याचीही अण्णांना पोच राहिली नाही. त्यांच्या छोटया गाठीवर आता कुणाचाच उपाय उरलेला नाही. त्यांचे आंदोलन म्हणून जे काही आहे ते आता भूताळी

जहाजासारखे भरकटत चाललेले आहे. बनेल नेते आनंदात आहेत.

पुरुषार्थ गमावलेली महाराष्ट्राची जनता दुसऱ्या अण्णांच्या शोधात स्वस्थ बसलेली आहे. जशी अण्णांअगोदर दुसऱ्या गांधींच्या शोधात बसली होती.

# तारे

# लता मंगेशकर

**मी** लता मंगेशकरना प्रत्यक्ष ओळखत नाही. त्यांच्याबद्दल सांगण्यासारखे व्यक्तिगत किस्से माझ्याकडे नाहीत. मी त्यांना फोन केल्यावर त्या पलीकडून किणी किणी आवाजात बोलत नाहीत. कारण मी त्यांना मुळात कधी फोनच केलेला नाही आणि केला तरी त्या स्वतः फोनवर याव्यात असं काहीही कर्तृत्व मी केलेलं नाही. माझ्या वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे चोवीस वर्षापूर्वी पहिल्यांदा मी लताजींचं गाणं ऐकलं. मी तेव्हा माझ्या आजीकडे राहत असे. कोकणात तिच्या कुशीत मी झोपत असे. माझ्या आजींच्या

उशाशी कायम ट्रान्झिस्टर असे. तेव्हा कोकणातल्या आमच्या त्या वाडवडिलांनी बांधलेल्या प्रचंड वाडयात इलेक्ट्रीसिटी आलेली नव्हती. त्यामुळे वाडयाची गूढता तशीच कायम होती. वाडयाचं नाव ‘ मथुरा निवास.’ आजी तिन्हीसांजेला अनेक गोष्टी सांगत असे. मथुरा निवासमधलं ‘ मथुरा ’ हे नाव माझ्या पणजांच्या बहिणीचं. आजीच्या गोर्ष्टींपैकी काही गोष्टी पूर्वजांच्या असत. काही देवांच्या आणि बऱ्याचश्या भुतांच्या गोष्टीत मला भारी रस असे. कारण आजी बरोबर असली की भुतांची मला भीती वाटत नसे. अशाच एका भुतांच्या गोष्टी ऐकून उरलेल्या रात्री मी झोपेची आराधना करीत होतो. अशा रात्री मी पहिल्यांदा ‘ आयेगा, आयेगा, आयेगा आनेवाला ’ हे गाणं ऐकलं. ते गाणं म्हणजे अक्षरशः चेटूक होतं. मी आख्खी रात्र भुताच्या वाडयात झोपलोय आणि हा चेटूक करणारा आवाज माझा पाठलाग करतोय असं मला वाटत होतं. त्या वेळी मी ‘ महल ’ पिक्चर पाहिला नव्हता. माझं वयही काही तो पिक्चर पाहून कळण्याचं नव्हतं. त्या चित्रपटाचा गूढाशी काही संबंध आहे हेसुध्दा तेव्हा मला माहित नव्हतं; पण त्या रात्री त्या ‘ आयेगा, आयेगा ’ च्या आवाजाने माझ्या कण्यातलं काही तरी कंप पावलं. बहुधा तो आदिबंध होता ! नंतर माझा पिच्छा कधीच ‘ त्या ’ आवाजाने सोडला नाही.

मुळात लता मंगेशकर या गायिका आहेत आणि त्या गातात हे मला कळलं तेराव्या वर्षी. आमच्या आख्ख्या घराण्यात गाण्यांशी कुणाचा काहीही संबंध आला नाही. अगदी वाद्यांचासुध्दा नाही. आज जर सज्जाद हुसेन हयात असते तर मला तत्काळ गोळी घालून मारण्याचा त्यांनी हुकूम दिली असता. मीही तो तत्काळ माना असता. कारण तेच सज्जाद हुसेन म्हणाले होते, ‘ लता गाती है, बाकी सब रोती है !’ मी या विधानाशी पूर्णतः सहमत आहे. अपवाद फक्त (त्यांच्याविषयी व त्यांच्या माझ्या सांगीतिक संबंधाविषयी नंतर कधी तरी !) आशाजी. गेली वीस वर्षे मी लताजींची मराठी आणि हिंदी असंख्य गाणी अक्षरशः पारायणासारखी ऐकलीत. वयाच्या नवव्या वर्षी एक अलौकिक अनुभव देणाऱ्या त्या आवाजाला पुनःपुन्हा संशयाने ऐकलंय. एखादा ऑबसेसिव्ह कंपल्सिव्ह न्यूरोसिस झालेला माणूस घराचं कुलूप नीट लावलंय ना हे पुनःपुन्हा ओढून पाहून खात्री करतो तसं माझं अनेकदा झालंय...

शुध्द आवाजातून अचूक अनुभूती देण्याची क्षमता फक्त लताजींचीच आहे हा माझा विश्वास मी पुनःपुन्हा पारखून घेतलेला आहे. ‘ लेकीन ’ चित्रपट

आला तेव्हाची गोष्ट. मी ‘ इकॉस ’ चित्रपटगृहावरुन अनेकदा गेलो; पण रिलीज झालेला ‘ लेकीन ’ मी आधी अजिबात पाहिला नाही. आधी डोळे बंद करुन लताजींचा आवाज त्या चित्रपटासंबंधी काय सांगतो ते मी पाहतो. नंतरच ते चित्रपट पाहतो. ‘ लेकीन ’ च्या वेळी राजस्थानातील मरुस्थल अक्षरशः डोळयासमोर उभे राहिले. शरीरातून सुटा झालेल्या आत्म्याचा आवाज किती सूक्ष्म आणि किती तरल असायला पाहिजे तेवढा सूक्ष्म आणि तरल आवाज फक्त लताजीच काढू शकतात. भर प्रेमात पडलेल्या व्यक्तीचा आवाज हा तिच्या आत्म्याचा आवाज असतो. तो शरीरापासून विलग होतो आणि तो क्षण लताजी कमालीच्या अचूकतेने आणि संयतपणे पकडतात. हे शक्य होण्याकरिता त्या व्यक्तीचा आत्मा कमालीचा योगी हवा अन् गळा कमालीचा भोगी हवा !लताजींच्या बाबतीत हे पूर्णत्व साकार झालेलं आहे.

मोठमोठया पंडितांनी आणि गाण्यातल्या दिग्गजांनी त्यांच्या त्यांच्या परीने लताजी किती थोर गायिका आहेत ते सांगितले आहे. बडे गुलाम अली खां साहेब ज्यांच्या नुसत्या नाम उच्चारणाबरोबर कानाच्या पाळीला हात आपोआप लागतात, त्यांनी लताजींच्या बाबतीत ‘ कंबख्त गलती से भी कभी बेसुरा नहीं गाती ’ असं म्हटलं होतं; दिग्गजांच्या पलीकडेही मला एक अनुभव लताजींच्या बाबतीत फार फार बोलका वाटतो. पाच-सहा वर्षांपूर्वी ऊसतोड कामगारांच्या सामाजिक आणि राजकीय प्रश्नांबाबत मी अभ्यास करीत होतो. त्या काळात सगळं फील्डवर्क आटोपून मध्यरात्रीपर्यंत ऊसतोड कामगारांच्या खोप्यांमधून मी हॉटेलवर जायचो. तेव्हा कुठल्या तरी एका खोपीतून लताजींच्या आवाजाची लकेर ऐकू यायची. नीरव निराश वातावरणात ती लकेर सगळा शीण नष्ट करायची. केवळ माझाच शीण नष्ट करायची असं नव्हे, तर त्या खोपीतल्याही कुणाचा तरी शीण नष्ट करायची. षड्ज गांधार म्हणजे काय हे त्या खोपीतल्याला कळत नसेल, तरीही त्या दैवी सुरेल आवाजाने अभिजात संगीत कळत नाही, म्हणून त्या पिचलेल्या माणसाकडे इतर भारदस्त गायकांप्रमाणे तुच्छतेने पाहिलं नाही. उलट करुणेने त्याच्या आयुष्यातल्या दुःखावर मलमपट्टी केली आपल्या दैवी सूरयोजनेद्वारा. लताजी मोठया ठरल्या त्या त्यांच्यातल्या जिनियसपणामुळे; पण त्या सर्वश्रेष्ठ ठरल्या त्या याच गुणांमुळे. इतर अनेक संगीतातले दिग्गज तत्वचिंतकाच्या भूमिकेतून गात असताना त्या मदर

तेरेसांप्रमाणे घराघरात करुणा, प्रेम, जीवन घेऊन गेल्या. अनेकांच्या आयुष्यातल्या अनेक एकाकीविरुध्द क्षणांना

लताजींच्या आवाजाने साथ दिलेली आहे. त्यामुळेच लताजींच्या ऋणातून आपल्यापैकी कुणीच बाहेर येऊ शकणार नाही.

लताजी पहिलं हिंदी गाणं मराठी चित्रपटातलं गायल्या होत्या. त्या गाण्याचे बोल होते, ‘ माता एक सपूत की दुनिया बदल दे तू ’ जे नंतर अनेकांची आयुष्य उजळवताना त्यांनी खरे केले. लताजींचा पहिला हिंदी चित्रपट होता, ‘ आपकी सेवा में ’ हेही पुढे अर्थपूर्णच झालं.... अर्थात अशी अर्थपूर्णता शोधण्याची त्यांच्याबाबत गरजच नाही. त्या कुणाशी चांगल्या वागल्या, कुणाच्या दुःखांशी किती समरस झाल्या हे सारे त्यांच्या एक आवाजापुढे फिजूल आहे. त्यांच्या बाबतीत मला त्यांच्या वागण्याचं एकदाच निराशाजनक आश्चर्य वाटलं होतं, जेव्हा त्या अटलबिहारी वाजपेयींच्या कविता गायल्या होत्या. कारण त्या कविता नव्हत्या. एका कविहृदयाच्या माणसाने केलेलं तेलेखन होतं. वायपेयी कविहृदयाचे असतील; पण ते चांगले कवी नाहीत हे शेकडो सिध्दहस्त कविता गायलेल्या लताजींन कळलं नसेल ? कळलं असेल तरी आपल्या अद्वितीय दैवी कारकिर्दीला दृष्ट लागू नये म्हणून त्यांनी ती तीट लावली असेल, असं समजून मी पुन्हा त्या दैवी आवाजाबरोबर भिरभिरत गेलो....

# अमिताभ

**प**रवा संसदेच्या दरवाजावर शेकडो छायाचित्रकारांनी वेढलेल्या अमिताभ बच्चन यांना पाहिलं तेव्हा वाटलं, अरेच्चा !या माणसाची जागा इथे नव्हती. सत्तरच्या दशकात जेव्हा डोळयांत आग घेऊन तरुणांच्या मनात आग पेटवत अमिताभ पडद्यावर अवतरत असे, तेव्हा अनेकांना अमिताभ म्हणजे सर्व संसदीय दु:खांवरचा अक्सीर इलाज वाटत असे.

जंगलात वाघ हा जंगलात असताना क्वचितच दृष्टोत्पत्तीस पडतो; पण त्याच्या थरकाप उडवणाऱ्या कहाण्या ऐकू

येतात. मग मधूनच तो सदेह समोर अवतीर्ण होतो. तेव्हा आपण नतमस्तक असतो. मग तो पुन्हा अदृश्य होतो ते थेट पुन्हा अवतीर्ण होईस्तोवर. मग पुन्हा त्याच्या कहाण्या, त्याची मिथकं आपल्यापर्यंत येत राहतात.

अमिताभचे डोळे पडद्यावर आग ओकत त्या काळात बराच काळ तो पत्रकारांशी बोलत नसे. त्याच्या बंगल्यासमोर तोबा गर्दी असे; फार थोडया भाग्यवंतांना तो दिसे. त्याच्याबद्दल, त्याच्या येणाऱ्या चित्रपटांबद्दल असंख्य खऱ्या खोटया कहाण्या पसरलेल्या असत.

हा सगळा भूतकाळ झाला.

यातलं तसं बाहेरुन बघता फार थोडं बदललंय. अजून त्याला बघायला गर्दी जमते. अजूनही त्याच्याबद्दलच्या बातम्या पसरतात. त्याच्या येणाऱ्या पिक्चरबद्दल खूप लिहिलं जातं; पण ते ते नाहीए.

जंगलातला वाघ पिंजऱ्यात आल्यावर तर जगलातल्यापेक्षा जास्त गर्दी लोटते; पण मुख्य फरक असतोच. पूर्वी त्याच्या न दिसण्याचे जे साध्य होऊ शकतं, ते आता त्याच्या दिण्यानेही होत नाही.

हे मी केवळ अमिताभ बच्चन नावाच्या अभिनेत्याबद्दल लिहित नाहीए. अमिताभने तेव्हा जे साध्य केलं ते सर्व त्याच्या अभिनयक्षमतेनेच; पण अमिताभयुग असं ज्याला म्हणतात ते केवळ त्याचीच करामत नव्हे. लोकांचा त्यातला सहभाग ही एक मोठी गोष्ट होती.

मुंबईतल्या अत्यंत मोक्याच्या ठिकाणचं राजेश खन्नाचं पोस्टर उतरवताना व तिथे अमिताभ बच्चनचं पोस्टर चढवताना मराठी लेखक भाऊ पाध्येंनी पाहयलं तेव्हा ते म्हणाले होते, ‘ अरे, हे बघा काय घडतंय ? ’ भविष्यात आपली चुणूक कुणाला, कधी आणि कशी देईल हे सांगता येत नाही.

स्वातंत्र्यानंतरचा रोमॅंटिक काळ राजेश खन्नासोबत संपला. राजेश खन्ना हा शेवटचा रोमॅंटिक महानायक. हिंदी चित्रपटांचा फार बारकाईने अभ्यास करणाऱ्याच्या हे लक्षात येईल की हिंदी चित्रपट हे खरोखरच हिंदुस्थानी समाजाचे आरसे आहेत. तत्कालीन सामाजिक परिस्थितीबाबत हिंदी चित्रपटांनी अचूक भाष्य केलेलं आहे.

रोमॅंटिक युगाचा अस्त हाच व्यवस्थाविरोधी बंडाचा झेंडा फडवणाऱ्या युगाची सुरुवात होती.

ही व्यवस्था आपल्याला काही देऊ शकत नाही. तेव्हा तातडीने ही व्यवस्था उलथून टाकली पाहिले असं ऐलान करणाऱ्यांचा अमिताभ हा ब्रॅंड ॲंबॅसिडर ठरला. हिंदुस्थानी जनता ही पराकोटीची व्यक्तिपूजक आहे. अमिताभचा तिने अक्षरशः देव बनवला.

अमिताभ बच्चनला कुली पिक्चरच्या सेटवर पोटात लागलं आणि तो

अत्यवस्थ झाला, तेव्हा संपूर्ण देशच अत्यवस्थ झाला होता.

अमिताभ बच्चन स्वतः राजकारणात येणाचा काळ आणि लोकांची बंडांची स्वप्नं विरहायची सुरुवात एकाच वेळी सुरु झाली. एकोणीसशे पंच्याऐंशी साली राजीव गांधीनी ' आय ॲम यंग, आय टु हॅव अ ड्रीम ' चा नारा दिला. अमिताभ बच्चन तेव्हाच अलाहाबादमधून हेमवतीनंदन बहुगुणांना पराभूत करुन निवडून आले. त्या वेळीच एक बंड संपलं होतं.

पुढे अनेक गोष्टी घडत गेल्या. बोफार्स प्रकरणात अमिताभ बच्चन यांचं नाव गोवलं गेलं. नंतर एबीसीएल आली. तीही नंतर दिवाळयात गेली.

बोफोर्सचं पुढे काहीच झालं नाही. एबीसीएलही पुन्हा सुरु होतेय. अमिताभही या साऱ्या संकटातून सहीसलामत बाहेर आलाय; पण पूर्णपणे बदलून. जसा त्याच्या भोवतीचा समाजही बदललाय.

आता आपल्या अवतीभवती कुणालाच कसलंच बंड वगैरे करायचं नाहीए. प्रत्येकजण आत्मकेंद्रित होण्याचा प्रयत्नात आहे. प्रत्येकाने स्वतःच कोश निर्माण केलाय. डाव्या-उजव्या सगळया चळवळी कायमच्याच थंडावल्यात. खुर्चीला लाथ मारुन ' ये कुर्सी तेरे बाप की नही ' असं सांगण्याऐवजी त्या खुर्चीचा साफसूफ करुन सांभाळून ठेवण्याची वृत्ती पूर्णत्वाला पोहोचलीय.

राजीव गांधी गेले तेव्हा त्यांना अग्नी देण्यासाठी राहुलसोबत अमिताभ होता. आता कॉंग्रेस पार्टीतर्फे अमिताभ बच्चन पंतप्रधान होणार अशी अफवा तेव्हा दिल्लीत जोरात होती.

मग पुढे सर्वांचे सगळेच रस्ते बदलले. अमिताभ बच्चननी मुलायमसिंगना ' पिताजी ' आणि ' नेताजी ' म्हणायला सुरुवात केली. अमरसिंह हे मित्रबंधू म्हणून अमिताभ बच्चनसोबत दिसू लागले.

माज बंड आणि लढयाने प्रश्न सोडवण्याऐवजी ' नेटवर्किंग ', ' लॉबिंग ', ' ओळख ', ' पहुॅंच ' वगैरे गोष्टींवर श्रध्दा ठेवू लागला.

अमिताभनंतर समाजाने महानायकत्व कुणालाच बहाल केलं नाही. ते पदच संपुष्टात आलं !

आग ओकणारी आत्मिक प्रेरणा आणि नैतिक बळ यांची जागा खुंटीवर गेली. समाजाला या गोष्टी बिनमहत्वाच्या वाटू लागल्या.

अशातच जया बच्चन समाजवादी पक्षाच्या राज्यसभेच्या खासदार म्हणून शपथ घ्यायला गेल्या आणि सोबत पाहुणा म्हणून अमिताभ ! तिथेही बघायला खूप गर्दी झाली.

ती गर्दीही त्याच्यासारखीच होती. बदललेली !

# सचिन तेंडुलकर

**मी** क्रिकेटचा फारसा चाहता नाही. मी हिंदुस्थान-पाकिस्तान मॅचसुध्दा कधी पहात नाही. इतर मॅचसबाबत तर दूरच; पण याचं कारण केवळ क्रिकेट आहे असं नाही, तर सचिन तेंडुलकर ही लोकांची मानसिकता ओळखण्याची एक कसोटी आहे असे मला वाटतं.

सचिन तेंडुलकर आज इतकी वर्षे खेळतोय. त्याने नवनवीन विक्रम प्रस्थापित केलेले आहेत. त्याने असंख्य प्रेक्षकांना आपल्या खेळाचा आनंद दिलेला आहे.

मध्यमवर्गीय माणसापासून ते देशातल्या एका श्रीमंत माणसापर्यंतची त्याची वाटचाल आपण सर्वांनी पाहिलेली आहे. या साऱ्या प्रवासात काही अनुत्तरीत प्रश्न उरलेले आहेत. सर्वोत्कृष्टता हा निकष मानला तर सचिन सर्वोत्कृष्ट खेळाडू आहे. कोणत्याही एका ऑस्ट्रेलियन खेळाडूपेक्षा तो भारी आहे; परंतु त्यामुळे आपली टीम बलवान झालीय असं फार थोडया वेळेला झालंय. तरीही संपूर्ण समाजाला या सर्वोत्कृष्ट खेळाडूंच्या 'हीरोवर्शिष ' मध्ये राहण्यात आनंद होतो. क्रिकेट हा अकरा जणांचा मिळून खेळला जाणारा खेळ मानायचा की टेनिस किंवा बुध्दिबळासारख्या खेळांप्रमाणे एकांडया खेळाडूच्या सर्वोत्कृष्टेचा खेळ मानायचा, हा प्रश्न कधी नव्हे एवढया सचिनने ऐरणीवर आणला; पण याचा अर्थ सचिन स्वतःकरिता खेळतो हे मी मानणार नाही. कारण तसे मानण्यात एक मोठा पेच आहे. तो म्हणजे, कोणताही सर्वोत्कृष्ट आविष्कार घडवणारा माणूस तो आविष्कार स्वतःकरताच घडवतो. सभोवतालची यंत्रणा इतकी बलवान असायला हवी की त्याचा सर्वोत्कृष्टतेचा उपयोग संघ, समाज आणि देशाला होईल. आपल्याकडे क्रिकेटची आणि क्रिकेट कंट्रोल बोर्डाची यंत्रणा इतकी आत्मकेंद्री आणि राजकारणाने पोखरलेली आहे की सचिनसारख्या अद्वितीय खेळाडूच्या खेळाचा देशासाठी वापर करणारी टीम उभी करताच आलेली नाहीय. त्याचा सचिनच्या खेळाशी काही थेट संबंध आहे असं नाही; पण यातला खरा मुद्दा पुढेच आहे. तो मुद्दा आहे लोकांच्या मानसिकतेचा, आपल्याला हीरो आवडतात. आपल्या सर्व व्यवस्थांमध्ये ते निर्माण व्हावे असं आपल्याला वाटतं. खैरनार निर्माण झाल्यने मुंबई महानगरपालिका सुधारत नाही. वाय.पी.सिंग निर्माण झाल्याने पोलीस खाते सुधारत नाही. या 'हिरो ' चा अर्थ काय, याचा विचार आपण कधीच करत नाही. राजकारणातदेखील आपले हीरो निर्माण होतच असतात पण व्यवस्था बदलण्याची क्षमता त्यांच्यामध्ये नसते. सचिन तेंडुलकर निर्माण झाल्याने हिंदुस्थानी क्रिकेटचं नष्टचर्य संपलं असं होत नाही. मागच्या वर्ल्डकप स्पर्धेत हिंदुस्थान-पाकिस्तान सामन्यात सचिन तेंडुलकरने वादळी खेळ करुन तो सामना एकहाती जिंकून दिला; पण त्यामुळे हिंदुस्थान संघाचं मनोबल वाढलं आणि हिंदुस्थानने वर्ल्डकप जिंकला असं काही झालं नाही. आपण सर्वजण एका सुपरमॅनच्या किंवा एका प्रेषिताच्या प्रतीक्षेत आहोत. क्रिकेटच्या ग्राऊंडवर आपला सुपरमॅन किंवा प्रेषित सचिन तेंडुलकर असतो. त्याचे प्रयत्नही कमी पडतात आणि मग आपण त्याला दोष देतो. आपल्याला हे कधीच कळत नाही की कोणताही प्रेषित किंवा महामानव आपल्याला वाचवू शकरणार नाही.

अख्खी टीम बलवान झाली तरच ते शक्य आहे. सचिनचं प्रत्येक अपयश हेच दाखवतं. पण आपण त्यातून काहीच शिकत नाही.

मध्यंतरी ऑस्ट्रेलियन टीममधल्या ' रिकी पॉण्टिंग ' ची मुलाखत ऐकण्याचा योग आला. रिकी पॉण्टिंगला मुलाखतकर्त्याने प्रश्न विचारला की, " तुझ्या नावावर असा कोणताच असाधारण विक्रम नाही किंवा विक्रमांच्या पुस्तकात तुझं नाव वारंवार येत नाही ? " त्यावर  रिकी पॉण्टिंगचं उत्तर फारच मार्मिक होतं. ते ऐकणारा माणून जर हिंदुस्थानी असेल आणि सचिनभक्त असले तर तो खाली पडेलच. प्रश्न शांतपणे ऐकून रिकी पॉण्टिंग फक्त एवढंच म्हणला, " आम्ही जिंकतो. "

२४ एप्रिल, १९७३ रोजी जन्माला आलेल्या सचिन रमेश तेंडुलकर नावाच्या पाच फूट चार इंच उंचीच्या एका माणसामध्ये आपली एवढी स्वप्नं गुंतलेली आहेत की त्याचे वडील हे त्याच्याहून खूप विद्वान होते यावर आपण विश्वास ठेवत नाही. प्रा.रमेश तेंडुलकरांना मी सचिनचं नाव खूप गाजायला लागल्यावरही अनेकदा भेटलो होतो. त्यांच्या बोलण्यात क्रिकेटचा विषय फारसार यायचा नाही. त्यांना सचिनचा सार्थ अभिमान होता; पण आवडीचा विषय होता साहित्य. मुख्य म्हणजे कविता. त्यांनी हयातीतच आपला मुलगा देव होताना पाहयला. ' टाइम ' मासिकाचं मुखपृष्ठ सचिनमय होतं. तेसुध्दा त्यांनी पाहयलं होतं. " क्रिकेट हा आमचा धर्म आहे. सचिन हा आमचा देव आहे. " असे शर्ट घालून फिरणाऱ्या तरुणांविषयी त्यांना काय वाटतं ? असा प्रश्न त्यांना मला करायचा होता. ते राहूनच गेलं.

आज सचिन तेंडुलकरचा थरारक खेळ संपल्याच्या बातम्या आणि विश्लेषणं प्रसिध्द होताहेत. शिवाय त्याला ' देव ' मानणाऱ्या मंडळींकडूनच तो स्टीव वॉप्रमाणे सामाजिक कार्यात भाग घेत नाही किंवा सामाजिक कार्याला मदतही करीत नाही असं पसरवलं जातं. हीच अपेक्षा आपण सचिनपेक्षा कित्येकपट जास्त श्रीमंत असणाऱ्या विजय मल्ल्यांकडून फारशी करत नाही असं का ? आपला ' देव ' आपल्याला हवं तसंच वागला पाहिले अशी आपली अपेक्षा करुन आपण त्याच्यावर अन्यायच करीत नाही का ? सचिनसारख्या माणसाने सामाजिक कार्यांना मदत करणं चांगलंच; परंतु त्याने तशी मदत केली नाही तर त्याला कृतघ्न वगैरे ठरवणं ही विकृतीच आहे. जर त्याला आयुष्यात असं वैभव मिळालं नसतं तर काय त्याला समाज मदत करणार होता ? ते वैभव त्याने स्वकर्तृत्वाने मिळवलेलं आहे. त्यामुळे त्याचा विनियोगाचं स्वातंत्र्यही त्यालाच

असलं पाहिले. त्याबाबत आपल्याला इच्छा करण्याचं स्वातंत्र्याही असता कामा नये; पण ही विकृती मुळात सचिनला देव आणि क्रिकेटला धर्म मानण्यातून निर्माण झालेली आहे.

सचिनच्या खेळाबाबत आता विस्डेनच्या मते त्याच्या खेळातला थरार संपलेला आहे. आयुष्यभर वागवलेल्या अपेक्षांचं ओझं सचिनच्या देहबोलीत आणि खेळातही दिसायला लागलंय. एका बाबतीत तो खराखुरा मराठी राहयला. त्याला देशाचं यशस्वी नेत्वृत्व करता आलं नाही. उलट असं नेतृत्व करण्याच्या कल्पनेचं ओझं त्याच्या खेळावर आलं. तो नाद त्यानं मराठीपणे सोडून दिला.

समस्यांनी गांजलेल्या आयुष्यातली उत्तरं सचिनच्या खेळातल्य प्रतिभेमध्ये पाहणाऱ्यां या अतिभ्रामक समाजाकडे खुद्द सचिन कसा पाहत असेल ? करीयरच्या उत्तरार्धात तरी त्याला असे प्रश्न पडत असतील काय ? मुळात सिचन समाजाबद्दल विचार करत असेल काय ?

# शाहरुख खान

**का**ही दिवसांपूर्वी वांद्रयाला समुद्रकिनाऱ्यावरुन जाताना एके ठिकाणी खूप गर्दी जमा झालेली दिसली. समोर शाहरुख खानचा ‘ मन्नत ’ बंगला होता. आपल्या देशात फिल्मस्टार्सना देवांएवढी लोकप्रियता लाभते. त्यामुळे ज्या राजकीय नेत्यांना गर्दी जमवता येत नाही किंवा ज्या राजकीय पक्षांना लोकप्रिय आहोत वा नाही याबद्दल शंका असते, त्यांना फिल्मस्टार्सची गरज पडतेच. शाहरुख खानच्या बंगल्यासमोरची गर्दी पाहून मला पुढे ही गर्दी त्याच्या ‘ राजकीय ’ भाषणासाठी कधी हजर होते,

याचं कुतूहल निर्माण झालं. तूर्तास शाहरुख खान रोजच आपण राजकारणात जाणार नाही असं उच्चरवाने सांगतो आहे;  परंतु सार्वजनिक जीवनात असलेले पंच्याहत्तर टक्के खोटं बोलतात, असा आपला अलिकडचा अनुभव आहे. त्यामुळे शाहरुखच्या या विधानांवर फार विश्वास ठेवण्याची गरज नाही. प्रियांका आणि राहुलच्या जवळचा म्हणून शाहरुखची प्रतिमाही भविष्यातल्या काही घटनांची नादी नसेलच असं नाही; परंतु या साऱ्या नंतरच्या गोष्टी झाल्या. आज शाहरुख खान हिंदी चित्रपटसृष्टीचा सुपरस्टार आहे ही वस्तुस्थिती आहे.

हिंदी चित्रपटसृष्टीत स्टार्सपुत्रांची मोठी चलती आहे. अभिषेक बच्चनपासून संजय दत्तपर्यंत अनेकजण त्यात येतात; परंतु हिंदी चित्रपटाचे मागचे तिन्ही सुपरस्टार्स (किंबहूना सर्वच सुपरस्टार्स) हे पहिल्या पिढीतले स्ट्रगलर्स होते. राजेश खन्ना, अमिताभ बच्चन आणि आता शाहरुख खान ही उदाहरणे हे दाखविण्यासाठी पुरेशी आहेत. स्टार्सपुत्र स्टार्स होत असतील भले; पण सुपरस्टार्स हा स्ट्रगल करुनच होतो हा हिंदी चित्रपटांचा आजवरचा इतिहास आहे. शाहरुख खानने पुन्हा एकदा त्यावर शिक्कामोर्तब केलं. दिल्लीहून आलेला सीरियलमध्ये भूमिका करणारा एक स्ट्रगलर यापेक्षा वेगळी काही त्याची ओळख नव्हती. फार मोठया ओळखी किंवा वशिलाही त्याच्यापाशी नव्हता. आईवडिलांचं छत्रही नव्हतं. अशा परिस्थितीत त्याने पंधरा वर्षात हा हा म्हणता स्वतःच्या करिष्म्याचं मायाजाल देशात आणि देशाबाहेर त्याने पोचवलंन. आज शाहरुख खानच्या बंगल्याबाहेर उभ्या असणाऱ्यांची गर्दी पाहताना आणि त्यासमोरचा खवळलेला समुद्र पाहताना या साऱ्या गोष्टी माझ्या मनात झरझर येऊन गेल्या. शाहरुख खान हे आपलं मायाजाल पसरवण्यात का यशस्वी झाला ? अशी कोणती गोष्ट त्याच्यापाशी होती जी इतरांपाशी नव्हती ?

शाहरुख खानच्या अगोदर सुपरस्टार होते अमिताभ बच्चन. त्यांच्या सुपरस्टारपदापर्यंत पोहोचण्यात त्या काळची परिस्थिती खूपच जबाबदारी होती. संपूर्ण देश त्या काळात असंतोषाने खदखदत होता. तरुणवर्ग प्रचंड स्फोटक बनलेला होता; परंतु व्यक्त करायला माध्यमांची संख्या मोठी नव्हती. व्यक्त होण्याचे जे मार्ग होते ते सारे राजकीय होते. त्या मार्गांची मर्यादा होती. त्या मार्गांना वास्तवाची चौकट होती. त्यामुळे बंडखोरीच्या स्वप्नमय जगात नेणाऱ्या अमिताभच्या प्रतिमेने मग संपूर्ण देशाला वेड लावलं शाहरुखच्या

उदयाच्या काळात अशी कोणतीही परिस्थिती नव्हती. सर्व बंडं ही मनातच विरुन फाटून गेलेली होती. शाहरुखला सलीम-जावेदसारखे तडाखेबंद संवादही मिळत नव्हते. तरीपण शाहरुख तिथपर्यंत पोहोचला याचं कारण बदललेल्या त्याच्या व्यावसायिकतेत आणि अफाट मेहनतीत जसं आहे, तसंच ते कारण आत्मकेंद्री, व्यक्तिवादी आणि महत्वाकांक्षी माणसाला प्रचंड ऊर्जा जाळत राहावी लागते. थकवा आणणारी आणि निराशेच्या गर्तेत ढकलू शकरणारी मेहनत केल्यावरही आयुष्याचा भोग घेण्याचं चिरतारुण्य टिकून राहावं अशी ययातीसारखी इच्छा ही आधुनिक हिंदुस्थानीची ठळक खूण आहे. ती खूण स्वप्नमयपणे शाहरुखमध्ये दिसते. शाहरुखची जी एक सर्वव्यापी प्रतिमा आहे ती कोणतीही बंडखोरी करणारी नाही. कोणत्याही प्रकारचा सामाजिक संदेश देणारी नाही तर अमर्याद ऊर्जा असणाऱ्या आत्मकेंद्रित माणसाची ती प्रतिमा आहे आणि आपल्याला आज नेमकं तेच व्हायचं आहे.

शाहरुख खानच्या पडद्यावरच्या प्रतिमेत त्याच्या अमर्याद वाटणाऱ्या अशा ऊर्जेचा मोठा भाग असतो. आज उदारीकरण आणि जागतिकीकरणानंतरच्या समाजामध्ये या ऊर्जेचाच पूर्णतः अभाव आहे आणि पडद्यावरच्या आपल्या सुपरस्टारमध्ये तेच गुण असावे लागतात. जे आपल्या आयुष्यात हवे असे आपल्याला वाटते; त्याचा आपल्या आयुष्यात खूप अभाव असतो. अमिताभच्या स्टारपदातही तेच गुण होते. ज्यांची समाजाला गरज होती; पण अभाव होता. शाहरुखच्या बाबतीतही ते खरे आहे.

मात्र अमिताभ आणि शाहरुखमध्ये एक मोठा फरक आहे. अमिताभने त्याच्या कारकीर्दीत कधी प्रतिमा मोडणारे धोकादायक प्रयोग केले नाहीत. शाहरुखने मात्र ' बाजीगर ', ' डर ' सारख्या चित्रपटांत बेधडकपणे नकारात्मक नायकाचे रोल केले. त्यामुळे त्याच्यावरचे प्रेक्षकांचे प्रेम कमी न होता उलट वाढलेच. अमिताभ, एकदा नायक आणि मग महानायक बनल्यावर ' ॲंग्री यंग मॅन ' या त्याच्या इमेजमधून बाहेर येण्याच्या फंदात कधी पडला नाही. शाहरुखने ' डर ' चित्रपटात जी भूमिका केली होती ती करण्याची कल्पनाही अमिताभला त्याच्या तारुण्यात करता आली नसती. हा जसा या दोन व्यक्तींमधला फारक आहे तसाच बदललेल्या काळाचाही भाग त्यात मोठा आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी नकारात्मक आणि खुनशी होणारा महानायकही समाजाला आवडू लागला आहे. असा या प्रवासाचा अर्थ. चित्रपटांच्या महानायकाची प्रतिमा ही समाजाची

मूल्यव्यवस्था नेहमीच अधोरेखित करीत असतात. आपण फक्त त्याची दखल घेतो अथवा नाही हा खरा प्रश्न असतो.

हृतिक रोशनच्या आगमनाने जी धूम उडाली होती तेव्हा भिजलेल्या कबुतराप्रमाणे असुरक्षित झालेला शाहरुख खान आठवतोय ? ज्या प्रक्रियेतून तुम्ही यशापर्यंत पोहोचता त्या प्रक्रियेपेक्षा यशच जास्त आनंददायक वाटणाऱ्या समाजाचा तो सार्थ प्रतिनिधी होता. तेव्हा असा समाज जे काही करतो ते उथळ आणि सवंग असतं. देशभक्तीसुध्दा !

शाहरुखच्या ‘ फिर भी दिल है हिंदुस्थानी ’ किंवा परदेशस्थ हिंदुस्थानींमध्ये लोकप्रिय असणाऱ्या चित्रपटातली तिरंगा वगैरे लहरणारी देशभक्ती म्हणूनच पपलू आणि उथळ असते. ज्या देशभक्तीमुळे ‘ नॉन रेसिडन्ट इंडियन ’ भारावून वगैरे जातात, तीच आपली खरी प्रतिमा आहे. शाहरुख खान त्याचा प्रतिनिधी आहे. म्हणूनच तो सुपरस्टार आहे. आपण बदललो की तो जाईल अन् आणखी कुणीतरी येईल; पण त्याचा बंगला जिथे बनेल तिथे गर्दी करण्याची आपण आतापास्नं तयारी ठेवली पाहिले. काय ?

## भैरवी

## नादिरा

**ना**दिरा गेली. सुटली. तेव्हा तिचं वय ७३ होतं. संपूर्ण आयुष्यात तिला न्याय मिळाला नाही. ‘ सागर ’ चित्रपटात कमल हसनच्या प्रेमभंगाला मूकपणे साक्षी राहून त्याचं ते दुःख हलकं करण्याला मदत करणारी नादिरा आठवत राहते, कारण तिला न्याय देणारी तीच एक खरी भूमिका. तिचं माणूसपण व्यक्त करण्याची संधीच तिला रुपेरी पडद्याने फार कमी दिली. सिगारेट ओढणारी, भुवया वाकडया करुन कठोर चेहऱ्याने व्यवहारवाद बोलणारी नादिरा ही खरी नादिरा नव्हती. तिच्या आत एक सल होती. त्याबाबत जगाला काहीही

पर्वा नाही याने ती सल अधिकच रक्तबंबाळ होत होती. 'आय ॲम द लोन्जीएस्ट पर्सन इन द सिटी ' असे उद्‌गार तिने दक्षिण मुंबईतल्या स्वतःच्या घरातल्या गादीवर झोपून काढले होते. तिला त्या गादीवरुन उठता येत नसे. त्या गादीवरुन ती समोरच्या भिंतीवरचे आपलेच अनेक सुपरस्टार्ससोबतचे फोटो पाहत राही. आपल्या पन्नास वर्षाच्या कारकीर्दीमध्ये मिळवलेली अनेक पदके, बक्षिसेसुध्दा तिने गादीवरुन पडल्या पडल्या दिसतील अशा बेताने रचून ठेवलेली होती. ती पदकं, ती बक्षिसं, ते सुपरस्टार्स यांच्यापैकी काही काही म्हणून आता तिच्या सोबतीला राहिलेलं नव्हतं. सोबतीला होते ते टी.बी., हृदयविकार, लकवा यासारखे दुर्धर रोग.

खरं तर नादिरा ही असाधारण गुणवत्तेची नटी होती. नट-नटयांमध्ये अभावानेच आढळणारं साहस तिच्या अंगात होतं. ती एकाकी अवस्थेत गेली तेव्हा माझ्या अनेक हिंदुत्ववादी मित्रांनी मला मुस्लिम नटयांचीच अखेर अशी का होते ? यावर विचार करायला नको का ? असा प्रश्न केला. (सुरैया, परवनी बाबी वगैरे) परंतु बऱ्याच पब्लिकला हे ठाऊक नाहीए की, नादिरा ही मुस्लिम नव्हती. नादिरा हे तिचं खरं नाव नव्हेच. तिच खरं नाव होतं फलोरेन्स इझिकेल. तिचा जन्म इस्त्रायलमधला. ती ज्यू धर्मीय होती. अर्थात् खऱ्या कलावंताला धर्म नसतो. त्यानुसार ती आपल्या सर्वांचीच आप्तेष्ट होती. १९३२ चा तिचा जन्म. तिला दोन भाऊ होते. तिचा पहिला चित्रपट ' आन '. ज्या चित्रपटात ती साक्षात दिलीपकुमारच्या समोर हिरॉईन म्हणून चमकली. त्यानंतर तिच्या आयुष्यातला सर्वात मोठा टर्निंग पॉईंट ठरला तो राज कपूरचा श्री ४२० हा चित्रपट.

श्री ४२० चित्रपटात ती सिगारेट ओढणारी पाश्चात्य धाटणीचा पेहराव करुन नकारात्मक रंग असलेल्या भूमिकेत दिसली. त्या भूमिकेचं तिने अक्षरशः सोने केले, पण तिच्या शब्दातच सांगायचं तर, त्या भूमिकेने मात्र तिच्या आयुष्याची माती केली, कारण त्या भूमिकेने ती अपार प्रसिध्द झाली, पण ती भूमिका हीच तिची ओळख बनली. इंग्रजीतून मराठीत सांगायचं तर तीच तिची ' इमेज 'बनली. आयुष्याच्या अखेरच्या पर्वात गादीवर पडल्या पडल्या ती या भूमिकेचाच मग विचार करीत राही. या भूमिकेनंतर माझ्याकडे फक्त याच प्रकारच्या भूमिका यायल्या लागल्या. त्या स्वीकाराव्या तर मी त्या इमेजच्या गर्तेत खोल खोल चालले होते. त्या नाकाराव्या तर खायचे काय ? असा पेचप्रश्न माझ्यापुढे होता. तिच्या घरातल्या त्या तिच्या गादीवर पडून तिनेच हा टप्पा या शब्दात विशद केलाय. ' श्री ४२० 'नंतर तिला आयुष्यात कधीही हिरॉइनचा

चांगला रोल मिळाला नाही. पन्नास वर्षांच्या तिच्या कारकीर्दीमध्ये तिने साठहून अधिक भूमिका केल्या; परंतु ती नायिका बनली नाही. तिला या गोष्टीचा फार पश्चात्ताप होत असे. आश्चर्य म्हणजे तिच्या गादीच्या बरोबर समोर ‘श्री ४२० ’च्या प्रीमियरच्या वेळेस राज कपूरने तिला दिलेल्या आलिंगनाचा फोटो लावलेला होता. जिथून आयुष्याच्या ओळी चुकत गेल्या, जिथून पुढचे अनेक उतारे खोडून टाकून परत लिहावेत असं वाटतंय, आयुष्याचा तोच मुखडा समोर ठेवण्यामागे तिचा काय हेतू असेल ?

तिच्यात त्या काळात नकारात्मक भूमिका करण्याचं जे साहस होतं ते केवळ असाधारण होतं. ‘लकीर की फकीर ’ असणाऱ्या हिंदी चित्रपटसृष्टीत हे साहस एका नादिरा नावाच्या स्त्रीने त्या काळात दाखवलेलं होतं. मला स्वतःला एक प्रश्न नेहमीच पडतो की व्यावहारिकदृष्टया सोडलं तर एक कलावंत म्हणून तिला नायिकेच्या भूमिका न मिळाल्याने तिचं असे काय नुकसान झालं ? नायकाच्या मागे झाडांमधून आयुष्यभर पळाल्याने किंवा खलनायकाच्या बलात्काराच्या प्रयत्नातून एकदोनदा वाचण्याने (तेही नायकामुळेच) असं तिच्या आयुष्याचं काय फारसं कल्याण होणार होतं ? अशा किती नायिका आपण पाहिल्यात ? त्यांनी कुठे आपल्या हृदयातली एक पोकळी अडवून ठेवलीय ? त्या मानाने नादिराने आपल्याला मोठी अजब भुरळ घातलेली होती. तिच्या भूमिकांतून ती नायकाच्या पौरुषाला सरळसरळ आव्हानच देत असे. ते आव्हान आपल्या पुरुषप्रधान नायकांना न पचल्याने (किंवा त्यात पराभवाची भीती वाटल्यानेच) शरणागतीचं स्तोत्र गाणाऱ्या नायिकेला तो आपलंसं करताना दिसत असे. मी माझ्यापरीने लावलेला हाच अर्थ होता. नादिराला मात्र तिचं जे झालं त्यापेक्षा तिचं जे झालं नाही ते झालं असतं तर जास्त आनंद झाला असता असं तिच्या अखेरच्या बोलण्यात पुनःपुन्हा जाणवायचं, पण हे वाटणंसुध्दा अस्सल कलावंताचं लक्षण आहे. आपल्याला जी भूमिका मिळाली त्यापेक्षा आपल्या सहकलाकाराच्या वाटयाला अधिक अस्सल काहीतरी आलेलं आहे असं वाटून असुरक्षित वाटणं हा अस्स कलावंतांच्या फडफडणाऱ्या मनाचाच खेळ आहे; परंतु आयुष्यातल्या एकाकीपणामुळे दक्षिण मुंबईतल्या तिच्या घरात भरुन राहिलेलं दुःख आणि व्याकुळता मात्र अस्सल होती. जगातल्या सर्व दुःखांमध्ये वरच्या प्रतीची जी दुःखे आहेत त्यात अस्सल, संवेदनशील माणसाला दिवसेंदिवस महिनोन्‌महिने, वर्षानुवर्ष बोलण्यासाठी फक्त स्वतःच उपलब्ध असणे हे दुःख अस्सल प्रतीचं आहे. नादिराच्या कथेत या प्रकारची जी व्याकुळता भरलेली आहे ती दिवसाचा

सूर्य अस्ताला गेल्यावर रात्री अधिकच काचत राहते. आपला सूर्य अस्ताला गेला आहे हे जाणवल्यावर कुणी आपल्याकडे येणारं नाही. कुणाचा फोन येणार नाही. कुणाला फोन केल्यावर आपल्यासाठी कुणाला वेळ नाही. हे सारं उमजून चुकल्यावर नादिरा गादीवर पडल्यापडल्या कशाकशाचा विचार करत असेल ? आणि कितीदा ? शेवटी झोपेनेही तिच्याशी संबंध तोडले होते. अश्वत्थाम्याच्याच दुःखाची प्रत ही, ती कवेत घेण्यासाठी एक तर बुध्द हवा नाहीतर ग्रेसांसारखा महाकवी तरी !

आजही कुठच्या तरी सिनेगॉगमध्ये (ज्यूंचे धर्मस्थान) बुरखा घेतलेली बाई स्वतःचं आयुष्य बदलून मागत फिरत असेल. ती बहुधा नादिराच असेल. भाटिया हॉस्पिटलमध्ये डॉ.अर्पिता द्विवेदींनी नादिराच्या मृत्यूची घोषणा केल्यावर मला जाणवलं की आपली एक गोष्ट नादिराला सांगायची राहिली.

'व्हॅलेंटाईन डे 'च्या दिवशी सिनेगॉगमध्ये जाऊन मी ती सांगून आलोय, ती गोष्ट म्हणजे 'आय लव्ह यू नादिरा !'

# परवीन बाबी

**प**रवीन मुहम्मद अली हे तिचं खरं नाव. ती मूळची जुनागढची. सारं शिक्षण अहमदाबाद युनिव्हर्सिटीतून तिने पूर्ण केलं. जुनागढ संस्थानच्या राजघराण्यात ती जन्माला आली आणि परवा परवा एकाकी अवस्थेत एका पायाला गॅंगरीन झालंल असताना केवळ भुकेमुळे ती मरण पावली.

सत्तरच्या दशकात परवीन बाबीच्या अदा पहाताना चुकूनही तिचा असा अंत होईल, असं कुणाला वाटलं नसेल. परवीन बाबीचा पहिला चित्रपट ‘ चरित्रहीन ’ पण तो काही खऱ्या अर्थाने तिचा पहिला गाजलेला चित्रपट नव्हे. पहिला गाजलेला

चित्रपट ‘ मजबूर ’ आणि खूपच खऱ्या अर्थाने बोलायचं झालं तर ‘ दीवार ’ दोन्हींमध्ये हीरो अमिताभ बच्चन. हिंदी सिनेमात मुळातच हिरॉईन ही खूपच दुय्यम मानली जाते. तिची भूमिका ही निव्वळ हीरोच्या हीरोगिरीला उठाव आणण्याकरताच लिहिली जाते. सत्तरच्या दशकात तर स्थिती अजूनच बिकट होती. त्या समोर हीरो अमिताभ बच्चन असेल तर मग विचारायलाच नको. अशा काळात परवीन बाबीने आपला ठसा पडद्यावर उमटवला. अमिताभ बच्चनबरोबर तिने आठ सुपरहिट चित्रपट केले. मुख्य म्हणजे या चित्रपटांत ती अमिताभसमोर उंचीला कमी वाटत नाही. हे केवळ शारीरिक उंचीपुरते मर्यादित नाही तर आत्मविश्वासाबाबतही तेवढेच लागू आहे. १९७७ साली जगप्रसिध्द ‘ टाइम ’ मासिकाच्या मुखपृष्ठावर परवीन बाबी झळकली. तो तिच्या आयुष्यातला एक सुवर्णक्षण. कारण ती एकमेव हिंदुस्थानी हिरॉईन हा पराक्रम करु शकली.

परवीन बाबीच्या आजाराबद्दल आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्यांबाबत मी जास्त लिहिणार नाहीए. कारण ते सारं सर्वविदित आहेच; परंतु परवीन बाबीने जी स्तवःची प्रतिमा स्वतःच्या आणि इतरांच्या मनात तयार केली, ती तिला कधीच पेलवता आली नाही. आधुनिक ग्लॅमगर्ल आणि मॉड फटाकडीची ती प्रतिमा होती. आयुष्याचा बहुतांश काळ आपण असेच आहोत असं मानत ती जगली; पण जर ती खरंच तशी असती तर तिला ते तसे असणे पेलवले असते. आपल्याला आपली एखादी प्रतिमा पेलवत नाही याचा अर्थ आपण तसे नसतो हा आहे. सत्तरच्या दशकात स्त्री-मुक्तीचे वारे हिंदुस्थानात जोरात होते. स्त्री-मुक्तीचा योग्य अर्थ न समजणाऱ्यांचीही त्यात चलती होत होती. बाईने दारु-सिगरेट पिणे, अनेक पुरुषांसोबत संबंध ठेवणे हीच स्त्री-मुक्तीची संकल्पना आहे, असे मानणारा एक मोठा वर्ग होता. मीडियात आणि पडद्यावर काही ग्लॅमगर्लनी या संकल्पनेचे प्रतिनिधित्व केले. प्रोतिमा बेदी, परवीन बाबी यांची नावे यामध्ये अव्वल क्रमाने घ्यावी लागलील; पण त्यातही परवीन बाबीची लोकप्रियता आणि ग्लॅमर कुणालाच लाभले नाही. आता मागे वळून बघताना वाटतं की, हे सारं नेमकं असं झालं असेल ? पैसे, मानमरातब, प्रचंड लोकप्रियता, स्वातंत्र्याची खोटी कल्पना, पराकोटीची असुरक्षितता आणि शेवटी कोसळणं... खोल खोल कोसळत राहणं. आजही परवीन बाबीचा मार्ग पत्करुन त्य कोसळण्याकडे वाटचाल करणाऱ्या शेकडो मुली आहेत. त्यातल्य बऱ्याचशा प्रसिध्द न होताच कोसळतील.

महेश भट्टनी ‘ अर्थ ’ नावाच्या चित्रपटात स्मिता पाटीलला जी भूमिका दिलेली होती वास्तविक आयुष्यात ती भूमिका परवीन बाबी जगत होती, हे आता उघड गुपित आहे. ते जगणे परिघावरचे होते, आपल्या आयुष्यात केंद्रच न सापडल्यामुळे परीघच घट्ट धरुन ठेवणारे ते जगणे होते. परिघ फिरत राहतो. केंद्र स्थिर असते. जे पकडून ठेवताच येत नाही ते पकडण्याचा अट्टाहास पराकोटीची निराशा आणि असुरक्षितताच देतो. त्या निराशेनेच परवीन बाबीला घेरले. अशा निराशेत असताना हिंदुस्थान काय आणि अमेरिका काय किंवा रजनीशांचा आश्रम काय आणि स्वतःचे घर काय सगळेच सारखे. हिंदुस्थानातल्या चित्रपटसृष्टीला रामराम ठोकून अमेरिकेत बरीच वर्षे राहून परतल्यावर परवीन बाबीने अमिताभ बच्चनवर सनसनाटी आरोप केले होते. ते तिच्या ढासळलेल्या मानसिक आजाराचे लक्षण मानले गेले, जे रास्तच होते. त्यानंतर तिने एकदा आपण मानसिक रुग्ण नसल्याचे ठणकासवून सांगितले; पण परत ९३ च्या बॉम्बस्फोटानंतर संजय दत्तविरुध्द सबळ पुरावा असल्यचा दावा करुन जिवाला धोका असल्यामुळे आपण तसे करु शकत नाही, असेही तिने सांगितले. हे लक्षण मानसिकदृष्टया ठीक असल्याचे निश्चितच नव्हते; परंतु याही काळात परवीन बाबीला भेटणाऱ्याला ती मानसिकदृष्टया ठीक नसावी असे अजिबात वाटत नसे.

अशाच एका दुपारी आर्ट प्लाझामध्ये मी परवीन बाबीला भेटलो होतो. तिच्या बरारीचा काळ पूर्णतः सरुन गेलेला होता. तिचा चेहरा अजिबात निरोगी दिसत नव्हता; परंतु त्याअगोदरचे वाढलेले वजन तिने पूर्णपणे काबूत आणलेले होते. मी कोणत्या तरी प्रेरणेने तिच्याशी बोलायला गेलो. ती अतिशय नीट बोलली; पण त्यात नैसर्गिक प्रेरणेचा अभाव होता. ती स्वतःवरच करडी नजर ठेवत बोलते आहे असं वाटतं. बोलण्यातला तर्क, संयोजन, विचार आणि व्यक्त करण्याची पध्दत ही ती काटेकोरपणे आणि कसोशीने सांभाळत होती. माझी आणि परवनी बाबीची ती एकमेव भेट. त्या भेटीचा माझ्या मनावर कोणातच ठसा राहिला नाही. त्या संध्याकाळीच ती भेट मी पूर्णपणे विसरुन गेलो. पडद्यावरच्या तिच्या प्रतिमेतला Desirable असण्याचा त्यात पूर्णतः अभाव होता. तिची त्यानंतर आठवण झाली ती परवा तिच्या मृत्यूच्या बातमीने.

तिच्या आयुष्यातले शेवटचे तीन-चार दिवस किती भयानक गेले असतील. डोळयांसमोरुन न हटणारा अंधार. मागेपुढे हलता भूतकाळ.

त्यातील असंख्य माणसं. बरेच पुरुष, प्रियकर, बॅंकातली खाती, संपत्ती आणि या साऱ्यांपुढे पोटातली न संपणारी भूक. उठण्याएवढेही शरीरात न उरलेले त्राण, गॅंगरीन झालेल्या पायाचं सडत जाणं. हळूहळू डोळयांसमोरचा फिकट होत गेलेला भूतकाळ. मग गडद अंधार. तसेच तीन दिवस. मग एका दुसऱ्याच अमिताभमुळे तिचा दरवाजा उघडला जाणे, अमिताभ गुप्ता, तिच्या सोसायटीचा सेक्रेटरी.

खरं तर मृत्यु आपणा सर्वांचीच सुटका करतो. गरीबाची तर फारच; पण अडीच कोटींचा फ्लॅट आणि प्रचंड संपत्ती असलेल्या फक्त ५० वर्षांच्या परवीन बाबीची मृत्यूने सुटका केली असं म्हणावं लागतं, तेव्हा तिच्या जगण्याने जितकी खोल खूण उपमटवली नाही एवढा तिचा मृत्यू खोल चरा उमटवतो.

भेटलेल्या आणि न भेटलेल्या माणसांचा एक गोफ आपल्या सर्वांच्याच मनाशी नकळत विणला जात असतो. त्या विणल्या जाणाऱ्या गोफाचा आपणही एक भाग असतो. या माणसांचं तत्काळ होणारं आकलन आणि अनुभवानं बनणारं त्यांच्याबद्दलचं आपलं मत हे या मानवी आयुष्याच्या व्यापारात चिरंतन नसतं. तरीही ते मत आणि त्या मताच्या प्रकाशात उभी रहाणारी चित्रं ही आपल्याला एक समज देतात. ज्या समाजाला कधी आपण इतिहास म्हणतो, कधी वर्तमान, तर कधी भविष्य....

ज्या माणसांच्या आयुष्याबद्दल आपल्याला काही कळलं असं वाटतं त्या माणसांबाबतचा हा इतिहास, हे वर्तमान, हे भविष्य आणि या तिन्ही काळात रमलेली ही, माणसं : भेटलेली, न भेटलेली.

नवचैतन्य प्रकाशन